म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय चरित्र
दा. क्र. ९५२१२

# महाराष्ट्राचा कर्मयोगी.



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

महाराष्ट्राचा कर्मयोगी.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# महाराष्ट्र-ग्रंथ-माला

३-२०
१/६
९

पुष्प १ लें

# महाराष्ट्राचा कर्मयोगी

अर्थात्

# लो. टिळकांचें चरित्र

( पूर्वार्ध )

लेखक— ' कर्मयोगी '

प्रस्तावना लेखक— दे. भ. माधवराव अणे B. A., LL. B.

शाखा. ९५२७२ दि

संपादक—

एकनाथ यादव निफाडकर

ग्रंथसंग्रहालय
९५२७२

( सर्व हक्क स्वाधीन )

आवृत्ती १ ली ] १९२० [ किंमत दीड रुपया

## श्रीमच्छंकराचार्य मठ करवीर आणि संकेश्वर यांचा आशिर्वाद

"आपल्या समतोल बुद्धीनें चालविलेल्या कर्मयोगाची भरभराट होवो ! आपल्या ठिकाणीं लोकमान्यांविषयीं जो ज्ञानपूर्ण आदर वसत आहे तो आपलें अहोरात्र कल्याणच करील."

# संपादकाचे दोन शब्द

" Indeed it is when a great nation is in great difficulties, that minds must exalt themselves to the occasion, or all is lost. " —Edmund Burke.

( खरोखरच एकादें राष्ट्र महदापत्तींत सांपडलें म्हणजे सूज्ञांनीं आपत्ति जाणूनच व अंतःकरण विशाल करून-संकटांना टक्कर दिली पाहिजे. नाहीं तर तें राष्ट्रच ढासळतें ) —एडमंड बर्क

**भगवान् श्रीकृष्ण** परमात्म्याच्या कृपाप्रसादानें आमच्या " महाराष्ट्र-ग्रंथ माले "स, **लोकमान्य बाळ गंगाधर टिळक** यांच्या चरित्रामृतापासून आरंभ झाला. ...... होणाऱ्या गोष्टी कांहीं झाल्याशिवाय राहत नाहींत. परंतु लोकमान्यांच्या ह्यातींतच आमचें हें " लोकमान्यचरित्र " लिहिलें गेलें असतें तर फार फार चांगलें झालें असतें. कारण एक तर हें त्यांच्या स्वतःच्या अवलोकनांतून प्रकाशनाच्या अगोदर गेलें असतें, व तितकेंच हें अधिक शुद्ध व सत्यपूर्ण झालें असतें. आज तें असत्यानें भरलें आहे असें नाहीं. परंतु प्रत्यक्ष चरित्रनायकापेक्षां त्याच्या चरित्र-सत्याची जाणीव इतरांना असणें असंभाव्य आहे, हें कोणी हि नाकबूल करणार नाहीं. त्यांतहि दुःखाची गोष्ट आणखी अशी कीं, प्रस्तुतच्या चरित्र-पूर्वार्धांत ज्या सन्मान्य व्यक्तींचीं नांवें प्रमुखतेनें आलीं आहेत, त्यांपैकीं एका, रा. सा. श्रीधर बाळकृष्ण उपासनींच्या खेरीज कोणीच आज ह्यात नाहींत. परमेश्वराच्या कृपाप्रसादानें लोकमान्यांच्या अत्यंत जिवलग स्नेह्यांपैकीं निदान् रावसाहेब तरी आहेत. अर्थातच ते आमच्या धुळ्याचेच नागरिक व आमच्या वडिलांचेहि एक स्नेहि असल्यामुळें आह्मांला त्यांच्या माहितीचा अतोनात फायदा झाला. अथवा त्यांच्या या अमूल्य मदतीशिवाय प्रस्तुतचा ग्रंथ निर्माण होणें सर्वथैव असंभाव्य झालें असतें यांत शंकाच नाहीं. आमची कल्पना आहे कीं लोकमान्यांची शैक्षणिक कालांतली माहिती दुसरीकडे असली तर कदाचित् स्वतः लोकमान्यांच्याच दप्तरांत आढळेल. परंतु तसें असतें तर रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं ३ ऑगस्टच्या केसरींत " लोकमान्यांना एका प्रो. वर्ड्स्वर्थखेरीज दुसऱ्या कोणाहि प्रोफेसरांविषयीं आदरबुद्धि वाटत नसे, " असें लिहिलें नसतें. श्री. उपासनींच्या " आठवणींत " सदरहु प्रोफेसरांचा उल्लेखहि नाहीं. कै. रा. सा. गो. वा. कानिटकर यांच्या " आठवणींतहि "

प्रोफेसरमजकुरांचा उल्लेख नाहीं. तथापि रा. सा. उपासनी सांगतात कीं मध्यंतरीं एका टर्मपुरते, लो. टिळक मुंबईला एलफिन्स्टन कॉलेजांत गेले होते तेथें मात्र प्रो. वर्डसवर्थ हे असत. परंतु त्यांचा जो इष्ट परिणाम लोकमान्यांवर झाला, त्यापेक्षांहि जास्त पुण्यालाच प्रो. शूट यांचा झाला, असें रा. उपासनी सांगतात; आणि त्या प्रोफेसरांची तर रा. केळकर मोजदादहि करित नाहींत! तेव्हां एक तर रा. केळकरांनीं लोकमान्यांचीं दप्तरें अजून पाहिलीं नसतील. किंवा कदाचित् इतक्या आरंभींची टांचणें लोकमान्यांनीं करून ठेविलीहि नसतील. त्यांना, अॅनी बिझा-न्टप्रमाणें, वाङ्मयाचे सगळे प्रान्त, लेखणीवर बसून आक्रमायला वेळ होता कोठें? तथापि त्यांचीं टांचणें नसतील यापेक्षां रा. केळकरांकडून दप्तरें वाचायचीं राहूनच गेलीं असावींत. तें कसेंहि असो. आज सगळ्या महाराष्ट्रांत लोकमान्यांचें दप्तर किंवा रावसाहेबांच्या आठवणी याव्यतिरिक्त तिसरा विशेष खात्रीलायक पुरावा, लोकमान्यांच्या शैक्षणिक कालांतील एका विभागाविषयीं, खचित नाहीं वास्तविक दप्तर व आठवणी यांचा ताळमेळ घालून नंतर मजकूर प्रसिद्ध करावयास हवा होता, परंतु आज त्या महाराष्ट्रीय कर्मवीराचें चरित्र अत्यंत जलदीनें प्रसिद्ध व्हावें अशीच समाजस्थिति आहे. प्रस्तुत चरित्रांतल्या चुक्या दुरुस्त करितां येतील. परंतु प्रस्तुतचा काळ, योग्य वाङ्मयाशिवाय जाऊं दिल्यास, ती घोड चूक होईल. आमच्या "**कर्मयोगी**" मासिकांतून याचीं कांहीं पानें प्रसिद्ध झाल्याबरोबर आह्मांला जीं शेकडों पत्रें आलींत त्यांवरून, ज्या जनतेकरितां लोकमान्य अहोरात्र, बारमहा अष्टकाळ, झटत राहिले, व अखेर "मारतां मारतां मेले," त्या जनतेला आज त्यांच्या चरित्रामृताची किती जरूर आहे हें आह्मांला दिसून आलें. लोकमान्यांचें चरित्र अमृताप्रमाणें आहे. तें चिरोलनें लिहिलें तरी त्याचें अमृतत्व नष्ट होणार नाहीं. मग आमच्यासारख्या एका महाराष्ट्रीय भक्तानें लिहिल्यास मूळची गोडी जाईल अशी भीतिच नको. इक्षुदंड लहान मुलानें मोडला ह्मणून काय त्याची गोडी कमी होईल? उलट त्या लहानग्यालाच आनंदाच्या निर्व्याज मिटक्या मारितां येतात. आह्मी आणून आहोंत कीं आह्मी अल्पमति आहोंत. परंतु आमचे महाराष्ट्र-बंधूहि आह्मांला सांभाळून घेण्याइतके प्रेमळ आहेत हें हि आह्मांला माहित आहे. तेव्हां त्यांच्याच आग्रहावरून व त्यांच्याच जरूरीप्रमाणें आह्मी आज लोकमान्यांच्या चरित्राचा "पूर्वार्ध" प्रकाशित करित आहोंत. "उत्तरार्ध" लवकरच म्ह. एप्रिल–मे मध्यें देऊं. तोहि साधारणपणें एवढाच होईल. झाला तर थोडासा मोठाच होईल; त्यांतहि फोटो घालूं. तरी किंमत यापेक्षां जास्त ठेवणार नाहीं. पूर्वार्धाला इतकी मागणी आहे कीं, बहुतकरून एप्रिल–मेच्याच सुमाराला द्वितीयावृत्ति काढावी

लागेल. तेव्हां ज्यांना पहिल्या आवृत्तीचीं पुस्तकें मिळालीं नाहींत, त्यांनीं जरूर नांवें नोंदवावींत. म्हणजे त्यामानानें द्वितीयावृत्तीपुढें तृतीयावृत्तीची वाट पाहण्याची त्यांना जरूर पडणार नाहीं. आजच्या भयंकर महागाईच्या दिवसांत ३०० पृष्ठांचा व २० फोटोंचा ग्रंथ अवध्या ३ रुपयांत देणें अशक्य आहे. तरीपण ही सबंध मालाची माला लोकमान्यांच्या प्रसादानेंच निघाली असल्यामुळें त्यांचेंच जनता-पूजनाचें व्रत आम्ही चालविलें पाहिजे; तें आमचें आद्यकर्तव्य आहे. या मालेचें उद्देशपत्रक व नियम याच ग्रंथांत छापिले आहेत. ते पाहून कायमचे ग्राहक व्हावें अशी विनंति आहे. आमचे मित्र रा. भा. ग. साठे बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं या चरित्राचें इंग्रजींत व हिंदींत भाषांतर करण्याचें अभिवचन दिलें आहे.

आतां आभारप्रदर्शनाचें आनंदाचें काम राहिलें. प्रथमतः **रा. सा. श्रीधर बाळकृष्ण उपासनी** यांचे आभार मानणें अत्यंत जरूरीचे आहेत. त्यांचे आमच्या कर्मयोगीवर व महाराष्ट्रग्रंथ–मालेवर किती प्रेम आहे हें एकाच गोष्टीनेंहि कळून येईल. टिळकांच्या खास अंकांत त्यांचा लेख यावा अशी आम्ही त्यांना आग्रहाची विनंती केली तेव्हां त्यांची नात अत्यवस्थेंत होती. परंतु हें आम्हांला माहित नव्हतें. आमची विनंति ऐकून व लोकमान्यांची आठवण होऊन त्यांना वाईट वाटलें. हुंदका आला, पण तो त्यांनीं तसाच गिळून टाकिला. पुढें त्यांनीं आम्हांला म्हटलें " मी बोलतों तुम्ही लिहा. " दुःखाचा भर सरा, पण जिवलग स्नेह्याच्या आठवणी. ते लवकरच आठवणींत गुंग झाले. इतके कीं त्यांच्या सांगण्याच्या गतीशीं आम्हांला बरोबरी करितां येईना. अर्थातच आम्ही टांचणें करून घेतलीं. तीं संपवून वरती पाहिलें तर प्रेमळ ममाच्या रावसाहेबांच्या नेत्रांतून अश्रूंचे ओघळ गालांवरून पुसून टाकलेले आम्हांला दिसले. लगेंच दुसऱ्या दिवशींच ते कोर्टांतील कारकुनांच्या परिषदेला पुण्याला गेले. परंतु तिसऱ्या दिवशीं त्यांची नात जेव्हां आसन्नमरण झाली असें आम्हांला कळलें, तेव्हां आमची, भलत्याच वेळेला आग्रह करण्याची चूक आम्हांला कळून आली. पुढें नातहि वारलीच. रावसाहेबदेखील नंतर परत आले. त्या गोष्टीला [illegible]चार महिने झाले. परंतु रावसाहेब लोकमान्यांची आठवण काढून अजून हळहळतात. 'त्यांचें दुःख विसरणें आतां शक्यच नाहीं' असे रावसाहेबांचे नेहमींचे उद्गार आहेत. वाचकांनो, आपणहि असेच उद्गार काढितों. पण आपल्या व राव-साहेबांच्या उद्गारांत किती तरी फरक आहे; असो.

रावसाहेबांनंतर ज्यांचे मनापासून आभारांबरोबर उपकारसुद्धां मानायचे असे थोर पुरुष **देशभक्त शंकर श्रीकृष्ण देव** होत. देवांनीं रा. सा. उपासनींना जाहीररीत्या, हजारों लोकांसमक्ष " उपासनी लोकमान्यांचे धाकटे बंधु, म्हणून माझे चुलते होत ," असें म्हटलें व त्यांना नमस्कारिलें, इतकें सांगितलें म्हणजे त्यांच्या व आमच्या " आपले पणाची " निराळी ओळख करून देण्याचें कारणच

गल्या

नाहीं. चरित्रनायक लोकमान्य, माहिती पुरविणारे रा. उपासनी, व मुद्रक आणि प्रोत्साहनदाते दे. भ. देव या त्रिमूर्तींचा सुंदर मिलाफ, आमच्यासारख्या साधारण लेखकाच्या ग्रंथमालेला पावन करील हें काय सांगायला हवें ? मनांत हेतू आहे कीं या त्रिमूर्तींचा फोटो उत्तरार्धांत तरी घालावा. काय परमेश्वरी योजना असेल ती खरी.

त्यानंतर ज्यांचे आभार मानावयाचे असे आणखी कांहीं देशभक्त आहेत. आजचें हें लोकमान्यांचें गायन ज्या देशभक्तांनीं करण्यास मदत केली त्यांचे आभार कसे मानावे हेंच समजत नाहीं. आमच्या एका शब्दाला मान देऊन ज्यांनीं आपलीं सर्व कामें बाजूस सारून हें कार्य केलें त्यांचा उघडपणें नामनिर्देश-हि करण्याची त्यांची आह्मांला परवानगी नाहीं. त्यांचे आह्मी अत्यंत ऋणी आहोंत. दुसरे देशभक्त यवतमाळचे प्रसिद्ध **माधवराव अणे** यांनीं गर्दींत असतांनाही आपली विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना लिहून दिली याबद्दल यांचे आभार मानणें अवश्य आहे.

अखेर **महाराष्ट्रीय बंधुभगिनींनो**, आपले आभार मानावयाचे. परंतु तुमच्या ठिकाणीं आमचा मीपणाच उरत नाहीं. ज्ञानेश्वर ह्मणतात, पाण्यांत मीठ जसें विरघळून तद्रूप होतें, आह्मी ह्मणतों ज्ञानेश्वरींत जसा मुमुक्षु तल्लीन होतो, त्याप्रमाणें, महाराष्ट्रीय जीवात्म्यांनो, आपण सगळेच त्या एका महाराष्ट्रदेवाच्या, **लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या** चरित्रसुधेंत एकजीवच आहोंत. तस्मात् ( अर्पणम् )

**“ सर्वमेतल्लोकमान्यार्पणमस्तु ”**

धुळें–लोकमान्यपेठ
२३ दिसेंबर १९२०

एकनाथ यादव निफाडकर

# प्रस्तावना.

Now is the stately Column broke
The beacon-light is quenched in smoke
The trumpet's silver sound is still
The warder silent on the hill.
—Sir Walter Scott

२१ जुलैच्या मध्यरात्रीं भरतखंडाच्या राजकीय क्षितिजावर आपल्या दैदीप्यमान प्रभेनें ४० वर्षे चमकणारा तारा एकाएकीं तुटून पडला; व त्याबरोबर चोहोंकडे एकदम काळी कभिन्न काळोखी पडल्यासारखी स्थिति झाली. या विस्तीर्ण देशांत इतस्ततः पसरलेल्या हजारों लहान मोठ्या सार्वजनिक कार्यांची नौका हांकणाऱ्या व दास्यस्थितीच्या तुफान झालेल्या दर्यांतून भारतीय समाजाला पैलथडीला नेऊन पोंचविण्याच्या उद्योगांत मग्न असणाऱ्या नाविकांना एकाएकीं दिशाभूल झाल्यासारखें वाटूं लागलें. आपल्या हातांतील वल्हीं जोरानें मारून नाव पुढें नेण्याचें काम बंद पडलें इतकेंच नव्हे; तर तुफानाचा वेग व क्षोभ वाढल्यामुळें त्यांत सांपडून आपली नौका पैलथडीच्या ऐवजीं समुद्राचें तळ गांठील कीं काय या विवंचनेंत ते पडले. स्वराज्यदेवीचें मनोहर मंदिर उभारण्याचें कामास सुरवात झाली. जमीनींत पाया खोल खणून तो भरून काढण्याचें काम नुकतेंच संपून त्यावरील उभारल्या जाणाऱ्या सुरम्य मंदिराचा थोडासा भाग वर आलेला दृष्टीस पडावयास लागला. आणि जिकडे तिकडे मोठ्या आस्थेनें व वेगानें काम सुरू असल्यामुळें अल्पावधींत हें कार्य पुरें होऊन त्यांत स्वराज्यदेवीची मोठ्या थाटमाटानें प्राणप्रतिष्ठा झाल्याचा मंगल प्रसंग पाहण्याचें सद्भाग्य लाभण्यास फार काळ लागणार नाहीं अशी बलवत्तर आशा वाटावयास लागली होती. इतक्यांत या भावी मंदिराचा आधारस्तंभ एकाएकीं कोसळून कडाडून खालीं आला. आणि सर्वत्र दिङ्मूढता उत्पन्न झाली.

सार्वजनिक कार्य करण्याच्या उत्साहावर विरजण पडून कर्तव्यप्रोत्साहनमापक यंत्रांतील पारा लोकमान्यांच्या अकालिक व आकस्मिक निधनामुळें जितका एकदम खालीं उतरला, तितका दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूमुळें हिंदुस्थानांतच नव्हे तर जगांतील दुसऱ्या सुधारलेल्या देशांत सुद्धा गेल्या

शें दोनशें वर्षांत उतरला असेल असें आह्मांस वाटत नाहीं. वायुभारमापक यंत्रांतील पारा खटकन् खालीं उतरल्याबरोबर ज्याप्रमाणें वातावरणांत एखादें प्रचंड वादळ लवकरच उठणार असें वायुमापन शास्त्रवेत्ते निःसंशय सांगू शकतात, त्याचप्रमाणें लोकमान्यांच्या निधनामुळें कार्यकर्त्यां वर्गांत उत्पन्न झालेला निरुत्साह, विषण्णता, व दिङ्मूढता लक्षांत घेतली असतां व त्यांचा कोणत्याहि पक्षाला चिकटून न राहतां, सर्व साधारणपणें विचार केला असतां भरतखंडाच्या राजकीय वातावरणांत कांहीं तरी भयंकर उत्पात उठण्याचें हें पूर्वचिन्ह आहे असें ह्मणावयास हरकत नाहीं. व अशा आगामी संकटांतून राजकीय चळवळीची नौका कौशल्यानें हांकारण्याचें व तिला पैलथडीस नेण्याचें अथवा एखाद्या वादळाचा वेग निघून जाई पर्यंत एखाद्या सुरक्षित बंदरांत नांगरण्याचें सामर्थ्य असलेला निधडा नावाडी किंवा कुशल कैवर्तक आपणांत नाहीं यामुळें तर लोकमान्यांवर निःसीम प्रेम करणाऱ्या हिंदिजनतच्या अंतःकरणांत प्रियवस्तुवियोगरूपानें उत्पन्न झालेल्या दुःखाच्या ज्वाला अधिकच जोरानें भडकूं लागल्या आहेत. व यामुळेंच, दावाग्नींत सांपडलेल्या हरिणीप्रमाणें ती मार्गांतील संकटांविषयीं अंध बनून सैरावैरां वाटेल त्या दिशेनें पळूं लागली आहे.

अशा भयानक स्थितींत निश्चित मार्ग चोखाळण्याचा कांहीं खात्रीचा उपाय असेल तर त्या लोकोत्तर विभूतीच्या समग्र चरित्राचा निरनिराळ्या दृष्टीनें विचार करून त्यांतून दिग्दर्शित होणाऱ्या कर्तव्यतत्त्वांची कांस घट्ट धरून असणें हाच होय. लोकमान्यांचीं जितकीं चरित्रें प्रसिद्ध होतील तितकीं आज एवढ्याच कारणाकरितां अत्यंत अवश्यक आहेत. ज्या तत्त्वावरील दृढ व निश्चल निष्ठेमुळें लोकमान्यांना आपल्या आयुष्याचा कंटकमय मार्ग निर्भयतेनें आक्रमण करतां आला व राष्ट्रीयकार्यांत एक प्रकारचें तेज व सामर्थ्य उत्पन्न करतां आलें त्या तत्त्वांचें उद्घाटन वारंवार होणें आजच्या परिस्थितींत अत्यंत जरूरीचें झालें आहे.

त्यांच्या हयातींत त्यांचा पाडाव करण्याच्या ईर्षेनें प्रामाणिक मतभेदाच्या नांवाखालीं अनेक प्रयत्न झाले. पण ते सर्व फुकट गेले. ' सामाजिक सुधारणेचा द्वेष्टा ' अशी खोटीच आरोळी उठवून त्यांच्या जिवलग व कार्यकर्त्या स्नेह्यांनीं त्यांजवर जो भडिमार केला त्याखालीं लोकमान्यांपेक्षां कमी योग्यतेची दुसरी एखादी व्यक्ति चूर होऊन गेली असती. परंतु त्यांच्या

बुद्धिमत्तेचा व कर्तृत्वाचा असा कांहीं विलक्षण प्रभाव दृष्टीस पडतो कीं त्या भडिमारामुळें लोकमान्यांचा नायनाट न होतां त्यांच्या प्रतिपक्षांचीच दमछाट झाली. व आज त्या सर्वांचा लोकमान्यांचे प्रतिपक्षी एवढेंच इतिहासांत गौरवानें उल्लेख होण्याचें भाग्य त्यांना लाभलेलें आहे. सामाजिक रणक्षेत्रावर आपली सर्व करामत खर्च करून हि लोकमान्यांच्या विजयी रथाचा अप्रतिहत गति कुंठित करतां येत नाहीं हें पाहून नाउमेद न होतां राजकीय युद्धभूमीवर त्यांच्याशीं पुन्हां सामना देण्याकरितां नवीन नेमस्त पथक बनवून निकराचा मारा करावयास त्यांनीं सुरुवात केली व याच विरोधाचा परिणाम म्हणून लोकमान्यांना राजकीय सभांतून अपमान व कारागृहांतून हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या.

त्यांच्या देशांतील जनतेंत नवीन स्वातंत्र्यजीवन वोपण्याच्या प्रत्येक प्रयत्नास प्रतिपदीं विरोध करण्याचें कंकण ज्यांनीं आपल्या हातांस बांधलें होतें असा बुद्धिमान् व इतर रीतीनें पूज्य असलेल्या लोकांचा मोठा वजनदार वर्ग, त्यांच्यांशीं गेल्या चाळीस वर्षांत कसा कसून प्रयत्न करीत होता व त्यांच्यांशीं झुगडून लोकमान्य आपला मार्ग कसा धैर्यानें व कुशलतेनें काढीत होते व आपला अनुयायी वर्ग वाढवीत होते हा इतिहास जर या देशांतील लोकांना नीट समजला नाहीं तर लोकमान्यांच्या चरित्रापासून घ्यावयाचा खरा बोध त्यांना कधींच प्राप्त होणार नाहीं. हजारों कसलेल्या वीरांकडून शस्त्रास्त्रांचा सारखा भडिमार होत असतां निर्भयरीतीनें कौरवसेनासमुद्रांत प्रवेश करणारा अर्जुन भीष्मद्रोणासारख्या युद्धनिष्णात सेनानींनीं बुद्धिमत्तेनें रचलेल्या व्यूहाचा भेद करून कौरवसेनेची दाणादाण करून टाकून सायंकाळीं आपला विजयीरथ प्रसन्न शिबिराकडे फिरवून आपल्या सारथ्याशी तत्त्वज्ञानाच्या गूढ प्रश्नावर शांतपणें वादविवाद करीत चालला आहे, हा भारतीय देखावा डोळ्या पुढें उभा रहाण्यासारखें एखादें उज्वल चरित्र या मलिन कलियुगांत झालें असेल तर तें लोकमान्याचें आहे हें आम्ही निःसंशय म्हणूं शकतो. आणि यामुळेंच त्यांच्या चरित्रपरिशीलनानें व चारित्र्यानुकरणानें राष्ट्रोद्धार होणार असा आमचा दृढ विश्वास आहे.

लोकमान्यांची उत्कट देशभक्ति व तत्प्रीत्यर्थ त्यांजकडून प्रतिक्षणीं होत असलेला स्वार्थत्याग हा सूर्यप्रकाशाइतका स्पष्टपणें दृष्टीस पडत असतां त्याजवर, सरकार आणि आमच्यांतील बराच मोठा समंजस म्हणवून घेणारा वर्ग

यांची वक्रदृष्टि किंवा रोष होता ही गोष्ट निर्विवाद आहे. व लोकमान्यांच्या निःसीम भक्तमंडळांत सुद्धां असे कांहीं लोक आहेत कीं ज्यांना या कोड्याचा उलगडा होत नाहीं व त्यामुळें त्यांच्या मनाला एक प्रकारची तळमळ लागल्यासारखी दिसून येते. लोकमान्य व इंग्रज अधिकारी यांमध्यें गेल्या चाळीस वर्षांत सारखा बेबनाव किंबहुना वैमनस्य होतें असें ह्मणावयास हरकत नाहीं. ते भाषणांतून किंवा लेखांतून सरकारी अधिकाऱ्यांसंबंधीं अतिशय कडक भाषा वापरीत असत; यामुळें वैमनस्य हें उत्पन्न झालें अशी कांहीं लोक आपल्या मनाची समजूत करून घेतात. परंतु आमच्या मतानें ही त्यांची समजूत सर्वथैव चुकीची आहे. ज्या सेव्यसेवक नात्यावर हिंदुस्थान व इंग्लंड यांचा संबंध कायम ठेवण्याची इंग्रजी अधिकाऱ्यांची इच्छा होती व आहे त्या नात्याचे लोकमान्य टिळक हे प्रथमपासून कट्टे शत्रू होते. इंग्लंड व हिंदुस्थान यांचा योग परमेश्वरी योजनेनुसार झाला असल्यामुळें तो कायम ठेवूनच आपल्या सर्व सार्वजनिक चळवळी चालविल्या पाहिजेत असें ह्मणणारा एक राजकीय सुधारकांचा वर्ग लोकमान्यांच्या अगोदर पासूनच अस्तित्वांत आला होता. इंग्रज अधिकारीवर्गाच्या मतानें हिंदुस्थानांतील रयतेस देतां येण्यासारखें असेल तेवढें सुख देण्याची इंग्लंडनें खटपट करणें हें त्यांचें कर्तव्य असलें तरी इंग्लंड व हिंदुस्थान यांमधील सेव्यसेवक संबंध कायम ठेवणेंच उभयतांच्या हिताच्या दृष्टीनें अवश्य आहे. वरील दोन्ही मतें लोकमान्यांना मान्य नव्हतीं. व त्यांनीं आपल्या सर्व आयुष्यभर या दोन्ही मतांचें खंडन करीत असतां स्वतः जरी हद्दपारीची शिक्षा भोगली तरी या मतांला हि हद्दपारीची शिक्षा द्यावयास विलायत सरकारला भाग पडलें. तारीख २० ऑगस्ट १९१७ चा जाहिरनामा ह्मणजे वर उद्धृत केलेल्या दोन्ही मतांवर सार्वभौम सरकारनें दिलेल्या हद्दपारीच्या शिक्षेची सुनावणीच ... आहे.

दोन परस्परविसंवादी संस्कृतींचें साहचर्य सेव्यसेवक संबंधांत शाश्वत टिकूं शकत नाहीं हा सिद्धांत लोकमान्यांनी संमतिवयाच्या कायद्याविरुद्ध जेव्हां सिंहगर्जना केली त्याचवेळीं त्यांनीं प्रतिपादन केला आहे. जेत्यांना आपल्या राजकीय वर्चस्वाचा फायदा घेऊन जितांच्या संस्कृतीस गिळून टाकण्याचा अनावर मोह उत्पन्न झाल्याशिवाय राहणें शक्य नाहीं. त्यामुळेंच कधीं नीती-च्या नांवाखालीं, तर कधीं अनाचारनिवारणाचें पांघरूण घेऊन अत्यंत साव-

धमिरीनें राजकर्त्यांकडून होत असलेल्या चोरट्या प्रयत्नांस चव्हाट्यावर आण-ण्याचा त्यांनीं आटोकाट प्रयत्न केला; व सर्व देश हालवून जागा केला. व राजकीयसत्ता अधिकारीवर्गाच्या हातून हिसकावून ती हिंदीजनतेच्या हातांत आल्याशिवाय स्वसंस्कृत्यनुरूप आपली प्रगति करून घेऊन जगांतील सुधा-रलेल्या राष्ट्रांच्या पंक्तीस भरतखंडास बसविण्याचा उद्योग यशस्वी व्हावयाचा नाहीं हा विचार त्यांनीं कायम केला. व तेव्हांपासून लोकजागृतीच्या कार्याची दिशा त्यांनीं जी आखून टाकली त्या बरहुकूम आपल्या चळवळी चालविण्यास सुरवात केली.

या सर्व चळवळींत देशाची राजकीय सत्ता जनतेच्या हातांत असणें व त्या करितां अहर्निश खटपट करणें एवढेंच त्यांचें धोरण होतें, हें ध्येय सिद्ध होण्याकरितां जगांतील इतर लोकांनीं जे प्रयत्न केले तेच हिंदुस्थानांतील जनतेला परिस्थितीच्या मानानें कमीजास्त फरक करून करावयाला पाहिजे हा त्यांचा ठाम सिद्धांत होता. जनतेंत राजकीय हक्कांची जाणीव उत्पन्न झाल्याशिवाय या नवीन झगड्यांत यश येणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं लोक-शिक्षणाच्या कार्यांत आपणांस वाहून घेतलें. प्राचीन संस्कृतीविषयीं सुशिक्षित वर्गांत पसरलेलें औदासिन्य व परकीय लेखकांनीं अज्ञानानें किंवा बुद्धिपुरःसर केलेल्या चुकीच्या सिद्धांतामुळें उत्पन्न झालेला अनादर दूर होण्याकरितां वैदिक वाङ्मयाचा आस्थापूर्वक अभ्यास करून त्रिखंड पंडीतांस मान्य होईल अशी ग्रंथरचना केली. सामान्य जनतेंत मिशनरी व समाजसुधारक यांच्या मूर्खपणानें सुप्तप्राय होणाऱ्या धर्मश्रद्धेचें पुनरजीवन करून धार्मिक उत्सव व प्रकृतव्यवहार यांची सांगड घालण्याकरितां निरनिराळ्या धार्मिक उत्सवांस सार्वजनिक ज्ञानसत्राचें स्वरुप देऊन धर्म व व्यवहार यांची हजार वर्षांपूर्वी झालेली फारकत नाहींशी केली, व धर्म-व्यवहार किंवा व्यावहारिक धर्म हा मोक्षप्रतिकूल नसून प्रवृत्तींतूनच मोक्षाची व परमपुरुषार्थाची प्राप्ति कशी करून घेतां येते व त्याच संबंधानें प्राचीन ऋषी व तत्ववेत्ते यांनीं काय तात्त्विक उपपत्ति बसविली आहे; याचा सशास्त्र व चिकित्सक बुद्धीनें चर्चा करणारा व कर्मयोगाचा सिद्धांत प्रतिपादन करणारा एक अलौकिक तात्त्विक ग्रंथ निर्माण केला. स्वदेशाचा इतिहास, स्वभाषा व वाङ्मय या वरील प्रेम वृद्धिंगत होण्याचे नवीन मार्ग शोधून काढलें व प्रबळ देशभक्तीच्या अज-रामर उदाहरणांनीं खचून भरलेल्या मराठ्यांच्या इतिहासाविषयीं व ऐतिहा-

सिक वीर व थोर विभूतीविषयीं अपरंपार प्रेम उत्पन्न केलें. राजकीय ध्येयावरील सामान्य जनतेची दृष्टि स्थिर होऊन तत्प्राप्त्यर्थ संकलित प्रयत्न करण्याची संवये उत्पन्न होण्याकरीतां स्वराज्यसंघासारख्या संस्था स्थापन करून अधिकारी वर्गाच्या निरर्गल सत्तेवर आघात घालणारें नवीन शस्त्र जनतेच्या हातांत दिलें. आणि " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे " या मंत्राची दीक्षा सर्व राष्ट्राला देऊन त्यांजकडून अनुष्ठान करावयास सुरुवात केली. हें अनुष्ठान निर्विघ्न रीतीनें पार न पडावें ह्मणून अधिकारी वर्ग व स्वार्थलोलुप परकीय लोक यांच्या होणाऱ्या उपसर्गावर कांहीं तरी तोड काढतां यावी ह्मणून आजकाल सर्व जगभर पसरणाऱ्या मजूरपक्षाशीं संगनमत करण्याकरितां शिष्टाई केली व या दिशेनें पुढें व्हावयाच्या प्रयत्नाचा भरभक्कम पाया घातला.

आत्मविश्वास, स्वावलंबन, प्रतिकारसामर्थ्याची वृद्धि व शिष्टानुकूलता या साधनचतुष्टयानें संपन्न होऊन जर मुमुक्षु भारत आपल्या उद्योगाला लागला तर त्याच्या उद्धाराचा दिवस कोणास हि लांबवतां येणें शक्य नाहीं.

त्यांनीं इतक्या सर्व गोष्टी आधीं केल्या आणि मग सांगितल्या. जगदुद्धाराच्या गोष्टींत राष्ट्राचें मन प्रचलित परिस्थितींत गुंतविल्यास राष्ट्रोद्धाराचे कार्य मागें पडेल. त्याचप्रमाणें कौटुंबिक सुख अथवा सामाजिक सोय असल्या संकुचित प्रयत्नाच्या पाठिमागें बसलें असतां सत्ताधाऱ्यांशीं चाललेल्या सनदशीर युद्धांत दाखवावयाच्या कर्तबगारींत ऐन आणीबाणीच्यावेळीं न्यूनत्व व वैगुण्य येणार हा त्यांचा दृढ विश्वास असल्यामुळें वरील दोन्ही प्रकारच्या प्रयत्नांत हिंदी जनतेनें कांहीं विशिष्ट मर्यादेपलीकडे लक्ष घालण्याचें प्रयोजन नाहीं हें ते नेहमीं प्रतिपादन करीत असत. राष्ट्रीयत्वाच्या भावनेच्या त्वरित परिपोषास प्रत्यक्ष किंवा पर्यायानें विघातक होणाऱ्या सर्व चळवळीविषयीं त्यांचें प्रायशः औदासिन्य होतें तें एवढ्यामुळें होतें. हल्लींच्या आपत्तींतून बाहेर पडण्याकरितां सुरू झालेल्या झगड्यांत यश प्राप्ति व्हावयाची गुरुकिल्ली ह्मणजे सर्व देशभक्तांचीं अंतःकरणें राजकीय स्वातंत्र्य प्राप्तीच्या एका बिंदुवर केंद्रित झालीं पाहिजे. व अशीं तीं व्हावीं ह्मणून प्रसंगविशेषीं थोडीबहुत माघार घेण्यास ते केव्हां ही तयार असत. उत्तम सेनापति ज्याप्रमाणें आपला हल्ला चढविण्यापूर्वी आपल्या सेनेंतील सर्व लहान मोठ्या पथकांची शक्ति अजमावून नंतर हल्ला चढविण्याची वेळ व स्थळ मुक्रर करतो त्याचप्रमाणें लोकमान्य हे नेहमीं जनतेंतील प्रतिकारसामर्थ्य

९५२९२

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचें चरित्र

## प्रकरण १ लें

### बाळपण

### १८५६-१८७२

९५२९२

**तेजसां हि न वयः समीक्ष्यते**

रघुवंश—११-१

जो तो आपापलें इहलोकींचें विहित कार्य करून जातो, ही गोष्ट जरी अगदीं अनुभवसिद्ध असली तरी अमका प्राणी आपलें ठरलेलें काम करून गेला कीं नाहीं हें ठरविणारे दोघे असल्यामुळें त्यांचें मतैक्य क्वचितच जुळतें. ज्या चिच्छक्तीनें प्राण्याला उत्पन्न केलें व त्याचें पालणपोषण करून संवर्धन केलें तिला त्या प्राण्याचें कार्य केव्हां संपलें व त्याचा इहलोक सोडून जाण्याचा समय केव्हां प्राप्त झाला हें माहित असतें. पण खुद्द त्या प्राण्याला आणि त्याच्या पश्चात् त्याच्या आप्तेष्टांना त्याचें नियोजित कार्य संपलें, व त्याची मृत्युवेला अगदीं योग्य अशीच ठरली असें बहुधां वाटत नाहीं. जे प्राणी केवळ बाळपणांतच वारतात त्यांची तर गोष्टच बोलायला नको; त्याचप्रमाणें जे तरुणपणांतच मृत्युलोक सोडून चालते होतात त्यांच्या निधनसमयाची योग्यता सिद्ध होणें तितकेंच अशक्य आहे; पण ज्याचीं सर्व गात्रें गलित होऊन एकही गात्र कार्यक्षम राहिलें नाहीं, अशा वृद्धाच्या मृत्यूविषयींसुद्धां " म्हातारा मेला खरा, पण काल सोकावला " असे असमाधानकारकच उद्गार निघतात. विधिघटनेची मनुजेच्छेशीं इतकी फारकत कां व्हावी याचें मूळ कारण दुसरें तिसरें कांहीं नसून मनुष्याप्राण्याला जगण्याची अनावर इच्छा असते हेंच होय. तशी इच्छा मनुष्येतर प्राण्यांनाही असते; पण दोहोंच्या इच्छांत फरक असतो. मनुष्येतर प्राण्याची इच्छाशक्ति मूळातच थोडी असते; आणि

जी थोडीशी असते तिच्या पाठीशीं सद्वासनाही क्वचितच असतात. नहुषराजाचा अजगरजन्म, जडभरताचा हरिणजन्म, याज्ञवल्क्यानें यजुर्वेद ओकिला असतां, इतर जैमिनी–शिष्यांनीं तित्तिर पक्षी होऊन तें वेदमय वमन घेतलें ते तित्तिरपक्षी, यक्षाचें मेषाचें डोकें, गणपतीचें हत्तीचें वदन, नागकन्या वगैरे विशिष्ट पशुपक्षी जलचर सोडून द्या. पण सामान्यतः मनुष्येतर प्राण्यांची मनुष्यप्राण्याशीं साम्यता नसते. एवढेंच नव्हे तर इच्छाशक्ति व सद्विचार आणि सद्वासना यांच्या मापांत तोलून पाहतां मनुष्यांतसुद्धां अनेक प्रकार दृष्टीस पडतात. तेव्हां ज्या मनुष्याची श्रेष्ठता फारच मोठ्या प्रमाणाची आहे अशा महात्म्याच्या निधनाविषयीं, तें त्याच्या उतार वयांत झालें असलें तरी ईश्वरेच्छा व आप्तेच्छा आणि आत्मेच्छा यांची एकवाक्यता क्वचितच दृष्टीस पडते.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा अंतकाल, ६४ वर्षे आणि ८ दिवस एवढ्या आयुर्मर्यादेनंतर जरी झाला,–आणि हिंदुस्थानवासीयांची साधारण आयुर्मर्यादा ३० वर्षांची आहे—तरी त्यांनीं जी कामगिरी केली ती, त्यांना जी कामगिरी करायची प्रबल इच्छा होती, तिच्या मानानें फारच कमी होती. इंग्रजी भाषेंत अशी एक म्हण आहे कीं " प्रत्यक्ष विजयासारखी विजयी गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं. " या म्हणीप्रमाणें लो. टिळकांनां, हिंदुस्थानला स्वराज्य मिळून, हिंदी लोक स्वतंत्रतेनें जिवंत कालक्षेप करित आहेत, असें जें पाहावयाचें होतें, त्या मानानें, त्यांची त्या ध्येयांकरितां झालेली कामगिरी जरी महत्त्वानें मोठी आहे असें म्हणतां येईल, तरी आत्मसमाधानानें कमी आहे. त्यांतून लोकमान्यांच्या पेक्षां बऱ्याच कमी दर्जाच्या श्रेष्ठ लोकांनां, आपापलें नियोजित कर्तव्य करून, स्वसंतोषानें ईश्वरेच्छेशीं एकजीव होऊन मरण पत्करण्याइतकी आयुरेखा आजसुद्धां मिळत आहे. या तुलनात्मक भावनेनें अधिक क्लेश होतात यात शंकाच नाहीं. न्यूटन, कार्लाईल, इमर्सन, टेनिसन, गोएथ्य, मेरिडिथ, व्हॉन् डर् गोल्टझ्, ग्लॅस्टन्, वगैरेसारखीं परकीय गतकालीन उदाहरणें विसरून गेलें आणि अजून हयात असलेल्या स्वकीय परकीय वृद्ध पिढीकडे पाहिलें तरी मोर्ले, ॲस्क्विथ, लॉइड् जॉर्ज, टिरपिटझ् डॉ. भाण्डारकर ना. सुरेंद्रनाथ बानर्जी, लोकमान्यांचे मित्र मोतिलाल घोष, फार कशाला, लोकमान्यांचे एक प्रमुख हितशत्रु, लॉर्ड सिडेनहॅम् यांचीं जिवंत चित्रें मनासमोर आणिलीं म्हणजे लो. टिळक खरोखरीच वृद्ध-

पर्णी गेले नाहींत, तर भर तारुण्याच्या उमेदींतच गेले असें वाटतें. युरोप-खंडांत ५० व ७० यांच्या दरम्यानचा काल मध्यकाल समजतात. साधारण ८५ च्या सुमारास आपला खड्डा तयार करण्याची पहिली कुदळ पडली अशी त्यांना आंतून मनाची उठावणी होते. आणि मग ९०, ९५ थोडेफार १०० आणि शेंकडा एखादा वृद्ध ११० आणि लाखांतला एकादा भीष्म, १२०, १२५ पर्यंतसुद्धां आज जाऊं शकतो. लॉर्ड मोर्ले हे जेव्हां हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी झाले तेव्हां त्यांनां त्यांच्या एका मित्रानें सहज थट्टेनें ह्मटलें कीं " आपण वारंवार ह्मणतां कीं, आपणांला अजून २५ पुस्तकें लिहावयाचीं आहेत, आणि आपण अजूनही राजकारणाची कांस सोडित नाहीं, तेव्हां आतां खरें कोणतें ? आपण राजकारणी आहांत, कां वाङ्मय-भक्त आहांत ? आणि आपण खरोखरींच वाङ्मयभक्त असाल तर आपण ती सेवा केव्हां करणार ? मेंदू थकल्यानंतर कीं काय ? " या प्रेमळ मनाच्या प्रेमळ प्रश्नाला ६७ वर्षांच्या लॉर्ड मोर्ले यांनीं हंसून उत्तर दिलें कीं " माझा मेंदू थकण्याची मला मुळींच भीति वाटत नाहीं. आतां हें राजकारण पुढें येऊन पडलें त्याला उपाय नाहीं. तें कर्तव्य ह्मणून केलें पाहिजे. तरीपण माझ्या डोक्यांतलीं २५ पुस्तकें मी कागदावर उतरवल्याखेरीज मरणार नाहीं अशी माझी खात्री नसती तर मी हें राजकारण खात्रीनें पत्करिलें नसतें. मी माझीं पुस्तकें हल्लीं पचवित आहें. तीं मी योग्य वेळीं बाहेर काढीन. " या निश्चयात्मक उक्तीप्रमाणें लॉर्ड मोर्ले आज ८२ व्या वर्षी, राजकारणांतून पूर्णपणें अंग काढून आपलीं उबविलेलीं पुस्तकें भराभर प्रसवित आहेत ! पुस्तकें लिहिणें हें साधें ध्येय असणारीं माणसें आपापलीं अवतारकृत्यें संपविण्याइतकीं जगावीं; आणि देशमान्य, खंडमान्य नव्हे जगमान्य पुस्तकें लिहिणें हें ज्याचें एक अत्यंत साधें, फुरसदीच्यावेळीं साधण्याचें ध्येय होतें, अशा मॅझिनीतुल्य, किंबहुना मॅझिनीलाही मागें सारणाऱ्या लो. टिळकांनां " मी मरत नाहीं, माझी मरण्याची इच्छा नाहीं, मला अजून कार्य करायचें आहे " अशा, सद्विचार, सद्वासना, व सत्कर्मे यांनीं प्रबळ झालेल्या आत्मविश्वासांतुद्धा ईश्वरेच्छेनें खेंचून न्यावें, यांत दुःखाच्या जालीम इंगळ्या आहेत. लोकमान्यांचें समळें चरित्रच अशा जालिम इंगळयांचें आहे.

१ सँटरडे रिव्ह्यु

कर्मवीर दादाभाई नौरोजी यांनीं ब्रिटिश पार्लमेंटला बजावून सांगितलें होतें कीं, " अशा संतापजनक स्थितींत हिंदी लोकांची भयंकर निराशा होऊन ते अस्वस्थ होतील याची मुळींच शंका नाहीं. " ती भयंकर निराशा मूर्तिमंत कुठें ओतली गेली असेल तर लोकमान्यांच्या चारित्र्यांतच होय. त्यांना चिरोलनें सुद्धां " हिंदुस्थानांतील प्रक्षोभाचे जनक " असें म्हटलेलें आहे. तेव्हां अशा, कालानें अकालीं खेंचून नेलेल्या, जनतेनें जनार्दन मानलेल्या, निराशेच्या इंगळ्यांनीं संतप्त झालेल्या, पण आत्मविश्वासानें व निग्रहात्मक इच्छाशक्तीनें आपला ध्येयदुंदुभी गर्जून दिलेल्या लोकमान्यांचें चरित्र कोणीही कसेंही लिहिलें असलें तरी रामनामसुधेप्रमाणें, तें कण्टकमय असून सुगंधी गुलाबाप्रमाणें, बेहोष करूनही आनंद देणाऱ्या सोमरसाप्रमाणें आणि तण्टे माजवूनही मधुर लागणाऱ्या अमृताप्रमाणें वाटेल, वाटलेंच पाहिजे.

( २ )

लो. बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म आषाढ वद्य ६ शके १७७८ सालीं, अथवा इसवी सनाप्रमाणें सांगायचें म्हणजे २३ जुलै १८५६ सालीं रत्नागिरी येथें झाला. २३ वी तारीख एकंदर जगाच्या इतिहासांत जर अत्यंत महत्त्वाची आहेच, पण हिंदुस्थानच्या अर्वाचीन युगांत बहुतेक सगळ्या महत्त्वाच्या गोष्टी २३ व्या तारखेलाच घडलेल्या आहेत हें आश्चर्य होय ! त्या महत्त्वाच्या गोष्टींपैकीं आणि जगांतील ऐतिहासिक प्रसंगांपैकीं सहजासहजीं जे आठवतात तेच सांगायचे म्हणजे लोकमान्यांप्रमाणें सर टी. माधवराव यांचाही जन्म २३ डिसेंबर इ. स. १८२८ रोजीं झाला. ( २ ) क्रिमियन युद्धाच्या वेळीं टर्की आणि रशिया यांत २३ ऑक्टोबर स. १८५३ रोजींच पहिली फेर झडली. ( ३ ) खुद्द लोकमान्यांचें पहिलें राजकारणविषयक भाषण २३ जुलै स. १८८७ या तारखेलाच झालें. ( ४ ) न्या. मू. माधवरावजी रानडे हे हायकोर्ट जज्ज २३ नोव्हेंबर स. १८९३ मिनहूलाच झाले. ( ५ ) इंडियन नॅशनल कॉंग्रेसची आद्य स्थापना मद्रास एथें, दिवाण बहादुर रघुनाथराव यांच्या वाड्यांत जमलेल्या १८ राष्ट्रभक्तांच्या सभेंत प्रादुर्भूत झाली; पण तो दिवस २३ डिसेंबर स. १८८४ हा होता. ( ६ ) थोडेसें मागें जाऊन शिपायांच्या बंडाचा इतिहास चाळ-

तर इ. स. १८५७ ची २३ जून ही तारिख ह्मणजे बंडाला ऊत आणणारी होती. कारण ( ७ ) २३ जून इ. स. १७५७ या दिवशींच प्लासीची लढाई झाली होती. " इंग्रजांना हिंदुस्थानांत शंभर वर्षे राज्य करण्याचा ईश्वरी वर-प्रसाद आहे व त्याला अनुसरून १८५७ च्या तेविस जूनला त्यांच्या सत्तेची शंभर वर्षे पुरीं भरतात असा त्या काळीं लोकांत वेडगळ ग्रह प्रचलित होता. त्यामुळें बंडखोरांनीं त्या दिवशीं जंगी लढाई दिली[1]. "( ८ ) लढाईची आणि बंडाची ही धामधूम सोडून देऊन शांतरसप्रिय धर्माच्या चळवळीकडे मन वळविलें तर प्रो. रॅन्के यांच्या History of the Popes Vols I, II, III या तिन्ही पुस्तकांत जिकडे तिकडे २३ वीच तारिख दुमदुमून गेलेली दि-सते ( ९ ) फक्त हिंदुस्थानपुरतेंच पाहिलें तर स्वामी विवेकानंद यांनीं स. १८९३ एप्रील २३ रोजींच अमेरिकेंत प्रथम पाय ठेविला. ( १० ) रमेश-चंद्र दत्त, बडोद्याचे माजी दिवाण व जगविख्यात कादंबरीकार व कवि हे २३ ऑगस्टलाच ( १९०४ ) दिवाण झाले होते. ( ११ ) युरोपियन महायुद्धाचें आद्यकारण जो ऑस्ट्रियाचा सर्वियाला निर्वाणीचा खलिता तो २३ जुलै स. १९१४ रोजीं, म्हणजे लोकमान्यांच्या ६० व्या वाढदिवशीं धाडविण्यांत आला. ( १२ ) खुद्द लोकमान्यांचा केसरींतील रायगडावरील अतिप्रसिद्ध अग्रलेख २३ एप्रील स. १८९५ मंगळवारींच आला होता. ( १३ ) लोकमान्यांना १९०८ सालीं जी जबर शिक्षा सुनावण्यांत आली ती २२ जुलै या दिवशीं आली तरी त्यांची स्पेशल ट्रेन साबरमतीला जाण्याला निघाली ती २३ वी ला निघाली! ( १४ ) अगदीं अलीकडे लोकमान्य आ-जारी पडून काळजी वाटूं लागली ती २३ जुलै याच दिवशीं. ( १५ ) पुन्हां जर्मनीकडे लक्ष दिलें तर त्याला मोठमोठे विजय मिळाले तरी एशिया-खंडांत जर्मनीविरुद्ध जपाननें शस्त्र उगारलें तो दिवस २३ सप्टेंबर सन १९१४ हाच होता. ( १६ ) आणि आतां जो अखेरची गोष्ट लिहिणार ती मुळींसुद्धां महत्त्वाची नसली तरी ईश्वरी हेतूचे गुप्त धागे असतात या दृष्टीनें आजदेखील २३ सप्टेंबर १९२० हाच दिवस आहे !

हा ओढून ताणून संबंध जोडण्यांत आला असें सकृद्दर्शनीं वाटेल; पण आम्ही आव्हान करितों कीं दुसरी कोणतीही तारीख इतक्या तरी मह-

1 उपःकालमाला पुष्प ९ वें

त्वाची असलेली इतिहासज्ञांनीं आम्हांला दाखवावी. आम्ही लोकमान्यांप्रमाणेंच प्रयत्नवादी आहोंत पण ईश्वरी अधिष्ठानाशिवाय मानवी प्रयत्न फोल होत, म्हणजे ईश्वराला स्मरून मनुष्याचे प्रयत्न झाले पाहिजेत अशी आमची समजूत आहे. ईश्वरी इच्छाशक्तीच्या छटा इतिहासांतून स्पष्टपणें उमटलेल्या असतात; तिकडे दुर्लक्ष करून चालण्याचे आजचे दिवस तरी खचित नाहींत. या अनेक धाग्यांत लोकमान्यांच्या जन्मदिवसाचा धागाही फार फार महत्वाचा आहे अशी आमची स्फूर्ति आहे; म्हणूनच आम्ही ही गोष्ट इतक्या विस्तारानें सांगितली; असो.

( ३ )

परमेश्वरी हेतू नंतर लोकमान्यांचें कुलीन घराणें पहावें लागतें. परंतु आमच्या या चरित्राची मर्यादा व स्वरूप इंग्रजी भाषेंतील Great men of Letters, किंवा Great men of Action, अथवा Life Sketches of Indian Rulers, असल्या ग्रंथावलीसारखीं असल्यामुळें आम्ही लोकमान्यांच्या पितरांपासूनच आरंभ करतों. त्यांचे सगळे ज्ञात पूर्वज अत्यंत साध्या रहाणीचे, विद्याव्यासंगी, करारी बाण्याचे पण विनयशील असत; तथापि हे सद्गुण विशेष स्पष्टतेनें गंगाधरशास्त्री टिळक यांच्या ठिकाणी दिसून येत होते. आजकाल जरी भटभिक्षुक, शास्त्रीपुराणीक, हरिदासकीर्तनकार वगैरे धर्मसेवकांविषयीं पूज्यबुद्धि कमी असली, आणि ती लोकमान्य व आगरकर यांच्या वेळेपासून जरी उत्पन्न झालेली असली, तरी गंगाधरशास्त्री टिळक यांबद्दल लोकांना अत्यंत आदर असे. " एकदां लोकमान्यांना प्रश्न विचारण्यांत आला होता कीं, आपण आणि आगरकर हे एकाच शैक्षणिक साच्यांतून निघालां असून, आपणां दोघांत इतकी तफावत कां असावी ? या प्रश्नाचें लोकमान्यांनीं हंसून थोडक्यांत उत्तर दिलें कीं, याचें खरें व एकच कारण आहे. तें हें कीं, मी शास्त्र्याचा मुलगा आहे, आणि गोपाळराव गृहस्थाचे चिरंजीव होते[१]." लोकमान्य पुराणमतवादीच विशेषतः कां असत व दिसत याचें कारण तरी हेंच होय. गंगाधर शास्त्र्यांविषयीं सर डॉ. भांडारकर यांनीं एकदां असें म्हटलें होतें कीं " गंगाधर पंतांची विद्वत्ता, सदयता, कल्पकता, निस्पृहता,

---

१ रा. गंगाधरराव देशपांडे यांचें नाशीक येथील व्याख्यान. (१२।९।२०)

व निरलस वागणूक हे गुण अर्वाचीनांनीं कित्ता घेण्यासारखे आहेत[1]" हें भाषण सरसाहेबांनीं, गंगाधर शास्त्री रत्नागिरीहून बदलून गेले तेंव्हां (१८६६-६७) केलें होतें. ते पुढें आणखी ह्मणाले होते, कीं "आज आपल्या हातांतला ठेवा, व्याकरणाचा ग्रंथ, मराठी भाषेचा समुच्चय, गुरुशिष्यभक्तीचें दुर्मिळ होत चाललेलें भांडार, आपण सोडित आहोंत असें मला वाटतें[1]." हेच सरसाहेब गंगाधर शास्त्र्याच्या जगप्रसिद्ध लोकमान्य मुलाचे एक प्रतिस्पर्धी असत हें लक्ष्यांत घेतले असतां, त्यांच्या वरील, श्रेष्ठ अधिकाऱ्याच्या नात्यानें केलेल्या भाषणाशीं, परवां लोकमान्यांच्या निधनानंतर त्याच्या विषयीं त्यांनीं काढिलेले दुःखोद्गार तुलनात्मक दृष्टीनें पाहून एका पितापुत्रांचा गुणसमुच्चय एक पुराणवस्तु संशोधक कसा सहजासहजीं आळवून गातो, हें अतीशय हृदयंगम रीतीनें दिसून येईल. लोकमान्यांच्या निधनानंतर डॉ. भांडारकर यांनीं त्यांचा असा गुणगौरव केला कीं "टिळकांच्या जीवनयात्रेंत त्यांच्यावर जे कष्ट येऊन पडले त्यांचा शतांश आमचेवर पडला असता तरी आह्मी कोठच्या कोठें असतों. त्यांच्यासारखीं नानाप्रकारचीं संकटें भोगून प्रपंचामध्यें तरंगावयाचें ही गोष्ट सामान्य मनुष्यास साध्य नसते. बळवंतराव टिळक यांचा व माझा संशोधनाचा मार्ग एकच असे, यामुळें त्यांचें लिहिणें मला विचारार्ह वाटे."[2] सरसाहेब आणि लोकमान्य टिळक यांचा संशोधनाचा मार्ग कसा होता याविषयीं योग्य स्थलीं चर्चा होईलच; परंतु एथें लो. टिळकांच्या ठायीं असलेले प्रमुख सद्गुण त्यांनां वंशपरंपरेनें कसे लाभले याविषयीं सरसाहेबांची शिफारस सादर केली, एवढेंच.

गंगाधरशास्त्री टिळक यांच्याविषयीं आणखी थोडेसें लिहावयास हवें. ते अत्यंत चौकस असत. प्रस्तुत लेखकाचे धुळें येथील गरुड हायस्कुलांत कै. रा. हरि गणेश बोडबोले बी. ए. हे प्रमुख अध्यापक असत. हे सद्गृहस्थ लोकमान्यांचे लंगोटी मित्रांपैकीं एक अत्यंत आवडते स्नेही असत. यांची शिकविण्याची पद्धति नेहमीं गोष्टीरूपानें असे. यांनीं आपल्या लहानपणाच्या गोष्टी वर्गांत सांगाव्या. त्यांचा आज प्रस्तुत लेखकाला केवढा फायदा झाला आहे हें या चरित्रावरून थोडें तरी कळून येईलच. परंतु प्रस्तुत लेखक ज्या

---

1 राष्ट्रप्रेममाला "महात्मा टिळक" २ केसरी १० ऑगस्ट १९२०

अत्यंत थोड्या शिक्षकांचा खरा ऋणी आहे त्यांत हरिभाऊंचा उपकार हा कधींही विसरणार नाहीं. त्यांनीं गंगाधरशास्त्र्यांच्या चौकसपणाची हि एक अशी गोष्ट सांगितली कीं " मी जेव्हां अगदीं पहिल्यांदा बाळाच्या घरीं गेलों तेव्हां, 'हा कोण आहे रे !' अशी चौकशी शास्त्रीबुवांनीं केली. त्यांना मी उत्तर दिलें कीं " शिष्यस्तेऽहम्. " यानें शास्त्रीबुवांना आनंद झाला; आणि त्यांनीं आमची मैत्री वृद्धिंगत केली. " असो. गंगाधरशास्त्री फार टापटिपीचे गृहस्थ असत. बळवंतरावांच्या मातेविषयीं प्रस्तुत लेखकाला जवळ जवळ मुळींच माहिती नाहीं. पण त्या साधारणतः अशक्त शरीराच्या पण तरतरित बुद्धीच्या आणि स्वभावानें प्रेमळ असत असें हरिभाऊ गोड-बोले सांगत असत. एकदां एका मुलाला उशीरां आल्यावरून शाळेच्या बाहेर उभा केला असतां तो आपल्या खिशांतील बोरें खात होता. हरिभाऊ " राउन्ड " घेत असतां त्यांना त्या मुलाची संतुष्ट मुद्रा दिसली. तेव्हां ते हळूंच त्याच्याजवळ गेले, आणि 'मलाही बोरें दे कीं रे !' असें ह्मणाले; व आपणच त्याच्या खिशांतलीं बोरें काढून त्यांनीं खाल्लीं. मौज अशी झाली कीं प्रस्तुत लेखक त्याच वेळीं खडूचा एक तुकडा घेऊन आपल्या वर्गांत चालला होता. याला तो गुरुशिष्यभक्तीचा प्रकार दिसला तेव्हां स्वाभाविक-पणेंच यालाही हंसू आलें. तें पाहून हरिभाऊ म्हणाले काय रे + + + + + ! हसतोस काय ? अरे बोरें खाण्याची मजा तुला काय माहित ? मी रत्नागिरीला असतांना मला टिळकांच्या पार्वतीकाकूंनीं खूप बोरें द्यावीं. घे. घे. तूंही थोडीं खा. ये ! " पार्वतीकाकूंसंबंधीं साधारण वर्णन त्यांनीं असें करावें कीं, त्या धर्मनिष्ठ असत. पण त्या किंचित् देवभोळ्याही होत्या. उपोषणां-पायीं त्यांनां अशक्तता आली असावी असें हरिभाऊंनीं सांगितल्याचें स्मरतें; पण याबद्दल खात्री मात्र देतां येत नाहीं. त्यांना पुत्रसंतति लवकर झाली नाहीं हेंहि व्रतवैकल्यें, पूजाअर्चा करण्याचें कारण असावें असें वाटतें. ते कसें ही असो. एवढें मात्र खचित कीं पार्वतीकाकूंचा आचार अत्यंत शुद्ध आणि पवित्र असे.

पार्वतीबाई लोकमान्यांच्या दहाव्या वर्षीं म्हणज इ. १८६६ साली वारल्या. आणि गंगाधर शास्त्री स. १८७२ मध्यें कैलासवासी झाले.

( ४ )

लोकमान्य टिळकांच्या प्राथमिक व दुय्यम शिक्षणासंबंधीं महत्त्वाचें असें विशेष नाहीं. त्यांची शरीरप्रकृति बाळपणापासून अशक्त असे. पुढें पुण्याला डेक्कन कॉलेजांत गेल्यावर पहिल्या वर्षी त्यांनीं तालिम करून शरीर कमविलें. पण मॅट्रिकची परीक्षा पास होईपर्यंत त्यांच्या शरीरप्रकृती-मुळें त्यांचा विद्याभ्यास मुद्दाम असा झालाच नाहीं. त्यांची बुद्धि मुळा-पासूनच तैल असे. त्यामुळें वडिलांनीं दिलेल्या धड्यांचें ते सहजगत्या पठन करित. हरिभाऊ सांगत कीं माझ्या 'शिष्यस्तेऽहम्' या संस्कृत उत्तरानें टिळ-कांचें गीतेकडे लक्ष लागलें. एवढें मात्र नक्की कीं गंगाधरशास्त्र्यांनीं कौमुदी, चंपु, कादंबरी, शाकुंतल, भगवद्गीता, रूपावली, अमर, समासचक्र, नित्यकर्म वगैरे ग्रंथ लो. टिळकांकडून वाचून घेतले होते. त्याचप्रमाणें गणित विष-यांतदेखील आपल्या हुशार मुलाची त्या बुद्धिवान् पित्यानें बरीच प्रगति केली होती. या जन्मदात्या पित्यापेक्षां विद्यादात्या पित्याचें—केरूनाना छत्र्यांचें—टिळकांवर जास्त प्रेम असे. टिळकांच्या गणितप्राविण्याचें श्रेय प्रो. हॉथॉर्नवेट हे उगाच घेत असत. त्यांची अवास्तव गर्वोक्ति टिळकांना मुळींच खपत नसे. एक दिवस तर त्यांनीं भर वर्गांत साहेबमजकुरांस सांगि-तलें कीं "मी केरूनानांचा आणि फक्त केरूनानांचाच शिष्य आहे." असें सांगतात कीं हें शल्य साहेबांच्या अंतःकरणांत राहिल्यामुळेंच टिळक एम्. ए. च्या परीक्षेंत पास झाले नाहींत !

एकदां केरूनानांना एका गणितभक्तानें विचारिलें "नाना, आपल्या-मागें गणितविद्या पोरकी होणार ना ?" केरूनाना पिकलें पान झाले होते. पण वरील दीनवाणीचे उद्गार ऐकून त्यांनीं आशेच्या आनंदानें म्हटलें कीं "काय कारण ? हा आमचा बाळ माझ्याहून तान करील. त्याचें पाणी कांहीं निराळेंच आहे."

टिळकांचें पाणी आणखी एका निराळ्याच सद्गुणांत दिसून येई. अ-न्यायाची त्यांनीं बाळपणापासूनच चीड असे. न्यायान्यायाच्या बाबतींत ते आपलेपणाही विसरून जात. एकदां आपलें बलाबल न पाहतां त्यांनीं आई-समक्ष हरिभाऊंशीं कुस्ती मारण्याचा विडा उचलिला. आईनेंही हरीला

पाडलेंस तर मूठभर जास्त खाऊ देईन असें बक्षिस लाविलें होतें. हरिभाऊ प्रथमपासूनच भरलेले होते. ते काय ऐकतात बाळाला ? त्यांनीं दिलें बाळाला सहज भिरकावून. अर्थातच टिळक पैज हरले. पण आपण हरलों म्हणजे हरिभाऊ जिंकले; अर्थात् त्यांना मूठभर जास्त खाऊ मिळालाच पाहिजे असा टिळकांनीं हट्टच धरिला; आणि हरिभाऊंना जेव्हां दूधपोहे मिळाले तेव्हां त्यांनीं हट्ट सोडला. जेकब साहेबाविषयींची गोष्ट तर प्रसिद्धच आहे. एकदां शाळेंत कोणी एकानें खोडी केली. पण त्याचा पत्ता लागेना. साहेबानें रागानें प्रत्येक मुलाला दोन दोन छड्या मारण्याचा क्रम सुरू केला. ही शिक्षा आपल्या बाबतींत अन्यायाची आहे; असें म्हणून टिळकांनीं छड्या घेण्याचें साफ नाकारिलें. "वर्गातून चालता हो" ही पुढची संतापाची पायरी साहेब चढले. पण टिळक चालते झाल्याबरोबर बाकींचीं सगळीं मुलें हि त्यांच्या मागून निघून गेलीं; तेव्हां चढलेले साहेब चटकन् पडले.

असाच एकदा कांहीं शेंगांच्या फोलकटांवरून मराठी शाळेंत त्यांना मास्तराकडून मार खाण्याचा प्रसंग आला होता. तेव्हां तर टिळक लहान होते. परंतु त्यांनीं मार न खातां दप्तरपाटी घेऊन तडक घरच गांठलें. घरीं शास्त्रीबुवांनां ही गोष्ट कळतांच त्यांनीं आपला मुलगा चुकूनमुद्धां बाजारच्या वस्तु आणून खाणार नाहीं, आणि त्यानें केलें तेंच बरोबर आहे असा कोरडा जबाब शाळामास्तराला दिला. याला म्हणतात आत्मविश्वास !

तथापि असल्या गोष्टी जरी सर्वसाधारण नसल्या तरी अनेकांच्या चरित्रांत घडून येतात. या गोष्टींत प्रत्यक्षतः भावी सद्गुणांचीं बीजें असतील-ही, परंतु त्यांची वाढ होऊन तीं पुढल्या आयुष्यक्रमांत जोमदार वृक्षाप्रमाणें सर्वमान्य झालीं तरच त्यांना किंमत येते. केवळ बीजें असतात एवढ्याच गोष्टीवरून व्यक्तिव्यक्तींतलें अंतर सिद्ध होत नाहीं. आम्ही टिळकांच्या या बाळपणच्या गोष्टी लिहिल्या त्याचा हेतु मोठ्या माणसाच्या साधारण गोष्टींलासुद्धां कसें महत्त्व येतें हें दाखविण्याचाच मुख्यतः आहे. साधारणतः सद्गुणांचीं बीजें प्रत्येक जणाच्या ठायीं वसतात. तीं जाणीवेनें जो वाढवील तो खरा तेजस्वी. असल्या तेजस्वी जनांच्या बाबतींत वयाची चाडच नसते. आत्मसंवेदना हा त्यांचा मुख्य गुण असतो. आणि मग अशा लोकांच्या मोठ्या माणसाची सगळी परिस्थिति अवलोकनीय होते. आतां दुसऱ्या प्रकरणांत लोकमान्यांच्या उच्च शिक्षणाचा क्रम पाहूं.

T. 292 / 9

# प्रकरण २ रें

## उच्च शिक्षण

## १८७३-१८७९

" मी जॉन्सनचा नांवाचा मात्र गुरु होतों. खरोखर पाहतां तो माझ्याहून वरचढ असे. "

डॉ. ॲडॅम्स

या प्रकारणांत लो. टिळकांचें उच्च शिक्षण कसें, कुठें व कोणकोणत्या अध्यापकांच्या सहाय्यानें आणि कोणकोणत्या मित्रांच्या समवेत झालें हें पहावयाचें; परंतु उच्च शिक्षणाविषयीं लिहिण्याच्या अगोदर एक गोष्ट मुद्दाम सांगितली पाहिजे. ती ही कीं लोकमान्य कॉलेजचें शिक्षण घेण्याकरितांच पुण्याला प्रथम आले असें नाहीं; तर पुण्याची व त्यांची गट्टी जमली ती त्यांच्या १० व्या वर्षीच जमली. गंगाधर शास्त्री रत्नागिरीहून बदलले म्हणून जो उल्लेख आम्ही मागल्या प्रकरणांत केला त्याच प्रसंगाची ही बदली होय. लो. टिळक स्वतः जरी कधींहि सरकारी रुपेरी शृंखलेनें बद्ध झाले नाहींत; उलट सरकारी लोखंडी पिंजऱ्यांत लोखंडी शृंखलेनें जरी ते अनेकदां बांधले गेले; तरी त्यांचे वडील मात्र १० रुपयांवर मालवण मुक्कामीं शाळामास्तर होते. परंतु या राजसेवेबद्दल गंगाधरशास्त्र्यांना मुळींच दोष देतां येणार नाहीं. ते दिवस-म्हणजे ब्रिटिशांची नवी अमलाई नुकतीच सुरू झाल्याचे दिवस—असेच होते कीं, लोकमान्यांच्याच भाषेंत लिहावयाचें म्हणजे, " सरकारनें आपल्या नोकरांस मेणे पाठवून त्यांच्या मर्जीप्रमाणें त्यांच्याकडून चाकरी करून घ्यावी." म्हणजे त्यावेळीं " कष्टमयोऽयं भृत्यभारः " असें हुश्श हुश्श करून धांपा टाकण्याचे नोकरांचे ते दिवस नसत. त्या दिवसांत ब्रिटिश अम्मलदारांकडून शास्त्रीबुवांसारख्या विद्वानांच्या विद्येचा गौरवदेखील होत असे. राष्ट्रीय भावना त्यावेळीं सुप्त झाल्या होत्या. कारण निदान महाराष्ट्रांत तरी त्यावेळीं रावबाजींच्या तिरस्करणीय क्षुद्रपणामुळें सामान्य जनपदसुद्धां त्रासून गेलें होतें. आपलेपणाच्या

१ विश्ववृत्त.

अभावाची त्यावेळीं अंधेरी आलेली होती. त्या अंधेरींत ब्रिटिशांच्या नव्या नवलाईची लकेकी दृष्टीस भूल पाडून भर पाडित होती. त्यावेळीं राजकीय दृष्ट्या आपलेपणाची जाणीव नसण्याचेच दिवस होते. धार्मिक छळ नसल्या-मुळें, हिंदी लोकांना स्वप्राणांपलीकडे प्रिय असलेल्या धर्माचें रक्षण कर-ण्याची जबाबदारी ऐन मुसलमानी अमदानींतील साधुसंतांप्रमाणें, कुणा-वरही येऊन पडली नव्हती. संस्कृत विद्येचें रक्षण, नव्हे प्रत्यक्ष परीक्षण स्वतः करणारे विल्सन, कोलब्रुक, मूर, रॉथ वगैरे इंग्रज संस्कृतज्ञ स्वतः शास्त्रीपंडितांबरोबर मित्रभावानें अभ्यास करित असत. अशा परिस्थितींत गंगाधरशास्त्री टिळकांनीं सरकारी नोकरीची रुपेरी बेडी पायांत घालून घेतली तर त्यांत त्यांना दोष देण्यांत काय हंशील ? आजच्या नव्या मनूंत, कलकत्याला गांधी असहकारितेचा कर्णा फुंकित असतां, उमरावतीला रा. ब. रंगनाथ नरसिंह मुधोळकर, साठीं बुद्धि नाठी होण्याच्या वयांत जाणून बुजून सर-कारी नोकरी पत्करून शरमिंदे होतात तर एकोणवीसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धाच्या आरंभाला गंगाधरशास्त्री ब्रिटिशांच्या शिक्षणखात्यांत शिक्षक असले तर त्यांत वाईट कांहीं च नाहीं. अहो, प्रत्यक्ष शिवाजीराजे जर सरकारी जाळ्यांनीं गुरफटून गेलेल्या शहाजीचे चिरंजीव झाले; तर लोकमान्यांना जन्म देणारा पिता सरकारी अन्नानें पोसला गेला तर, त्यांत मनाला लागण्यासारखें असलें तरी, त्याचा दोष मात्र कुणा व्यक्तीवर नसून केवळ भवितव्यतेचा तो एक फेरा असेंच ह्मणावें लागतें.

असो. गंगाधरशास्त्री मालवणाहून इ. स. १८६६ सालीं पुण्यास बद-लले. ते शिक्षकाचे असिस्टंट डेप्युटी झाले. सर डॉ. भांडारकरांनीं गंगाधर शास्त्र्यांचा जो गुणगौरव केला ह्मणून पहिल्या प्रकरणांत ह्मटलें आहे तो याच प्रसंगीं केला होता. सांगायचा मुख्य मुद्दा असा कीं लो. टिळकांची आणि पुण्याची एकतानता होण्याला जो आरंभ झाला, तो कांहीं उच्च शिक्षण घेण्याच्या वेळीं च झाला नाहीं तर त्यांच्या वयाच्या १० व्या वर्षी ह्मणजे स. १८६६ मध्यें झाला. असाच आपल्या वयाच्या १० व्या वर्षी पुण्याला विद्याभ्यासाकरितां राहून, नंतर राजकारण साधण्याचा सुयोग सुमारें २३० वर्षांपूर्वीं शिवाजीराजांच्या बाबतींत आला होता. इ. स. १६३६

असलीं शहाजीराजे बिजापूरकराकडे गेले तेव्हां त्यांनीं जिजाऊ आणि शिवाजी यांनां शिवनेरीहून काढून पुण्याला दादाजी कोंडदेव कुळकर्णी यांच्या हवालीं केलें होतें.[1] या ठिकाणीं, शिवाजीराजे प्रथम आले ते कुठें राहिले, कसे राहिले वगैरे अत्यंत बारिकसारिक गोष्टी सगळ्या जरी माहित नसल्या तरी बऱ्याचशा, इतिहासकारांनीं लिहून ठेविल्या आहेत; तशा लो. टिळकांविषयीं नमूद करून ठेवावयास पाहिजेत. पण एक तर इतकी माहिती आह्मांस नाहीं; आणि दुसरी गोष्ट अशी कीं इतकीं इत्थंभूत उपलब्ध माहिती लिहिण्याचें कर्तव्य टिळकांचे पट्टशिष्य रा. नरसिंह चिंतामण केळकर, संपादक केसरी व मराठा हे करतीलच; त्यांनांच चांगलें करितां येईल. मुंबईचे रा. अच्युतराव कोल्हटकर, संपादक संदेश हे देखील लो. टिळकांचें एक अति विस्तृत चरित्र लिहिणार आहेत. ३०० पानांचा एक भाग, असे १३ भाग त्यांच्या लोकमान्यचरित्राचे होणार आहेत असें त्यांच्या खासगी मित्रमण्डळांतून बाहेर पडलं आहे. तें जर खरें असेल तर त्या चरित्रांतून बॉस्वेलनें लिहिलेल्या जॉन्सनच्या चरित्रापेक्षांहि फारच फार बारिक गोष्टीहि येतील; असो. शिवाजी राजे आणि त्यांच्यानंतर २३० वर्षांनीं लो. टिळक हे दोघे आपापलीं जन्मस्थानें सोडून पुण्याला आपल्या वयाच्या १० व्या वर्षी विद्यार्जनाकरितां आले ही साम्यता विशेष नजरेंत भरण्यासारखी आहे. आमच्या मतें लोकमान्य आणि शिवाजी याच्यांत बरेंच साम्य आहे. लो. टिळक हे एक ऐतिहासिक राष्ट्रपुरुष होऊन गेले. त्यांची योग्यता महाराष्ट्रीय ऐतिहासिक नरपुंगवांशीं तुलना पावण्याची आहे. आणि तशी तुलना करतां, राष्ट्रसेवेच्या दृष्टीनें ते फक्त एका शिवाजीराजांना हार जातात, इतरांना ते वरचढ आहेत; अशी आमची ऐतिहासिक चिकित्सक दृष्टि आमच्या मनस्तरंगांवर रूपरेषा रेखाटते. ह्मणून या चरित्रांत लोकमान्यांच्या नांवालगत राजे शिवाजी भोसले यांचें नांव आलें तर आमच्या कोणत्याही जातीच्या वाचकानें रागावण्याचें कारण नाहीं. ब्राह्मणेतर, त्यांतून मराठा जातींतील वाचक, आमचें हें अल्प चरित्र वाचून विचार करूं लागला आणि नंतर निर्मल मनानें त्यानें आमचे दोष दाखविले तर त्यांबद्दल आम्ही त्याचे अंतःकरणपूर्वक आभार मानूं. आम्ही सनातनधर्माचें कंकण बाहूला बांधिलें आहे. आम्ही परमतसहिष्णुता पत्करिली आहे. आम्ही रागाच्या

---

१ यदुनाथ सरकारांचा " शिवाजी " पान २६ पहा.

झपाट्यानें झपाटले जाणार नाहीं हें आम्ही एकदोनदां नव्हे, पुन्हःपुन्हां जाहीर करितों. त्याचप्रमाणें चरित्रनायकाच्या फक्त घडलेल्या गोष्टीच सांगून मिळमिळित दिवलाणें वाचकांपुढें ठेवून देऊन मोकळें होण्याचें क्षुद्र कार्य करण्याचा आमचा मुळींच इरादा नाहीं. लो. टिळक यांची सजीव मूर्ति शब्दसहाय्यानें नादब्रह्मांत रेखाटून देण्याचें आम्ही आमचें आद्यकर्तव्य समजतों; आणि तें आम्ही केल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. उलट बाजूनें नायक ( Hero ) म्हटला कीं तो चांगल्या तेवढ्याच कृति करितो, त्याच्या हांतून चुक्या होतच नाहींत असें समजून चालण्याइतका नादानपणाहि आमच्या अंगीं नाहीं. आम्ही टिळकभक्त आहोंत. पण राष्ट्रभक्त टिळकांचे आम्ही दासानुदास आहोंत. टिळक जर राष्ट्रसेवेखेरीज अन्यस्वरूपांत व्यंगी असे आम्हांला दिसले तर त्यांचीं व्यंगें नमूद करायला, आम्हांला वाईट वाटलें, तरी भीति वाटणार नाहीं; असो.

तर मग शिवाजीप्रमाणें लो. टिळकांनीं पुण्याच्या आणि आपल्या नाड्या परस्परांत गुंतवून टाकण्याचा आरंभ आपल्या वयाच्या १० व्या वर्षीं केला. आतां पुढें चरित्रकथा चालू करण्याच्या अगोदर एका ऐतिहासिक मुद्याचा मात्र उल्लेख केलाच पाहिजे. शिवाजीराजांचा जन्म इ. स. १६२७ सालीं झाला असें आह्मी धरून चालतों. प्रसिद्ध इतिहाससंशोधक वासुदेवशास्त्री खरे यांनीं अलीकडे विशेष खात्रीलायक पुरावा गोळा करून, शिवाजीराजे इ. स. १६३० सालीं शिवनेरीला जन्मले असें सिद्ध केलें आहे. [1] ही नवीन तवारिख बरोबर आहे असें धरलें तर, सारख्या वयाची साम्यता जाऊन, लो. टिळक आणि राजे शिवाजी हे दोघे आपल्या लहानपणींच पुण्याला विद्याभ्यासासाठीं आले असा सामान्य साम्यतेचा सिद्धांत होईल.

तरी पण दोघांनीं पुण्यापासून आरंभ केला ऐवढें खचित. महाराजांचा काळ समशेरचमकीचा होता; म्हणून ते पुण्याहून सह्याद्रीत घुसले आणि तेथून प्रथम विजापूरकरावर व नंतर उत्तरेस मोंगलावर घसरले. लोकमान्यांचा काळ लेखनपटुत्वाचा असल्यामुळें ते पुण्याहून यरवड्यानजीकच्या विद्यापीठाकडे वळले आणि नंतर त्यांनीं मुंबई, मद्रास, बंगाल, पंजाब, वऱ्हाड, मध्यप्रान्त वगैरे हिंदी प्रान्त दणदणून सोडले. एकाची तरवार तर दुसऱ्याची

१ लोकसंग्रह जून १९२०

लेखणी होती. पण तीं दोन्हीं केवळ साधनें असतात. त्यांचा योजक जी अंतःकरणांतली राष्ट्रहिताची ज्वलज्ज्योत ती दोहोंत सारखीच प्रज्वलतेनें जळत होती. शिवाजीराजे शिवनेरीला जन्मले, नंतर पुण्याला गेले, पुढे सह्याद्रींत घुसले, मग विजापूरकरावर प्रसरले, मग उत्तरेला मोंगलावर उसळले, अखेरीला दक्षिणेस कर्नाटकावर त्यांनीं झडप घातली; त्याचप्रमाणें लो. टिळक रत्नागिरीस जन्माला आले, नंतर पुण्याला आले. त्यांनीं सर्व विद्या पुण्याला केली, संसार पुण्याला थाटला, पुण्यांत राष्ट्रसंसार मांडला, तो सर्व हिंदुस्थानभर ( एका दृष्टीनें सर्व जगभर ) पसरवून दिला, आणि कोट्यावधी लोकांच्या चित्तवृत्तीवर आपली छाप पाडून ' या पुण्याच्या वामनानें ' आपल्या बुद्धिवैभवानें व कर्तबगारीनें आपणांस 'महाराष्ट्राचा अनभिषिक्त राजा,' आणि आतां " महाराष्ट्राचा खरा कर्मयोगी " असें म्हणवून घेतलें ! या पदव्या ज्या प्रखरतर बुद्धिवैभवानें त्यांनां लाभल्या, तें बुद्धिवैभव कसें, कुठें, व केव्हां प्रखर होत गेलें ही कथा आतां सांगितली पाहिजे.

## ( २ )

लो. टिळकांच्या उच्च शिक्षणाचा काल इ. स. १८७२ ते स. १८७९ पर्यंत सहा वर्षांचा आहे. त्यांत ते बी. ए. आणि एल्. एल्. बी झाले. त्यांचें दुय्यम शिक्षण पुण्याला पूना हायस्कुलांत झालें. या प्रकरणाविषयीं आमची माहिती, बहुतेक सगळीच, नामदार श्री. बा. उपासनी, बी. ए. एल्. एल्. बी यांच्याकडून आम्हांला मिळाली आहे. ती त्यांनीं आमच्या कर्मयोगीच्या लोकमान्य अंकांतून बरीचशी प्रसिद्ध केली आहे. तींत इतर कांहीं गोष्टींचा समावेश करून, त्यांच्या व इतर तज्ज्ञांच्या माहितीवरून आम्ही हें प्रकरण लिहित आहोंत; असो. पूना हायस्कुलांतून आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षी लो. टिळक मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास होऊन डेक्कन कॉलेजांत उच्च शिक्षण घेण्यासाठीं गेले. याच सुमारास त्यांचे वडील वारले, आणि ते आतां पोरके बनले. तत्रापि पोरक्या मुलाचे हाल मात्र त्यांच्या नशिबीं नव्हते. त्यांना आपल्या सार्वजनिक आयुष्यक्रमांत अनेकदां कारागृहवास भोगावा लागला आणि त्यांचे हाल झाले खरे; पण परमेश्वरानें त्यांच्या या हालअपेष्टांवर कौटुंबिक सुखाची अमृतधारा अखंड ठेविली होती. त्यांचे स्नेही व प्रतिस्पर्धी रा. गोपाळ-

रावजी आगरकर यांच्याप्रमाणें लो. टिळक दारिद्र्यांत खिचपत नव्हते. त्यांना जमीनजुमला वडिलांनीं ठेविला होता. शिवाय वडिलाइतकीच, किंबहुना बाळ पोरका झाला म्हणून एका परीनें वडिलाहून जास्तच प्रेमदृष्टी ठेविणारे त्यांचे चुलते, रा. गोविंदराव रामचंद्र टिळक हे बरींच वर्षे हयात होते. आपल्या, त्रैलोकीं झेंडा गाजविणाऱ्या पुतण्याची कीर्ति स्वकर्णीं ऐकून समाधान पावण्याचें आणि उलट स्वनेत्रीं आपल्या पुतण्याचे हाल पाहून दुःख सहन करण्याचें त्यांचें दीर्घ आयुष्य होतें. अखेरीस गोविंदराव " हाय बाळ ! हाय बाळ ! " करूनच वारले; परंतु लोकमान्यांचे वडिल जाऊन ते जेव्हां पोरके झाले तेव्हां पोरकेपणाची शून्यमनस्कता गोविंदरावजींनींच टाळिली. त्याकामीं लोकमान्यांच्या साध्वी पत्नीनें, कै. सौ. सत्यभामाबाई टिळक, यांनींही उत्कृष्ट मदत केली. लोकमान्यांच्या दिव्य तेजानें त्यांच्या मागल्या व पुढल्या सात सात पिढ्यांना ग्रासून टाकिलें आहे. तरी हें तेज वृद्धिंगत करणारें कौटुंबिक सुख सति सत्यभामाबाईनीं टिळकांनां दिलें. म्हणूनच टिळक ६४ वर्षे तरी जगले. बाहेर संतप्त झालेल्या त्यांच्या मनाला घरीं शांतिनिकुंज दिसावे; बाहेर तळमळणारा त्यांचा जीव घटकाभर घरच्या पत्नीप्रेमाच्या घराणदाज सुखलहरींनीं शांत व्हावा, बाहेर पायाखालची वाळू निघून तोंडघशीं पडणाऱ्या टिळकांनां घरीं पत्नीप्रेमाचा मजबूत, अभेद्य, वज्रप्राय किल्ला मिळावा. मित्रांनो, याठिकाणीं तुम्हांलाही आमच्याप्रमाणें शिवाजीरायाची नाहीं कां आंठवण होत ? त्या महाराष्ट्रदेवाला जिजाऊ, दादाजी आणि सईबाई यांच्या जिव्हाळ्याचा अभेद्य किल्ला नसता तर रायगडसिंहगडांनीं काय काम केलें असतें? याचा अर्थ असा नाहीं कीं या माहात्म्यांची कर्तबगारी गृहसौख्यावर अवलंबून होती. उलट मॅसिडोनियाचे राजे फिलिप व अलेक्झॅन्डर दि ग्रेट, रोमचा ज्यूलियस सीझर, आमच्याकडचा राजा भोज, अशा जगद्विख्यात राष्ट्रपुरुषांचें गृहसौख्य पार विरजून गेलेलें असून ते तितकेच जोमानें तळपून गेले हें हि खचित. परंतु गृहसौख्यानें महात्म्यांचें आयुष्य वाढतें, निदान त्यांची कार्यामुळें होत असलेली शरीराची घांस न झाल्यामुळें, त्यांची आयुर्मर्यादा कमी तरी होत नाहीं. प्रत्येक प्रख्यात पतिव्रतेचा पति पहा, दीर्घायुषीच झाला आहे. सति सावित्रीनें तर आपल्या सत्यवान् पतीला प्रत्यक्ष यमपाशांतून सोडविलें आहे ! तेव्हां सति सत्यभामा-

बाई टिळक आणि कै. रा. गोविंदरावजी टिळक यांना जगानें विसरूं नये; त्यांच्या नांवाचा दिगंत बोलबाला व्हावा, अशी आमच्या ( लोकमान्यांच्या निधनामुळें दुःखित झालेल्या ) मनाला उठावणी होत आहे. आणि आमची खात्री आहे कीं आमच्या प्रत्येक वाचकाला होत असलीच पाहिजे; असो.

बळवंतरावजींचें कॉलेजांत जाण्याच्या सुमाराला जरी लग्न झालें होतें तरी विद्यार्थीदशेंतही त्यांचें लक्ष राष्ट्रहिताकडेच सर्वशः लागलें होतें. आपण लवकर लवकर परीक्षा पास होत जाऊं आणि मग एखादी दिवाणबहादुरी मिळवून पत्नीसह पालखीपदस्थ होऊन ऐष–आराम करूं असें काल्पनिक ध्येय चितारण्याकडे त्यांचें मन कधींच धांवेना. उलट ना. उपासनी सांगतात कीं त्यांनीं कॉलेजांत आल्याबरोबर आपली अशक्त शरीरप्रकृति सशक्त करण्याकडेच वेळ खर्च केला. आणि त्यांतही विशेष गोष्ट अशी कीं आपण कांहीं तरी विशिष्ट राष्ट्रहित करण्याकरितां जन्माला आलों आहोंत, त्या हिताला आपली फाटकी तनु पुरी पडणार नाहीं म्हणून ती चांगली धमधकट केली पाहिजे अशा जाणीवेनें त्यांनीं उच्च शिक्षणाच्या आरंभींच शरीरसंवर्धन केलें. " शरीरमाद्यं खलु ( राष्ट्र–महाराष्ट्र– ) धर्मसाधनम् " हें कालीदासाचें वचन त्यांनीं प्रत्यक्ष कृतींत उतरवलें. आम्हांला या ग्रंथांत महात्म्यांची तुलना न करणें अशक्य आहे. पण तौलनिक ज्ञानामागें योग्य चिकित्सक बुद्धीचा आदर आहे हें वाचकांनीं लक्षांत ठेवण्याची कृपा करावी म्हणजे, शरीरसंरक्षणाच्या कामीं गोपाळरावजींनीं किती हयगय केली हें सांगण्यांत आमची राष्ट्रहिताहिताचीच दृष्टि आहे हें वाचकांना दिसून येईल. " गोपाळरावांना आनुवंशिक संस्कारानें दम्याचा जबरदस्त विकार जडला होता. "[1] लोकमान्यांनाही मधुमेहाचा जबरदस्त विकार होता. तो आनुवंशिक होता कीं नाहीं नकळे; पण आगरकरांनीं शरिराची काळजी वाहिली नाहीं आणि टिळकांनीं ती वाहिली हा त्या दोहोंच्या मनोभूमिकांतील फरकांपैकीं एक अत्यंत महत्त्वाचा फरक आहे. आतां गोपाळरावजींची स्थिति फारच फार हलाखीची होती ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. त्यांना कॉलेजकोर्स संपविण्यास अभ्यासाखेरीज खासगी शिकवणी धराव्या लागल्या. तशी स्थिति टिळकांची नव्हती. टिळक कोंक-

१ श्री. गो. बा. कानिटकर " आगरकरांच्या आठवणी " मा. मनोरंजन जुलै १९१६

णांतले एक खोतदार असत. त्यांचे वडील नुकतेच वारले होते. त्यांत ते नुकतेच मॅट्रिकची परीक्षा पास होऊन कॉलेजांत गेले होते. अशी त्या दोघा महात्म्यांची भिन्न परिस्थिति असे. तत्रापि, द्रुम्याच्या विकाराला पोषक अशी जी तापट वृत्ति, त्याचप्रमाणें कविकल्पनेची उंच भरारी, यांना जर आगरकरांनीं आपल्या आटोक्यांत ठेविलें असतें तर त्यांना गरिबींत राहूनही शरिराची दुरुस्ती करितां आली असती. हा मनोवृत्तींच्या सहज-धर्मांवरचा दाब टिळकांनीं योग्य प्रमाणांत ठेविला होता. दुसरी भवि-तव्यतेची गोष्ट अशी कीं लोकमान्यांची बहुतेक सगळीच मित्रमंडळी अल्पा-युषी झाली! चिपळूणकर, वामनराव आपटे, नामजोशी, आगरकर वगैरे मित्र पटापट मृत्युमुखीं पडलेले पाहून टिळकांनासुद्धां १८९६ सालीं म्हणजे ४० व्या वर्षी आपणही अल्पायुषी आहोंत असें वाटलें, आणि म्हणून त्यांनीं सातार्‍याहून रा. न. चिं. केळकरांना पुण्याला बोलाऊन नेलें.[1] ' म्हणजे आपली शारिरिक परिस्थिति वेळोवेळीं लक्षांत घेऊन, केवळ राष्ट्रापायीं लोक-मान्यांनीं तनु-दुरुस्ति केलेली आहे. आतां याच प्रकरणांत आम्ही या विद्व-न्मण्यांचीं मासलेवाईक संभाषणें देणार आहोंत. त्यावरून आगरकरांचीं बेप-र्वाई-चांगली आणि वाईट दोन्ही प्रकारची, दिसून येईल; आणि टिळकांच्या राष्टहितेच्छेचें स्पष्ट आविष्करण होईल. पण त्याला अजून थोडा अव-काश आहे.

मातृभूमीच्या पायीं सर्वस्व अर्पण करणार्‍या टिळकांनीं कॉलेजांत शिर-तांच पहिल्या घडाक्याला दगडू हलवायाची दोस्ती संपादन केली![2] भावी केसरीचा संपादक प्रथम दगडूच्या तालमेंत तयार झालेला होता ही गोष्ट पुष्कळ लोक विसरतात. आणि आतां ही गोष्ट तर ब्राह्मणेतरांनीं मुद्दाम लक्षांत बाळगावी. वाङमयाचे शक्य तितके प्रांत आक्रमण करणार्‍या 'बेझंट बाईप्रमाणें टिळकांनीं आत्मवृत्त लिहून ठेविलें असतें, निदान कांहीं टिपणें तरी करून ठेविलीं असतीं, तर आज या दगडू हलवायाची खरी किंमत लोकांनां कळली असती. पण लोकमान्यांना स्वार्थी आपलेपणाचीं स्वप्नें हि पडलीं नाहींत; आणि मित्रगौरवाचीं टांचणें करण्याइतका वेळही मिळाला नाहीं. त्यामुळें दगडूचें नांव मात्र आज त्यांच्या नांवाशीं जोडलें गेलें. असो.

१ केसरी ३ आगष्ट १९२० २ राष्ट्रप्रेममाला " महात्मा टिळक ".

हा दगडू हलवाई मोठा तालिमबाज असे. तो पोहण्याच्या कलेंत हि अट्टल होता. त्याच्या नादीं लागून बळवंतराव एका वर्षाच्या आंत रोजीं आठशें जोर व तितक्याच बैठका काढूं लागले, त्यांचा पोहण्याचा छंद वाढूं लागला. ते पाण्यांत उताणें पडून हातांत दशमी घेऊन, ती खराब होऊं न देतां सावकाश खात. हा जलविहारांतला आहार झाला. नंतरचा आहार त्यांचा इतका वाढला कीं त्यांचें त्यांनां आश्चर्य वाटूं लागलें आणि त्यांच्या टंच शरिराचें कौतुकही घरींदारी होऊं लागलें !

परंतु शरीराच्या भरतीमुळें परीक्षेकडे थोडी ओहोटी लागली. ते एफ्. ए. ची परीक्षा नापास झाले. त्यांचे त्यावेळचे अभ्यासी सहाध्यायी म्हटले म्हणजे धुळयाचे श्रीधर बाळकृष्ण उपासनी, इंदूरचे मुळे, बडोद्याचे आप्पा शारंगपाणी, व नगरचे मनोहरपंत काथवटे हे होत. उपासनी आजमित्तीला मुंबइच्या ले. कौंसिलचे सभासद आहेत. मुळे रावबहादुर किताब पावून इंदूरचे दिवाणही होते. ते आज हयात नाहींत. रा. ब. शारंगपाणी हे बडोदा संस्थानांतील न्यायखात्यांत एक अतिप्रसिद्ध न्यायाधीश आहेत. आणि रा. ब. म. विष्णु काथवटे हे स. ज. चें पेनशन घेऊन विश्रांतींत इतिहास-वाङ्मयाची सेवा करित आहेत. मुळे आणि शारंगपाणी हे संस्थानांतले रहिवासी असत. म्हणून त्यांचा थाटमाट कांहीं वेगळाच असे. मुळे तर टिळक काथवटे आणि उपासनी यांच्या साध्या राहणीवर विनोदात्मक टीकाही करित; परंतु एकंदरीनें हे पांचही मित्र हुशार आणि मनमिळाऊ असत. यापैकीं लोकमान्य एफ्. ए. ची परीक्षा नापास झाले आणि ना. उपासनी पास झाले ( इ. १८७३ ) यामुळें लोकमान्यांनां किंचित् वाईट वाटलें; वाटणें स्वाभाविक आहे. संस्कृत आणि गणित या विषयांविषयीं शंका घेण्याचें त्यांनां मुळींच प्रयोजन नव्हतें. ती " माझी वडिलोपार्जित मिळकत आहे, "[1] असें त्यांनां साधार वाटत होतें. आणि त्या विषयांनीं त्यांना दगा दिलाहि नाहीं, दगा दिला इंग्रजीनें. त्यांचें इंग्रजीचें अध्ययन तालमेमुळें व्हावें तितकें झालें नाहीं. या एका अपयशाचा आणि तेंही इंग्रजींत आलें म्हणून

१ ना. उपासनी यांच्या " लोकमान्यांच्या आठवणी " कर्मयोगी सप्टेंबर १९२०.

बेझंट बाईंनीं त्यांच्या वर " इंग्रजींत प्राविण्य नाहीं " असा ताशेरा मारिला, तो त्यांच्या चंचल वृत्तीची आणि गोऱ्या चामडीखालच्या हृदयांतल्या एका काळ्या ( मत्सराच्या ) डागाची मात्र साक्ष पटवितो. पुढील एका प्रकरणांत लोकमान्यांच्या इंग्रजीविषयीं आह्मी लिहिणार आहोंतच; पण टिळकांनां एका परीक्षेंत अपयश आलें ह्मणून, किंवा " हातवारे व अंगविक्षेप करून बोलतां येत नाहीं[1] " ह्मणून त्यांचें इंग्रजी भाषेंत प्राविण्य, इंग्लंडांतील मजूरवर्गाच्या पुढाऱ्यांवर छाप बसविण्याइतकें नाहीं असें ह्मणणें अत्यंत चुकीचें व कुत्सित बुद्धीचें आहे. आपण इंग्रजीकडे अमळ जास्तच दुर्लक्ष केलें; ती कांहीं आपली मातृभाषा नव्हे; असें त्यांनां चटकन् समजलें, आणि त्यांनीं उपासन्यांजवळ प्रतिज्ञा केली कीं " मी बी. ए. त फर्स्टक्लास पटकावीन. " अगोदर " काय उपासनी, पुढें गेलांत ना ? " असें ते अर्धविनोदी अर्धदुःखी आवज़ानें ह्मणाले होते. पण त्यांच्या तापट स्वभावाला तें अपयश सहन झालें नाहीं. त्यांनां शरीर तर कमवावयाचें होतेंच परंतु त्याची परीक्षेंत अपयश मिळण्याइतकी जबर किंमत देण्यास ते तयार नव्हते. ती देणें त्यांच्यां जेव्हां नशिबींच आलें तेव्हां त्या शेषानें आत्मविश्वासाचा सहस्रमुखी फणा रागारागानें उगारिला ! लोकमान्यांनीं मग पुढल्या सहान् महिन्यांत—त्यांच्या काळीं सहा महिन्यांनीं परीक्षेस पुन्हां बसण्याची सवलत होती—इंग्रजी भाषादेखील आपली बटीक करून सोडिली. रावसाहेब उपासनी सांगतात कीं त्यांचें इंग्रजीकडे लक्ष लागलें याला चार कारणें झाली. ( १ ) अवास्तव अपयश ( २ ) त्यामुळें मनाला लागलेली तळमळ ( ३ ) प्रो. शूट यांचें अत्युत्कृष्ट शिक्षण; आणि ( ४ ) ॲरिस्टॉटल्, मिल्ल वगैरे ग्रंथकार. टिळक जात्या रसिक नव्हते. ह्मणजे आगरकरांइतके ते काव्यरसानें थबथबले नव्हते. त्यांच्या " रहस्यां " तून क्वचित्प्रसंगीं कवींचीं अवतरणें सांपडतील; भाषणांतून कवींचे उल्लेख केलेले आढळतील; परंतु नादब्रह्मांत विलीन होण्याचा त्यांचा मार्ग नव्हता. त्यांना नीतिशास्त्राचा कंटकमय रस्ता स्वभावतांच आवडत असे. ते काव्य—विण्याच्या झंकारानें स्वर्गारोहण करण्याच्या भानगडींत न पडतां बुद्धीच्या समशेरीच्या खणखणाटांतून आपणाकरितां व आपल्या सामान्य दर्जाच्या देशबंधूकरितां मार्ग कापित जाण्याकरितांच अवतरले होते. कर्मधर्मसंयोगानें

[1] केसरी ३ आगष्ट १९२०

त्यांनां प्रो. शूटसाहेबासारखा खणखणाटीचाच शिक्षक मिळाला. हा प्रोफेसर अतीशय स्वतंत्र बुद्धीचा व स्वतंत्र बाण्याचा असे. शिकवितांना तास संपण्याची घंटा वाजली आणि विषय अपुरा राहिला तर त्यानें दुसऱ्या प्रोफेसराला " माझा विषय अपुरा राहिला आहे तेव्हां मला तुमचा तास द्या. " असें ह्मणावें. एखादे दिवशीं वर्गांत जाऊन न शिकवितां त्यानें आपल्या मनाशींच एखादें पुस्तक वाचित असावें. प्रो. शूट हे अर्थशास्त्र, नीतिशास्त्र व इतिहास यांत फारच प्रविण असत. त्यांनीं " On truth " नामक एक स्वतंत्र ग्रंथही लिहिला आहे असें ना. उपासनी सांगतात. पण मग इतकें तेजःपुंज पुस्तक " क्लासिक " कां झालें नाहीं याचें आश्चर्य वाटतें ! तें कसेंही असो; पण या प्रोफेसरांची विषयप्रतिपादनाची शैली अत्युत्कृष्ट असे. त्यांनीं ॲरिस्टॉटल् कसा चुकला, मिल्ल वगैरे जनहितवाद्यांची तत्त्वें कशीं भ्रामक आहेत हें इतक्या उत्तम पद्धतीनें आणि चटकदार वर्णन करून सांगावें कीं सबंध वर्ग त्यांच्या व्याख्यानाकरितां नेहमीं उत्सुक असे. आणि व्याख्यानाच्या वेळीं चित्रासारखा स्तब्ध बसून त्यांची शिकवण मुकाट्यानें मनांत सांठवून ठेवित असे[1]. ह्या ना. उपासन्यांच्या आठवणीची साक्ष खुद्द टिळकांचीं भाषणें व टिळकांचे ग्रंथही पटवितात. टिळकांचीं भाषणें ऐकतांना मंत्रबद्ध झाला नाहीं असा एक तरी श्रोता असेल कां ? टिळकांच्या ग्रंथांत बुद्धीचे तुरंग कसे चौफेर उडतात हें न समजणारा समंजस वाचक क्वचितच आढळेल.या प्रचंड शक्तीचें श्रेय त्या महात्म्याला तर आहेच आहे; पण त्याचें एक तरी मूळ प्रो. शूट यांच्या शिकवणींत खात्रीनें आहे. शूट साहेबांचा प्रत्यक्षतः उल्लेख जरी लोकमान्यांनीं केला नसला तरी आपण इतर पुढाऱ्यांप्रमाणें इंग्रजी-मुळेंही–ही हें शब्दयोगी अव्यय विसरतां कामा नये—चौकस झालों असा लोकमान्यांचा वारंवार भाषणांतून कबुली जबाब आहे.

या एका मुद्यावरून आम्हांला नामदार उपासनींचें एक विधान अक्षरशः पटतें; आणि तें कुणाहि विचारवन्ताला पटेल. उपासनींचें असें ह्मणणें आहे कीं, " आमच्या वेळच्या तरुण पिढीनें आपापल्या परीनें काय कामगिरी केली आहे, हें आज जगाच्या निदर्शनास आलेलें आहेच. परंतु आम्हांला ज्यांनीं शिक्षण दिलें ते प्रोफेसर्स कोण होते व कोणत्या दर्जाचे

१ कर्मयोगी. सप्टेंबर १९२०

होते; त्यांनीं आम्हांला कशा रीतीनें शिकाविलें व आम्ही कशा रीतीनें शिकलों हें आजच्या तरुण पिढीला खात्रीनें समजून घेण्यासारखें आहे. बळवंतरावजी सारखीं अद्वितीय मनुष्यरत्नें स्वयंप्रकाशी असतात यांत वादच नाहीं; असले तेजस्वी कर्मयोगी मुद्दाम तयार करितां येत नाहींत, ते स्वयंसिद्धच असतात यांतहि दुमत नाहीं. पण हे नरपुंगव ज्या शैक्षणिक वातावरणांत वावरले तें वातावरणदेखील अभ्यासाला अतिशय योग्य असतें, हें कोणी हि नाकबूल करणार नाहीं[1]." प्रो. शूट यांच्या शिकवण्याचा परिणाम लोकमान्यांच्या विषयरचनेवर किती झाला होता हें नुकतेंच सांगितलें आहे. त्याचप्रमाणें केरूनाना छत्रे आणि प्रो. हॉर्थनवेट यांच्याविषयींच्या टिळकांच्या आदरानादराची हि एक गोष्ट वर येऊन गेलीच आहे.तेव्हां ना. उपासनींचें विधान, केवळ बड्या ग्रंथकारांचेंहि तसेंच आहे म्हणून नव्हे तर मनास पटण्याइतकें सयुक्तिक आहे. अर्थातच आपणाला टिळकांचे मुख्य तेवढे अध्यापक, जिवलग तेवढे स्नेही, आणि नजिकची तेवढी शैक्षणिक परिस्थिति जरूर पाहिली पाहिजे.

लोकमान्य शरीरस्वास्थाकरतां पहिल्या वर्षी नापास झाले हें आपण पाहिलेंच आहे. आणि या अपयशाबद्दल त्यांना जें वाईट वाटलें तें त्यांनीं फक्त उपासनींच्याजवळच बोलून दाखविलें. एक तर उपासनी त्यांच्याहून किंचित् वर्षादीडवर्षानें लहान होते; शिवाय ते हाडाचे अत्यंत गरीब. म्हणून आपला धाकटा मित्र पास झाल्याचें जरी त्यांना लागलें तरी उपासनींच्या गरीब, शांत, व सरळ स्वभावामुळेंच टिळकांनीं आपलें दुःख त्यांच्याजवळ ओकून टाकिलें. दिसायला गोष्ट किती किरकोळ आहे. पण तिचे परस्परांवर परिणाम किती दीर्घकाल टिकणारे झाले पहा. "काय उपासनी, पुढे गलांत ना ?" असें टिळकांचें एक वाक्य होतें. पण वास्तविकपणें पुढें कोण गेले होते ? सर्वतोपरीनें टिळक आणि याचा उपासनींनाही केवळ आनंद वाटावा. पण शरीरयात्रेंतहि आपला वयस्य पुढें गेला ही गोष्ट उपासनींच्या हृदयाला अजून चरका देते !

नामदार उपासनी टिळकांचे केव्हांही प्रतिस्पर्धी नसत. त्यांचा टिळकांवर जर कांहीं परिणाम झाला असेल तर तो मुख्यत्वे दोन गोष्टींत. एक

1 कर्मयोगी पान १०७

हृदयांत शांतता राखण्याची गोष्ट आणि दुसरी गोष्ट तिच्याहीपेक्षां जास्त महत्त्वाची आहे. ती अशी कीं अत्यंत शुद्ध शील तयार करण्याची. आम्हांला या दुसऱ्या गोष्टीवर फारसें विवरण करावयाचें नाहीं. पण टिळक, आगरकर आपटे, उपासनी व आणिखी एखादा पांचवा पांडव यांचाच तेवढा कंपू त्यावेळीं सोंवळ्या शीलाचा होता असें खात्री लायक माहितीवरून कळते. हे पांच वीर मात्र परपस्परांस या एका विशिष्ट बाबतींत हृदयांतील सहज-स्वभावानें निगडित होऊन गेलेले होते. या पंचकांतला प्रत्येक देव वेग-वेगळ्या वैशिष्ट्यानें चमकून गेला असेल; त्यांत मतभिन्नता भरपूर असेल पण ज्याला व्यक्तिवाचक शील म्हणतात, त्यांत ते समानधर्मी असत. आणि म्हणूनच उपासनींना अधिकारयुक्त वाणींत सांगता आलें कीं " मी सगळ्या लोकांना सांगतों कीं नुसतें आचरण नव्हे तर बळवंतरावचीचे विचार आणि त्यांच्या वासनादेखील अत्यंत पवित्र असत.[1] " हेच शब्द नामदार उपास-नींनासुद्धां पूर्णपणें लागूं पडतात; असो.

उपासनींखेरीज टिळकांचे सहाध्यायी जे होते त्यांत; ज्यांनीं टिळकां-वर कांहीं तरी स्पष्ट असा परिणाम केला असे आगरकर, आपटे, दाजीसाहेब खरे, लक्ष्मण मोरेश्वर ऊर्फ अणासाहेब देशपांडे हेच होत. पण हे सगळे टिळकांच्या मागून वर्षादीडवर्षानें आले होते. आणि त्यांचा परिणाम सामा-न्यतः चुरशीचा असे. उदाहरणार्थ आपटे आणि देशपांडे यांनीं " मातृ-विलाप " या मथळ्याच्या संस्कृत कविता टिळकांबरोबरच रचिल्या होत्या. त्या तिन्ही कविता रसभरित आहेत. पण त्यांतल्या त्यांत टिळकांच्या कवितेनें प्रो. किलहॉर्न यांनां खुष करून टाकिलें होतें. त्याचवेळी प्रसिद्ध प्रो. जिन्सि-वाले डेक्कन कॉलेजांत फेलो असत. त्यांनांही टिळकांचीच कविता अधिक आवडली; आणि त्यांनीं टिळकांना शाबासकी दिली. आतां आपण साह-जिकपणेंच अध्यापकांकडे झुकलों आहोंत; पण आगरकर आणि खरे यांच्या सुरशीविषयीं दोन शब्द लिहून टाकूं या.

आगरकरांच्या स्पर्धेवर दोन शब्द लिहून काय होणार आहे ? आम-च्या या नियामित स्वरूपाच्या चरित्रांत या विषयाचें जरी स्वतंत्र प्रकरण करतां

[1] कर्मयोगी पान १११.

आलें नाहीं तरी कांहीं पानें तरी खर्ची घातल्याशिवाय आम्हांलाही गत्यंतर नाहीं. पण त्या प्रसंगाला अजून अवधि आहे. तेव्हां आगरकरांना कांहीं काळ वगळून खऱ्यांचेच दोन शब्द लिहून टाकूं. ती एक मजेदार गोष्ट आहे. दाजीसाहेबांना एका एका प्रकरणांत कॉलेजमधून कांहीं काल काढून देण्यापर्यंत शिक्षा झाली होती हें पुष्कळांना माहित नाहीं. पण ती गोष्ट अगदीं खरी आहे. प्रो. शूट फार अशक्त असत. ते हुशार खरे, त्यांची शिकविण्याची पद्धति ठासदार खरी, वर्ग कसा सुई पडली तर ऐकूं येईल असा स्तब्ध बसायचा, पण एकदां त्यांना शिकवितां शिकवितां झांब आली. अर्थातच त्यांनीं इंग्लंडचा रस्ता धरला. त्यांच्याजागीं सरकारनें एक आय्. सी. एस्. नेमिला. त्याला नीट शिकवितां येईना. मुलांना संवय पडली प्रो. शूटची. ते लागले प्रथम चळवळ व नंतर कारस्थानें करायला. टिळक वरच्या वर्गांत आणि खरे खालच्या वर्गांत पुढारी झाले. पण टिळकांच्या वर्गानें असहकारिता करण्याच्या अगोदरच खऱ्यांच्या वर्गानें प्रिंसिपालकडे जाऊन तक्रार करून विरोध करूं म्हणून धमकीसुद्धां देऊन टाकिली. पुढें प्रोफेसरांचा एक विषय बदलला, पण खऱ्यांना मात्र थोडीशी शिक्षा भोगावी लागली. हाच आरंभ टिळकांकडून झाला असता तर काय झालें असतें हें सांगणें कठीण आहे. पण निदान त्या काळांत तरी, आणि निदान कॉलेजांत तरी ब्युरॉक्रसीचें टिळकांशीं वाकडें नव्हतें. उलट प्रो. किलहॉर्नची टिळकांवर संस्कृतामुळें अतोनात भक्ति असे. पुढें एकदां प्रो. मॅक्स मुल्लर यांनीं जशी लोकमान्यांच्या "ओरायन" पुस्तकाचा अचंबा वाटून त्यांना राणीकडून कैदेतून सोडविलें तसाच प्रकार प्रो. किलहॉर्न यांच्याकडून घडता. केरूनाना तर टिळकांना पितृसमान होते. या दोन अध्यापकांखेरीज आणि प्रो. जिन्सिवाल्यांच्याशिवाय चवथ्या अध्यापकानें टिळकांना विशिष्ट वळण लाविलें असें वाचण्यांत व ऐकण्यांतही नाहीं.

तेव्हां दगडू हलवायाच्या मदतीनें शरीरसंपत्ती संपादन करून, आगरकर, आपटे, उपासनी, खरे, मुळे, शारंगपाणी, देशपांडे वगैरे मित्रांच्या सान्निध्यांत आणि केरू नाना छत्रे, प्रो. किलहॉर्न आणि प्रो. श्रीधरपंत जिन्सिवाले यांच्या अध्यापनाचा फायदा घेऊन लोकमान्य इ. स. १८७६ सालीं, उपासनींच्यानंतर फक्त सहा दिवसांनीं, मुंबई युनिव्हर्सिटीचे बी. ए. झाले.

पण एवढ्यानें त्यांच्या उच्च शिक्षणाचा पूर्वार्ध संपला. उत्तरार्धांत तर या प्रदीप्त महाराष्ट्रसूर्याचा खरा अरुणकाल सुरू होतो, त्याचेंही आम्ही आतां मोठ्या चंडोली आनंदानें वर्णन करितों.

( ३ )

या उत्तरार्धांत लोकमान्य टिळक एल्. एल्. बी. ची परीक्षा पास झाले तोंपर्यंचा इतिहास आहे. या उत्तरार्धांतही नामदार उपासनी हेच टिळकांचे मुंबईस सहाध्यायी असत. छे, नुसते सहाध्यायी नव्हे तर आतां सहानिवासीही असत. डेक्कनकॉलेजात ते दोघ एकाच खोलींत राहण्याचा प्रसंग आला नव्हता. तसे ते वादविवाद करतांना कोणा एकाच्या तरी खोलींत बसत; आणि कैक प्रसंगीं फार रात्र झाली तर तेथें च निजत; त्याच प्रमाणें दोघांचा जेवण्याचा क्लबही एकच असे; साधारणतः दोघांच्या जेवण्याच्या वेळा एकच असत; दोघांची रसनारुचीही सारखीच सात्विक अन्नाची असे; दोघांचे वर्ग पहिल्या वर्षानंतर वेगवेगळे झाले तरी दोघे फिरावयास जातांना बहुशः एकाच पुस्तकावर चर्चा करित; या सगळ्या गोष्टी खऱ्या; पण मनुष्याच्या अत्यंत सहजगत्या घडणाऱ्या गोष्टी सहजासहजीं नजेरेला आणण्याइतका निकटचा सहवास त्या दोघांचाही मुंबईला घडला तेथें ते तीन वर्षे सतत एके ठिकाणीं एकाच खोलींत राहिले होते. कांदेवाडींत जगन्नाथजीच्या मंदिरासमोरच्या चाळींत त्यांचें बिऱ्हाड असे. आज त्या इमारतींत बराच फरक झाला आहे. तिची आजची ख्याति कांहीं निराळीच आहे. पण याच कांदेवाडींत स. १८७६ च्या अखेरीला लो. टिळक ना. उपासनींच्या बिऱ्हाडांत वकीलीच्या अभ्यासाकरितां ह्मणून गेले होते व तीन वर्षे राहिले होते, ही गोष्ट थोडीशी मौज वाटण्यासारखी आहे. अशीच दुसरी ध्यानांत धरण्यासारखी एक गोष्ट आहे. डेक्कन कॉलेजांत असतांना " लो. टिळक सोंवळें नेसल्याशिवाय कधींही जेवायला बसत नसत.[1] " यांत कांहीं विशेष नाहीं असें नाहीं. टिळकांच्या वेळीं देखील सोंवळयाओंवळ्यांचा सावळा गोंधळ सुरू झाला होता; आणि सबंध डेक्कन कॉलेजांत ना. उपासनी आणि प्रो. जिन्सिवाले यांचेच काय ते क्लब सोवळें वापरित

---

1 कर्मयोगी पान १११.

असत; ही गोष्ट लक्षांत घेतां टिळक कॉलेजमधल्या आयुष्यक्रमांत कधींही सोवळें नेसल्याशिवाय जेवित नसत यांत विशेष नाहीं असें कसें ह्मणावें ? तथापि या पेक्षां टिळक आणि उपासनी मुंबईसदेखील सोवळें नेसून जेवित असत या सत्यांत जास्त आनंद आहे. सोवळें आणि ओंवळें याविषयीं निराळी चर्चा करण्याचें आतां आह्मांला कारणच नाहीं. कारण ही चर्चा आगरकरांनीं कडेलोटीपर्यंत नेली आहे. तथापि ती जी जाहीर रीत्या झाली तिच्या-पेक्षां खासगी संभाषणांतली चर्चा अनेक बाजूंनीं महत्त्वाची आहे. सबब आह्मी ती एथें सारांशरूपानें नमूद करितों:—

## सोंवळें-ओंवळें

मुलेः— ( उपासन्यांना ) काय भडजी ! चाललांत जेवायला ?

उपासनीः— ( अगदीं साध्या भावानें ) हो.

टिळकः— हो राजेबहाद्दर !

आगरकरः— आह्मी येऊं कां तुमच्या क्लबांत उपासनी !

उपासनीः— या कीं. आह्मांला आनंद वाटेल.

मुलेः— पण आह्मी तें गबाळें नाहीं नेसणार.

उपासनीः— मी तुह्माला शारंगपाण्यांचा पीतांबर आणून देतों.

आगरकरः— त्यांच्या लग्नापासून कधींही न धुतलेला पीतांबर ?

उपासनीः— मग धुतलेला माझा कद देतों.

आगरकरः— पण धुतलेलें हें आमचें कर्पास-वस्त्र कां चालूं नये ? हा जुलूम कां ? अमकेंच नेसा; अमक्याच रीतीनें नेसा; अमक्याच गोष्टींची ड्रिल करा, अरे आहे काय हें सोंग ? याला कांहीं आधार ? याचें कांहीं प्रयोजन तरी आहे काय ? आमच्या सोवळ्यानें आमचें स्वाभाविक कोवळें हृदय शिस्तीच्या नांवाखालीं निगरघट्ट करून टाकिलें आहे. तुह्मांला नाहीं असें वाटत टिळक ?

टिळकः— तुह्मी मला असे प्रश्न वारंवार कां विचारितां ? माझीं उत्तरें तुह्मांला रुचत नाहींत. तथापि तुमचा हल्ला निकराचा जरी असला तरी तो कळवळ्याचा आहे ह्मणून मी आज निराळ्या पद्धतीनें उत्तर देतों. पण आतां हें असें जेवल्या-

शिवाय बोलत उभें राहून आमच्या शंकरला ( आचाऱ्याला ) त्रास देणें मला आवडत नाहीं. शिवाय आचारी रागावला की खर्च जास्त लागून अन्नही चांगलें मिळत नाहीं. मुळे, आह्मी बुवा गरीब माणसें आहोंत.

**आगरकर:—** तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. तुम्ही गरीब असाल, मी तर जन्माचा दरिद्री आहे. पण तुमची तयारी असेल तर मी आज जेवणार सुद्धां नाहीं. चला उपासनींच्या खोलींत बोलत बसूं.

**मुळे:—** नाहीं रे बाबा. मला सपाटून भूक लागली आहे.

**टिळक:—** आणि मलाही खूप पोहण्यामुळें मनस्वी भूक लागली आहे. आगरकर, तम्ही वादविवादापायीं शरीराची खराबी करून घेतां हें चांगलें नव्हे.

**आगरकर:—** आगोदर मन नंतर शरीर.

**टिळक:—** नव्हे, अगोदर धर्म, आणि तो शरीराशिवाय नीट होत नाहीं. शिवाय आतां आपणांला घाई कसली आहे? आपण कांहीं कुठें पळून जात नाहीं. नीट मनसोक्त जेवा. ह्मणजे मग प्रफुल्लित मनानें आपण बोलूं.

( नंतर जेवणखाण आटोपल्यावर व थोडावेळ इतर किरकोळ गप्पा झाल्यावर आगरकरांच्या आग्रहावरून टिळकांनीं आपली बाजू मांडिली. )

**टिळक:—** हें बघा आगरकर. पहिल्या घडाक्याला शास्त्र सांगतों.

**मुळे:—** शास्त्र्याच्या मुलाला सर्वत्र शास्त्रच दिसतें.

**टिळक:—** स्वाभाविकच आहे. आजचें सगळें पाश्चात्य जग शास्त्र्याचेंच मूल आहे. आणि त्या पोराचें आपण तर फार कौतुक करतां. आजपर्यंत आपला मुलगा तेवढा बाब्या आणि दुसऱ्याचा ठोंब्या असा स्वाभाविक प्रकार असे. पण हें इंग्रजी राज्य आल्यापासून आह्मी आमचें तें ढोर आणि दुसऱ्याचें मात्र पोर असें म्हणत आहों. असो. मुळे, मध्येंच बोललांत म्हणून निरुपायानें समाचार घ्यावा लागला. ( आगरकराकडे तोंड करून )

मला वाटतें मध्येंच कोणी बोलूं नये. ( संमती मिळाल्यावर पुढें ) शास्त्र सांगतें कीं कापसापेक्षां रेशीम जास्त ऊष्ण असतें आणि म्हणून तें केरकचरा किंवा अन्य प्रकारची घाण स्वत:वर राहूं देत नाहीं. तथापि त्यालाही कांहीं मर्यादा आहे. रेशमी वस्त्र झालें तरी तें धूत गेलेंच पाहिजे. पण तें वारंवार धुतलें म्हणजे लवकर फाटतें, आणि भारी किंमतीचें असल्यामुळें सामान्य लोक धूत नाहींत. माझें भाषण सामान्य जनसमूहाच्याच दृष्टीनें असतें हो. हें मात्र विसरूं नका. उलट कापसाचें वस्त्र रोज धूत गेलें असतां रेशमी वस्त्र नेसण्याचीच कां गरज असावी, आगरकरांच्या भाषेंत, जुलम कां असावा याचें उत्तर सोपें आहे. वस्त्रांतर करणें शुद्धतेच्या दृष्टीनें इष्ट आहे. साहेब लोकसुद्धां जेवतांना पोषाख बदलतात आणि तेही जेवतांना शक्य तितका रेशमी पोषाखच करितात. रावबाजींच्या सोवळ्याच्या पराक्रमाबद्दल फाजिल विश्वासाची गोष्ट जमेस धरून तुम्ही सोवळ्याचा धिक्कार करूं नका. आतां हा सोवळें परिधान करण्याचा एक किरकोळ प्रकार आहे. तो इतर महत्त्वाच्या प्रसंगीं केला नाहीं तरी चालेल; न केल्यास भयंकर पाप लागतें असें नाहीं, हें मी कबूल करितों; पण तसे महत्त्वाचे प्रसंग तुम्हांआम्हांवर आज येऊन पडले आहेत काय ? नाहींत. मग उगाच आपल्या अनंतकालापासून चालत आलेल्या रीतीवर शस्त्र कां उगारितां ?

आगरकर:— हा, हाच भयंकर अंधविश्वासाचा तोटा या सोवळ्यामुळें होतो. टिळक, तुमचीआमची गोष्ट निराळी आहे. चांगलें कोणतें आणि वाईट कोणतें हें तुह्माआह्मांला समजतें, पण सामान्यजनपद झाडून रावबाजीसारखेंच बावळट आहे. मला हा बावळटपणा अगदीं खपत नाहीं. मग तो सोवळ्यांत असो कीं आगगाडीपुढें कोंबडीं, अंडीं, नारळ फोडण्यांत असो. आणि सगळ्या प्रकारांत जर कोणता अतीशय

जालिम, कालियाच्या विषाचा बावळटपणा असेल तर तो गतानुगतिकत्वाचाच आहे. अनंत कालापासून चालत असलेले रिवाज म्हटले कीं माझ्या कपाळांत तिडिकच उठते. खरोखरें अनंतकाल म्हणजे काय, रिवाज कसे पडतात, आपण त्यांनीं कितपत बांधले जातों व जावयास पाहिजे वगैरे विषय फार फार विचार करण्यासारखे आहेत. पण विचार करतो कोण? जो तो उठला कीं लागला ठेवायला बापाच्या पावलावर पाऊल. बाप तांबट तर मुलगाही तांबट, बाप हजाम तर मुलगाही हजाम; पण बाप कुंभार तर मुलगा भिक्षुक असा प्रकार आमच्या हिंदुस्थानांत चुकून होणार नाहीं. तेंच पाश्चात्यांकडे पहा. पण काय हो टिळक, पाश्चात्यांचें नांव काढतांच तुम्ही असे मनांतल्या मनांत रागावतां कां?

**टिळकः—** कारण मला त्यांची भीति वाटते म्हणून नव्हे, तर कोणत्याही गोष्टीचा साधक बाधक विचार व्हावा म्हणून मी बोलत नाही. राग येतो यांत शंकाच नाहीं. या पाश्चात्यांनीं आमचें राग येण्यासारखेंच नुकसान करणें चालवलें आहे. तथापि त्यांच्यांतहि कांहीं अत्युत्कृष्ट गुण आहेत ही गोष्ट मला आज मान्य आहे. माझे या विषयावर अजून पक्के विचार तयार व्हावयाचे आहेत. त्याचप्रमाणें आगरकर, तुम्ही सांगितलेले सगळे विषय खरोखरच विचारकरण्यासारखे आहे. पण विचार करतो कोण? या तुमच्या प्रश्नाला सामान्य जनता हें उत्तर नाहीं. सामान्य जनता विचारवंत होईल तर आपण राजे च होऊं. इंग्रज आणि मराठे समसमान दर्जाचे मित्र होतील. आजच्याप्रमाणें धनिनोकरांचे त्यांचें नातें राहणार नाहीं. पण तशी परिस्थिति कशी जुळवून आणितां येईल त्याचा विचार आजच्या सुशिक्षित तरुणांनीं करावयाचा आहे. आगरकर, मी, तुम्ही व या सर्व मित्रांनीं विचार चालविलाच आहे. त्या विचारांचें वर्गीकरण करून, कोणास कुठें कितपत

संघशक्तीनें कार्य करितां येईल हें आपण ठरवूं. पण तोंपर्यंत ज्या सामान्य जनतेला शिकवायचें आहे तिचा बुद्धिभेद करूं नका. दमादमानें गोष्टी घ्या, आंजारूनगोंजारून शिकवा, असें माझें म्हणणें आहे.

**आगरकरः**— ( तडफीनें ) माझा मतभेद आहे.—

( नंतर आगरकर सामान्य जनतेवर फार घसरले. त्यांचें भाषण ऐकवेल तितकें टिळकांनीं ऐकून घेतलें. पण पुढें असह्य झाल्यावर, उपासनींच्या संकेतावरून ते आपल्या खोलींत जाऊन निजले. )

अशा तऱ्हेचे वादविवाद टिळकादिकांचें कॉलेजांत असतांना पुष्कळ होत असत. आणि ते आपल्या मतानुसार उपासनींच्याप्रमाणें सोवळें नेसून जेवित असत. पण हीच पद्धत त्यांनीं मुंबईलाहि ठेविली होती. पुढें राष्ट्रहिताचा सगळाच बोजा त्यांच्यावर येऊन पडला तेव्हां ते सोवळें नेसत नसत आणि याचा फायदा घेऊन समाजसुधारक अजून त्यांच्यावर टीकेचे प्रहार करितात. त्यांनीं हा वादविवाद नीट शुद्धांतःकरणानें वाचावा असा आमचा त्यांना आग्रह आहे. त्यांचे स्नेही उपासनी हे अजून सोवळें नेसतात. आणि तेहि म्हणतात. कीं " माझ्यासारखे टिळक जर पेन्शनर असते तर त्यांनींही सोवळें सोडून दिलें नसतें. " खुद्द टिळकांनींसुद्धां एकदां असें म्हटलें होतें कीं " मी केसरीचा संपादक नसतों तर कीर्तनकार झालों असतों " असो.[1]

सोवळें नेसण्याखेरीज बळवंतरावजींची मुंबईची दुसरी विशेष गोष्ट अशी कीं, त्यांनीं हिंदुधर्मशास्त्राचा त्यावेळीं अतीशय अभ्यास केला. उपासनी सांगतात कीं हिंदु लॉ वरचीं त्यांनीं सगळीं महत्त्वाचीं पुस्तकें वाचलीं. मनु, नारद याज्ञवल्क्य, वगैरे पौर्वात्य स्मृतिकारांचे ग्रंथ त्यांनीं मूळ संस्कृतांत वाचून अभ्यास केला. त्यांनीं पाश्चात्यांनीं कसा अभ्यास केला हें नीट पाहिलें, तौलनिक ज्ञानाकरितां मुस[illegible] धर्मशास्त्रांचीं मूलतत्त्वें अभ्यासिलीं. ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वांचा सांगोपांग विचार केला आणि अशा रीतीनें

१ कीर्तनकारांचें संमेलन, अध्यक्षस्थानचें भाषण.

त्यांनीं हिंदुत्वाची आपली कल्पना, बावनकशी सोन्याप्रमाणें शुद्ध करून घेतली एवढ्या जगड्व्याळ अभ्यासाला किती दीर्घ काळ लागेल याची अभ्यासी वाचकांनींहि कल्पना करावी, आणि मग उपासनींच्या[1] " आह्मी दोघे तीन वर्षें मुंबईंत एका खोलींत काढिलीं; पण बळवंतराव कधीं वाचण्यांत किंवा विचार करण्यांत गर्क नाहींत असें कांहीं मला स्मरत नाहीं. " या शब्दांत अतिशयोक्ति असणें शक्यच नाहीं अशी आपली खात्री पटवून घ्यावी.

स्वतः उपासनींकडून तितका अभ्यास झाला नाहीं. कारण त्यांचे डोळे त्यावेळीं बिघडले होते. टिळकांनीं वाचावें आणि उपासनींनीं ऐकावें असा त्यांचा क्रम चालला होता. ते दोघे स्नेही संध्याकाळीं बॅकबेवर हिंडत त्यावेळीं देखील टिळकांनीं हिंदु लॉवर बोलावें आणि उपासन्यांनीं ऐकावें.

परंतु लोकमान्यांनीं हिंदुलॉचा अभ्यास केला या गोष्टीपेक्षां जास्त महत्त्वाची दुसरी एक गोष्ट स. १८७८ च्या ऑक्टोबरांत घडून आली. ऑक्टोबरांतच आली असें मात्र उपासनींना आठवत नाहीं. ते म्हणतात कीं तो महिना कदाचित् मे देखील असेल; परंतु बहुधां ऑक्टोबरच असावा अशी त्यांची स्मरणशक्ति धांव घेते. आणि तो ऑक्टोबर महिनाच असला पाहिजे. कारण विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं सरकारी नोकरीस सन १८७९ च्या एप्रिलमध्यें रामराम ठोकला; आणि ते मे महिन्यांत पुण्याला सहकुटुंब येऊन दाखल झाले. आणि त्यानंतर त्यांनीं लक्ष्मणराव चिपळुणकरांना १३ सतेंबर १८७९ रोजीं पुढील पत्र लिहिलें

" The memorable 1st fo October is approaching. I shall enjoy the pleasure of kicking off my chains that day. Mr. Agarkar [ going for M. A. ] Mr. Tilak [ going for L. L. B. ] Messrs. Bhagwat and Karandikar ( appearing for B. A.) have tendered proposals for joining me in the enterprise. This step they have done of their own accord. We have settled 1st of January for the hoisting of the s[illegible]rd. Such a battery must carry the High School instantaneously before it ?[2]"

---

१ कर्मयोगी अंक ३ ना. उपासनींच्या आठवणी. २ चिपळूणकरांचें चरित्र.

( आतां ती स्मरणीय १ ऑक्टोबर तारिख जवळ जवळ येत चालली आहे. त्या दिवशीं नोकरीची बेडी झुगारून देण्याचा आनंद मी उपभोगीन ! रा. रा. आगरकर एम्. एचा, रा. रा. टिळक एल्. एल्. बीचा, व रा. रा. भगवंत आणि रा. रा. करंदीकर हे बी. एचा अभ्यास करित आहेत. त्यांनीं मला माझ्या अंगीकृत कार्यांत येऊन मिळण्याचा इरादा मला कळविला आहे; आणि; ही गोष्ट त्यांनीं आपण होऊन केली आहे. आम्ही आमच्या कार्याची गुढी उभारण्याचा दिवस १ जानेवारी हा ठरविला आहे. अशा गोलंदाजांच्या मदतीनें आम्ही हायस्कुलाचा हां हां म्हणतां धुव्वा उडवून देऊं ! )

या पत्राची तारिख १३ सप्तेंबर स. १८७९ ही आहे. आणि १८७८त टिळक फायनल एल्. एल्. बीचा अभ्यास करित होते. ते व उपासनी पुण्याला सुट्टींतच पण अभ्यास करण्याकरितां आले होते. अर्थात् हा महिना जर मे असता तर त्यानंतर सहा महिन्यांनीं टिळक वगैरे मंडळींचा जो बेत ठरला होता, त्यांत वाजवीपेक्षां जास्त कालावधी झाल्यामुळें कांहीं तरी फाटेफुटे उत्पन्न झाले असते. नंतर टिळक आणि उपासनी १८७९ च्या अखेरीला व मध्यांत एल्. एल्. बी झाले. आणि म्हणूनच त्या मित्रमंडळींनां कांहीं तरी एक कार्य ठरविणें भाग पडलें. तें कोणतें कार्य त्यांनीं ठरविलें, त्याच्या अगोदर ऑक्टोबरांत त्यांचें डेक्कन कॉलेजांत कोणते भाषणप्रसंग झाले व त्यासमयीं कोणकोण हजर होते वगैरे मजकूर आतां ओघाओघानें येईलच. परंतु एथें तो महिना मे नसून ऑक्टोबरच असावा अशाबद्दलचे पुरावे दिले आहेत. असो.

तेव्हां स. १८७९ च्या ऑक्टोबरांत टिळक आणि उपासनी मुंबईहून पुण्याला डेक्कन कॉलेजांत आले. मूळ हेतु अभ्यास करण्याचा पण अभ्यासापेक्षां, पुढें कोणतें राष्ट्रकार्य करायचें व तें कसें करायचें, हें ठरविण्यांतच सारी सुट्टी निघून गेली. या विशेष महत्त्वाच्या मुद्यावर वादविवाद करणारे प्रमुख तरुण म्हटले म्हणजे, प्रथम लोकमान्य, नंतर उपासनी, आगरकर, भगवत, करंदीकर, काथवटे, कृष्णाजी [illegible] शारंगपाणी हे होत. या मंडळींत रा. वामनराव आपटेहि होते असें उपासनी ‘ कर्मयोगींत ’ लिहितात. आण्णासाहेब देशपांडेहि असल्याचें त्यांनां स्मरतें. दुसरे सद्गृहस्थ बहुधां नसावे



हिंदपुत्र अरविंद घोष.

# महाराष्ट्राचा कर्मयोगी.



दे. भ. शि. म. परांजपे.

कारण ते एव्हांना बी. ए. होऊन कॉलेजांतून बाहेर पडले होते. आणि वामनराव आपटे तर खचित नव्हते. कारण ते रा. विष्णुशास्त्र्यांनीं स्थापिलेल्या न्यू इंग्लिश स्कुलास सन १८८० च्या ऑगस्टांत येऊन मिळाले. त्याच्या अगोदर ते एका मिशन स्कूलमध्यें नोकर असत. एवढेंच नव्हे तर त्यांच्या मनांतून सरकारी नोकरीहि पत्करायची होती, याच्याही पलीकडची गोष्ट सांगायची म्हणजे त्यांना मि. चॅटफील्ड साहेब मधून मधून ॲक्टिंग जागा देत आणि वानमरावही त्या स्वीकारित. परंतु त्या हंगामी, कमी पगाराच्या व आज या जिल्ह्यांत तर उद्यां दुसऱ्याच जिल्ह्यांत अशा असल्यामुळें वामनराव शेवटीं कंटाळले आणि त्यांनीं अखेर स. १८८० च्या ऑगस्टांत विष्णुशास्त्र्यांच्या न्यू इंग्लिश स्कुलास मिळून चॅटफील्ड साहेबांच्या भुलवण्याला चाट दिली[1]! इ. स. १८७८ सालीं वामनराव आणि आगरकर एम्. ए. ची परीक्षा देण्याच्या बेतांत होते तेव्हां टिळकादि मंडळींत ते येऊन बसतही असतील असा संभव असता तर ते कॉलेजांतसुद्धां अप्रतिम बुद्धीचे विद्यार्थी नांवाजलेले होते; तेव्हां त्यांचा संवादांतला भाग त्यांची हजिरी विसरून जाण्याइतका खात्रीनें कमदर्जाचा नसेल. आणि असला तर त्यांची कळकळ नसेल आणि म्हणून ते अभ्यासाचा अमूल्य वेळ वादविवादांत खर्च करण्याच्या भानगडींतही पडले नसतील. एका उपासनींच्याखेरीज दुसरे कोणीहि वामनराव हजर असल्याचें सांगत नाहींत. तथापि ह्या मुद्यावर विशेष पुरावा पाहिजे ही गोष्ट अगदीं खरी आहे. असो. आतां टिळक—आगरकर वगैरेंचा दुसरा संवाद देण्याचें आह्मी कबूल केलें होतें. तें वचन आह्मी एथें पाळितों.

## आमचें शिक्षण आह्मीं च सांभाळिलें पाहिजे.

**टिळकः—** आगरकर, आज तुह्मांला वेळ आहे कां? आपण आपल्या भावी कार्याची नक्की जाणीव करून घेऊं या. तुमचें व आमचें सार्वजनिक सेवेचें ध्येय कोठें कसें आणि कितपत जुळतें हें आपण बी. ए. च्या क्लासांत असतांनाच ठरविणार होतों. त्याला आज तीन वर्षें होऊन गेलीं. हें असें फुकट दिवस घालविणें चांगलें कां?

---

१ विष्णुशास्त्र्यांचें चरित्र पान २४१.

उपासनी— आपण काय फुकट दिवस घालवितों ? परीक्षा पास होणें ही पूर्वतयारी नाहीं कां ?

आगरकरः— परीक्षा पास झालों ह्मणजे आमची समाजांत प्रतिष्ठा वाढेल व तितकीच आह्मांला समाजसेवा जास्त करितां येईल, यापेक्षां परीक्षांची जास्त किंमत निदान मला तरी वाटत नाहीं. तसें पाहिलें तर मलाहि टिळकांसारखेंच, तीन वर्षें फुकट घालविल्यासारखें वाटतें. असो. हा विषय अत्यंत किरकोळ आहे. टिळक, तुमच्या विषयावर मी थोडेच दिवस पण कसून विचार केला आहे. समाजसेवेचा मी सर्व बाजूंनीं थांग घेऊन पाहिला. पण मला अजूनहि राजकीय सुधारणांच्या ऐवजीं सामाजिक सुधारणा करणेंच आजचें आमचें आद्य कर्तव्य आहे असें वाटतें.

उपासनीः— हा कांहीं Common platform (एकमताचें आविष्करण) होत नाहीं. जी चर्चा बी. ए. च्या क्लासांत झाली तिचाच काथ्याकूट एम्. एच्या आणि एल्. एल्. बीच्या क्लासांत असतांना होत आहे.

टिळकः— हरकत नाहीं. द्वैतमताचें अद्वैत मत करणें कांहीं कमी फायद्याचें नाहीं. आजच्या वादविवादाची आपण मर्यादाच ठरवूं या. आज आपण फक्त समान ध्येय होतें कीं नाहीं एवढेंच पाहूं. त्याची दिशा नंतर आंखून टाकूं. आगरकर, एकूण तुमच्या मतें अगोदर सामाजिक सुधारणा आणि नंतर राजकीय सुधारणा होणें जरूर आहे.

आगरकरः— होय. पुष्कळ विचार करून मी हें मत निश्चित केलें आहे. अहो. अगोदर घर नंतर दार. ज्याचें घर मजबुत त्याचें दारहि मजबूत. ज्याला घरीं किंमत नाहीं त्याला बाहेर कोण विचारणार ? शेले ह्मणतो "ज्याच्या घरीं बायकापोरांमध्यें अनन्वित जुलूम ययमान करितो त्याच्या घरांतच त्याच्या बायकापोरांतच त्याच्या अधःपतनाचे शाप संचार करितात" हें वर्णन आज आपल्या घरांना सर्वथैव लागू पडत नाहीं

काय ? टिळक, तुमची–आमची गोष्ट निखालस आहे. पण एकंदर हिंदुसमाज लक्षांत घ्या. म्हणजे भूतांखेतांवरचा विश्वास, आगगाडीपुढें अंडीं व नारळ फोडणें, कुळधर्मापायीं कर्जबाजारीपणा स्वीकारिणें, स्मशान–यात्रेंत प्रेताची विटंबना करणें आणि विधवांचें–नको–बुवा तो प्रकार तर शिसारीचे शहारे उत्पन्न करितो ! टिळक, तुम्ही मला काय वाटेल तें म्हणा, पण आपण तर घर सुधारा, घर सुधारा, असाच डांगोरा पिटविण्याच्या तर्फेचे आहोंत.

**टिळकः—** पण मी कुठें तुमच्या विरुद्ध आहे ? अहो घर कुणाला नको असतें ? तुमचा शेले तर आमचे रामदासहि म्हणतात कीं " आधीं प्रपंच करावा नेटका. " परंतु शेले नुसता बडबडला आणि रामदासानीं "आधीं केलें मग सांगितलें." आगरकर, घर सुधारा, घर सुधारा, असा तुम्ही डांगोरा पिटविणार ना ? पिटवा कीं, आनंदानें पिटवा. जोरजोरानें पिटवा. पण माझ्यासारखा एखादा अज्ञानी तुमच्याकडे आला आणि म्हणाला कीं " आगरकर, घर सुधारा म्हणतां पण मला तर घरच नाहीं; मग मी काय करूं ? " तर तुम्ही त्याला घर दिलें पाहिजे. दुसरा उपासनींच्यासारखा एकादा हुशार नागरिक तुमच्याकडे आला आणि तुम्हाला विचारूं लागला कीं, "आगरकर, घर म्हणजे काय गो ? आधीं घर मग दार म्हणतां पण आधीं दार मग घर हें तर प्रत्यक्ष चर्मचक्षूंनांहि दिसतें" तर मग तुम्ही त्याची शंका फेडली पाहिजे. अहो, घर तर हवेंच हवें. घराकरितांच तर सगळ्या उलाढाली चालतात. इंग्रज लोक एथें आले, सर्व जगभर पसरले ते घराकरितांच. पण बाजाराशिवाय, दाराशिवाय, बाह्य जगाशिवाय घराचें अस्तित्व नसतें हें तुम्हांला मान्य आहे कीं नाहीं ?

**आगरकरः—** अलबत. अलबत. खऱ्या गोष्टी मी अमान्य कशा करीन? या मर्त्यलोकांत जोपर्यंत आमचें घर आहे तोंपर्यंत या मर्त्य लो-

काऱ्या बाजारावर तें अवलंबून असतें यांत संशयच नाहीं. खरोखर, टिळक, मी मूळांतच वेगळ्या मताचा मनुष्य आहे. मला वाटतें कीं मनुष्याचें ध्येय अती उच्च असावें. त्याचा एक दशांश भाग जरी त्याला शेकडों वर्षे पर्यंत प्राप्त झाला नाहीं तरी चालेल. तुह्मी बाजाराला या मर्त्यलोकाला फार महत्त्व देतां. इतकें कीं विचार करितांना तुह्मी दुसऱ्या सृष्टि लक्षांत घेतच नाहीं. शेलेच्या एपिपश्चिशिडायन् काव्यांत वर्णन केलेलें दिव्य कौटुंबिक सुख किंवा आपल्या संस्कृत काव्यांतून वर्णन केलेलें स्वर्गसुख अशक्य कोटींतले आहे असें मला वाटत नाहीं. तरी पण या मायिक बाजारापासून जरी तुह्मी आरंभ केला आणि तेंच ध्येय पुढें ठेविलें तरी मला आतां असें सांगा कीं हा बाजार तरी कोण मांडतो ? घरांत उत्पन्न झालेलीं मनुष्येंच मांडतात ना ? " मला घरच नाहीं, आगरकर, मला घर द्या " असें म्हणणाऱ्या माणसाला मी त्याचा स्वभाव ओळखून घर देईन. आतां थोडेसें विषयांतर होईल पण मी थोडासा गोल्डस्मिथच्या मताचा आहे. मला वाटतें कीं कोणी कसा हि असो, त्याला कुटुंबपोषणाची ताकद असली तर त्यानें लग्न जरूर करावें. पण ज्याला ताकदच नाहीं अशा माणसाची आपण कींव करावी आणि त्याला जें देवानें दिलें नाहीं तें जिव्हाळ्याच्या माणसांचें प्रेमसुख आपण देण्याचा प्रयत्न करावा. आतां उपासनीसारख्या हुशार माणसाला मी सांगेन कीं बाळा - तुझ्या प्रश्नाची खोंच समजली. पण ती लक्षांत घेऊनही मी सांगतों कीं बाह्य जगांतली जी राजकीय परिस्थिति आहे, तिचा तर अवश्यमेव विचार करा. करूं नका असें मी कधींहि म्हटलें नाहीं; आज म्हणत नाहीं; व पुढेंहि म्हणणार नाहीं. पण राजकीय परिस्थिति ही बाह्य जगाची एक स्थिति आहे; तिचा तेवढ्यापुरताच विचार करा असें माझें सांगणें आहे; आणि तो विचारहि घराकरितांच करा

असा माझा आग्रह आहे. घराला तुम्ही राजकीय संज्ञा द्या कीं सामाजिक असें विशेषण लावा. शब्दाकरितां मी भांडत नाहीं. पण त्या शब्दांचे जे रूढ अर्थ आहेत त्या अर्थानीं मी सामाजिक सुधारणा घराच्या बाबतींत लावतों. मला वाटतें कीं माझें बोलणें टिळकांना गैर वाटूं नये.

टिळक:— नाहीं. अगदीं गैर वाटत नाहीं. उलट आजचा दिवस चांगल्या शकुनाचा असला पाहिजे असेंच मला वाटतें. कारण आपण आज किती तरी शांत रीतीनें विचार करित आहोंत. यावरून आगरकर, आपणां दोघांकडून महाराष्ट्राकरितां कांहीं तरी सुरेख सेवा खचित घडणार यांत शंकाच उरत नाहीं. असो. आगरकर, तुमचें मूळतत्त्व मला सर्वथैव मान्य आहे. घराकरितां सगळ्या चळवळी असतात यांत मतभिन्नता नाहींच. तुमच्यासारखी माझी कविकल्पना नसली तरी घर हि एक मोक्षपदाची पायरीच आहे असें माझें शास्त्रीय मन मला सांगतें. तथापि ही पायरीच मजबूत असली पाहिजे. आगरकर, ध्येय उच्च असावें असें तुम्ही म्हणतां; पण मी सांगतों कीं प्रत्येक जीवाचें ध्येय उच्च असतेंच. त्याला हवें असलेलें सुख मिळालें म्हणजे त्याची स्वाभाविक हांवच त्याला पुढलें ध्येय दाखविते. पण सामान्यजनाला सामान्य ध्येयच प्रथम सर्वस्व वाटतें. आणि आम्हांला सामान्य जनाच्या दृष्टीनेंच विचार करायचा आहे. तेव्हां आज हिंदुस्थानच्या सामान्य मनुष्याच्या घराची परिस्थिति कोणती आहे हें पहावयाला हवें. पण मला अगोदर असें सांगा कीं हें पाहतांना दृष्टि किती लांबच्या भविष्यकाळांत न्यायला तुम्ही तयार आहांत ?

आगरकर:— तुम्ही सांगाल तितकी लांब. मला सूर्यमंडळ भेदून विश्वामित्राच्या सृष्टीपलीकडेहि दृष्टि नेतां येईल.

टिळक:— ( हंसून ) नको. तितक्या दूरचा पल्ला आज नको. आपणांला सगळे लोक आजच कवि करायचे नाहींत.

आगरकर:— पण सगळे लोक मुत्सद्दीहि करूं नका हो. टिळक एकवार कवि चालतील; पण ते जर कां मुत्सद्दी झाले तर दिल्ली-आग्र्याचे घाणेरडे प्रकार समाजांत सुरूं होतील बरें.

टिळक:— त्याची तुम्हांला आज भीति नको. आगरकर, तुम्ही म्हणतां तितकें राजकारण बोकाळायला आपण मरून वर चार पिढ्याहि खपतील. असो. माझी एवढीच विनंती आहे कीं आजचा विचार करितांना भूतकालांत स. १६१२ पासून तों भविष्यकाळांत निदान स. १९२० पर्यंत तरी आपली दृष्टि पोचवली पाहिजे. मी एक गोष्ट कबूल करितों कीं राजकीय परिस्थिति ही घराची एक स्थिति आहे. पण ती एकच स्थिति आज वामनावताराप्रमाणें घराच्या आदि–मध्य–अंत या तिन्ही अवस्थांनां व्यापून उरली आहे. कशी ती पहा. घरांतलें पहिलें स्थान देवांचें.

आगरकर:— देवांचें ! देवांचें कसलें, मुलांचे. दगडी म्हसोबाचें ! त्याचें घरांत स्थानच नाहीं. प्रत्यक्ष अंतरालांतून तुटून आलेल्या लहानग्या सोनुकल्याचें घरांतले पहिलें स्थान.

टिळक:— (स्वगत[1]) किती शुद्ध व पवित्र जीवात्मा हा ! खरोखर, असले साधु उत्पन्न होतात म्हणूनच स्थित जगाला ठोसे मिळून गति प्राप्त होते. पण [illegible] गतीला वळण मी दिलें पाहिजे. (उघड[2]) आगरकर, मुलांना देवस्थानीं समजणारे तुह्मीच मला देव माणूस आहांत. थट्टा नव्हे. खरोखरच. (हृदय आवरून) असो. घरांतले देव जीं मुलें त्यांनां आज जरी मुबलक दुधदुभतें व अन्न खायला मिळतें तरी इतकें पुढें मिळत राहिल काय ? आज आमचीं गुरें विलायतेला दरवर्षी फुगणाऱ्या संख्येनें जात आहेत. शेतसारा दर तीस वर्षांनीं वाढतो आहे.

---

१ स्वगत विचार टिळकांनीं नंतर मुंबईला आपल्या मित्राजवळ सांगितले.

२ स्वगत विचारांचा परिणाम उघड केलेल्या भाषणावर झालेला दिसून येईलच.

मुलांनां शिक्षण कसें मिळेल तें तुह्मी स्वतःच अनुभवतां आहां. लष्करी खात्याकडे खर्च होतो त्याच्या कितव्या हिश्यानें शिक्षण दिलें जातें ? कसें दिलें जातें ? शूट साहेब गेले नंतर यःकश्चित् आय्. सी. एस्. कां आला ? धार्मिक समजुती पहा. किती घाणेरड्या ? त्या कांहीं इंग्रजांनीं घाणेरड्या केल्या नाहींत. पण त्यांनीं आह्मांला त्या कामीं काय मदत केली ? आह्मांला मदत हवी फक्त शिक्षणद्वारें. आणि तीहि द्रव्यद्वारें. आमच्या मुलांना, बायांना आह्मीच खरा धर्म सांगू. इंग्रजांनीं आमच्या धर्मांत हात घालतां कामा नये. कारण त्यांनां आमचा धर्म समजत नाहीं. A cow has no soul असा त्यांचा प्रत्यक्ष आचार आहे. आमच्या मुलांची खाण्यापिणाच्या बाबतींत गैरसोय आणि शिक्षणाची ही असली अनवस्था ! मग आमच्या देवांचा देवपणा राहिला कुठें ? सामाजिक सुधारणा करा ? हो करा. मी हि सांगतों सामाजिक सुधारणा करा. पण नुसत्या बोलण्यानेंच सुधारणा होत नाहींत. उद्योगाला लागा ह्मणजेच त्या होतील. आणि मग तुह्मांला आढळून येईल कीं तुह्माला सर्व ठिकाणीं सरकाराशीं झगडावें लागेल.

**आगरकर:—** झगडूं. आह्मी आमच्या घराकरितां, [illegible]करितां झगडूं. पण [illegible]रोबर आह्मांत. आमच्या अज्ञानाशीं हि झगडावें लागेल. झगडाल तुह्मी ?

**टिळक:—** तो हृदयाची जखम आहे. तेथें मी गोड बोलून, किंबहुना मुळींच न बोलतां नुसत्या आचारानेंच जखम भरून काढीन. सरकाराशीं करण्याचा विरोध बाहेरचा आहे. तो पुष्कळसा कचरा आहे. ह्मणून जोरानें झटकून टाकीन. मलीन पदार्थ लावून भांडें पुसून काढल्यास जास्त स्वच्छ होतें; या न्यायानें मी सरकाराचा आभारी आहे.

**आगरकर:—** मतभेद होतो तो एथेंच होतो. सामाजिक जखम हृदयाची

आहे असें समजून आज शेकडों वर्षें इलाज झाला नाहीं. आज हृदयाची क्रिया बंद पडण्याची वेळ आली आहे. मलम लावतां ? लावा. पण लवकर लावा. आधीं लावा. खूप लावा. हृदय बंद पडून हिंदुस्थानचें प्रेत झाल्यावर त्याच्यावरचा बाहेरचा कचरा झाडून काय उपयोग ? टिळक, समाजाला हृदयाची उपमा दिलीत; ठीक केलें. पण आतां ती जखम भरून काढा. हृदयाकरितां बाहेरची स्वच्छता ठेवा.

टिळकः— अहो आगरकर, ही जखम तरवारीची नाहीं. भुकेची आहे. अन्न न मिळाल्यामुळें हृदय अशक्त झालें. एथें मलम नको. बाहेरून पोटांत अन्न गेलें पाहिजे; आणि अन्नाचें ताट आपल्या ताब्यांत नाहीं. तथापि मी आज एक मधलाच मार्ग सुचवितों. आपणां दोघांना चालू रिशतीचें, किंवा सर्वांगीण शिक्षण हातीं घ्यायला हरकत नाहीं ना ? शिक्षणासारख्या पवित्र कार्यांत तर आपला common platform आहे ना ?

आगरकर:— ( विचार करून ) आहे. common platform आहे. ठीक टिळक ठीक सुचवलें. ठरलें. आमच्या देशाचें शिक्षण आम्हींच हातीं घ्यायचें. ठरली ना एकवाक्यता ?

टिळक:— ठरली.

उपासनी:— ठरली. आगरकर, टिळक, तुमचें दोघांचे मी अभिनंदन करितों.

या संवादाप्रमाणें पुढे अनेक संवाद झाले. परंतु टिळक आणि उपासनी डेक्कन कॉलेजांत फक्त सुटींतच राहण्याकरितां आले होते. म्हणून इ. स. १७७८ च्या ऑक्टोबरपर्यंत तरी लोकमान्य व त्यांचे तरुण आणि उत्साही स्नेही यांची " शिक्षण आपल्याच हातांत असावें " या बाबतींत एकवाक्यता मात्र झाली. ही कामगिरीसुद्धां त्या तरुणांच्या त्या वयांत आणि तो काळ लक्षांत घेतला तर कमी नव्हती. त्याकाळीं सबंध हिंदुस्थानाप्रमाणें महाराष्ट्रांतही प्रत्येक गोष्ट अनिश्चितपणाचे हेलखावे घेत होती. रावबाजींच्या सर्वस्वावर नादानपणानें तिलांजली सोडण्याच्या दिवसापासून सुमारें स.१८७०

कालापर्यंत हिंदी राजकारण व हिंदी समाजस्थिति इंग्रजांच्या अमलाखालीं संतोषानें राहून त्यांना शांततेची स्थिति प्राप्त झाली होती आणि ती स्थिति दिवसेंदिवस वृद्धिंगत होईल असें भासत होतें. नाहीं म्हणायला स. १८५७ च्या **'शिपायांच्या बंडा'** मुळें हिंदीसमाजाचा, छे; हिंदी लष्कराचा मेंदू भडकला होता; परंतु ती आग, उन्हाळ्यांतील प्रचंड वणव्याप्रमाणें विलक्षण प्रदीप्त पण अत्यंत अल्पकालीन व अल्पस्थलीक, अशीच ठरली. ही आग जागच्याजागीं **'राणीच्या जाहीरनाम्यानें'** विझवून एक 'डझन' वर्षें, एक तप होतें न होतें तोंच लॉर्ड लिटन साहेबांची खळबळी कारकीर्द सुरू झाली. लॉर्ड लिटनच्या कादंबऱ्या आणि चिमुकल्या पण सुंदर कविता वाचूनच त्यांची मूर्ति नेत्रांसमोर काढिली तर ती फार फार गोजिरवाणी व नव्या दमाची दिसेल; परंतु कादंबरीकार व कवि असा लिटन निराळा; आणि हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल लॉर्ड लिटन निराळा. त्याच्या कारकीर्दीचें यथातथ्य वर्णन करण्याचें हें स्थळ नाहीं असें नाहीं. परंतु आमच्या पुस्तकाची मर्यादा आम्हाला, लक्ष्मणानें जानकीला घालून दिलेल्या मर्यादेप्रमाणें अनुल्लंघनीय वाटते. म्हणून सारांशानें सांगतो कीं; लिटनच्या कारकीर्दीमुळें सर्व हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्याच्या सद्धेतूंची शंका येण्यास आरंभ झाला. ही शंका स. १८५७ सालीं हिंदी लष्कराला आली होती; पण ती बंड मोडल्यामुळें फोल ठरली. पण त्या शंकेनें स. १८७० च्या सुमाराला हिंदिसमाजाला पछाडायला आरंभ केला. त्यावेळच्या तरुण व शिकलेल्या मुलांच्या अंतःकरणांत आपल्या वास्तविक स्थितीविषयीं विचिकित्सा करण्याची भावना उत्पन्न झाली. त्यांचे बाप आणि आजे अत्यंत प्रामाणिकपणें व शांतपणें सरकारची नोकरी करित होते. पण लिटनच्या कारकीर्दीमुळें, वरून शांत भासणारा सरकारीसमुद्र आंतून साम्राज्यतृष्णेचा वडवानल धारण करित आहे असा संशय त्या इमानी व शांत नोकरांच्या तरुण मुलांना आला. आणि महाराष्ट्रांत सर्व प्रान्तांच्या अगोदर स. १८७० सालीं एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या तारखेला पुण्याला **"सार्वजनिक सभा"** स्थापन झाली. या सभेविषयीं, तिचा टिळकाशीं जितका संबंध होता, तितकी माहिती आम्हांला द्यावयाची आहेच; पण एथें ज्या कारणामुळें ही सभा अस्तित्वांत आली त्याच कारणामुळें त्यावेळच्या तरुणांच्या हृदयांत स्वदेशाभिमान जागृत झाला हें सांगावयाचें होतें. असा स्वदेशाभिमान नुकताच

जागृत होतो तेव्हां त्या अभिमानी तरुणांची सगळीच परिस्थिति बिकट असते. तिला असें एकहि छिद्र नसतें कीं ज्याच्यावाटें त्या अभिमानाला निर्वेधपणें वावरायला मिळेल; पण अशा बिकट स्थितींतदेखील बळवंतरावजी टिळक आणि गोपाळरावजी आगरकर यांनीं आपली राष्ट्रशिक्षणाची राष्ट्रसेवा करण्याची मानसिक तयारी केली हें काय थोडें झालें !

या दोघां तरुणांच्या नव्या उत्साहाला लवकरच तजेला मिळावा असा परमेश्वरी संकेत होता. कारण रत्नागिरीला, लोकमान्यांच्या जन्मस्थलीं, विष्णुशास्त्री चिपळूणकर, निबंधमालाकर्ते विष्णुशास्त्री चिपळूणकर, त्याचं सुमाराला सरकारी रुपेरी शृंखला ताडकन तोडून शिक्षणद्वारा समाजाची सेवा करावी, या अंत:करणाच्या तळमळीला व बुद्धीच्या प्रखरतेला अंकित होऊन ठिकठिकाणीं ठाव घेत होते. त्यांनीं शाळा स्थापन करण्याचा आपला मानस कोणालाही कळविला नव्हता. पण ते स्वतः मात्र कोठें व कसें शिक्षणाचें निशाण उभारावें याचा सूक्ष्म विचार करित होते. त्यांनीं जर पत्रव्यवहार सुरू केला असता तर टिळक आणि आगरकर यांच्या स. १८७८ च्या ऑक्टोबरांतल्या वादविवादाला कांहीं निराळेंच स्वरूप येतें. पण चिपळूणकरांनीं मे. १८७९ पर्यंत, अगदीं राजीनामा देईपर्यंत, नव्हे, प्रत्यक्ष पुण्याला येईपर्यंत, आपला विचार ( फक्त आपल्या पत्नी शिवाय ) कोणालाहि कळविला नाहीं. अर्थातच, टिळक–आगरकरादि तरुणांना विष्णुशास्त्र्यांचा बेत माहित नव्हता ही उपासनींची आठवण अगदीं साधार आहे.

( ४ )

आतां या प्रकरणांतली फक्त एकच गोष्ट सांगायची राहिली आहे. टिळक व उपासनी योग्य वेळीं परीक्षा उतरले. पुढें मग साहजिकच वरील प्रश्नाचा एक कांहीं तरी निकाल लावणें भाग होतें. त्यांचें मित्रमंडळ आतां आपापला अभ्यासक्रम संपवून कांहीं तरी विशेष देशकार्य करण्यास पूर्ण तयार झालें होतें. शिक्षणाची किल्ली आपल्या हातांत ठेविली पाहिजे यावर मतैक्यता १८७८ तच झाली होती. पण त्या कार्मी लागणारा निधि आणावा कसा ही मुख्य अडचण होती. उपासनी सहा महिने अगोदर परीक्षा पास होऊन धुळ्याला आले होते. एथें त्यावेळीं न्या. मू. माधवराव रानडे फ. क्ला. स. जज्ज होते. त्यांना उपासनींनीं मण्डळीतर्फे सल्ला विचारली.

त्यांनां मंडळींचा उत्साह पाहून आनंद वाटला. ते म्हणाले कीं कांहीं विशेष धार्मिक आणि राजकीय स्फूर्ति असेल तर तुम्हांला यश येईल. ही गोष्ट उपासनींनीं मंडळींस सांगितली. तेव्हां त्यांनांही विशेष उत्साह प्राप्त झाला. पण या विशेष उत्साहानेंही आर्थिक-प्रश्न सुटणारा नव्हता. तेव्हां अखेर त्या दोघांनीं असें ठरविलें कीं उमरावती-वर्दा किंवा वऱ्हाडांत कोठेंतरी ४।५ वर्षें वकिली करावी आणि द्रव्यनिधि जमवावा. आणि मग आपल्या शिक्षणाच्या कार्याचा बोजा उचलावा. या ठरावाप्रमाणें ते दोघे एका रविवारीं निघणारच होते. आणि तसे निघाले असते तर आज दादासाहेब खापर्डे आणि रंगोपंत मुधोळकर यांच्याऐवजीं बळवंतरावजींचेंच नांव वऱ्हाडचे पुढारी वकील म्हणून प्रसिद्ध झालें असतें.

परंतु परमेश्वराचा हेतु निराळाच होता. बळवंतरावजींनीं वऱ्हाडासारख्या एकाच प्रान्तांत रहावें अशी त्याची इच्छा नव्हती. विष्णुशास्त्र्यांच्या खटपटींला त्याला यश द्यावयाचें होतें. तिकडे वामनराव आपट्यांना सरकारी नोकरींत १०० रुपयांचा आरंभ हवा होता तो ७५ रुपयांपर्यंतच मिळेल, अशी योजना झाली, म्हणून तेही या मंडळीबरोबरच विष्णुशास्त्र्यांना मिळण्याच्या बेतांत सामिल झाले. तो बेत कसा सफल झाला व पुढें डे. ए. सोसायटी, तींतला बळवंतरावजींचा भाग, ते तेथून कां निघाले, वगैरे इतिहास निराळा आहे. त्यासंबंधीं तिसऱ्या प्रकारणांत माहिती देऊं.



# प्रकरण ३ रें

## विधायक कामगिरी

## शैक्षणिक संस्था आणि सामाजिक सेवा

## १८८०—१८९७

शिक्षणसंस्था काढतांना ती कोणत्या तत्त्वावर काढावी याबद्दल टिळक-आगरकरांचे जे कॉलेजांत वाद होत असत, त्यांत ही संस्था युरोपातील जेसुइट पंथाच्या पद्धतीवर असावी असें ठरलेलें होतें.

हरी रघुनाथ भागवत

जेसुइट लोकांच्या अंगीं दोन मोठे जबरदस्त गुण आहेत. एक स्वार्थत्याग आणि दुसरा विलक्षण धैर्य.

विष्णुशास्त्री चिपळूणकर

पहिल्या प्रकरणांत लोकमान्यांचें बाळपण आणि प्राथमिक शिक्षण यांचें वर्णन झालें आहे. हें वर्णन शक्य तितकी माहिती देऊन केलें नाहीं ही गोष्ट अगदीं खरी आहे. परंतु प्रस्तुत पुस्तकाचा मूळ उद्देश तसा नाहींच. लोकमान्यांच्या बाळपणाविषयीं खडान्खडा माहिती रा. रा. कृष्णाजी आबाजी गुरुजी यांनीं सन १९०६ सालीं ग्रंथरूपानें प्रसिद्ध केली आहे. त्या माहितींतून आम्हांस पाहिजे तितकी घेऊन व तींत आणखी दोन चार आठवणी घालून, लोकमान्यांच्या भावी लोकसेवेची बीजें किती अप्रतीम होतीं हें आह्मी दाखविलें. त्या प्रकरणाचा आमचा मूळ हेतु तोच होता. त्यापेक्षांही दुसरें प्रकरण मोठें झालें आहे याचें कारण असें कीं लोकमान्यांचें लोकमान्यत्व अविश्रांत श्रमसंत आहे हें साधार सिद्ध करण्याचें आमचें व्रत आहे. दीर्घ स्मरणशक्ति, अचाट कल्पकबुद्धि, तीक्ष्ण विचिकित्सा या ईश्वरदत्त देणगींशीं टिळकांनीं जिव्हाळ्याच्या कळकळीची, स्वदेशप्रेमाची, स्वबांधवहिताची, आणि अविश्रांत श्रमाची कशी सुंदर सांगड घातली याचें साग्र व मनोवेधक चित्र उभारण्याचें कार्य दुसऱ्या प्रकरणावरच येऊन पडलें होतें. त्या प्रकरणांत टिळकांचे सहाध्यायी, गुरुजन व आप्त यांनीं त्यांची शरीररचना व मनोभूमिका कशा कार्यक्षम केल्या याचा इतिहास आहे. अर्थातच अत्यंत ठळक तेवढ्याच गोष्टी

नमूद करणें आम्हांला प्राप्त आहे. आमची लोकमान्यांची राष्ट्रपुरुष या दर्शनाची मूर्ति पहा, एक सामान्य खासगी व्यक्ति अशी बाहुली पाहण्याची अपेक्षा धरूं नका अशी आमची विनंति आहे.

(२)

आतां तिसऱ्या प्रकरणापासून लोकमान्यांच्या चरित्राचे पूर्व तयारीचे दोन भाग सोडून दिले तर बाकींच्या भागांची रचना आह्मी बरीच वेगळया रीतीनें करितों. प्रथमतः सर्वसाधारण असे दोनच भाग करितां येतील. विधायक आणि विघातक. बाकीचे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, संपादकीय, वाङ्मयात्मक, शास्त्रीय, संस्थास्थापनविषयक, वगैरे अनेक कार्यविभाग विधायक किंवा विघातक यांपैकीं एका तरी मुख्य भागांत अंतर्भूत होतात. ह्मणून आह्मी ते दोन भाग मुख्य कल्पून बाकींचे गौण गणिले आहेत; असो.

लोकमान्यांच्या कार्यावर त्यांचे शत्रु ' विघातक ' असा शिक्का मारितात; आणि त्यांचे अनुयायी ' विधायक ' असा मोर्तब चढवितात. परंतु त्यांचा कोणत्याही कार्यांत आपमतलबीपणा होता असें एकही पक्ष ह्मणत नाहीं. उलट त्यांचे शत्रूदेखील कबूल करितात कीं टिळकांचे मार्ग चुकीचे असले तरी त्यांचा हेतु खात्रीनें जनतासुखाचा होता. तेव्हां हेतूकडे नजर दिली तर विघातक कामगिरीसुद्धां मूळांत विधायकच असते; आणि टिळकांचा हेतु चांगला होता ह्मणजे टिळकांची कामगिरी विधायकच होती असें ह्मणण्यास प्रत्यवाय राहत नाहीं. हेतूनंतर परिणामही लक्षांत घ्यावा लागतो. End justifies the means. परिणामाकडे लक्ष द्या. तो चांगला असला कीं त्याचे मार्ग कसेही असले तरी क्षम्य आहेत, अशी एक इंग्रजी म्हण आहे. आणि तिचा फायदा आंग्ल ग्रंथकारांनीं रॉबर्ट क्लाइव्ह वॉरन् हेस्टिंग्ज, मार्किस, वेल्स्ले वगैरे राजकारणी पुरुषांना दिला आहे. हाच फायदा टिळकांना देऊं लागल्यास त्यांच्याहि कार्यांचा परिणाम त्या सवलतीस योग्यच आहे. त्यांच्या कार्याची कोणतीहि बाजू घ्या. तीं जनतेनें खूप प्रगति केली आहे आणि तिला कारण प्रामुख्यानें टिळक झाले आहेत असेंच दिसून येईल. ह्मणून या दुसऱ्या दृष्टीनेंही त्यांची कामगिरी विधायक स्वरूपाचीच होती असें ह्मणावें लागतें.

इतकें असूनहि, हेतु आणि परिणाम यांच्याकडे सर्वस्वी दुर्लक्ष केलें आणि साधनांचाच तेवढा विचार केला तर मात्र टिळकांच्या साधनांना ( १ ) सख्य ( २ ) विरोधीभाव असे दोन मोर्तब असतात. अर्थातच हे दोन्ही शिक्के इतक्या विलक्षण स्वरूपाचे असतात कीं विरोध कोठें आरंभ पावतो व कोठें संपतो, किंवा सख्य कोठें उगम् पावतो व कोठें लयास जातें, हें नक्की ठरविणें शक्यच नाहीं. दे. भ. शिवरामपंत परांजपे हे टिळकांच्या पदरांत शिलामूर्तिकाराचा विघातकपणा घालण्यास कबूल झाले पण टिळकांचे कैक विरोधीभाव मेणाच्या मूर्तिकाराच्या रचनाविघटनात्मक कुशलतेच्या स्वरूपाच्या असत. उदाहरणार्थ पुण्याचा प्लेग, युद्धकालांतील त्यांचा राजनिष्ठेचा जाहिरनामा, त्यांची स्वयंसैनिकांचीं हिंदी पथकें, सरकारच्या वतीनें लढण्याकरितां तयार करण्याची जाहीर मनीषा, वगैरे. तेव्हां विघातक कोणती कामगिरी व विधायक कोणती सेवा हें ठरविणें कठीण आहे. तथापि सर्वजनतेला समजेल असें एक स्वरूप निश्चित करणें अत्यंत जरूर आहे. टिळकांचे स्वकीय ह्मणा किंवा परकीय ह्मणा जे प्रतिस्पर्धी, त्यांच्याशीं न जुळणाऱ्या गोष्टी विरोधाच्या समजाव्या आणि जुळणाऱ्या त्या सख्यत्वाच्या समजाव्या. मूळ हेतु मात्र अत्यंत चांगले होते हें अंत:करणांतून कधींच काढूं नये.

प्रथम विधायक कामगिरीचाच विचार करणें इष्ट आहे. या विषयरचनमुळें आपणांला कालमानानुसार नेहमींच जातां येईल असें नाहीं. लोकमान्यांची विधायक कामगिरी अगदीं त्यांच्या अंतघटकेपर्यंत झालेली असल्यामुळें आपणाला त्यांच्या चरित्राची अतापर्यंत मजल मारून फिरून विघातक सेवेकरितां तोच कालविभाग आक्रमावा लागेल. ह्याच प्रकार स्थलांविषयीं देखील होईल. पुणें, मुंबई, कलकत्ता, नागपूर, धुळें, मद्रास; नव्हे इंग्लण्डमध्यें जाऊन फिरून, जळगांव जानोद, चोपडें, अमळनेर वगैरे ठिकाणींही परत यावें लागेल. टिळकांसारख्या विभूति देशकाल मर्यादित कधींच नसतात. त्यांचें सच्चरित्र देशकालानुसार गाऊं म्हटलें तर त्याची गोडी कमी होते; कथानकाची सांखळी राहत नाहीं; सूक्ष्मगामी परिणाम स्पष्टदर्शनी होत नाहींत तोंच अस्पष्ट होतात. तेव्हां आम्ही केवळ स्पष्टतेकरितां देशकालाची सीमा सांभाळून लोकमान्यांचें यापुढचें चरित्र गाणार आहोंत.

# ( ३ )

तेव्हां बळवंतरावजी आणि श्रीधररावजी ह्यांचें इर्दो, उमरावती किंवा वऱ्हाडांतील कोणत्या तरी मोठ्या शहरीं वकिली करून, शिक्षणसंस्थेला पुरेसें द्रव्य मिळवायचें आणि नंतर एखादी शिक्षणसंस्था स्थापन करायची असें ठरलें. आणि त्या निश्चयाप्रमाणें ते दोघे एका रविवारीं निघणार होते. खरो-खरींच असल्या अत्यंत क्रान्तिकारक दिवसांच्या नक्की नोंदणी करून ठेव-लेल्या असाव्या. त्यायोगें कार्याची, त्यांच्या कर्त्यांची व कारणांचीहि आप-णांला शक्य तितकी स्पष्ट व सत्य अशी कल्पना करितां येते; असो. नक्की तारखेच्या अभावीं हा रविवार इ. स. १८७९ च्या दिसेंबरांतलाच असावा असा पुरावा आहे. बालशिक्षणमालेच्या खास टिळक अंकांत रा. ह. र. भाग-वत हे ( दुसऱ्या आवृत्तींत ) लिहितात कीं, " लगेच ह्मणजे सप्टेंबर महि-न्यांतच त्या चौघांनीं ( रा. टिळक, रा. आगरकर, रा. भागवत आणि रा. करंदीकर यांनीं ) शास्त्रीबुवांच्या नारायण पेठेंतील वाड्यांत एकेदिवशीं रात्रीं त्यांचीं गांठ घेतली " परंतु ही गांठ नुसती बोलणें लावण्याची होती. नक्की निश्चयाची नव्हती. शिवाय या भेटींत टिळक तरी जातिनिशीं, नसावेत. कारण ते त्याचवेळीं मुंबईत परीक्षेच्या तयारीच्या ऐन भरांत होते. उपासनी पास होऊन धुळ्याला माधवरावजी रानडे यांची सल्ला घेत असत. आगरकर भागवत आणि करंदीकर हे मात्र पुण्याला होते. त्यांनीं पत्रद्वारें टिळक व उपासनी यांची संमति मिळविली असावी. टिळकांनीं निश्चय केलेली ती भेट होती हें भागवतांचें विधान, त्यांनीं जरी नक्की महिना सांगून, भेट झाली ती दिवसा नव्हे तर रात्रीं झाली असा मुकरपणा नमूद करून ठेविला आहे, तरी पुराव्याच्या कसोशीला उतरत नाहीं. पहिली पुराव्याची गोष्ट अशी कीं, खुद्द शास्त्रीबुवाच पुण्याला आले ते सप्टेंबरांत आले. शास्त्रीबुवांनीं आपला स्वतंत्र शाळा स्थापन करण्याचा विचार आपल्या पत्नीशिवाय दुसऱ्या कोणासहि कळविला नव्हता हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. पण ही गोष्ट रत्नागिरीची आहे आणि त्यांची मुग्धता अर्थातच राजीनामा देईपर्यंतच टिकणारी होती. ती राजीनामा दिल्यानंतर आणि रत्नागिरी सोडल्यानंतर टिकणें शक्य नव्हतें. कारण शा-

स्त्रीबुवा जरि बोलले नाहींत तरी त्यांच्या राजीनाम्याचा डंखा वाजलाच. तरीसुद्धां त्यांत शास्त्रीबुवांनीं जातीनिशीं मदत केली नाहीं. पुण्याला आल्यावर त्यांनीं आपल्या विचाराला जर कुठें वाच्यता दिली असेल तर ती प्रथम भावे स्कुलाचे उत्पादक रा. भावे यांच्याजवळच. ही भाव्यांची शाळा स. १८७९ च्या अखेरीला चांगल्या स्थितींत आली होती. अर्थातच भाव्यांना जेव्हां विष्णुशास्त्र्यांचा विचार कळला तेव्हां त्यांनीं विष्णुशास्त्र्यांनां आपल्या शाळेंत ओढण्याचा विचार चालविला होता. म्हणजे स. १८७९ च्या अखेरीपर्यंत टिळक विष्णुशास्त्र्यांच्या बेताला सर्वस्वी अनुकूल होते असें दिसत नाहीं. शिवाय तिसरा मुद्दा असा कीं टिळक सप्तेंबरांत एल्. एल्. बी. झाले नव्हते. या मुद्यांवरून टिळकांनीं विष्णुशास्त्र्यांच्या बेतांत सामिल होण्याचा नक्की निश्चय दिसेंबरांतल्या एकाद्या गुरुवारी केला असला पाहिजे असें सिद्ध होतें.

आतां आमच्या विधानाच्या विरुद्ध पुरावाहि खुद्द शास्त्रीबुवांच्या एका स्वदस्तुरच्या पत्रांतच आहे हें आम्ही विसरलो नाहीं. शास्त्रीबुवांनीं आपल्या कनिष्ठ बंधूंना जें पत्र लिहिलें आहे, व ज्याचा एक उतारा आम्ही दुसऱ्या प्रकरणांत प्रसिद्ध केला आहे, त्याची तारिख १३ सप्तेंबर १८७९ ही आहे. पण त्या पत्रांत टिळक आगरकर वगैरे मंडळींना आपण येऊन मिळतों असें नुसतें बोलणें लाविलें होतें असा उल्लेख आहे. " आम्ही आमच्या शाळेची मुहूर्तमेढ उभारण्याचा दिवस १ जानेवारी स. १८८० हा मुक्रर केला आहे " असेंही त्या पत्रांत लिहिलें आहे; आणि, " अशा तोफखान्यापुढें हायस्कुलचा आम्ही धुव्वा उडवून देऊं " अशा उत्साहाचे त्यांत उद्गारहि आहेत. परंतु हा उत्साह तरुण मनाचा भावी स्वातंत्र्यसौख्याचा होता. त्यांनीं मुक्रर केलेली जानेवारीची पहिली तारिख पत्रद्वारेंहि ठरली असेल. तें कसेंहि असो. मिळत असलेल्या पुराव्यावरून उपासनी आणि टिळक यांचा विचार वऱ्हाडात किंवा मध्यप्रांतांत कांहीं वर्षेंपर्यंत तरी वकिली करण्याचा होता; त्यावेळीं ते दोघेहि वकीलीच्या परीक्षेंत उतरले होते; म्हणजे स. १८७९ च्या अखेरीसपर्यंत तरी टिळक आणि विष्णुशास्त्री यांना न्य इंग्लिश स्कूल काढायाचेंच असा सर्वसाधन संपत्तीचा कृतनिश्चय झालेला

१ वि. चि. यांचें चरित्र पान २२७

नव्हता, असेंच स्पष्ट दिसून येतें. तथापि सप्टेंबरांत टिळक शास्त्र्यांना भेटले नाहींतच असें विधान करण्याचें धाष्ट्य आह्मी करित नाहीं. कदाचित् अभ्यासांतून सवड काढून ते पुण्याला येऊन गेलेहि असतील. एका रात्रींत भेट घेऊन परत मुंबईला जाणें अशा तातडीमुळें संभाव्य असेलहि; आणि ह्मणून भागवतांचें रात्रींच भेट झाल्याचें छापिल टांचण कदाचित् साधारहि असेल. परंतु टिळकशास्त्र्यांच्या साध्या भेटीचा आमचा मुद्दाच नाहीं. मुद्दा आहे तो टिळकांच्या कृतनिश्चयाच्या भेटीचा आहे. आणि ती भेट, बैठक ह्मणा हवें तर, डिसेंबरांतल्या एकाद्या गुरुवारीं झाली असावी. कारण त्याच बैठकीमुळें टिळकांनीं वकिली करण्याचा कृतनिश्चय सोडला यांत दुमत नाहीं, असो.

विष्णु शास्त्री चिपळूणकरांनीं रत्नागिरी सोडून पुण्याला शाळा स्थापन करण्याचा विचार केला. त्यांत त्यांना डेक्कन कॉलेजांतील टिळक, आगरकर, करंदीकर आणि भागवत यांनीं जाऊन मिळण्याचें ठरविलें. त्यावेळीं उपासनी धुळ्याला होते. त्यांनां स्वताला विष्णुशास्त्र्यांना मिळावें असें वाटत होतें. पण त्यांचा स्वभाव मूळचाच शांत असल्यामुळें ते प्रत्येक गोष्ट धिराईनें करित. सप्टेंबर आणि डिसेंबर यांत विष्णुशास्त्र्यांनीं प्रॉस्पेक्टस लिहून प्रसिद्ध करण्याचें कबूल केलें. त्याच सुमाराला भागवत आणि करंदीकर हे कटांतून गळाले. आगरकर मात्र "येतों" असें ह्मणत. तरी त्यांनींही एम्. ए. झाल्यावर येतों, असा लांबणीचा पल्ला ठेवला होता. इकडे उपासनीहि धुळ्याहून पुण्याला गेले आणि टिळक मुंबईहून पुण्याला आले. आणि इतरांपेक्षां तेच दोघे परस्परांचे विशेष जिव्हाळ्याचे स्नेही असल्यामुळें त्यांनीं वकिली करण्याचा निश्चय केला. शास्त्रीबुवांचा प्रॉस्पेक्टस पाहावयास मिळेल तर फार चांगलें होईल. आमची कल्पना आहे कीं त्या प्रॉस्पेक्टसमुळेंच मण्डळांत विलक्षण गडबड उडवून दिली असली पाहिजे. त्याचप्रमाणें विष्णुशास्त्री आपल्या शाळेला येऊन मिळत नाहींत, तेव्हां त्यांच्या भावी शाळेला गर्भावस्थेंतच चिरडून टाकावी, असाहि भाव्यांचा एखादा कट असेल. तिसरा पोटशूळ सरकारी हायस्कुलाच्या हेडमास्तरांच्या पोटांत उठला असेल! असेल कशाला? होताच[1]. तेव्हां अशा या गर्भपोषणाचा इतिहास खरोखरच अत्यंत बोधप्रद व मनोरंजक असला पाहिजे. हा इतिहास

---

१ वि. चि. यांचें चरित्र पानें २३९-२४०

जनतेपुढें आणावा अशी आह्मी रा. न. चिं. केळकर यांना सप्रेम विनंति करितों.
तोंपर्यंत उपलब्ध तेवढ्या माहितीवरून आह्मी लिहितों कीं, ठरल्याप्रमाणें स.
१८८० च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेला- दुसरीला नव्हे— विष्णु-
शास्त्रयांनीं 'न्यू इंग्लिश स्कूल' या नांवाची एक शैक्षणिक संस्था पुण्याला
मोरोबादादा फडनवीस- नाना फडनवीसांचे प्रतिस्पर्धी- यांच्या वाड्यांत
उघडली. रा. भागवत यांनीं आपल्या बालशिक्षणमालेच्या लेखांत २ जाने-
वारी म्हटलें आहे तें बरोबर नाहीं. विष्णुशास्त्री आणि टिळक हे दोघे एका-
च करारी बाण्याचीं दोन भिन्न भिन्न शकलें होत. विष्णुशास्त्रयांच्या चुलतीला
ता. ३१ दिसेंबर स. १८७९ च्या रात्रीं कॉलऱ्यानें पूर्णपणें पछाडिलें. तरी-
सुद्धां शाळेच्या समारंभाला आपण गेलों नाहीं तर तो एक निंदाजनक अप-
शकुनच होईल असें त्यांच्या मनाला वाटलें आणि त्यांनीं वेळांत वेळ काढून
समारंभ १ जानेवारीलाच उरकून घेतला. त्यांनीं आपलें त्यावेळचें भाषण
इंग्रजींत केलें. शास्त्रीबुवांच्या व टिळकांच्या इंग्रजी पत्रादि लेखनावर कित्येक
एककल्ली मराठीभाषाभक्त ताशेरे उडवितात, त्यांचा विचार पुढें योग्य
प्रसंगीं होईलच. एथें कथानकाचें सूत्र पुढें चालवून सांगायचें ह्मणजे. शास्त्री-
बुवांचें भाषण झाल्यावर टिळक आणि नामजोशी यांनीं आलेल्या १५०
विद्यार्थ्यांची त्याच दिवशीं नोंद केली. त्या दिवसाच्या हजिरीबुकावर फक्त
तीनच शिक्षकांच्या सह्या होत्या. कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर, कै. बळवंत-
रावजी टिळक ( वाचकांनों, अश्रूंची माफी करा ) आणि कै. माधवरावजी
नामजोशी. टिळक प्रथम शाळेला येऊन मिळण्याचा विचार करीनात याचें
कारण असें होतें कीं त्यांच्या मनांतून शिक्षकांनीं कमालीच्या स्वार्थत्यागानें
रहावें आणि आरंभापासूनच [illegible] काढतां एखादें कॉलेजहि स्था-
पन करावें असें होतें. या कल्पनेनुसार, रा. उपासनी सांगतात कीं, सरकारी
डेक्कन कॉलेजच टिळक-आगरकरादि तरुणांच्या हातीं देण्याला खुद्द सर-
कारच कबूल झाले होते. परंतु आह्मी कॉलेज घेऊं तें मालकी हक्कानें घेऊं,
मन चाहील तर त्याच्या शिक्षकवर्गांत इंग्रजीकरितां एकादा किंवा गरजे-
प्रमाणें अनेक युरोपियन प्रोफेसर्स ठेऊं, असा टिळकांनीं पत्रव्यवहार सुरू
केला होता. परंतु प्रत्येक गोष्टीवर कंट्रोल ठेवणाऱ्या सरकारनें "कंट्रोल"

१ वि. चि. यांचें चरित्र. पान २३३. २ कर्मयोगी पान ११२.

शिवाय कॉलेज देण्याचें नाकारिलें. आणि मग टिळकांनीं हि कॉलेजचा नाद तूर्त तरी सोडण्याचें कबूल केलें. दुसरी स्वार्थत्यागाची कल्पना विष्णुशास्त्र्यांकडून मनापेक्षां हि अधिक पुरवली गेल्यानंतर टिळकांनां वकिलीचा निश्चय झुगारून देण्याला मुळींच जड गेलें नाहीं. आणि नंतर ते जे त्या संस्थेला चिकटले ते स्वार्थत्यागाचा डिंक जसा कमी होऊन मतलबीपणाचें पातळ पाणी संस्थेंत मुरूं लागलें, तसें स. १८९० सालीं अजिबात गळालें. अर्थातच या दहा वर्षांची त्यांचीं शैक्षणिक कारकीर्द आम्ही अभ्यासावयाला हवी. पण तत्पूर्वी विष्णुशास्त्र्यांचे धाकटे बंधु व चरित्रकार रा. लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर यांनीं टिळकांच्यासंबंधीं यावेळचे जे उद्गार काढले आहेत ते आम्हांस एथें नमूद केल्याशिवाय पुढें जाववतच नाहीं. लक्ष्मणरावांनीं ह्मटलें आहे:–

" विष्णुशास्त्री यांचे अंगीं धैर्य, विद्वत्ता आणि स्वदेशहिताकरितां स्वत:स पैशाची व अंगमेहनतीची झीज लावून घेणें वगैरे जे गुण होते, त्यांमध्यें त्यांचे खालोखाल रा. टिळकांचीच पायरी लागेल यांत संशय नाहीं. रा. टिळक यांचे कित्येक मतवैचित्र्याबद्दल व त्यांचे कांहीं अंशीं तापट व आग्रही प्रकृतीवरून त्यांस कित्येक लोक नांवे ठेवितात तरी ज्या गृहस्थांनीं, एल्. एल्. बी. चा डिप्लोमा मिळाल्याबरोबर, इतर होतकरू विद्वान मंडळीप्रमाणें हायकोर्टाची वाट न धरितां किंवा मुनसफीची जागा पटकाविण्याची हांव न बांधितां, विष्णुशास्त्र्यांप्रमाणें देशसेवेकडे आपलें आयुष्य खर्चण्याचा निश्चय केला, त्यांची योग्यता कमी मानणें आणि ज्या रावसाहेबांचा आणि रावबहादूरांचा सरकारी नोकरींत स्वत:ची व स्वत:चे कुटुंबाची चैन चालण्याकरितां जन्माचा जन्म जायाचा, त्यांचा मोठा बडिजाव करणें, यांपेक्षां आपले लोकांमध्यें खरें थोरपणाची यथार्थ परीक्षा करण्याची अद्याप समजूत आली नाहीं याबद्दल दुसरें कोणतें प्रमाण पाहिजे बरें ! "[1]

आतां उपासनींच्याबद्दल चारच ओळी. त्यांनीं रा. टिळकांच्या सहवासांत सहाअधिक वर्षे घालवूनहि अखेरीस वकिलीच कां पत्करिली याचें पुष्कळांनां आश्चर्य वाटतें; आणि खरें सांगायचें म्हणजे वाईटहि वाटतें. परंतु रा. उपासनी हे देखिल विष्णुशास्त्र्यांच्या शाळेला चिटकण्याला कबूल होते.

१ वि. चि. चिपळूनकरांचें चरित्र. पानें २३२–२३४

१५२९२

पण त्यांना मंडळानें कबूल केलें नाहीं. कबूल न करण्याचें कारण उपसनींचीं घरचीं माणसें त्यांच्या अतीशय विरुद्ध होतीं. घरच्या अत्यंत जिव्हाळ्यांच्या माणसांचीं हृदयें दुखवून शाळेंत यायचें नाहीं असा मंडळाचा आग्रह होता. कृष्णशास्त्री चिपळूणकर हयात असेपर्यंत खुद्द विष्णुशास्त्र्यांनां आणि गंगाधरशास्त्री टिळकांच्या हयातींत स्वत: टिळकांना प्रत्यक्षत: स्वार्थत्यागाची व देशकल्याणाची अशी कोणतीच गोष्ट करितां आली नाहीं हें सुप्रसिद्धच आहे. कसेंहि असो. उपासनी खऱ्या देशसेवेला मुकले व पुढें तर सरकारी बेगडी बेडीमुळें बद्ध झाले व महाराष्ट्र तितकाच खिळखिळा झाला खरा. त्यांचा मनमिळाऊ स्वभाव भावी फाटाफुटीच्या प्रत्येक प्रसंगीं फारच फायदेशीर झाला नसता असें कोण शाहणा म्हणेल ?

## ( ४ )

आतां लोकमान्यांच्या सार्वजनिक सेवेला आरंभ झाला. ते विष्णुशास्त्री चिपळुणकर आणि माधवराव नामजोशी यांच्याबरोबर १ जानेवारी स. १८८० रोजीं " न्यू इंग्लिश स्कूल " या शास्त्रीबुवांच्या शैक्षणिक संस्थेंत एक अध्यापक झाले. त्यांच्या अध्यापनाची पूर्व तयारी व अध्यापक या नात्याची सरस्वतीसेवा यांत वरवर विरोध दिसून येतो; परंतु थोडासा खोल विचार केला तर हा विरोध भ्रमाचा आहे अशी खात्री पटते. टिळक बी. ए. झाल्यावर त्यांच्यापुढें दोन रस्ते होते. एक एम्. एचा आणि दुसरा एल्. एल्. बीचा. असाच प्रसंग सहा महिने अगोदर उपासनींवरहि आला होता; आणि त्यांनीं विशेष वेळ न घेतां वकीलिचा—अर्थात् पुढें मुनसफीचा—रस्ता स्वीकारिला. टिळकांनां निश्चय करायला वेळ लागला. त्यांच्या मनांतून वकिली करावयाची नव्हती. " त्यांच्यापुढें त्यावेळीं तीन निशाणें उभीं होतीं. एका निशाणाच्या फराऱ्याला एम्. ए. हीं अक्षरीं लिहिलेलीं होतीं. दुसऱ्या निशाणावर एल्. एल्. बी अशीं अक्षरें फडफडत होतीं[२] रा. गुरुजी पुढें लिहितात कीं तिसऱ्या निशाणावर " अ. मास्तरकी किंवा खजिनदारी " हीं अक्षरें होतीं. परंतु याला कांहीं आधार नाहीं. " मी मामलेदारीण होईन, " " माझा पुतण्या मुनसफ होईल " वगैरे ती. सौ. सत्यभामाईचें व ती. काकांचे आत्मगत विचार गुरुजींनीं त्यांच्या

१ कृ. आ. गुरुजी यांचें बा गं. टि. यांचें चरित्र पान अखेरचें शेवटून दुसरें वाक्य. २ कृ. आ. गुरुजीकृत " बा. गं टि. चरित्र " पान ९२

माथीं मारिले आहेत असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. टिळक सरकारी रुपेरी बेडी आपल्या शरीरावर धारण करतील ही कल्पनाहि करण्याइतकी कोणालाच मुळींसुद्धां जागा राहूं नये असेंच टिळकांचें लहानपणापासून तडफीचें वर्तन आणि वचनदेखील असे. उपासनी सांगतात कीं टिळकांना जेव्हां, बी.ए. झाल्यावर, पुढें काय करावें; याचा विचार करावा लागला तेव्हां " उपासनी एल्. एल्. बी चा अभ्यास करित आहेत. तेव्हां तूं देखील तोच अभ्यास कर " असाच त्यांना घरांतून सल्ला मिळाला. आतां टिळकांच्या पुढें आणखी एक एल्. सी. ई चें निशाण होतें, ही गुरुजींची हकिकत मात्र खरी आहे. त्यांची गणितांत विलक्षण प्रगति होती; तेव्हां आपण एल्. सी ई सहज होऊं असा त्यांना एकदां विचार सुचला होता. परंतु तोहि गुरुजींच्या म्हणण्याप्रमाणें नोकरी करितां नव्हे तर बड्या बड्या एंजिनियरांप्रमाणें आपणहि प्रत्यक्ष दृश्यमान कृति करून अखंड कीर्ति मिळवूं या तडफीचा तो विचार होता. टिळकांची तीख किती तिखट असे याचें सर्टिफिकिट देण्याची जरूरीच नाहीं, आणि तो अधिकार आज कोणालाहि नाहीं. परंतु लहानपणापासून कर्तव्याची अव्यभिचारी भक्ति त्यांचीच होती, चिपळूणकरांनंतर असिधाराव्रताचा अंगिकार व आचार एकाट्या टिळकांनींच केला यांत थोडीसुद्धां शंका धरण्यास आधारच नाहीं; असो. एकूण टिळकांनीं बी. ए. झाल्यावर एल्. एल्. बीकडे आपल्या बुद्धीचा मोर्चा फिरविला खरा. एक तर उपासनी तिकडे फिरले होते म्हणून व दुसरें कारण कदाचित् ते बी. ए. च्या क्लासांत असतांना फक्त पांच महिन्यांकरितांच मुंबईला एल्फिन्स्टन कॉलेजांत होते, तेथें त्यांची कै. रा. गोविंदराव कानिटकर, रां. दादासाहेब [illegible] व कै. रा. दाजीसाहेब खरे यांच्यांशी मैत्री झाली होती; ती वाढवावी असेंहि त्यांना वाटलें [illegible] सखाराम अमृत पळशीकर हे देखील त्याच सुमाराला म्ह. स. १८७७ [illegible] मुंबईला वकीलाचा अभ्यास करित होतें. तेहि टिळकांप्रमाणेंच विलक्षण तडफीचे सद्गृहस्थ असत. या समान गुणामुळें तेहि टिळकांच्या कक्षेंत येऊं लागले होते. शिवाय एल्. एल् बीचा अभ्यास करित असतां टिळकांच्या मनांतून एम्. एचाहि अभ्यास करावयाचा होता. त्याप्रमाणें त्यांनीं अभ्यास केला; ते त्या परीक्षेला बसले आणि व्हॉर्थोनवेट साहेबांच्या विषयुक्त शल्यामुळें नापास झाले हें मागें एका प्रकरणांत आलेंच आहे.

एकूण टिळकांच्या मनांतून कांहीं वकिली करायची नव्हती. लोकसेवा करायची हें मात्र ठरलें नव्हतें. पण त्यावेळीं तरी लोकसेवेचें एक बऱ्यांपैकीं—चांगलें नव्हे—साधन ह्मणजे वकिली होय असें त्यांना वाटलें; आणि ह्मणून त्यांनीं कायद्यांचा कसून अभ्यास केला. परंतु सर्व कायद्यांना गुंढाळून त्यांनीं आपल्या अनंत बुद्धीच्या एका कप्प्यांत ठेविलें नाहीं तोंच त्यांच्या मूळ लोकसेवेच्या हेतूला शिक्षणप्रसाराचा एक राजमार्ग मिळाला. वकिलीपेक्षां अध्यापकाचाच विडा जास्त रुचकर आहे अशी त्यांची खात्री नसती तर त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूलसारख्या अंकीचनपण कार्यकारी संस्थेला आपलें जीवितसर्वस्व वाहिलेंच नसतें. ही गोष्ट वकिलांनीं मुद्दाम ध्यानांत ठेवावी. आज **असहकारितेच्या** वादामुळें वकील आणि शिक्षक यांच्यावर सारखीच जबाबदारी येऊन पडली आहे; ती न ओळखितां वकिलांनीं जर निष्कारण शिक्षकांशीं तुलना करून, शिक्षकांपेक्षां आपण श्रेष्ठ आहोंत असें विधान केलें,[१] तर एकतर तें अप्रस्तुत होईल व दुसरी गोष्ट तें निराधार होईल. एथें विशेष ऊहापोह न करितां लोकमान्य टिळकांनीं केव्हां हिं, एक क्षणदेखील, वकिली केली नाहीं तर उलट ते स. १८८० पासून स. १८९१ पर्यंत १०।११ वर्षें अध्यापक होते; त्यांची समाजसेवेची पहिली पायरी अध्यापकाचीच होती; शिक्षकाच्या मजबूत पायावर त्यांनीं समाजसेवेचा अजस्त्र व अभेद्य किल्ला उभारला, इतकेंच आह्मी नमूद करून ठेवितों; आणि लोकमान्यांची पूर्वतयारी जरी वरवर कायदाविषयक भासली तरी अंतर्यामीं ते खरोखर, **अत्यंत अत्यंत जिव्हाळ्याचे समाजगुरु** होते, यांत महाराष्ट्रांतील एकहि प्राणी, तो टिळकांचा शत्रु नसल्यास, आमच्या विरुद्ध जाणार नाहीं; अस्तु.

तेव्हां लोकमान्य टिळक स. १८८० च्या सुमारास " न्यू इंग्लिश स्कूल " चे एक आध्यापक झाले. प्रथम दिनींच चिपळूणकराना आपल्या चुलतीच्या भारी आजारामुळें घरीं जावें लागलें; आणि पहिल्या दिवसापासूनच शाळेचें काम टिळक आणि नामजोशी यांच्यावर येऊन पडलें. विस्तारभयास्तव फक्त लोकमान्यांचेंच काम आपण पाहूं या.

---

१ रा. रा. शंकर श्रीकृष्ण देव यांचें धुळें येथल व्याख्यान. विशय " असहकारिता. " ऑक्टोबर १९२०

कोणतेंहि एकादें नवीन कार्य शिरावर घेतलें म्हणजे त्याच्या आरंभ-दशेंतली सर्वांत कठीण गोष्ट कोणती असेल तर ती त्या कार्याच्या विस्ताराचीच होय. कारण तिचा भावी उत्कर्ष पहिल्या एक दोन वर्षांतील चिन्हांवरूनच ठरूं लागतो. पहिल्याच वर्षांत स्थापकांत जोरकसपणाचा अभाव दिसून आला कीं कार्याला मुळांतच कीड लागण्यास सुरुवात होते. उलट श्रमांहून वाजवीपेक्षां जास्तच यश आलें, आणि तें सर्वस्वी बाजूच्या परिस्थितिवरच अवलंबून असलें तर त्या कार्याला " कुत्र्याच्या मुताच्या झाडांप्रमाणें " क्षणिक यश आलें, व तें लवकरच अस्ताला जाणार, अशा टीकेचें साधार स्थल होतें. परंतु यश परिस्थितीनें लवकर येऊन तें मूळांत स्थापकांच्याच जोमदारपणावर अधिष्ठित असलें तर तें मात्र यश खरें; तें मात्र यश चिरकाल टिकणारें; व तें मात्र यश वंदनीय होय. न्यू इंग्लिश स्कुलाचा इतिहास वाचिला म्हणजे त्याच्या प्रथम वर्षाचें खत टाकणारे टिळक, नामजोशी आणि चिपळूणकर होते, म्हणूनच आजचें पुण्याचें न्यू इंग्लिश स्कूल म्हणजे अजूनहि सबंध हिंदुस्थानांत एक नमुनेदार शाळा झाली आहे. शास्त्रीबुवा तर शाळेचे आद्य जनकच असत. परंतु टिळकांनींहि शास्त्रीबुवाप्रमाणेंच एक वर्षभर बिनपगारी काम केलें. त्यांच्यावर शाळेच्या वाढीची तजवीज व अंतर्व्यवस्थेचा सर्व बोजा येऊन पडला. तें काम त्यांनीं नामजोश्यांच्या कळकळीच्या सहाय्यानें, अविश्रांत श्रम करून पार पाडिलें. त्या दोघांनीं शाळेंतील सामान कसें व कोठून आणावें या गोष्टीपासून तों शाळेचा अभ्यासक्रम कसा असावा, शिक्षकांची योजना कशी करावी व शाळेला मदत कशी मिळेल, या गोष्टींना वारंवार खल करित असावें. नामदार उपासनी सांगतात कीं मारी जरी वकिलीच्या धंद्यामुळें टिळकांशीं पुढें वारंवार गाठ होऊं नये तरी आमचा पत्रव्यवहार आरंभीं आरभीं पुष्कळ होई. दुर्दैवानें उपासनींजवळ हीं पत्रें आजमितीला नाहींत. उलट उपासनींचीं पत्रें टिळकांच्या जवळ असण्याचा बराच संभव आहे. टिळकांच्या अंगीं अलौकिक विद्वत्तेबरोबर अविश्रांत टापटीपहि असे. पुराव्याचीं कागदपत्रें तें वर्षांनवर्षे रुमालांत गुंडाळून ठेवित असत. आतां ही संवय त्यांच्या अंगीं जरूरीमुळें उत्पन्न झाली किंवा मूळचीच होती हें कळायला एकच मार्ग आहे; आणि तो म्हटला म्हणजे त्यांचे पट्टशिष्य व आमचे भाषागुरु रा. नरसिंह चिंतामण केळकर यांना तें

माहित असेल. आह्मी त्यांच्याशीं पत्रव्यवहार चालविला आहे. ते हल्लीं "असहकारितेच्या चळवळींत पूर्णपणें निमग्न आहेत; पुण्याला क्वचितच असतात. हीच स्थिति आमच्या अनेक साह्यकारी मित्रांची हल्लीं आहे. त्यामुळें या पुस्तकाची पहिली आवृत्ति, आमच्या मताप्रमाणेंसुद्धां बरीच अपुरी निघणार आहे. भीति वाटते कीं, व एका परीनें आनंद वाटतो कीं, दुसरी आवृत्तीहि बहुतेक पहिलीचेंच पुनर्मुद्रण होईल. कारण पुस्तकांना मागणी आजच फार आहे. तरीपण आम्ही शक्य तितकी जास्त माहिती दुसऱ्या आवृत्तींतहि घालूं. मात्र तिसऱ्या आवृत्तींत सगळ्या पत्रांचा समावेश होऊन तें पुस्तक आमच्याहि आनंदाला त्रिगुणित करील; असो. झालेलें अल्प विषयांतर टाकून देऊन चरित्राची गाडी पुन्हां रुळांवर आणावयाची म्हणजे असें सांगायचें कीं, उपासनी म्हणतात कीं "न्यू इंग्लिश स्कुलाचें बहुतेक सगळें काम टिळकांनींच आरंभावें. ज्या जेसुइट बाण्यानें त्यांनीं संस्थेंत प्रवेश केला होता, तोच स्वार्थत्यागाचा व आविश्रांत मेहनतीचा बाणा त्यांनीं अहोरात्र आचरणांत आणिला." टिळकांनीं तयार केलेलें एकादें वेळापत्रक, त्यांचा शाळेसंबंधीचा पत्रव्यवहार वगैरे साधनें उपलब्ध झाली तर किती पण मौज होणार आहे ? त्यांनीं, डेक्कन कॉलेज सरकार त्यांच्या हातीं देत असतां, सरकारशीं केलेला पत्रव्यवहार आणि युनिव्हर्सिटी-बद्दलची चर्चा, भाषणें व कागदपत्रें, यांची तुलना मोठ्या मनोरंजक आणि बोधप्रद रीतीनें करितां येईल. ही तुलना, निदान संक्षेपानें तरी आम्ही तिसऱ्या आवृत्तींत करूं. तोंपर्यंत आम्ही एवढेंच सांगून ठेवितों कीं न्यू इंग्लिश स्कुलाचा पहिल्याच वर्षाचा "ॲड्रेस" विष्णुशास्त्र्यांनीं मे १८८० मध्यें दिला. तो त्यांनीं स्वतःच लिहून काढिला होता; परंतु त्यांतलीं अत्यंत बाणेदारपणाचीं वाक्यें लोकमान्य टिळकांनींच आहेत. सदरहु शाळेचें उद्दिष्ट कार्य कोणतें आहे याविषयीं थोडासादेखील किंतु कोणाच्या मनांत येऊं नये म्हणून टिळकांनीं विष्णुशास्त्र्यांच्या संमतीनें पहिल्या ॲड्रेसमध्यें जीं वाक्यें घातलीं आहेत तीं येणें प्रमाणें:—

"The other important thing to be like-wise borne in mind is what constitutes the peculiar feature of this Institution. It is that full measure of freedom which is

# महाराष्ट्राचा कर्मयोगी.



कै. हिंदपुत्र आर्यपुत्र गोपाळराव आगरकर.



कै० हिंदपुत्र विष्णुशास्त्री चिपळूणकर.

accorded both to the teachers and the taught.. A teacher in our institution has to fear no hourly rounds of the Head-Master, no annual bugbear of the Inspectorial visit; he has no official etiquette to observe, variable with the whims and caprices of every new head ; no useless infliction of no end of catalogues, registers, books and papers to submit to. — "

" आणखी एक गोष्ट लक्षांत बाळगिली पाहिजे. त्या गोष्टींत या संस्थेचें वैशिष्ट भरलेलें आहे. ती गोष्ट अशी कीं, शिक्षक आणि शिक्षित यांच्यांतलें स्वाभाविक स्वातंत्र्य त्यांच्या पदरांत पूर्णपणें पडावें. आमच्या शाळेंतल्या शिक्षकाला हेडमास्तराच्या प्रतिघटकेला होणाऱ्या ( " मरिआईच्या " ) फेऱ्याची भीति वाटण्याचें कारण नाहीं; इन्स्पेक्टरचें प्रतिवर्षीचें दर्शन त्याला भेवडावून सोडणार नाहीं. नवा हेडमास्तर, नवी शिस्त, नवे रीतिरिवाज अशी फाजिल पद्धति त्याला सांभाळण्याची जरूर नाहीं. अवास्तव कॅटलॉग, रजिस्टरें, पुस्तकें आणि कागदपत्रें खरडण्याचें आतां त्याला कांहीं प्रयोजन नाहीं.—[1] "

हें वर्णन आणखी पंधरावीस ओळींचें आहे. इंग्रजी शिस्तीच्या फाजिल दडपणानें पोंचट झालेल्या आमच्या पिढींतील कांहीं तरुणांना लोकमान्यांचीं व शास्त्रीबुवांचीं वरील विधानें बेफामपणाच्या गैरशिस्तीचीं वाटतील, आणि त्यांत जे हेडमास्तर असतील त्यांच्या तर तळपायाची आग मस्तकांपर्यंत चढली असेल. परंतु शेकडों नव्हे हजारों शिष्य आपल्या आश्रमांत शिकविणारे कण्वसांदीपन्यादि महर्षि, कॅटलॉग्स्, रजिस्टरें, प्रोग्रेसबुकें वगैरे ठेवित नसत; ही गोष्ट त्यांनीं लक्षांत घ्यावी. आतां काळ बदलला ही गोष्ट, उलट बाजूकडून विधान ह्मणून कबूल आहे. तत्रापि, जीं प्रमेयें आमच्या मूळ स्वभावाला, संस्कृतीला, आर्यत्वालाच सर्वस्वीं परकीं आहेत, तीं केवळ शंभर वर्षांच्या दडपणामुळें तुह्मी अंगीं भिनवून घेतां कशाला ? जशी मुसलमानी लाट हिंदुस्थानावर आदळून हिंदुस्थानांतच फुटून जिरली तशीच ही युरोपियन संस्कृतीची अत्यंत कमजोर—कारण तिच्या मुळाशीं भांडखोरपणा आहे

१ न्यू इंग्लिश स्कूलचा पहिल्या वर्षाचा चिपळूणकरांचा अॅड्रेस.

म्हणून—लाट आमच्या हिंदुस्थानांत फुटून जिरणार आहे. आमचें सरकार इंग्रज आहे म्हणून आम्हांला शेक्सपियर सर्व जगांत अत्युत्कृष्ट, पहिल्या नंबरचा कवि आहे असें वाटतें; आमच्या तरुण पिढींतील एक वर्ग मध्यंतरीं ख्रिस्त धर्म स्वीकारूं लागला होता याला कारण इंग्रजी सत्ता; आणि मेकॉलेसारखा वाहवून जाणारा लेखक आम्हांला अजून प्रिय वाटतो याला कारण इंग्रजी राज्यच होय. ही सत्ता आहे म्हणूनच Essays, Dramas and Bible हीं आम्हांला वंदनीय पुस्तकें वाटतात. पण ते तिन्ही ग्रंथ बेगडी श्रीमंतीचे आहेत. या विषयावर खूप लिहितां येईल व लिहिलें पाहिजे; परंतु स्थलमर्यादा आमच्यासमोर धूमकेतूप्रमाणें स्पष्ट दिसत आहे. तेव्हां निरुपायानें लेखणीला मार्ग सारून आम्ही सांगतों कीं " **शिक्षक आणि शिक्षित यांच्यांतलें स्वाभाविक स्वातंत्र्य त्यांच्या पदरांत पूर्णपणें पडावें.** " हा मूळ हेतु न्यू इंग्लिश स्कुलाचा होता, असें चिपळूणकर, टिळक आणि नामजोशी यांनीं जाहिर केलें.

आम्ही आमच्या तरुण पिढींतील हेडमास्तरांना राग येईल असें म्हटलें. एकवार असें वाटतें कीं आमची ती भीति कदाचित् फोलहि ठरेल. परंतु टिळकांच्या वेळच्या सरकारी हायस्कुलाच्या हेडमास्तरांच्या मात्र अंगाची लाही लाही झाली. त्या वेळचे हेडमास्तर, लिहिण्यास खेद होतो कीं, वामन आबाजी मोडक हे होते. त्यांच्या सरकारी शाळेंतलीं मुलें अर्थातच कमी होऊं लागलीं होतीं. त्याविषयीं मोडकांनीं जें लिहून ठेविलें आहे तें अत्यंत चीड आणण्यासारखें आहे. त्यांनीं असें लिहून ठेविलें आहे कीं " येथें कांहीं उनाड व हुच्चे ( vagabond ) तरुण लोकांनीं एक नवीन खाजगी शाळा काढल्यामुळें तूर्त या शाळेंतील संख्या कमी झाली आहे. परंतु अशा शाळांची स्थिति केवळ कुत्र्याचे मुताचे झाडांप्रमाणें क्षणिक असल्यामुळें आमच्या शाळेची संख्या नेहमींची कमी होण्याची फारशी भीति नाहीं. "[1] या वाक्यांचा निषेध करण्याचा आतां काळहि नाहीं व जरूरहि नाहीं. पण हेंच अदूरदर्शीपणाचें वर्तन नंतरच्या राजकीय संस्थांतूनहि दिसून आलें; आणि त्याच्याच प्रादुर्भावानें, सरकाराशीं मिळतवारीनें वागणारा असा एक व सरकाराशीं फटकून वागणारा असा दुसरा, असे दोन पक्ष उत्पन्न झाले. पहिला नेमस्त आणि दुसरा राष्ट्रीय या संज्ञांनीं ते प्रसिद्धीस

१ वार्षिक रिपोर्ट, पुणा हायस्कूल स. १८८० एप्रील

आले] आहेत. त्यांचीं बीजें महाराष्ट्रांत जीं अनेक ठिकाणीं आढळून येतात, त्यांत हें वामनराव मोडकांचें हि एक मोडकें बीज आहे; असो.

लोकमान्य टिळकांनीं जर संस्थेच्या कारकुनी कामांतच आपला सगळा वेळ खर्च केला असता तर आह्मी त्यांची योग्यताहि पण तितकीच ठरविली असती. परंतु लोकमान्यांचें सत्त्व असल्या डबक्यांतच डुंबणाऱ्या बेडकीचें नव्हतें. त्यांनीं शाळेंतील विद्यार्थ्यांनां जे विषय शिकविले ते शिकविण्यास त्यांच्याखेरीज दुसरा कोणीहि समर्थ नव्हता. त्यांनीं गणित व शास्त्रज्ञान हे दोन विषय हातीं घेतले होते. एवढेंच नव्हे तर शाळेच्या बाल्यावस्थेंत शिक्षकांचा भरणा कमी असल्यामुळें प्रसंगविशेषीं त्यांनां दुसरेहि विषय शिकवावे लागत; आणि त्यांनीं अमका विषय मला येत नाहीं अशी कधींहि तक्रार केली नाहीं; किंवा हें काम माझें नव्हे, असें ह्मणून तेवढा तास नुसतें स्तब्ध बसून किंवा झोंप घेऊन काढला नाहीं. हल्लींही अशी टंगळमंगळ करण्याची प्रवृत्ति सरकारी आणि निमसरकारी शाळांतून दिसून येते. सरकारी खजिन्यांतून आमचेच पैसे येण्याचा हा गुण आहे कीं काय नकळे ? पण टिळक बिन पगारी शिक्षक असल्यामुळें ह्मणा किंवा स्वयंस्फूर्तीनें ह्मणा अथवा त्या दोन्ही कारणांमुळें ह्मणा त्यांच्याकडून न्यू इंग्लिश स्कूलच्या कोणत्याहि कामांत कोणतीहि कसूर ह्मणून झाली नाहीं. शूट साहेब हुशार शिक्षक खरे पण अत्यंत लहरी असत; परंतु त्यांचाच शिष्य बळवंत गंगाधर टिळक हा त्यांच्यापेक्षांहि जास्त हुशार पण मुळींच लहरी नाहीं असा असे. टिळकांनीं शाळेंतल्या नियमित कामांत खासगी व्यवहार, वाचनसुद्धां केलें नाहीं, ही गोष्ट अप्रतिम आहे. त्यांच्या भावी राष्ट्रकार्याचीं हीं असलीं बीजें होत ! स्वभाव त्यांनीं कसा आपल्या मुठींत ठेविला होता. ते आधुनिक काळाचे छत्रपति शिवाजीराजे होत, नेपोलिन बोनापार्ट होत, असे जे वारंवार उद्गार निघतात ते किती साधार व अर्थपूर्ण आहे हें त्यांच्या आरंभींच्या सार्वजनिक कार्यावरूनच दिसून येतें. टिळक ही मुळीं सर्वांशीं सार्वजनिक व्यक्ति होय. आपल्या व्यक्तिरूपाच्या अंशाकरितां टिळकांचा जन्मच नव्हता. त्यांचा अवतार समष्टीरूप असे; असो. टिळक रसायन व पदार्थ विज्ञानशास्त्रांचें शिक्षण शाळेंत शिक्षक या नात्यानें देत असत, या राईचा

टिळकांनीं अराजकतेला मदत केली, असा पर्वत चिरोलसाहेबांच्या वकीलांनीं केलेला आहे, हेंहि एथें सांगून ठेविलें पाहिजे.

लो. टिळकांची अध्यापनाची व चालकत्वाची अशा उत्कृष्ट रीतीनें कामगिरी चालली असतां शाळेला लवकरच रा. वासुदेवशास्त्री खरे—( यांची अलीकडची ओळख करून द्यावयाची ह्मणजे हे अति प्रसिद्ध "शिवसंभव " नाटकाचे कर्ते होत )—रा. गोपाळ रघुनाथ नंदरगीकर—( रघुवंश, जानकीहरण इ० संस्कृत-काव्यांवरील टीकाकार )—रा. हरि कृष्ण दामले, रा. कृष्णाजी बापूजी मांडे, रा. मुळे वगैरे मंडळी फक्त शिक्षक ह्मणून शाळेला येऊन मिळाली. या शिक्षकांकडे कोणते विषय असत, व ते त्यांनीं कशा रीतीनें शिकविले वगैरे माहिती प्रस्तुतच्या ग्रंथाला गौण आहे, तथापि या सर्व मंडळींना शाळेची नौका टीकेच्या तुफानी सागरांतून पार पाडण्याचें श्रेय दिलेंच पाहिजे; असो.

शाळेच्या आरंभींच्या वर्षांतली, म्हणजे स. १८८० मधली अत्युत्तम मिळकत म्हटली म्हणजे रा. वामन शिवराम आपटे यांची होय. लोकमान्यांच्या चरित्राला आपण जर दासबोधाची उपमा दिली—आणि ती खरोखरच तंतोतंत लागू पडेल—तर त्या दासबोधाच्या पहिल्या दशकांत आपट्यांना बरेंच उच्च दर्जाचें स्थळ मिळेल. आपट्यांची भूमिका टिळकांच्या चरित्रांत विलक्षण निरनिराळ्या रंगांनीं चकाकते. टिळकांच्या तुरुंगवासाला आपट्यांनीं आरंभ केला; परंतु टिळकांपेक्षां आपट्यांनींच शाळेचा बाह्य दर्जा ( Face value ) वाढविला. आपटे स. १८८० च्या ऑगस्टांत शाळेला येऊन मिळाले. त्यापूर्वीच्या ८ महिन्यांत, विष्णुशास्त्र्यांच्या रूपकाचा उपयोग करूं म्हटल्यास, ज्या तोफखान्याच्या मदतीनें सरकारी हायस्कुलाचा धुव्वा उडाला त्या तोफखान्यांतली हॉवित्झर टिळकांची होती. अर्थातच शाळेच्या श्रेयाचा बहुतेक सगळा भाग टिळकांनाच द्यावयास हवा. इतकें असून, " रा. आपटे हे न्यू इंग्लिश स्कुलांत आल्यापासून त्या शाळेला विशेष टापटीप व व्यवस्था हीं आलीं, " असें रा. लक्ष्मणराव चिपळू-

---

१ टिळक—गुण—कलाप; पान ४. २ रा. शंकर श्रीकृष्ण देव यांचें टिळकांच्या दौऱ्याच्या वेळचें भाषण; स. १९१७ दिसेंबर ३ वि. चिपळूणकरांचें चरित्र पान २४१

णकर लिहितात हें आश्चर्य होय. या आश्चर्याचा उलगडा उपासनींनीं "कर्मयोगी" च्या टिळक—अंकांतील आपल्या आठवणींच्या लेखांत केला आहे. ते म्हणतात—

"तथापि एथेंहि पुन्हां बळवंतरावजींचा एक सद्गुण मला प्रामुख्यानें दिसला. बळवंतरावजी आपलेंच घोडें पुढें पुढें दामटणारे होते; असा कित्येकांचा समज आहे. तो किती गैर आहे; नव्हे बळवंतरावजी मूळचे किती विनयशाली असत याची, शैक्षणिक संस्था स्थापण्याच्या वेळीं मला साक्ष पटली. वास्तविकपणें संस्था स्थापण्याच्या वेळच्या सगळ्या बारिकसारिक गोष्टी देखील ते जातीनिशीं करित असत. सगळीं कामें त्यांनींच केलीं. तेव्हां वास्तविक पहिले प्रिन्सिपाल तेच व्हावेयास पाहिजे होते; पण उलट त्यांनीं म्हणावें कीं "मी कामें करितों; ह्यांत मला मुळींच मौज वाटत नाहीं."

त्याच प्रसंगीं उपासनी पुढें लिहितात कीं "हाच विनय केसरी वर्तमानपत्राच्या संबंधींही दिसून आला."

या दोन उताऱ्यांवरून टिळक अत्यंत विनयशील असत असें दिसतें. उपासनींची ही साक्ष फार फार महत्त्वाची आहे. कारण "टिळक! आणि विनय!!" असे विरोधी भावांचें आश्चर्य अनेकांना वाटतें. खुद्द टिळकांचे आठ वर्षांचे लेखक रा. रा. आप्पाजी विष्णु कुळकर्णी यांनीं हि टिळकांच्या अंगच्या आठ गुणांत "विनयशीलपणा" ची गणति केलेली नाहीं. त्यांत कुळकर्ण्यांकडे दोष येत नाहीं. ते टिळकांच्या सहवासांत असतांना, टिळकांना आपल्या अंगच्या कर्मयोगित्वालाच जोरदार स्वरूप द्यावें लागलें. त्यामुळें टिळकांची विनयादि मृदु अंगें त्यांना दिसलीं नाहींत. त्यांचें "आठ वर्षांचें चरित्र" त्यांची टिपणांची कुशलता व्यक्त करितें; परंतु टिळकांच्या हृदयाचें आविष्करण त्या चरित्रांत नाहीं, असें निदान आम्हांला तरी वाटतें. दृढ कवचाखालीं नारिकेल जसें मृदु व मधुर जल धारण करितें तसे टिळकांच्या दृढ आत्मविश्वास, खडतर तपश्चर्या, अनिवार सत्यलालसा इत्यादि प्रखर सद्गुणांच्या अभेद्य खडकांतून विनय, परोपकार, विनोद, विभूतिप्रेम वगैरे शांतरसाचे निर्झर वाहत असत. आमेंचें हें पदरचें तिखटमीठ नव्हे, उलट टिळक ही व्यक्ति आम्हांला लोकांप्रमाणेंच लोकमान्य वाटत असली तरी

१ कर्मयोगी वर्ष १ लें पान ११२.

आमची त्यांच्याविषयींची भक्ति अव्यभिचारी ठेवण्याचें आह्मी कंकण बांधिलें आहे; भक्ति आणि नीति यांच्याहून बुद्धीची किंमत आम्हांला Thomas Buckle[1] पेक्षांही जास्त वाटते; आम्ही उपलब्ध पुराव्यांच्या आधारावरच लिहूं; पुरावे चुकीचे ठरले तर आमच्या चुका कबूल करण्यास आम्ही तयार असूं; पण मनास, बुद्धीस पटलेल्या पुराव्यावरून जर, टिळकच कशाला, गोखले, रानडे, मेथादि राष्ट्रपुरुष, आम्हांला वंदनीय वाटले तर आम्ही त्यांना वंदन करूंच करूं. उपासनी सांगतात कीं टिळक अत्यंत विनयशील असत. ते खासगी बैठकींतून मित्रप्रेमाच्या बौधिक भरांत आले म्हणजे सांगतात कीं टिळक श्रेयविभागाकडे कधीं हि पाहत नसत. तेव्हां न्यू इंग्लिश स्कुलांतील टापटीप, व व्यवस्था यांचें श्रेय आपट्यांपेक्षां जास्त टिळकांनांच आम्ही दिलें तर त्यांत सत्यास सोडून आमचें विधान होत नाहीं.

तथापि एक गोष्ट मात्र अगदीं खरी आहे. वामनराव आपटे न्यू इंग्लिश स्कुलास मिळाले याच्यायोगानें सरकारी अधिकाऱ्यांच्या अहंमन्यतेला आळा बसला आणि तितकीच न्यू इंग्लिश स्कुलाची इभ्रत वाढली; यांत संशयच नाहीं. आपट्यांची तैल बुद्धीची कीर्ति कॉलेजांत असल्यापासूनच वाढत होती. त्यांच्यासारखा मोहरा आपणांला लाभावा अशी इच्छा चॅटफील्डसाहेबाची व इकडे विष्णुशास्त्र्यांचीहि होती. खुद्द आपट्यांच्या मनाचा कल सरकारी शाळेकडेच आरंभीं विशेष झुकत असे. तथापि ब्रिटिशांच्या खरताणीच्या सवयीमुळें आपटे सरकारला मिळाले नाहींत, आणि शास्त्र्यांनां लाभले. असें जर झालें नसतें, आपटे जर सरकारी नोकर झाले असते, तर काय झालें असतें ? हा प्रश्न अत्यंत नाजुक आहे. तरी त्याचें उत्तर हें दिलेंच पाहिजे. परंतु तें एकदम न देतां त्यांचा टिळकांशीं जो संबंध आला त्याचें साधार वर्णन करून नंतर आह्मी आमचें मत देऊं. असें केलें तरच आमच्या निःपक्षपातीपणाची आह्माला खात्री पटेल; आणि वाचकांनांही आपलें स्वतंत्र मत बनवितां येईल.

पहिली गोष्ट आपट्यांनीं केली ती अशी कीं शाळेच्या कारभारांत 'सुपरिंटेंडन्ट' (मुख्य जबाबदार अधिकारी) ही जागा नवीनच तयार केली. मात्र ही जागा एकाच व्यक्तीकडे कायमची नसावी तर ती दरदर्षी वेगवेगळ्या इसमाकडे असावी, असा अपवाद टिळक आणि

१ Civilization in England Vol I chap. IV.

नामजोशी यांनीं मंजूर करून घेतला. शाळा स्थापन करण्याचें अखंड श्रेय एकट्या विष्णुशास्त्र्यांचेंच आहे याची कोणी शंका घेईल अशी कल्पनासुद्धां करवत नाहीं. अर्थातच पहिले हेडमास्तर—मुख्य अध्यापक—शास्त्रीबुवाच होते. तरीसुद्धां शाळेची सर्व देखरेख आणि जबाबदारी रा. आपटे यांच्या स्वाधीन त्या तिघांनींही केली. पुढील वर्षी इ. १८८१ सालीं शाळेचे सुपरिंटेंडन्ट बदलले असा कोठेंच पुरावा सांपडत नाहीं स्वतः शास्त्रीबुवा "आर्यभूषण" छापखाना, "चित्रशाळा" दुकान, आणि "किताबखाना" या संस्था काढण्याच्या उद्योगांत गुंतले होते. टिळकांकडे "मराठा" आणि आगरकरांकडे "केसरी" हीं वर्तमानपत्रें दिलीं होतीं. तेव्हां शास्त्रीबुवा, टिळक, आणि आगरकर या तिघांच्या अभावीं आपटेच स. १८८१ सालींसुद्धां शाळेचे सुपरिंटेंडेंन्ट असले पाहिजेत. पुढें स. १८८४ च्या आरंभीं "फर्ग्यूसन" कॉलेज स्थापन झालें तेव्हां त्याचे हि पहिले सुपरिंटेंडन्ट रा. वामनराव आपटेच असत. तेव्हां न्यू. इं. स्कुलाचे स्थापक जरी विष्णुशास्त्री असले, व चालक जरी टिळक व नामजोशी असत, तरी मुख्य अधिकारी वामनराव आपटेच होते.

आतां हे श्रमविभाग बरोबर झाले किंवा कसे हा प्रश्न आहे. याचें उत्तर बरोबर झाले, असेंच आहे. मला पहिले सुपरिंटेंडन्ट कराल तरच मी शाळेला येऊन मिळतो असा पुरावा नाहीं. उलट शाळेला स्कॉलरशिपा मिळवून देण्यानें तिचा दर्जा वाढतो, तो फायदा आपट्यांच्या शिकवणीपासून व देखरेखीमुळें न्यू. इं. स्कुलास मिळणार होता, ( तसा मिळाला, ) असें जाणून खुद्द विष्णु शास्त्र्यांनीं देखील आपणांहून मोठा दर्जा आपट्यांना दिला. टिळकांनां तर एक माहित होतें. कार्य करायचें, कार्याच्या क्षमतेकडे नजर द्यावयाची. त्याच्या प्राप्तीचा वाटा त्यांच्या लक्षांत देखील येत नसे. आगरकर १८८० सालींच परंतु नोव्हेंबर–डिसेंबरांत, ह्मणजे आपट्यांच्यानंतर शाळेंत रुजू झाले. ह्मणून त्यांचा हक्क पोंचत नव्हता. शिवाय

1 बालशिक्षणमाला; टिळक अंक. आवृत्ती दुसरी पान २२. २ मद्रासच्या गणेश आणि कंपनीनें The Indian Nation Builders, Part II मध्यें पान १४७ वर १८८५ सालीं फर्ग्युसन कॉलेज स्थापन झालें असें लिहिलें आहे; तें चूक आहे.

१८८१ पासून टिळकांना मराठ्याकडे आणि आगरकरांना केसरीकडे प्रामुख्यानें नजर देण्यास सांगून शास्त्रीबुवांनीं शाळेचें गाडें अत्यंत योग्य अशाच पदवीधरांच्या स्वाधीन केलें यांत मतभेद असूं नये असें वाटतें.

शाळेला आपट्यांनीं उत्तरोत्तर उत्तम स्वरूप आणिलें असेंहि वारंवार वाचण्यांत येतें. आणि स्कॉलरशिपा मिळवून दिल्या एवढ्यापुरतें हें विधान आह्मी हि कबूल करितों. पहिल्या वर्षी मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत शाळेनें 'पाठविलेल्या १६ विद्यार्थ्यांपैकीं १२ पास झाले. एवढेंच नव्हे तर त्यांतील एकाला जगन्नाथ शंकरशेटजींची पहिली स्कॉलरशिप मिळाली. नव्हे त्यापुढल्या बऱ्याच वर्षांत, दरवर्षी न्यू. इं. स्कुलांतील विद्यार्थ्यालाच ज. शं. स्कॉलरशिप मिळत राहिली होती. तें फळ आपटे यांच्याच परिश्रमाचें व काळजीचें होतें. आपटे स्वत: तर विद्वान होतेच, पण विद्यार्थ्यांनीं परीक्षेची तयारी कशी करावी याबद्दलची त्यांची शिकवणूकहि टापटिपीची व बिनचूक असे. परीक्षेंत १६ पैकीं १२ मुलें पास झाली यांत विशेष असें. कांहींच झालें नाहीं. आजच्या वीसाव्या शतकांतिल दुसऱ्या दशकांत आमच्या अमळनेरच्या शिक्षणप्रिय शिक्षकांनीं पहिल्याचवर्षी (स. १९१८) १४ पैकीं १४ मुलें पास होण्याइतके श्रम घेतले. त्यामानानें, जेव्हां विद्यार्थ्यांची गर्दी होऊन अहमहमिकेला कारणच नव्हतें अशा कालांत १६ पैकीं १२ विद्यार्थी पास होणें कांहीं नवलाचें नव्हतें. तथापि ज. शं. स्कॉलरशिप अव्याहत रीतीनें आपल्याच संस्थेला मिळवून देणें यांत मात्र खरी करामत आहे. आणि या अनुपमेय कामगिरीकरितां आपट्यांचें करावें तेवढें अभिनंदन थोडेंच आहे. प्रश्न फक्त एकच आहे. त्यावेळीं संस्कृत विषय कोणाकडे होता ? आपट्यांकडे किंवा टिळकांकडे ? शाळेचा जबाबदार अधिकारी ह्मणून श्रेयाचें लौकिक स्थल आपटे असतील पण टिळकांकडेच जर संस्कृत शिकवण्याचें काम असेल तर मात्र आह्मी आपट्यांनां श्रेय देण्यास तयार नाहीं. आह्मांला यासंबंधीं माहिती अजून मिळाली नाहीं. दिलगिरीची गोष्ट आहे. माहितीच्या अभावीं टिळकांच्याकडे व्याकरण व आपट्यांच्याकडे वाङ्मय असे कार्यविभाग असावेत. असें वाटतें; आणि हें वाटणें जर साधार असेल तर श्रेयविभागहि सार-

१ वि. चिपळूणकरांचें चरित्र. पान १४२. २ बालशिक्षणमाला. टिळक-अंक. द्वि. आ. पान २३.

खेच होतील हें निःसंशय आहे. त्यांतहि १८८२ सालीं कोल्हापूर प्रकरणाकरितां टिळकांना कैद झाली होती व पुढें संमतिवयाच्या कायद्याच्या धामधुमीमुळें टिळकांचें काम नंदरगिकर यांच्यावरहि येऊन पडलें असेल. तेव्हां त्यांनाहि त्यांच्या श्रेयाचा वाटा मिळणें रास्त आहे; असो.

तथापि स्कॉलरशिपा मिळवून देण्याखेरीज अंतर्व्यवस्थेच्या बाबतींत आपट्यांना, आह्मांला टिळकांइतका मान देण्याला आधार नाहीं. शाळेला शिस्त आपट्यांनीं लाविली याचा अर्थ विद्यार्थ्यांच्या वर्तनाला आपट्यांनीं वळण दिलें असा आह्मीं करितों. विद्यार्थ्यांच्या वर्तनाला वळण लाविणें हा एक अमोलिक गुण आहे याच्या विरुद्ध आह्मीं मुळींच नाहीं. परंतु वळण देण्याचें कटु कर्तव्यसुद्धां मधुरशब्द व सद्वर्तन या शर्करेनें अवगुंठित करूनच केलें पाहिजे. म्हणजे बाह्य शिस्तीच्या मुळाशीं प्रेमच असावयाला हवें. हें प्रेम आपट्यांच्या बाबतींत कमी होतें. त्यांची शिस्त कडक असे. उलट " टिळकांचें विद्यार्थ्यांवर प्रेम अतिरक्त होतें; व विद्यार्थ्यांचाहि त्यांच्यावर पराकाष्ठेचा लोभ होता. त्यांच्या सौजन्यामुळें त्यांच्याविषयीं शाळेच्या गडीमाणसांतहिं फार पूज्यबुद्धि होती. स. १८९० सालीं त्यांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीशीं फारकत करून घेतल्यानंतरहि, ही गडीमाणसांची प्रेमादरवृत्ति अखंड कायम होती.[1]" टिळक ही आतां एक असामान्य व्यक्ति होऊन गेली म्हणून त्यांचें सारेंच चांगलें, वाईट देखील चांगलें, असा प्रतिपक्ष होईल असें वाटत नाहीं. तथापि झालाच तर ( १ ) टिळक–गुण–कलापकर्ते, ह्मणजे वरील उतारा ज्यांच्या लेखांतून आह्मी घेतला ते, टिळकांचे एक प्रतिपक्षी आहेत; ( २ ) टिळकांना जाऊन अजून तीनही महिने पुरे झाले नाहींत; ह्मणून त्यांचीं व्यंगें ' फिल्टर ' होतील अशी आजच भीति नाहीं; ( ३ ) आह्मी स्वतः टिळकांचे अंध-भक्त ह्मणवून घेत नाहीं; वगैरे अनेक मुद्दे आम्ही वाचकांच्या पुढें मांडतों. आमचे वाचक आजकालच्या नवयुगाचे आहेत. ते उत्कृष्ट चिकित्सक आहेत हें आह्मी पूर्णपणें जाणून आहोंत.

तरीही प्रेमाची बाजू टिळकांनीं सांभाळिली व कटु शिस्तीची बाजू

---

१ टिळक—गुण—कलाप. पान ४

आपट्यांनीं पार पाडिली; आणि एकंदरीनें शाळेचा वेळकोट झाला असेंच ह्मणावयाला हवें. परंतु आपट्यांच्या या सर्व उत्कृष्ट कार्य-दुग्धांत, त्यांच्या स्वार्थत्यागाच्या ढिल्या वर्तनाच्या मिठाचा खडा पडला ही गोष्ट मात्र आह्मांला नमूद करून ठेवण्यास दुःख होतें. शाळेला येऊन मिळण्याच्या अगोदर त्यांनीं सुपरिंटेंडन्टशिपचा जरी हट्ट धरला नव्हता, तरी ज्या निस्वार्थीपणाच्या पायावर शाळा उभारिली होती, व ज्या पायाच्या मजबुतीकरितां टिळक निशिदिनीं डोळ्यांत तेल घालून बसले होते, त्या पायांत आपट्यांनीं स्वार्थाचीं लहान लहान छिद्रें पाडिलीं. संस्थेच्या हिताकरितां अत्यंत गरीबीनें गृहप्रपंच चालवून बाकीचा सगळा वेळ व सगळी कुशलता जेसुइट लोकांप्रमाणें, संस्थेच्या सेवेंतच खर्च करायचीं हा संस्थेचा कणखर नियम आपट्यांना पसंत नव्हता. त्यांचें ह्मणणें होतें कीं शाळेचें काम सांभाळूनही बरीच फुरसत सांपडते. तींत शिक्षकांनीं स्वतःला मिळकत होईल अशीं कामें करावीं, आणि शाळेच्या गरीबीमुळें त्यांना जी गृहप्रपंचांत ओढाताण होते ती ढिली करावी.[1] अट सयुक्तिक आहे यांत शंकाच नाहीं. पण जेव्हां राष्ट्रांत कार्यकर्ते पुरुष हातांच्या बोटांइतकेहि निपजत नाहींत, त्या कालांत त्या राष्ट्रपुरुषांनीं आपणांस इतरेजनांच्या तुलेनें मोजूं नये हेंच राष्ट्रहिताचें आहे. विष्णुशास्त्र्यांनीं नाहीं कां स्वार्थावर पाणी सोडिलें? टिळकांनीं नाहीं कां वकिलीचा नाद सोडून आप्तांचें मन थोडें तरी दुःखित केलें? आतां ही गोष्ट खरी कीं चिपळूणकर आणि टिळक यांच्या डोक्यांवर वडील माणसांचीं विशाल छत्रें होतीं. तशीं आगरकर-आपट्यांच्या डोक्यावर मुळींच नव्हतीं. आह्मांला हरिभाऊ गोडबोले सांगत असत कीं आपटे म्युनिसिपॅलिटीच्या चौकावरच्या कंदिलावर अभ्यास करित असत, इतकी त्यांची गरीबी असे. कबूल. सर्वथैव कबूल. परंतु अशा स्थितींतदेखील त्यांनीं जर टिळकांसारखे वर्तन केलें असतें तर त्यांची टिळकांपेक्षांहि जास्त कीर्ति झाली नसती काय? यावर अलीकडचा एक शास्त्रीय ज्ञानाचा पक्ष शास्त्रीय आक्षेप घेतो कीं दारिद्र्यामुळें आयुष्य कमी होतें. आगरकर-आपट्यांना दारिद्र्य नसतें तर त्यांचें आयुष्य वाढलें असतें व मग अर्थातच त्यांच्या हातून जनतेच्या अपेक्षेप्रमाणें निर्भेळ स्वार्थत्यागाची सेवा बरींच वर्षे झाली असती, ( Physical vitality ) शरीराची

1 बालशिक्षणमाला, टिळक—अंक द्वि. अ. पान २२

सजीवता खरोखरच हवी. उगांच मानसिक वाढीची तुतारी आम्हीहि फुंकित नाहीं. परंतु ज्या दारिद्र्यांत आयुष्याचा पहिला तृतीयांश गेला तें दारिद्र्य एकदम श्रीमंतींत विकास पावलें तर त्याचा शरीरावर विपरीत परिणाम झालाच पाहिजे. आतां आपटे आणि आगरकर हे दोघेहि एकदम श्रीमंत झाले नाहींत; आगरकर तर दारिद्र्यांतच वारले; हें अगदीं खरें. " आपलें दारिद्र्य कितीहि असलें तरी आपल्या प्रेतसंस्काराबद्दल आपल्या मित्रांवर खर्च पडूं नये म्हणून त्यांनीं आपल्या पेटींत कांहीं रुपयांची परचुंडी बांधून ठेविली होती. व तिच्यावर एक चिठ्ठी मारिली होती कीं, " माझ्या प्रेत दहनार्थ ![1] " तथापि शिक्षकांच्या शरीराच्या सजीवतेकडे चालकांनीं दुर्लक्ष केलें असा कोठेंच पुरावा नाहीं. तुम्ही लहानपणीं माधुकरी मागितली असेल तर आतांहि मागा, इतका कठोर स्वार्थत्याग टिळकांनींहि पुकारिला नाहीं. सर्व शिक्षकांचे पगार ठराविक प्रमाणांत असावे असा कारागृहांतील तोलका व्यवहार टिळकांनीं कधींच आंखिला नव्हता. आपल्या गृहप्रपंचाला जरूर तेवढें वेतन घ्या; पण बाकीची मिळकत वसे वा संस्थेच्या पायांवर घाला असा त्यावेळेला अत्यंत जरूर असलेला निर्बंध टिळकनामजोश्यांनीं घालून दिला होता. खुद्द आगरकरांनांहि तो निर्बंध अतिशय पसंत पडला. परंतु आपट्यांची जादा मिळकत पाहून, आगरकरांनाही पुढें पुढें स्वार्थाचा स्वाद इष्ट वाटूं लागला. " अगदीं मूळारंभीं म्हणजे न्यू इंग्लिश स्कूल स्थापण्याच्यावेळीं आगरकरांचें मत जरी पूर्ण स्वार्थत्यागाला अनुकूल, म्हणजे सोसायटीच्या प्रत्येक सभासदानें आपला सर्व वेळ व बुद्धि संस्थेलाच दिली पाहिजेत, असें होतें तरी तें बदलत जाऊन पुढें गोखल्यांच्या मनाची त्यांस जोड मिळाल्यावर ते दोघेहि, सोसायटीला प्रत्येकानें आपला सर्व काळ व बुद्धि देण्याचें कारण नाहीं असें म्हणूं लागलें. " परंतु या मतभेदाला आपट्यांनीं आरंभ केला. ते शाळेला येऊन मिळण्याच्या बेतांत होते तेव्हां त्यांनीं A guide to Sanskrit Composition ही विद्यार्थ्यांची आजकालची व्याकरणगीता, हातीं घेतली होती. ते संस्कृत शिकवित असतीलच. तेव्हां त्या पुस्तकाची मिळकत संस्थेला कां द्यावी ? अशी त्यांना शंका आली. पुढें केसरी आणि मराठा हीं पत्रें काढण्याची आणि " किरण " छापखाना विकत

[1] मनोरंजन. आगरकर-अंक. पान २९.

घेण्याची जी आपटे-आगरकरांनीं विशेष उचल घेतली म्हणून लक्ष्मणराव चिपळूणकर लिहितात,[1] तिचा हेतू तरी आपणांस त्यांतून कांहीं किफायत होईल, असें आपट्यांना वाटलें हाच होय.

आतां आपट्यांचा व टिळकांचा शाळेच्या बाबतींत जो दुसरा संबंध आला तो सांगयाचा आहे. हा दुसरा संबंध प्रत्यक्षत: शाळेविषयीं नव्हता परंतु त्यामुळें शाळेवर एक संकट मात्र ओढवलें होतें. तो संबंध म्हणजे कोल्हापूर प्रकरण होय. या प्रकरणाच्या विशेष माहितीचा संबंध टिळकांच्या संपादकत्वाशीं आहे. तेव्हां ती आम्ही तेथेंच देऊं. पण ऐथें एवढेंच सांगतों कीं ज्या विशिष्ट लेखांमुळें कोल्हापूरप्रकरण उद्भवलें आणि टिळक--आगरकरांना १०१ दिवस डोंगरीच्या किल्ल्यांत बंदिवास घडला, ते विशिष्ट लेख, वामनराव आपट्यांचे होत. याविषयीं लेखी पुरावा आमच्याजवळ नाहीं. कदाचित् केसरी–ऑफिसांत असेल. नव्हे असलाच पाहिजे. परंतु याविषयीं बरीचशी माहिती रा. उपासनी यांनीं आम्हांला दिली आहे. रा. न. चिं. केळकर हें जें चरित्र लिहिणार आहेत, त्यांत रा. श्री. बा. उपासनी हे त्यांना मदत करणार आहेत. त्याचवेळीं मी हें जाहिर करीन असें ते म्हणाले. त्यावेळीं आमचा चरित्र लिहिण्याचा विचार ठाम झाला नव्हता. परंतु आतां ती गोष्ट नमूद करणें आम्हांला सत्यशोधनार्थ प्राप्त आहे. शिवाय त्यांमुळें आपट्यांच्या लौकिकाला कोणत्याही प्रकारें कमीपणा न येतां उलट बर्वेप्रकरण चव्हाट्यावर उत्कृष्ट रीतीनें आणिल्याचें श्रेय त्यांच्या पदरांत पडलें. आतां, लेख लिहिला एकानें, व भोगावें लागलें दुसऱ्यांना, असा अपवाद जनतेकडून होईल हें खरें, परंतु शिक्षा भोगण्याची, नव्हे अगोदरच सर्व जबाबदारी घेण्याची आपली तयारी आहे असें आपट्यांनीं कबूल केलें होतें,[2] हें जनतेला समजल्यानंतर जनता आपट्यांबद्दल कुशंका घेईल इतकी ती खचित खचित वेडी नाहीं. तो खटला कोर्टांत सुरू होण्यापूर्वींच विष्णुशास्त्री यांना देवाज्ञा झाली होती. तेव्हां चिपळूणकर नाहींत, आणि आपटेहि जर कैदेंत अडकले तर शाळा चालवावी कोणीं,[3] असा प्रश्न उत्पन्न झाला. वर्तमान-

---

१ बालशिक्षणमाला. टिळक अंक. द्वि. आ. पान २५. २ वि. चिपळूणकरांचें चरित्र पान २६२. ३ बालशिक्षणमाला टिळक–अंक. द्वि. आ. पान. २३

पत्रांचें समजलें. टिळक-अगरकर कैदेंत गेले असतां मागें आपटे व वासुदेवराव केळकर तीं पत्रें चालवायला होते. परंतु आपट्यांच्या पश्चात् शाळेचें जूं मानेवर घेण्याला टिळक-आगरकरांना सवड झाली नसती; व सरकारची इतराजी म्हणून तें इष्टहि नव्हतें. नामजोशी ग्रॅज्युएट नव्हते. शिवाय टिळक-आगरकर, मराठा-केसरींचे संपादक म्हणून खटल्यांत खेचले गेले असतेच. तेव्हां आपट्यांसारखा मोहरा फुकट कां गुंतवून टाका, अशा सोयीकरितां मंडळींनीं आपट्यांना मोकळें राहण्याचा आग्रह केला होता.

आतांपर्यंत आपट्यांचा न्यू इंग्लिश स्कुलाच्या बाबतींत टिळकांशीं म्हणून जेवढा संबंध आला होता, त्याचा इतिहास सारांशरूपानें सांगितला. आतां त्यावरचें आमचें मत आम्ही वाचकांपुढें मांडतों. आमच्यामतें आपट्यांनीं शाळेच्या घटनेच्या बाबतींत जो स्वार्थत्यागाच्या अत्यवश्यक तत्त्वाला अपवाद उत्पन्न केला, त्याखेरीज आपट्यांची बाकीची सेवा अभिनंदनीयच होय. अर्थातच तो अपवाद म्हणजे किल्ल्याच्या अत्यंत महत्त्वाच्या बुरुजाखालीं जसा सुरुंग तयार करावा, तसल्याच स्वरूपाचा ठरला; कारण टिळकांनीं स. १८९० मध्यें जेव्हां संस्थेंतून आपलें अंग काढून घेतलें तेव्हांच शाळेचा, कॉलेजाचा आणि सोसायटीचाहि चिपळुणकरी बाणेदारपणा नाहींसा झाला; आणि आज तीं, जरी सर्वस्वी नाहीं तरी बव्हंशीं सरकारी ओंजळीनेंच पाणी पीत आहेत ! आमच्या मतें तरी या पापाचें खापर आपट्यांच्याच माथीं बसतें ! आतां आपट्यांनीं आपला मानस अगदीं मोकळ्या मनानें व उघड रीतीनें मंडळींनां अगोदरच कळविला हें अगदीं खरें आहे. आणि त्यामुळें त्यांच्या दोषाची धार बरीच बोथट होते हें देखील आम्ही कबूल करितों. परंतु प्रत्येक समंजस व सुसंस्कृत राष्ट्रपुरुषावर राष्ट्राचा जो एक विशिष्ट हक्क असतो त्याच्या तुलनेनें पाहतां आपट्यांनीं निदान कांहीं वर्षें तरी टिळकादि सभासदांइतका स्वार्थत्याग करणें राष्ट्रहिताचेंच होतें.

परंतु याउपरहि असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं टिळकादि मंडळींनीं तरी आपट्याचें म्हणणें कां कबूल केलें ? त्यांनां जर पूर्ण स्वार्थत्यागच शाळेला हितावह होईल असें वाटत होतें तर त्यांनीं तरी दूरदृष्टि ठेवावयाची होती. याचीं उत्तरें अनेक आहेत; परंतु त्या सर्वांचा मिलाफ एकाच गोष्टींत करतां येण्यासारखा आहे. ती गोष्ट म्हटली म्हणजे टिळकांनां कार्याची ला-

लसा असे. कार्य साधायचें, मग त्याकरितां नुसत्या शरीराची नव्हे, नुसत्या संपत्तीचीहि नव्हे, तर आपल्या उत्तमोत्तम मतांचीहि ते सारवाट करित होते. आपट्यांच्या आगमनानें शाळेला पुष्कळशी मदत होत आहे ना? तर मग करा त्यांचा हेका कबूल; असा त्यांचा क्रम असे. आपल्या उदाहरणानें व आपल्या वाणीनें आपण आपल्या प्रतिपक्षीयांचें मन अधिक शुद्ध करूं व मग देशाचें कार्य दुप्पट जोरानें चालेल, तें सध्यांच नकाराचा मोडा घालून अजिबात बंद पडूं नये, असा सलोख्याच्या भाव ( Compromising Spirit ) त्यांच्या पवित्र अंतःकरणांत सतत वास करित असे. त्यांच्या विद्येच्या अखंड अभ्यासानें अत्यंत शुद्ध झालेल्या हृदयांत " अहंकार " तो कसा राहिलाच नव्हता. अहंमन्यतेची जाणीव त्यांनीं नष्ट केली होती. याचें जें एक प्रत्यंतर, पुढें स. १९०७ सालीं सुरतेला आलें, तें योग्य ठिकाणीं योग्य शब्दांत वर्णन करून सांगूच. परंतु एथें अमृत बझार पत्रिकेचे संपादक हिंदपुत्र बाबु मोतिलाल घोष यांचे तत्संबंधींचे बहुमोलाचे शब्द मात्र उतरवल्याखेरीज चालायचेंच नाहीं. त्यांनीं लिहिलें आहे:—

" Ponder on the magnitude of the magnanimity and self-abnegation of the man. He chearfully consented to humiliate himself before relentless enemies who would tear him to pieces if they could, though sincerely believing himself to be innocent " *

" या पुरुषाच्या निरहंकाराच्या आणि भलेपणाच्या मोठेपणाचा विचार करा. याचे शत्रु, शक्यतर, याच्या चिंधड्या उडवायला तयार होते; तरी यानें, आपण निर्दोषी आहोंत अशी आंतून मनाची ग्वाही असतांही, आपल्या शत्रूपुढें मान वांकविण्याचें कबूल केलें ! "

वाचकांनों ! ज्या सद्धेतूनें टिळकांनीं पुढें सुरतेला मान वांकविली, त्याच सद्धेतूनें त्यांनीं अगोदर सन १८८० सालीं जुलैंत पुण्याला आपट्यांच्या पुढें लवतें घेतलें ? यापेक्षां त्यांच्या निरहंकरीपणाबद्दल ज्यास्त शब्दच नकोत ?

आतां आपट्यांचा अपवाद करून शाळेचें गाडें जोरानें चाललें असतां

* A step in the Steamer ; foreword by Babo Motilal Ghose, Page IX.

टिळकांनीं आपलें नियोजित कार्य कसें केलें याबद्दल सांगायला हवें. आपटे आल्यानंतर १८८० मध्येंच पण दिसेंबरांत आगरकरहि आले. ते आले ते स्वार्थत्यागाच्या पूर्ण बहारीनें आले.अर्थातच टिळकादिकांना आनंद झाला पुढें लवकरच इ. १८८१ च्या जानेवारींत विष्णुशास्त्र्यांनीं 'किरण' नांवाचा एक छापखाना विकत घेऊन, त्याचा " आर्यभूषण " ( हो ! आजचाच अतिप्रसिद्ध आर्यभूषण छापखाना ) छापखान्यांत विस्तार केला. त्यांत त्यांच्याबरोबर आपटे, टिळक वगैरे मंडळी भागीदार होतें. याच छापखान्यांत " मराठा " नांवाचें एक इंग्रजी, आणि " केसरी " नांवाचें एक मराठी, अशीं दोन साप्ताहिकें सुरू करावयाचें ठरलें. त्याचप्रमाणें लवकरच चोहोंकडे नोटिशी वाटण्यांत आल्या. त्यांवर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची प्रथम सही होती. नंतर रा. टिळक, रा. आपटे, रा. आगरकर, डॉ. गर्दे, वगैरे आठ दहा गृहस्थांच्या सह्या होत्या. परंतु हिंदपुत्र आप्पाजी विष्णु कुळकर्णी यांच्या माहिती प्रमाणें उद्देशपत्रकावर फक्त सहाच असामींच्या सह्या होत्या. ( १ ) विष्णुशास्त्री चिपळूणकर ( २ ) टिळक ( ३ ) आपटे ( ४ ) डॉ. गर्दे, ( गणेश कृष्ण ) ( ५ ) आगरकर आणि ( ६ ) नामजोशी. त्यांनीं असेंहि निश्चयात्मक लिहिलें आहे कीं केसरीचें उद्देशपत्रक स. १८८० सालच्या दसऱ्याच्या मुहूर्तावर प्रसिद्ध केलें आणि तें निबंधमालेच्या जून १८८० च्या ६६ व्या अंकावरील तिसऱ्या व चवथ्या रंगी मुखपृष्ठांवर छापिलें आहे. तेव्हां कदाचित् चोहोंकडे वांटण्याच्या हस्तपत्रिकांवर दहा पण निबंधमालेच्या अंकांत फक्त सहाच जणांच्या सह्या असतील. तें कसें हि असो. केसरी व मराठा हीं पत्रकें १८८१ च्या जानेवारींत निघालींत हें खचित. इंदुप्रकाशाच्या टिळकगुणकलापांतील लोकमान्यांच्या चरित्राच्या लेखकांनीं जें लिहिले आहे कीं, " १८८५ सालीं केसरीची स्थापना होऊन लोकांत राजकीय जागृति जोरावली होती; " तें अजिबात चूक आहे. पण कदाचित् त्यांना १८८५ सालीं राजकीय जागृति जोरावली होती, असें म्हणावयाचें असेल झालें. परंतु तसा त्या वाक्यांत जोर नाहीं; असो. मराठाहि त्याच सालीं स्थापन झाला होता. कारण पुढें १८८२ सालींच बर्वे प्रकरण उत्पन्न होऊन, टिळकांना त्यांत " मराठ्याचे " संपादक म्हणून आगरकरांबरोबर शिक्षा झाली होती. तथापि या प्रकरणांत

आम्हांला केसरीची हकीकत किंवा त्याचा टिळकांशीं असलेला संबंध सांगावयाचा नाहीं. सांगावयाचें इतकेंच होतें कीं टिळक शिक्षक असून संपादकही झाले. आणि संपादक झाले म्हणून सरकारचे कैदीहि झाले. तरीहि त्यांनीं शाळेच्या वाढीचें काम थोडेंसुद्धां कमी केलें नाहीं. याबद्दल एकच गोष्ट सांगण्याची आम्ही वाचकांची परवानगी घेतों. ही गोष्ट बर्वेप्रकरणाच्याहि अगोदरची आहे.

"न्यू इंग्लिश स्कुलाची भरभराट पाहून पुष्कळ विद्वान व प्रसिद्ध गृहस्थ ही शाळा पाहण्याकरितां येऊं लागले. या सालचे (१८८१) ऑगस्ट महिन्याचे सुमारास मि. तेलंग हे एके दिवशीं मि. टिळक यांजबरोबर शाळा पाहण्याकरितां आले. या नूतन संस्थेची एकंदरींत नवीन कल्पना व तिची उत्तम व्यवस्था पाहून ते खूष झाले. शेवटीं बोलतां बोलतां आह्मी हळुं हळुं या शाळेला जोडून एक कॉलेजहि काढणार आहोंत, असें मि. टिळक यांनीं सुचविलें. त्यावरून मि. तेलंग हे न्यू इंग्लिश स्कूलचे संसर्गानें क्षणभर तद्द्रुत होऊन ह्मणाले "मलाहि तुह्मांमध्यें येऊन मिळावेंसें वाटतें. आणखी साधारण चार पांच वर्षांनीं मला तसें करतां येईल. दोन लाख रुपये जमले ह्मणजे मी असें करणार. कांहीं थोडे हजार कमी आहेत, ते तेवढे वेळांत भरून येतील" हा तत्समयोचित उद्गार विष्णुशास्त्री यांनीं मुकाट्यानें ऐकून घेऊन त्याबद्दल घरीं येऊन सांगत असतां ते ह्मणाले "काय हो! एकुण दोन लाखांत दहा पांच हजार कमी असले म्हणजे कांहीं बरें नव्हे अं! दोन लाख ततोतंतच पाहिजेत; एरवीं चालायाचेंच नाहीं अं!![1]"

ही गोष्ट सांगणारे लक्ष्मणशास्त्री चिपळूणकर यांनीं पुढें आणखी माहिती सांगितली कीं प्रोफेसर होऊं इच्छिणारे बॅरिस्टर तेलंग, दोन लक्ष रुपये जमल्यानंतर मुंबईच्या हायकोर्टांतले एक न्यायाधिश झाले; परंतु आपणांला आज त्या दोघां बंधूंच्या आश्चर्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. आपण वरील गोष्टीपासून इतकेंच पहावयाचें कीं आपल्यांच्या अटी कबूल करूनहि टिळक बॅरिस्टर तेलंगासारख्यांना शाळेच्या वृद्धीकरितां आणित असत. नुसते आणितच असत असें नाहीं तर आपणहि अशीच निस्पृही बाण्याची जनसेवा करावी, अशी भावना ते त्यांच्या अंतःकरणांत

१ वि. चिपळूणकर यांचें चरित्र पानें. २६७ २६८.

उत्पन्न करित असत. आतां ती भावना तेलंगाच्या बाबतींत स्मशान वैराग्या-प्रमाणें क्षणिक ठरली त्याला टिळक काय करणार ?

असो. केसरी व मराठा ही पत्रें स्थापन झालीत; बर्वे-प्रकरण उपस्थित होऊन त्याच्या ठिणग्यांनीं टिळक-आगरकरांनां १०१ दिवस तापविलें, यांहून विशेष मोठा घाला असा पडला कीं खुद्द विष्णुशास्त्र्यांनां १७ मार्च स. १८८२ रोजीं अकालीं मृत्यु घडला ! तरीपण कंबर खचूं न देतां टिळकांनीं आपल्या मित्रांच्या मदतीनें " डेक्कन एज्युकेशन सोसायटी " स्थापन करून न्यू इंग्लिश स्कुलास एकाच व्यक्तीच्या आधारावरून काढून त्याचीं पाळेंमुळें महाराष्ट्रांत खोल जातील असें सत्कृत्य केलें. आतां या पुढें [1]याच सोसायटीचा इतिहास आम्हांला संक्षेपानें देणें आहे.

(५)

पुण्याची डेक्कन-एज्युकेशन-सोसायटी, तिचीं " फर्ग्युसन, " सांगली व साष्टी एथलीं कॉलेजें आणि तिचें न्यू इंग्लिश स्कूल, यांच्यामुळें, फार प्रसिद्ध आहे. तिचेंच अनुकरण खानदेश-एज्युकेशन-सोसायटी वगैरे जिल्ह्यानिहाय स्थापन झालेल्या शैक्षणिक संस्थांनीं आजकाल केलेलें आहे. शिक्षणाच्या बाबतींत हा होत असलेला विस्तार पाहून आनंदच वाटतो. परंतु ज्या मूळ डे. ए. सो. चें अनुकरण केलें जात आहे, तिच्या संस्थांत आणि सरकारी संस्थांत विशेष फरक काय आहे, असें पाहूं लागलें असतां, आपणांस त्यांत विशेष तफावत मुळींच दिसत नाहीं; तर उलट एथून तेथून सगळे कारकूनपैदाशीचे " इमालखाने " च आहेत असा दुःखदायक देखावा दिसतो ! ज्या स्वतंत्र बाण्यानें " विद्यार्थ्यांचीं मनें शाळेंत असतांनाच फिरविलीं तर त्यापासून फार अधिक फायदा होईल असें मनांत आणून विष्णुशास्त्री यांनीं विद्यार्थ्यांचे बुद्धीस ' मूळापासूनच स्वतंत्रपणाचें वळण देण्याकरितां न्यू इंग्लिश स्थापन केलें, ' व ज्या स्वस्तंत्र बाण्यानें विष्णुशास्त्र्यांच्या पश्चात् टिळकांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन केली, त्या स्वतंत्र बाण्याच्या मानेवर ' सरकारी रुपेरी जूं सभासदांनीं आपल्या हातांनीं लादलें, ह्मणूनच आज स. १९२० सालीं सुद्धां आह्मा महाराष्ट्र-पुत्रांनां स्वावलंबनीं राष्ट्रीय शिक्षण मिळत नाहीं. तें मिळत नाहीं तें

१ वि. चिपळूणकरांचें चरित्र. पान २६९

नाहींच, पण हमालखान्याची पैदास मात्र जोरानें आणि अत्यानंदानें चालली आहे. आमचे धुळेकर धुळ्याला आर्टस कॉलेज हवें ह्मणून ओरड करित आहेत, ( टेक्निकल इंस्टिटयूशन मात्र धूळ खात पडली आहे ! ), जळगांवकरांनीं नुकताच आर्टस कॉलेजाचा नाद सोडला, अमळनेरकरांनीं तर आर्टस कॉलेज स्थापन करायचा विडाच उचलिला आहे; आणि त्या कामीं त्यांनां कलेक्टर मॉन्टिथनें मदत केली ह्मणून त्याला डोक्यावर घेऊन नाचत आहेत ! नाशिकालाहि तसलाच एक हमालखाना उत्पन्न करण्याची खटपट चालली आहे ! शाबास ! शाबास महाराष्ट्र-पुत्रांनो [1] ! महात्मा गांधी अलीगडच्या मुसलमानी कॉलेजाचें " राष्ट्रीय आश्रम " करित आहेत; आणि तुह्मी, टिळकांनीं जो स्वतंत्र बाणा सांभाळिला त्याची वरवर आराधना चालवून स्वहस्तांनीं हमालखाने उभारतां ! धिक्कार ! धिक्कार !

कॉलेजभक्तांनो ! अजून अवकाश आहे ? अजून तुह्मांला टिळकांच्या या स्वतंत्र बाण्याचें चित्र पाहून हातच्या द्रव्यनिधीला उत्तमोत्तम वळण देतां येईल. तेव्हां कृपावरून हें चित्र अवश्य पहा.

न्यू इंग्लिश स्कूल काढण्याच्या अगोदर एकादें कॉलेजच स्थापन करावें असा टिळकांचा आग्रह होता, असें मागें एकदां लिहिलेंच आहे. तरी पण टिळकांनीं कार्याकडे नजर देऊन तो आग्रह त्यावेळीं सोडला. आपट्यां करितां अशाच उत्कृष्ट स्वमतांचा त्यांनीं त्याग केला होता हेंहि पण बा[2]-कांनीं नुकतेंच वाचिलें आहे. अशीच आग्रहाची गांठ त्यांनीं डे. ए. सो. टीच्या स्थापनकाळीं सैल केली. सोसायटीला द्रव्यनिधि हवा होता. तो राजे-रजवाड्यांकडूनच मिळणें शक्य होतें. राजेलोकांत नामजोशयांचें बरेंच वजन असे. केसरीच्याहि अगोदर " किरण " पत्र नामजोशीच चालवीत असत. शिवाय बर्वेप्रकरणांत मराठा-केसरींनीं ह्मणजे टिळक- आगरकरांनीं, ( खरो-खर पाहिलें तर आपट्यांनींच ) कोल्हापूर सरकाराचें हित केलें होतें. ( कोल्हापूर सरकारचें टिळकादि मंडळींनीं हित केलें होतें, हें वाचकांनीं मुद्दाम ध्यानांत धरावें अशी त्यांना शिफारस आहे. कारण पुढें जितका टिळक व

१ आर्योन्नती. वर्ष १ अंक २, अग्रलेख !!!. २ बालशिक्षणमाला. टिळक अंक. द्वि. आ. पान १०६.

इंग्रज यांचा संबंध येणार आहे तितकाच टिळक व को. राजे यांचाहि येणार आहे.) एवढेंच नव्हे तर टिळक--आगरकर गेले हित करायला, पण उलट त्यांचेच पाय सरकारी खोड्यांत अडकले याला कारण तरी कांहीं बड्या संस्थानिकांनीं साक्ष देण्याचें नाकारिलें हें च झालें होते. तेव्हां कांहीं अंशीं झालेल्या अन्यायाची भरपायी करण्याकरितां, कांहीं अंशीं कृतज्ञताबुद्धीनें, कांहीं अंशीं नामजोश्यांचें वजन ह्मणून, व फारच थोड्या अंशांनीं राष्ट्रीय शिक्षणाच्या बुद्धीनें, राजेरजवाड्यांच्या मदतीनें द्रव्यनिधि तर गोळा झाला. अशा रीतीनें अर्धस्वतंत्र, अर्ध-परतंत्र, अशा निधीचा उगम असल्यामुळेंच डे. ए. सोसायटीचें पहिलें कॉलेज " फर्ग्यूसन " हें विलायती नांव पडलें. त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्यूसन हे असत. अर्थातच सरकारी आश्रमिंदेपणाचा शिक्का न बसणें अनिवार्य होतें.

इतकें असूनहि टिळकांनीं विचार केला कीं सामुग्रीपेक्षां योजकांवरच इमारतीचें कसब विशेष अवलंबून असतें. परंतु त्या योजकांत सुद्धां, आपल्यांनीं मारलेली स्वार्थाची पांचर जास्तच मोठें भगदाड पाडील, असा रंग दिसून आला. " सोसायटीचे नियम करण्याचें काम अर्थातच टिळकांकडे आलें. त्या नियमांप्रमाणें सोसायटीचे ( १ ) कौंसिल आणि ( २ ) बोर्ड ऑफ लाइफ् मेंबर्स, असे दोन भाग केले होते. पैकीं फक्त लाइफ् मेंबरांकडेच शाळा आणि कॉलेज यांची सगळी अंतर्व्यवस्था ठेवलेली होती; आणि कौंसिलचें काम, कायम फंडाची व्यवस्था करणें आणि सामान्यतः सोसायटीच्या संस्थांवर देखरेख ठेवणें एवढेंच होतें. सोसायटीच्या मिळकतीचे ट्रस्टी ह्मणून तिसरेहि एक अधिकारी होते; व त्यांचें काम शाळेला मिळालेली मिळकत, पैसे किंवा स्थावर, शाळेकरितां कायदेशीर रीतीनें राखणें एवढेंच होतें. शाळेचे जे लाइफ मेंबर होते त्या सर्वांनां सारखा पगार मिळत असे. पण प्रसंग विशेषीं त्यांनां मदत म्हणून जास्त रक्कम देण्याची सवड ठेविलेली होती. कौंसिलांत या सर्व लाइफ् मेंबरांचा समावेश केलेला असून, खेरीज तितकेच बाहेरचे सभासद नेमावे असा नियम होता. या नियमाप्रमाणें प्रि. ऑम्स्लेनहॅम्, डॉ. भांडारकर, न्या. मा. गो.

१ बा. शि. माला, दि. अंक. द्वि. आ. पान, २३.

रानडे वगैरे बाहेरच्या गृहस्थांचा कौंसिलांत समावेश झाला. आणि एवढी तयारी झाल्यानंतर, व कॉलेज काढण्याची सरकारची परवानगी मिळाल्या-नंतर स. १८८४ च्या जानेवारींत शनवारांतील गद्रयांच्या वाड्यांत कॉलेजची स्थापना झाली. नंतर त्याची जागा बुधवार चौकांत जाऊन तेथें सर जेम्स फर्ग्यूसन यांनीं इमारतीच्या पायाचा दगड बसविला. कांहीं कालानें कॉले-जनें नामांचा वाडा पाहिला, आणि आज चतु:शृंगीच्या मैदानांत टोलेजंग इमारतींत व भव्य आवारांत वसतिगृहादि अनेक इमारतींसह तें स्थानापन्न झालेलें आहे. "

एणेंप्रमाणें डे. ए. सो. चा थोडक्यांत मसुदा व इतिहास आहे.[1] आतां हा संक्षिप्त मसुदा पाहतां टिळकांनीं एकंदर परिस्थिति पाहूनच नियम केले आहेत असें कोणालाहि दिसेल. आम्ही जीं दोन वाक्यें मोठ्या टाइपांत घातलीं आहेत, त्यापैकीं दोन वाक्यांत लाइफ् मेंबरांच्या पगाराचा स्पष्ट उल्लेख आहे. सर्वांना पगार सारखा, पण प्रसंगविशेषीं मदत म्हणून जास्त रक्कम मिळण्याची सवड असावी हीं तीं वाक्यें होत. त्यावरून आपल्यांनां त्यानंतर तरी टिळकांच्या जेसुइट् स्वार्थत्यागाची अंमलबजावणी करण्यास हरकत नव्हती. परंतु त्यांनीं ती केली नाहीं ती नाहींच; पण आगर-करांनां " हॅम्लेट " नाटकाचें उत्पन्न हि त्यामुळेंच स्वतःच्या फायद्याकरितां घ्यावेंसें वाटलें. नंतर गोपाळराव गोखले सोसायटीला येऊन मिळाले त्या-वेळीं त्यांनींहि " गणित " तयार केलें होतें. त्याचें उत्पन्न तेहि सोसायटीला जमा करिनात. या अंगचोरटेपणाचा—अर्थातच अंगचोरटेपणा. कारण संस्थेला[2] आपलें आयुष्य एकदां वाहून टाकलें म्हणजे मग आपल्या सगळ्या कर्तब-गारीचें फळ संस्थेचें नाहीं तर कोणाचें होतें? अंत:करणाच्या प्रामाणिक-पणाच्या उत्तराला मान दिला तर तें उत्पन्न संस्थेचेंच होतें हें उत्तर रास्त आहे असेंच वाटेल.—आणि म्हणूनच आपटे वगैरे मंडळींच्या अंगचोरटेप-

---

१ वा. शि. माला द्वि. आ. पान २४. या उताऱ्यांतलीं कांहीं वाक्यें व श-ब्द आम्ही मोठ्या टाइपांत घातलीं आहेत. व कांहीं वाक्यांना सारांश रूपानें उद्धृत केलें आहे. २ संस्थेला गोखले आणि भानु यांच्या बरोबर येऊन मिळालेले रा. पा-टणकर यांचें हि असें च मत होतें. जेसुइट् पद्धतीच्या स्वार्थत्यागाच्या कल्पनेचे रा. टिळक, रा. जोशी, रा. केळकर ( वासुदेवराव ) आणि रा. पाटणकर हे चौघे प्रमुख पुरस्कर्ते होते.

णाचा टिळकांना अत्यंत राग येई. त्यांना फार फार आशा होती कीं, जरी स्वार्थत्यागाचा बाणा लेखी मसुद्यांत आंखून दिला नाहीं, आणि जरी आपट्यांचा अपवाद उघड उघड रीतीनें करण्याची आपण संमती दिली तरी आपली सर्व मित्रमंडळी पूर्ण स्वार्थत्यागानें, राजेरजवाड्यांच्या आश्रयानें नाहक चिकटून बसलेलें परावलंबित्व सोडतील ही आशा वाटायला टिळकांना बरेच आधार होते. पहिला आधार आगरकरांचा. ते प्रथम टिळकांइतकेच स्वार्थत्यागाचे पुढारी असत. दुसरा आधार आपट्यांच्या निर्भिड लेखांचा. त्यांचे बाणेदार लेख, त्यांच्या वर्तनांतील वरपंगी दोष काढून टाकतील असें टिळकांना वाटलें. तिसरा आधार गोखल्यांचा. टिळक आणि आगरकर यांच्यावर खटला उपस्थित झाला तेव्हां त्यांच्याकरितां द्रव्य हवें होतें. म्हणून त्या तरुण मंडळीनीं एक नाटक रंगभूमीवर केलें. त्यांत गोखल्यांनीं प्रमुख भाग घेतला होता. चवथा आधार बहुमताचा. आपटे वगैरे मंडळींनीं जर आपलें म्हणणें कबूल केलें नाहीं तर आपण कौंसिलांत बहुमतानें तें कलम पास करवून घेऊं अशी त्यांना साधार आशा होती. तेव्हां अशा चौफेर आधारांवर त्यांनीं आरंभीं स्वमतांना योग्य परिस्थिति प्राप्त होईपर्यंत गुंढाळून ठेविलें यांत त्यांचा मोठापणाच व्यक्त होतो. या त्यांच्या मोठेपणाचा व स्वतःच्या स्वार्थत्यागाचा परिणाम इतर सभासदांवर, नव्हे बाहेरच्या सभासदांवरहि होत असे यांत शंकाच नाहीं. "त्याच्या प्रत्यंतरादाखल पाहीं एथें वाचकांना १८८४ सालांत डे. ए. सोसायटीची मुहूर्तमेढ लावतेसमयीं प्रो. भांडारकर ( हल्लींचे डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर ) यांनीं दिलेल्या व्याख्यानांतला एक उतारा सादर करितों. ' ज्या सात जणांनीं या शाळेच्या कामीं परिश्रम चालविले आहेत, त्यांच्या अग्रभागीं एका एल्. एल्. बीचें नांव आहे. हा गृहस्थ या खाजगी शिक्षणाच्या नादीं न लागतां, व स्वहिताकडे पाहून, सरकारी नोकरी धरतां तर रावसाहेब होऊन दरमहा दोनतीनशें रुपयांवर आज कोठें तरी चैनींत असतां. ' अर्थातच अशा स्वार्थत्यागी माणसानें आपली मित्रमंडळीहि, आज नाहीं तरीं उद्यां, आपल्याप्रमाणेंच स्वार्थत्यागी होतील, अशा आशेवर आंखून दिलेले नियम जर कोणी सभा-

---

१ टिळक-गुण-कलाप

सदानें उल्लंघिलें तर तिकडे नुसती इशारत देऊन अबोला टाळला तर त्याची कोणताहि सूज्ञ तारीफच करील.

परंतु निदान त्या दशकांत तरी टिळकांच्या मित्रांनीं त्यांची तारिफ केली नाहीं. उलट एक ना दोन अनेक कारणांमुळें त्यांचें टिळकांशीं अधिकाधिक फाटतच गेलें. इतर मंडळी आपापल्या स्वतंत्र कामगिरीची मिळकत संस्थेला देण्याचें मनांतसुद्धां आणीनात. संस्थेंतून पगार जेसुइट् पद्धतीनें राहाण्यापुरता मिळायचा, आणि राहण्याची इच्छा होती साधारणत: श्रीमंती थाटाची. त्यांतून, आमच्यांत जर श्रीमंतीनें राहण्याची कर्तबगारी व धमक आहे, तर मग आम्ही कां राहूं नये, ही कल्पना अंगीं बाणलेली, अर्थातच संस्थेच्या कामापेक्षां जास्त जरी नाहीं तरी तितकेंच लक्ष आपटे, गोखले आणि आगरकर यांचे, आपापल्या स्वतंत्र प्राप्तीकडेहि खर्च होऊं लागलें. असल्या प्रसंगीं त्या मंडळींत खडाजंगीचे वाद निस्संशय होत असले पाहिजेत. या वादांत भाग घेणारे सगळेच अन्य लोकीं निघून गेले आहेत; आणि त्यांची या याबद्दलची टिपणेंहि उपलब्ध नाहींत; नाहींतर "टिळकांनां स्वत:ला स्वतंत्र पुस्तकें लिहितां येत नाहींत म्हणून ते स्वार्थत्यागाच्या लंब्या चवड्या गप्पा मारीत आहेत" किंवा, "टिळक पडले खोतदार, त्यांना एक कमी पगारावर राहणें शक्य आहे, म्हणून बाकीच्यांना काय हा त्रास!" असले आरोप त्यांच्यावर झालें किंवा नाहींत हें खात्रीलायक पुराव्यावरून समजलें असतें. तें जरी आज कळायला मार्ग नाहीं तरी टिळकांना आपल्या वडिलोपार्जित मिळकतीखेरीज; केवळ स्वत:च्या हिकमतीची पण शाळेच्या बाहेर मिळणारी देणगी संस्थेला देण्याचा प्रसंग आला होता व त्याचा त्यांनीं योग्य तोच फायदा घेतला. सन १८८५-८६ च्या सुमारास इंदूरचे माजी महाराज श्रीमंत शिवाजीराव हे पुण्यास गेले होते; व त्यांनीं पुण्यांतील बड्या बड्या लोकांचा त्यावेळीं चांगला सन्मानहि केला. त्यांतच पत्रकर्ते या नात्यानें टिळक आणि आगरकर यांनांहि आमंत्रण आलें होतें. आपणांस ज्याअर्थीं आमंत्रण आलें आहे त्याअर्थीं संभावनेदाखल, कांहीं रकम आपणांस दिली जाईल असें दोघांनांहि वाटलें होतें. परंतु महाराजांनीं कांहीं रकम दिली तर ती स्वत: न घेतां संस्थेकरितां घेण्याचा संकल्प करून दोघेहि बरोबरच महाराजांकडे गेले. आणि महाराजांनीं त्यांनां जेव्हां

सातशें रुपयांची रक्कम देऊं केली तेव्हां तिचा आपण संस्थेकरितां स्वीकार करितों असें दोघांनींहि तेथें सांगितलें. पण पुढें एक दोन दिवसांतच आगरकरांचें मत पालटून त्यांनीं टिळकांना चिठ्ठी लिहिली कीं, होळकरांनीं जर आपणांस व्यक्ति म्हणून पैसे दिले तर ते व्यक्तिशः घेण्याला हरकत कोणती ? टिळकांनीं उत्तर पाठविलें कीं, तुम्ही पाहिजे तर घ्या, मी घेत नाहीं. पण आगरकरांना ही गोष्ट पसंत न पडतां त्यांनीं टिळकांना बरींच पत्रें पाठविलीं व त्यांत टिळकांना टोंचून बराच मजकूर लिहिला होता. शेवटीं इतकेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं, आगरकरांनीं या बिदागीपैकीं आपला हिस्सा घेतला व टिळकांनीं आपला हिस्सा सोसायटीकडे जमा केला.

या एकाच गोष्टीवरून टिळकांचा संस्थेच्या हिताचा ध्यास दिसून येतो. पण त्या बरोबर असाहि प्रश्न पुन्हां करावासा वाटतो कीं आगरकरादि मंडळी ऐकतच नाहीं असें अनेकदां अनुभवाला येऊनहि टिळकांनीं ( १ ) १८८६ सालींच संस्था कां सोडिली नाहीं ? किंवा ( २ ) आपणच एकट्यानें संस्था ताब्यांत कां घेतली नाहीं ? " तुम्ही पाहिजे तर आपला हिस्सा घ्या " इतका मालकीहक्क तरी आगरकरादि सभासदांना कां ठेविला ? या दोन्ही प्रश्नांला उत्तरें देणें अत्यंत सोपें व साधारहि आहे. पहिल्याचें उत्तर असें आहे कीं आपल्या राहण्यानें जोपर्यंत संस्थेचें अनहित होत नाहीं तोपर्यंत टिळकांनीं संस्था सोडण्याचें मनांतसुद्धां आणिलें नाहीं. लो. टिळक व्यक्तीच्या रागाला मुळींच भीक घालित नसत. पण संस्थेच्या कार्याकडे अखंड लक्ष पोंचवित असत. १८९०–९१ सालापर्यंत टिळकांच्या राहाण्यानें मंडळी संस्थेतून चालती होण्यापर्यंत बेफाम झाली नव्हती. ह्मणून ते संस्थेंत काम करित राहिले. दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर लक्ष्मणशास्त्री चिपळूणकर यांच्याच शब्दांत देणें साधार होईल. हे शब्द जरी स. १८९२ सालांतले असले तरी ते स. १८८६ सालींहि निदान टिळकांच्या बाबतींत तरी लागू होते. ते लिहितातः—

" विष्णुशास्त्री यांचें पुढील विद्यार्थी प्रजेचे शिक्षणासंबंधीं जें मत होतें त्यास त्यांचे सहायकारी शिक्षक मंडळीकडून फारसें पाठबळ मिळालें

1 बालशिक्षणमाला, द्वि. अ. पान २६—२७

नाहीं. पुढें विष्णुशास्त्री लवकरच वारल्यामुळें न्यू इंग्लिशस्कूल यासारखीं इतर ठिकाणीं स्वतंत्र स्कुलें होण्याची वाढ खुंटली जाऊन स्वतः न्यू इंग्लिश स्कूलच हळूं हळूं सरकारी हायस्कुलांचे धर्तीवर येऊन पोंचलें आहे ! पुढें निदान पांच सात तरी नांव घेण्यासारखी मंडळीं निघून आपले गुरुवर्यांचे शिरावरील ओझ्यास हात लावायास पुढें आली पाहिजे होती ! मूळ शिक्षक मंडळींत नांव घेण्यासारखी फारशी मंडळी भरतीस न पडतां मृत्यु, व मतभेद यांनीं त्यांमध्यें खांच पडली आहे " वगैरे[1]

या उताऱ्यावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेलच कीं टिळकांना स्वतंत्रपणें शाळा व कॉलेज चालविण्याला योग्य मदतनीस मिळणें त्यावेळीं शक्य नव्हतें. अशा दुधारी अडचणीमुळें त्यांना स्वतःस जी कांहीं स्वार्थत्यागपूर्वक सेवा करितां आली ती त्यांनीं केली व आपल्या मित्रांनींहि तशी करावी असें विनवून पाहिलें, आपल्या उदाहरणानें दाखविलें व प्रत्येक खेपस मिटंत घेतलें. पण संस्थेचें नशीबच कमी ह्मणून टिळकांचे श्रम वाया गेले व लक्ष्मणशास्त्रयांच्या शब्दांत, " या संस्थेचा ( आतां निमसरकारी अतएव एक मोडक्या व एक अर्ध्या चाकाचा ) गाडा अशीच रेटारेटी करित आणखी किती दिवस चालेल " हा प्रश्नच आहे !

खाजगी मिळकतीच्यापायीं आपटे–टिळकांत जसा मतभेद सुरू झाला होता तसा टिळक–आगरकरांत सामाजिक बाबतींतला मूळचाच मतभेद दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालला होता. सन १८८८ मध्यें आगरकरांनीं " केसरी " तून फटकून निघून " सुधारक " पत्र काढलें होतें हें खरें आहे. संपादक या नात्यांनीं टिळक–आगरकर वेगवेगळ्या ध्रुवाकडे चालले होते यांतही शंका नाहीं. तरी पण भांडणाला अजून उग्र स्वरूप आलें नव्हतें. टिळक अध्यापक होते तों पर्यंत या सामाजिक मतभेदाला जाहीर स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. तरीपण ती आग आंतून भडकत चालली होती. तथापि टिळक ज्या अनेक कारणांमुळें संस्था सोडून गेले त्यांत सामाजिक मतभेदाला स्थान नाहीं हें खचित. आगरकरांचें मन कलुषित होण्याला व त्यामुळें आस्ते आस्ते आपला संबंध 'संस्थेला विघातक होत आहे असें टिळकांना वाटायला जीं कारणें झालीं त्यांत मात्र सामाजिक मतभेदांना

१ वि. चिपळूणकर यांचें चरित्र पानें. २६७, २६८.

बरेंच मोठें स्थान आहे. शिवाजीराजे यांनीं दिलेले सातशें रुपये टिळकांनीं स्वत: साठीं वाटून घेण्याचें नाकारिलें; तेव्हां आगरकरांनीं जीं पत्रें त्यांना टोंचून लिहिलीं तीं, निदान थोडीं तरी, मिळतील तर आमच्या ह्मणण्याला खात्रीनें सबळ पुरावा मिळेल. टिळकांच्या दप्तरांत हीं पत्रें आहेत असें कळतें. मिळतील तेव्हां प्रसिद्ध होतीलच; असो.

आगरकरांनीं व आपट्यांनीं टिळकांना जो त्रास दिला त्यांत खात्रीनें बराच भेद आहे. आपट्यांचा मतभेद स्पष्ट व प्रामाणिक होता. आगरकरांचा अप्रामाणिक होता असा त्यांच्यावर आरोप जरी करितां आला नाहीं, तरी आगरकरांच्या तापट व लहरी स्वभावानुरूप त्यांच्या वर्तनांत फरक पडे ह्मणून टिळकांना आगरकरांच्या वागणुकीचा थांग लागेना. याची साक्ष शिवाजीराजांची दक्षिणाच होय. दक्षिणा संस्थेलाच होती, आणि संस्थेलाच ह्मणून दोघांनींहि घेतली. पण दोन चार दिवसांतच आगरकरांचें मत बदललें. आगरकरांसारखा थोर मनुष्य असें वर्तन करण्याइतका चंचल कसा बनला हा खरोखरच महत्त्वाचा प्रश्न आहे. आमची शंका आहे कीं त्याकामीं कोणा तिसऱ्याचीच चिथावणी असण्याचा संभव आहे. आगरकरांचे सामाजिक मतभेद असूं देत. परंतु कॉलेजांतले पूर्ण स्वार्थत्यागी आगरकर शिक्षणसंस्थेंत येतात न येतात तोंच स्वार्थाला बळी पडतात, ( आणि जेव्हां जेव्हां बळी पडले तेव्हां तेव्हां त्यांचे त्याप्रसंगाचे अगोदरचे विचार स्वार्थत्यागाचे होते, ) यांत चिथवणीशिवाय तिसरा भाग असूं नये असें वाटतें. आपट्यांचें उदाहरण त्यांच्यापुढें होतेंच; पण तें स्पष्टतेचें होतें. आणखी एकादें होतें कां ?

हो, होतें. दुसऱ्या उदाहरणांत गोखल्यांचा संबंध होता. गोखल्यांच्या गणिताच्या प्राप्तीविषयीं जेव्हां प्रश्न उपस्थित झाला होता, तेव्हां टिळकांनीं[1] गणिताचा हक्क सोसायटीकडे ठेवावा, परंतु गोखल्यांना त्याबद्दल योग्य पारितोषक मिळावें, अशी तडजोड सुचविली. एवढेंच नव्हे तर हा मार्ग सोसायटीनें कबूल केला तर आपण स्वत: अशीं कैक गणित विषयक पुस्तकें सोसायटीला लिहून देऊं असेंहि ते ह्मणाले. वास्तविक या तडजोडीनें लेखक आणि संस्था या दोहोंचाहि फायदाच होणार होता. पण आपट्यांचें संस्कृत गाइड आणि आगरकरांचें हॅम्लेट यांना तोच कायदा लागू होणार

१ बा. शि. माला टिळक अंक द्वि. आ. पान २६.

होता. म्हणून अखेर बहुमत टिळकांच्या विरुद्ध पडलें व गोखल्यांना मंजुरी मिळाली.

या गणिताच्या बाबतींत गोखल्यांचें बहुमत झालें, त्यामुळें आपटे-आगरकरांचाहि फायदा झाला; पण नंतर आणखी एका प्रकरणांत खडाजंगी वाद होऊन टिळकांना बहुमत मिळालें. हें प्रकरण सार्वजनिक सभेच्या सेक्रेटरीशिप विषयींचें होतें. या जागेवर सीताराम हरि चिपळूणकर हे असत. क्राफर्ड प्रकरणांत त्यांचा सार्वजनिक सभेशीं मतभेद होऊन त्यांना आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. तेव्हां त्यांच्या जागीं गोखल्यांची योजना करावी म्हणून शिवराम हरि साठे वगैरे मंडळींची शिफारस होती. टिळकांनीं या गोष्टीचा निषेध केला. कारण ती जागा पगाराची होती. आणि पगाराची नसती तरी एका संस्थेला सर्वस्वीं वाहून घेतलेल्या माणसालें दुसऱ्या संस्थेची सेवा भरकाम कशी करतां येईल हेंच टिळकांस कळेना. तरीसुद्धां जुळतें घेणाऱ्या टिळकांनीं एथेंहि तडजोड सुचविली. त्यांनीं म्हटलें कीं गोखल्यांना कांहीं दिवस रजा द्या. तें होत नसेल तर त्यांनीं राजीनामा द्यावा. टिळकांच्या या तडजोडीला मात्र त्यावेळीं मोठ्या माराकुटीनें बहुमत मिळालें. पण यांत मौज नाहीं. मौज निराळ्याच गोष्टींत आहे. वरील वाद-विवाद डे. ए. सोसायटींत झाला. त्यांत आपट्यांनीं गोखल्यांच्या तर्फे मतें दिलें. पण याच मुद्यावर सार्वजनिक सभेंत वाद झाला होता तेव्हां मात्र आपट्यांचें मत गोखल्यांना प्रतिकूल होतें !

या इतक्या गोष्टी कशाला सांगायच्या ? तर यावरून जात्या तडफदार, स्वार्थत्यागी व मेहनती अशा आगरकरांवर आपट्यांचा आणि गोखल्यांचा कांहीं परिणाम झाला असेल काय ? अशी जर कोणाला शंका आली तर त्याला विचार करायला थोडीतरी सामुग्री मिळावी असाच यांत आमचा हेतु आहे. तरी पण आगरकरांचीं पत्रें किंवा त्यावेळच्या त्या दोस्तांच्या मित्रांचीं टिपणें किंवा असलाच कांहीं तरी विशेष सबळ पुरावा असल्याखेरीज केवळ वर नमूद करून ठेविलेल्या गोष्टींवरच विचारवन्तांनीं अवलंबून राहूं नये अशी मात्र आमची आग्रहाची विनंती त्यांनीं कृपाकरून विसरू नये.

---

१ बा. शि. माला टिळक अंक द्वि. आ. पान २६.

तेव्हां विष्णुशास्त्र्यांच्या या भक्तांचा विष्णुशास्त्र्यांच्या पश्चात् एकीचा भाव न राहतां त्यांत दुही माजत राहिली ही गोष्ट निर्विवाद आहे. या दुहीचें खापर आतांपर्यंत नमूद करून ठेविलेल्या लहानमोठ्या अशा सर्व प्रकरणांवरून आह्मी कोणाहि एका पक्षावर फोडिलें नसतें. परंतु सरकारी ग्रॅन्ट घ्यावयाची किंवा नाहीं, या अखेरीच्या वादावर जेव्हां टिळकांच्या सयुक्तिक मुद्यांना फेटाळून लाविलें व त्यामुळें टिळकांनीं अखेर संस्थेला नमस्कार केला, तेव्हां मात्र दुहीच्या खापराचा आघात टिळकांच्या मस्तकावर मुळींच बसत नाहीं अशी आमची खात्री पटते. खुद्द टिळकदेखील सरकारी ग्रॅन्ट घेण्याच्या विरुद्ध नव्हते. कारण ते ह्मणत असत सरकारचे जरी पैसे झाले तरी ते काय इंग्लंडमधले थोडेच होते ? पण त्यांची हरकत अशी होती कीं आमचेच पैसे आह्मांलाच मिळत असले तरी ते केवळ सरकारी हातानें मिळाल्यामुळें आमच्या स्वभावसिद्ध स्वातंत्र्याला जो नसता धक्का पोंचतो तो त्यांना नको होता. स्वातंत्र्य कायम राहून पैसे मिळाले तर ते काय त्यांना नको होते ? पण हजारों रुपयांच्या आमिषानेंसुद्धां ते स्वतंत्रता खोडायला तयार नव्हते, ते ह्मणत, जोरजोरानें, कंठरवानें आपल्या मित्रांना सांगत कीं बाबांनो, विष्णुशास्त्र्यांनीं शाळा काढिली ती कांहीं हायस्कुलें नव्हतीं ह्मणून काढिली नाहीं, तर आपल्या मुलांना हतबल करणारें शिक्षण सरकारी शाळांतून मिळतें, तें उलट सामर्थ्यसमृद्ध करणारें आपण देऊं या, अशा भावनेनें शास्त्रीबुवांनीं शाळा काढिली आहे. टिळकांनीं हेंचसें काय पुष्कळ सांगितलें. जें आज म. गांधी सबंध हिंदुस्थानभर असहकारितेच्या एका रूपानें, राष्ट्रीय शिक्षणाच्या रूपानें सांगत आहेत तेंच स. १८८९ मध्यें टिळकांनीं आपल्या कर्तबगारीच्या पण दिशाभूल झालेल्या मित्रांना सांगितलें. पण तें त्यांनीं ऐकिलें नाहीं, ह्मणून शेवटीं लक्ष्मणशास्त्री चिपळूणकरांनीं ह्मटलें कीं " हें असलें गाडें किती दिवस चालेल तें चालों ! "[2] आज १९२० साल आहे. तें गाडें चाललें आहे. पण चाललें आहे झालें !

तरीसुद्धां टिळकांनीं राजीनामा दिला नाहीं ! त्यांनीं सहा महिन्यांची रजा घेतली. आणि त्या सहा महिन्यांत क्राफर्ड प्रकरणांत मामलेदारांना मदत

१ बा. शि. माला टिळक अंक द्वि. आ. पान २६. २ वि. चिपळूणकरांचें चरित्र.

केली ! मामलेदारांनो, हें ध्यानांत ठेवा. कोल्हापूरच्या राजानें टिळकांच्या सेवेच्या घराचे वासे मोजले तेथपर्यंत तुमची मजल टिळकांच्या अनुयायांच्या बाबतींत जाऊं देऊं नका. असो. फिरून यांतहि दुसरी गोष्ट अशी पहावयाची कीं रजा काढून नंतर टिळकांनीं संस्थेखेरीज अन्यत्र लोकसेवा केली. रजा संपल्यानंतर ते आपस्यांच्या आग्रहावरून पुन्हा रुजूं झाले, पण परतंत्रतेच्या वाळवंटांत त्या माशाचा जीव कासाविस होऊं लागला. टिळकांनीं स. १८९० अखेरपर्यंत धडपड केली. पण व्यर्थ. शेवटीं अगदीं निरुपाय म्हणून त्यांनीं संस्थेंतून, राजीनामा देऊन आपलें अंग काढून घेतलें. [1]कै० करच पाटणकर, धारप व नामजोशी यांनींहि पण तसेंच अंग काढून घेतलें. गोखले व भानु ( चिं. गं. ) यांनीं गेलेल्या मंडळीची जागा भरून काढिली. कशी तें दिसतेंच आहे.

येणेप्रमाणें लो. टिळकांच्या सार्वजनिक आयुष्यांतील पहिल्या दहा वर्षांच्या लोकसेवेचा इतिहास आहे. आजची राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ पाहिली म्हणजे टिळकांच्या पराभवांचें फार फार वाईट वाटतें. जें काम स. १८९० सालींच झालें असतें त्या कामाची नुसती चळवळ स. १९२० सालीं व्हावी, यापेक्षां नामोहरम करणारी दुसरी कोणती गोष्ट आहे? चाळीस वर्षेपर्यंत साधी गोगलगाय रत्नागिरीहून निघाली असती तर एव्हांना कैलासाला पोंचती. पण गोखले आगरकरादि समाजसुधारकांना, मुत्सद्यांना, व सुशिक्षितांना राष्ट्रीय शिक्षणाचा गाडा थांबवून काय मिळालें कोण जाणे ! त्या सर्व विभूतींबद्दल आम्हांला आदर आहे, त्यांच्यावर आम्ही आरोप असे कोणतेच करित नाहीं, पण इंग्रजी शिक्षणाला, पाश्चात्य संस्कृतीला ते बळी पडले यांत मतभेदच नाहीं. ब्रिटिशांच्या वचनांला ते भाळले, त्यांना फक्त मेकॉले-ग्लॅडस्टनादि दाखवायचे दांत दिसले, पण कर्झनादि खायचे दिसले नाहींत, किंवा दिसून त्यांना ते घाबरले ( आगरकरांचा अपवाद करावा लागेल ) असें गेल्या ४० वर्षांच्या इतिहासावरून आजच्या तरुण पिढीला तरी खचित स्पष्टपणें दिसत आहे !

आतां टिळकांच्या पहिल्या अध्यापनाच्या दशकाची रजा घेतां घेतां एक अत्यंत महत्त्वाच्या मुद्यावर दोन शब्द लिहिणें भाग आहे. आणि तो

---

1 बा. शि. माला. टि. अंक. द्वि. आ. पान. २३.

मुद्दा म्हटला म्हणजे राष्ट्रीय शिक्षणाचा होय. आज त्यानंतर ३० वर्षांनी-देखील असें विचारण्यांत येतें कीं " राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय ? " सुमारें १२।१५ वर्षांपूर्वी, बंगालच्या फाळणीचें राजकारण पूर्ण भरांत असतां, बंगाल्यांत राष्ट्रीय शाळा स्थापन झाल्या होत्या, राष्ट्रीय कॉलेजेंहि उघडण्यांत आलीं होतीं. पण तीं एक ना अनेक कारणामुळें ओस पडलीं.त. या दुसऱ्या, अपयशाच्या—पहिलें अपयश महाराष्ट्रीय चिपळुणकर—टिळकांचें होय—फायदा घेऊन आज पुन्हां जेव्हां म. गांधींनीं राष्ट्रीय शिक्षण सार्वजनिक करण्याचा विडाच उचलला आहे तेव्हां कांहीं भांबावून गेलेली—सरकारच्या आमिषानें भुललेली असें आम्ही म्हणत नाहीं—मंडळी विचारूं लागली आहे कीं चिपळूणकर—टिळकांनीं तरी राष्ट्रीय शिक्षणाची कोणती तळी उचलून धरिली होती ? त्यांच्या न्यू इंग्लिश स्कुलांत किंवा फर्ग्युसन कॉलेजांत तरी असा कोणता अभ्यासक्रम होता कीं त्यामुळें त्या शिक्षणाला राष्ट्रीय ही संज्ञा प्राप्त झाली होती ? किंबहुना आजदेखील राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय, हें तरी सांगा, अशी या शंकितांची दिशाभूल झाली आहे. तिला शांत चित्तानें उत्तर न देणें, म्हणजे एक तर चिपळूणकर--टिळकांबद्दल पर्यायानें कृतघ्नपणा पत्करणें, किंवा आगरकर-आपटे--गोखल्यांना उगीच छळण्यासारखें होय. आम्हाला दोन्ही गोष्टी करावयाच्या नाहींत; म्हणून आम्ही वरील शंकांचें साधार समाधान करितों.

पहिली गोष्ट अशी कीं राष्ट्रीय शिक्षणाचे मुख्य दोन भाग असतात. एक ध्येयात्मक व दुसरा व्यावहारिक. राष्ट्रहितास पोषक अशी तरुण नागरिकांची भावना तयार करणें हें ध्येय व तें कसें होईल याचा विचार करून केलेला उपक्रम व्यावहारिक होय. चिपळूणकर- टिळकांनीं विशेषतः पहि-

---

१ या बाबतींत मुख्यतः ज्ञानप्रकाश व केसरी यांचे ऑक्टोबर १९२० पासून पुढचे अंक वाचावे. त्याचप्रमाणें म. गांधी यांच्या " यंग इंडिया " तले लेख हि काळजीपूर्वक वाचावे. आर्यपुत्र लाला लजपतराय यांचें यावरील पत्र हि वाचनीय आहे. तें अमृत—बझार—पत्रिकेंत नोवेंबरांत ( १९२० ) प्रसिद्ध झालें आहे. ॲनी बिझांट बाईच्या " न्यू इंडियाची " शिफारस सुद्धां करवत नाहीं. तथापि " निंदकाचें घर असावें शेजारीं. " या तुकोबारायाच्या शिकवणीप्रमाणें ते हि वर्तमानपत्र त्यावेळचें चाळून पहा.

लींच गोष्ट केली हें आरंभींचें कबूल केलें पाहिजे. त्यांच्या हातून व्यवहारांत असें जें शिक्षण उतरलें तें राष्ट्रीय कसाला सरकारी हायस्कुलापेक्षां विशेष ठळक रीतीनें उतरलें असें दिसत नाहीं. व्यक्ति विसरून केवळ कार्यच पाहिलें तर स्कॉलरशिपा मिळविण्यापलीकडे किंवा ड्रिल शिकविण्याबाहेर विशेष झालें नाहीं. ड्रिलचें कलम मात्र आम्ही कमी समजत नाहीं. पण स्कॉलरशिपांना आम्ही फारसें महत्त्व देत नाहीं. आतां टिळक व आगरकर यांनीं संपादक या नात्यानें विशेष कीर्ति मिळविली असेल, पण ती एथें विचारांत घेतां येत नाहीं. त्या कीर्तीमुळें शाळेचें स्वतंत्रतेचें ध्येय उत्कटरीतीनें जाहीर झालें असेलही; पण त्याचें श्रेय शिक्षणाला नसून संपादकत्वालाच द्यावें लागेल. शिक्षणांत Example किता ही कांहीं लहान बाब नव्हे. गोष्ट अगदीं कबूल; पण तें Example तो किता संपादकानें हाल सोसले अशा स्वरूपाचा होता. शिक्षणाकरितां टिळकादि मंडळींनीं कोणते हाल सोसले ?

टिळकांनीं पूर्ण स्वार्थत्यागाचे हाल सोसले, आगरकरादि मंडळींनीं तितके सोसिले नाहींत. हेंच याचें उत्तर. आणि ह्मणून राष्ट्रीय शिक्षणाच्या ध्येयात्मक बाबतींत टिळकांनीं, चिपळूणकरांनीं व त्यांच्याहून कमी कां होईना, परंतु आपटे–आगरकर–गोखले, नामजोशी, केळकर वगैरे तरुणांनीं भर टाकिली. अर्थातच राष्ट्रीय शिक्षणाच्या एका व प्रथमच्या अंगांत तरी १८८० ते १८९० च्या कालविभागांत महाराष्ट्रांत दृश्यमान अशी प्रगति झाली होती.

परंतु या प्रगतींतच अवनतीचीं बीजें उत्पन्न झालीं ! टिळकांच्या आणि शास्त्रीबुवांच्या स्वार्थाहुतिपूर्ण तडफीनें जर न्यू इंग्लिशस्कूल आणि फर्ग्युसन कॉलेज चालतीं तर, राष्ट्रीय शिक्षणाचें प्रत्यक्ष व्यवहार्य अंगही आज दृश्य फलें धरतें; आणि मग राष्ट्रीय शिक्षण ह्मणजे काय तें तरी सांगा, असल्या कुशंकांना जागाच रहाती ना. पण तशा तडफीनें आपटे, गोखले आणि आगरकर यांनीं सेवा केली नाहीं ह्मणून राष्ट्रीय शिक्षणाची जी व्यवहार्य बाजू ती सरकारी शाळांहून विशेष प्रशंसनीय अशा स्वरूपात सांभाळिली गेली नाहीं. शास्त्रीबुवांना किंवा लोकमान्यांना नुसत्या ध्येयात्मक कामागरीनेंच समाधान झालें नाहीं. ध्येयाच्या मोहक स्वरूपाला भाळून जाणारे ते दोघेहि नव्हते. त्यांची मनोरचनाच व्यवहार्य गोष्टीकडे उचल खाणारी होती. शास्त्रीबुवांना ऐन बत्तिशींत यमराजानें खेचून नेलें आणि

टिळकांना त्यांच्या सहाध्यायांनीं वेळोवेळीं नाउमेद केलें. म्हणून शास्त्रीबुवांच्या " तोफखान्यानें सरकारी हायस्कुलाचा धुव्वा " तर उडला नाहींच; पण तें पुण्याला अजूनहि जीव मुठींत धरून आहे !

इतकें असूनसुद्धां आगरकरादि मंडळींची गोष्ट बाजूला सारून खुद्द टिळकांनींच अगदीं स्वतंत्र रीतीनें थोडी तरी राष्ट्रीय शिक्षणाच्या व्यावहारिक बाजूची चुणूक दाखविली का ? अशा दृष्टीनेंहि आम्ही विचार केला पाहिजे. आम्हांला माहित आहे कीं एकाच्या अपकीर्तीनें दुसऱ्याला मिळणारी कीर्ती, खरी कीर्तिच नव्हे. आणि टिळकांची जर स्वतंत्र कामगिरी नसती तर त्यांच्या पदरांत ही बेगडी कीर्तिदेखील निदान आम्ही तरी घातली नसती.

लो. टिळकांची पहिली स्वतंत्र कामगिरी अशी आहे कीं त्यांनीं शास्त्रीय ज्ञान शिकविण्याचा भाग उचलिला. ते संस्कृतांत आपट्यांपेक्षां आणि गणितांत गोखल्यांपेक्षां खात्रीनें वरचढ असत. त्यांना काय, ते विषय घेतां आले नसते ? त्यांना काय मुलांना परीक्षेंत कसें पास व्हावें हें सांगतां आलें नसतें ? त्यांनां काय विद्यार्थ्यांकरतां शिष्यवृत्ति मिळवितां आल्या नसत्या ? त्यांना काय गाइडें तयार करितां आलीं नसतीं ? गोखल्यांच्याप्रमाणें आपण कैक गणित पुस्तकें संस्थेला तयार करून देऊं असें ते म्हणाले नव्हते काय ? ती त्यांची पोकळ ऐट होती काय ? मग त्यांनीं आपल्या वडिलाची मिळकत जी संस्कृत व गणित विद्या, ती सोडून शास्त्रीय[1], शिक्षणच कां पत्करलें ? कारण त्यांनां माहित होतें कीं त्यापुढें शास्त्रज्ञानाचेच दिवस होते. त्यांना कळून चुकलें होतें कीं संस्कृताच्या घोकंपट्टीनें राष्ट्रीय बल प्राप्त होणार नव्हतें, तर त्यांची दूरदृष्टि त्यांना सांगत होती कीं केवळ चक्रवाढव्याजी मारवाडी हिशेबापेक्षां कारबनच्या उपयोगांचें ज्ञानच हिंदुस्थानचें द्रव्यबल वाढवील. चिरोलनें या पराचा कावळा कसा केला हें पुढें यथावकाश येईलच; पण तो करतांना त्याला कोणी व कशी माहिती पुरविली हें जर सत्यस्वरूपांत जगापुढें येईल तर त्या काळेबेऱ्यांतूनहि टिळकांची राष्ट्रीय शिक्षणाची व्यवहार्य सेवा तरी स्पष्ट रीतीनें सिद्ध झाल्याशिवाय राहणार नाहींच नाहीं.

---

१ संस्कृतांत व्याकरणाचा भाग लोकमान्यांकडे असला तरी त्यांचा मुख्य विषय science होता. या विषयामुळें हि त्यांचें लक्ष नंतर ज्योतिषाकडे लागलें असा उल्लेख पुढें आला आहे.

या शिवाय आणखी एक पुरावा आहे. परंतु हा परिस्थितीचा पुरावा आहे. शास्त्रीबुवांचें आणि टिळकांचें एकमत होतें या विषयीं त्याचे शत्रुहि शंका घेणार नाहींत. शास्त्रीबुवांनीं पहिला ॲड्रेस जो तयार करून वाचिला तो टिळकांच्या मदतीनें तयार केला होता हें मागें एका प्रसंगीं सांगितलेंच आहे. त्या ॲड्रेसमध्यें विद्यार्थ्यांनीं सुटींत काय करावें या विषयीं सांगतांना शास्त्रीबुवांनीं त्यांना बजाविलें कीं—

There were times, when the student could afford to sleep off or play off whole vacations and live as merrily as the day was long........But those golden days are now no more. *The present is an age of stern necessities, when the struggle for life has become tenfold more arduous than it ever was.* With the furious battle therefore going round you, and the din of blows given and received resounding in your ears, you cannot afford to indulge in similar sloth ; you must be up and doing.

( एक काळ असा होता कीं सबंध सुट्टीभर विद्यार्थ्यांनीं झोपावें किंवा मोठाचा मोठा दिवस खुशाल घोरून काढावा......परंतु ते चैनीचे दिवस आतां राहिले नाहींत. **वर्तमानकाळ जालीम भुकेचा आहे. आतां पूर्वीपेक्षां दसपटीनें जास्त आयुष्याचें रणांगण माजून राहिलें आहे.** तुमच्या कर्णरंध्रांत त्या रणांगणाचा खणखणाट आणि त्या टोलेबाजीचा दणदणाट घुमत असतांना, आतां तुम्हांला पूर्वीसारखें झोंपून चालावयाचें नाहीं; तुम्हांला आळस झाडून कामाला कंबर बांधलीच पाहिजे. )

या उताऱ्यावरून काय दिसतें ? यावरून असें कां दिसतें कीं शास्त्रीबुवा आणि टिळक शिष्यवृत्ती मिळवूनच आनंद मानणार होते ? होते असें ज्यांना वाटत असेल त्यांनीं खुशाल हव्यातशा राष्ट्रीय शिक्षणाविषयीं शंकाकुशंका काढाव्या. आम्हांला अशा व्यक्तींना शांतपणें नमस्कार करून त्यांची रजा घेतल्याखेरीज दुसरें कांहीं करितां येणें शक्य नाहीं, हा आमचा कबुली जबाब आहे.

---

१ वि. शा. चिपळूणकराचें चरित्र पान २३८.

## ( ६ )

आतांपर्यंत लोकमान्य टिळकांच्या शैक्षणिक व आमच्या मतें एका अत्युत्कृष्ट कार्याविषयीं माहिती व विवरण झालें. आतां त्यांची सामाजिक सेवा पहावयाची. आपण ओघाओघानेंच आगरकर व टिळक यांच्या सामाजिक मतांकडे वळलों होतों, तोच धागा एथें उचलूं या.

आजकाल समाज–सुधारणा हा शब्द उच्चारितांच, आगरकरांचीच प्रथम आणि नंतर लो. टिळकांची मूर्ति नजरेसमोर उभ्या राहतात हें सत्य आहे. या मानाला गोपाळरावजी बव्हंशीं पात्रहि आहेत. तथापि टिळकांच्या समाजसेवेचा विचार करतांना आह्मांला केवळ त्या मित्रांच्या झटापटींचाच धागा गुंढाळायचा नाहीं; उलट शक्य तितका तो अस्पृहणीय वाद टाळायचाच आहे. आह्मी याच कशाला, प्रत्येक बाबतींत सन्मान्य व्यक्तींविषयीं स्वतंत्र रीतीनेंच विचार करूं. राष्ट्रहित ही आमची कसोशी आहे. तिच्याकरितांच व्यक्तींचें आम्हांला महत्त्व वाटतें. आह्मी विभूतिभक्त नव्हत कीं तत्त्वभक्तहि नव्हत. आह्मी आपले गरीब राष्ट्रभक्त आहोंत. तेव्हां टिळकांच्या समाजसेवेचा धागा आगरकरांच्या नांवानें जरी आम्ही उचलिला आहे, तरी जसे टिळक राजकारणांत अग्रणी होते तसे समाजसेवेंत आगरकर अग्रणी होते म्हणूनच आम्ही तसें केलें. आतां राजकारणांत टिळक आम्हांला सर्वस्वीं स्थितप्रज्ञ दिसतात तसें सामाजिक सेवेंत आगरकर दिसत नाहींत ही गोष्ट निराळी. पण केवळ सामाजिक सेवेंतच दोघांची तुलना केली तर टिळकांपेक्षां आगरकर एकंदरीनें कांकणभर अधिकच ठरतात, अशी आमच्या मनाची ग्वाही आहे. कसें तें आतां विस्तारानें सांगतों.

प्रथमतः समाज-सुधारणा म्हणजे काय हें नीट लक्षांत घेतलें पाहिजे. समाज हा शब्द उच्चारायला फार सोपा आहे पण कळायला फार कठीण आहे. तीच गोष्ट सुधारणा या शब्दाचीहि आहे. 'समाज' शब्दांत समुच्चयवाचक अर्थ खेचून भरला आहे. त्याचप्रमाणें सुधारणाहि एकांगी कधींच नसते. समाज जसा सूक्ष्म अशा निरनिराळ्या घटकावयवांनीं बनूनहि स्थूल अशा साम्यतास्वरूपांत दिसतो, त्याचप्रमाणें सुधारणाहि अत्यंत सूक्ष्म अशा कारणांनीं आस्ते आस्ते बनत जाऊनहि स्पष्ट अशा दृश्य स्वरूपांत

निगडित करून दाखवितां येतात. अर्थातच समाजसेवकांची जी कामगिरी आपण पाहूं ती अशा भिन्न भिन्न दृष्टीनें व नंतर सर्वांची गोळाबेरीज करूनहि पाहिली पाहिजे.

आतां समाजाचीं भिन्न भिन्न स्वरूपें सांगण्याच्या भरीस पडलों तर हें प्रकरण कोणत्या दीर्घ मर्यादेपर्यंत जाईल याचा पत्ताच राहणार नाहीं. नुसतें पोटभर खावयास मिळालें व जरूर तेवढें पांघरावयास मिळालें ह्मणजे समाज सुधारला असें होत नाहीं. एवढ्यावरच जर एकादा समाज संतुष्ट राहिला तर त्याची स्थिति पशूंच्या कळपांपेक्षां जास्त चांगली होणार नाहीं. समाजांत मनुष्यत्वाच्या अंतिम सीमेपर्यंत ज्या कर्तबगारीच्या गोष्टी करितां येणें शक्य आहे, त्या सगळ्या सतत होत राहणें यालाच जिवंत समाजसुधारणा असें नांव योग्य दिसेल. मनुष्याच्या समाजाच्या कर्तबगारीला ठराविक सीमा कधींहि नसते, ह्मणून समाजाचीं भिन्न भिन्न स्वरूपेंहि निस्सीम असतात; आणि ह्मणूनच आह्मी आमच्या वाचकांना विनंती करून सांगतों कीं आतां आह्मी ज्या समाजसेवेबद्दल बोलणार आहोंत, तिची मर्यादा आह्मी आंखून टाकित आहोंत. नुसत्या हर्बर्ट स्पेन्सरचीं Principles of Sociology पाहिलींत, तरी समाजाच्या बहुरूपीपणाची साक्ष पटते. स्पेन्सरनंतर Biology सारखीं कितीं तरी शास्त्रें वेगवेगळ्या अध्वर्यूंकडून उदयास पावलीं आहेत. हें पुस्तकी पांडित्य सोडून दिलें व समाजाकडे साध्या पण उघड्या डोळ्यांनीं पाहिलें तरी Bolshevism सारखीं भयंकर स्वरूपें समाज धरित आहे. एवंच समाज बहुगुणी व अनंतरूपी असतो. परंतु आपणांला विषयविवेचनाकरितां त्याचें रूप मर्यादित केलेंच पाहिजे. त्या शिवाय गत्यंतर नाहीं. प्रचलित राजसत्तेचा जिच्याशीं प्रत्यक्षतः असा संबंध येणार नाहीं, जितका थोडा येईल तितकादेखील लोकहितास बहुधा अनुकूल असेल; जिच्याशीं प्रचलित धर्माचा संबंध असेल पण जी धर्माच्या घाणेरड्या समजुतींनीं व्यथित झाली नसेल; जिचा वाङ्मयाशीं संबंध असूनहि जी वाङ्मयावर आपला छाप मारणारी असेल, जी शिक्षणामुळें वळण पावणारी असेल पण जिला विचारस्वातंत्र्य हवें असेल, जी व्यापाराचें बाह्य चिन्ह मात्र आहे, अशा आणि अशाच सुधारणेला आह्मी समाजसुधारणा म्हणतों; आणि अशाच मर्यादित कल्पनेनुसार लोकमान्य टिळक व लोकहितेच्छु आगरकर यांच्याकडे आह्मी पाहतों. फिरून आगर=

करच एकटे टिळकांचे प्रतिस्पर्धी नव्हते, तर एका बाजूनें रानडे, तेलंग, व भांडारकर आणि दुसऱ्या बाजूनें शास्त्री पंडित व आचार्य हे देखील वेगवेगळया कारणांपुरते त्यांच्याशीं स्पर्धा करित असत. समाजसेवेच्या बाबतींत लोकमान्यांची स्थिति भयंकर नाजुक झाली होती. त्यांनीं सामाजिक सेवेला हृदयाची उपमा दिली होती ती केवळ स्फूर्तीनें दिली नव्हती;— स्फूर्तीवर हवाला ठेवण्याचें काम आगकरांचें होतें—तर ती उपमा त्यांना अनुभवानें सुचली होती. पुढें तर या नाजुक स्थितीचें अतीव भयंकर स्वरूप ताई-महाराजांच्या खटल्याच्या वेळीं झालें होतें. तें प्रकरण योग्य स्थलीं येईलच. पण लोकमान्य सामाजिक सुधारणांच्या यादवी युद्धभूमीवर फारच चमत्कारिक ठिकाणावर उभे राहिले होते. राजकारणांत त्यांचे दोनच शत्रु असत. एक नोकरशाही व दुसरे प्रागतिक पुढारी. पण निदान पहिले शत्रु तरी दणकेबाज असत. आणि दणका झटला कीं त्या वीराचे बाहु तावडतोब स्फुरण पावत ! परंतु समाजसेवेंत त्यांना त्याच प्रागतिक पुढाऱ्यांना मुख्य शत्रु समजावें लागे. आणि वर शास्त्री—आचार्यहि बिथरण्याचा संभव असे. शिवाय नोकरशाही अडचणीच्या प्रसंगीं हंसायला तयार असेच. अर्थातच या दांडग्या वीराला, त्याचा स्वत:चा अत्युच्च असा जो "जनतारूपी" आत्मा, त्याचाच धांवा करावा लागला; आणि संकटकाळीं धांवून जाणारा हा जनींजनार्दन लोकमान्यांच्या मागें वीरासन मारून जो बसला आहे तो अजूनपर्यंत बसला आहे; आणि हिंदुस्थानला पूर्ण स्वराज्य मिळेपर्यंत हा जनताजनार्दन आपलें वीरासन कधींहि सोडणार नाहीं; आणि पूर्ण स्वराज्य मिळाल्यावर, नव्हे त्याच क्षणीं हा लोकमान्यांची देवप्रतिष्ठा करून लोकमान्यांची घरोदारीं चरित्रसुधा वाटित सुटेल; असो. एकंदरींत सांगायचें इतकेंच होतें कीं टिळकांची समाजसेवेंत अत्यंत नाजुक परिस्थिति होती. ती लक्षांत घेऊन त्यांनीं काम केलें. तें कसें झालें व त्यांच्या प्रतिपक्षियांचें कसें झालें हें पाहणें आहे.

कोणतीहि कामगिरी घ्या. तिला प्रमुख दोन अंगें हीं असलींच पाहिजेत. ध्येयात्मक व व्यावहारिक दुसऱ्या अंगापेक्षां पहिलें थोर दर्जाचें आहे यांत शंकाच नाहीं. तरीहि सामान्य मनुष्य अगोदर दृश्य फलांकडेच लक्ष देईल. आपल्या मतांप्रमाणें मनुष्य कितपत वागला तेंच तो प्रथम पाहील.

व नंतर त्याच्या अडचणी तो लक्षांत घेईल. टिळक नाजुक परिस्थितींत सांपडले होते इकडे तो पाहणार नाहीं–आतां टिळक ह्मणून कदाचित् पाहीलहि; पण ही प्रेमाची सवलत टिळकांना नको–टिळकांची प्रत्यक्ष दृश्य अशी कामगिरीच तो पाहील आणि ती त्याच्या बुद्धीला पटली तरच तो ती प्रांजलपणें कबूल करील. निदान आह्मी तरी अशीच दृष्टि ठेविली आहे. अशी दृष्टि ठेवावी हें लोकमान्यांनाहि मनापासून आवडत होतें. तेव्हां प्रत्यक्ष दृश्य कार्य या दृष्टीनें लोकमान्यांची समाजसेवा कोणती झाली हें इतर राजकारण, ग्रंथलेखन, संपादन, संस्थास्थापन वगैरे बाबींकडे मुद्दाम दुर्लक्ष करून पाहिलें तरी टिळकांचीच कामगिरी श्रेष्ठ आहे. रानड्यांची नाहीं. आगरकरांचीहि नाहीं, तेलंगांची तर नाहींच नाहीं. भांडारकरांची नाहीं अशी तर त्यांची स्वतःची जबानी आहे. पण उलट ध्येयात्मक सेवा पाहतां मात्र एकटे आगरकरच टिळकांहून कांकणभर श्रेष्ठ आहेत हें मुळींच विसरतां कामा नये. हें कसें ?

आह्मी जें वर समाज-सुधारणेचें मर्यादित स्वरूप आखून टाकिलें आहे तें समजायला जरा कठीण जाईल. म्हणून आपण त्याचे निरनिराळे कप्पेच करून टाकूं या; व असे कप्पे करतांना वादविवादांच्या जोरकसपणाच्या रांगेनें कप्प्यांचा अनुक्रम लावूं. ( १ ) पुनर्विवाह ( २ ) प्रौढविवाह ( ३ ) जातिभेदनिराकरण ( ४ ) मिश्रविवाह ( ५ )सर्ववर्णांना सोळा संस्कार ( ७ ) स्त्रीशिक्षण ( ७ ) परदेशगमन ( ८ ) प्रायश्चित्तविधिनिषेध व ( ९ ) अंत्यजोद्धार. यांखेरीज आणखीहि विभाग तयार करितां येतील. उदाहरणार्थ ( १ ) संमतिवयाचा कायदा ( २ ) पंचांगानुसार आचरण ( ३ ) सण पाळणें ( ४ ) नाटकें पाहणें वगैरे शेंकडों लहान मतभेद आहेत. त्याचप्रमाणें ( १ ) सति जाणें ( २ ) अन्य वर्णांनें आचरण न करणें इत्यादि मतभेदहि आतां जुने झाले आहेत. सोवळ्या–ओवळ्याचा प्रश्न व फराळाच्या दुकानांत न जाणें इत्यादि प्रश्नही आतां अत्यंत किरकोळ आहेत. सोवळ्या–ओवळ्याकडे टिळकांनीं लक्ष दिलें होतें हें आह्मी विसरत नाहीं. पण आह्मी विभाग पाडले आहेत ते मोटमोठे पाडले आहेत. वाचकांनीं हवे असल्यास स्वतःच आणखी विभाग पाडावेत; असो.

आतां प्रत्येक विभागाच्या कसोटीला कोण कसा उतरला पहा:—

| | पु.वि. १ | प्रौ.वि. २ | जा. भे. निराकरण ३ | मि.वि. ४ | सो.सं. ५ | स्त्री. शि ६ | प. दे. ग. ७ | प्रा.वि. निषेध ८ | अंत्यजो ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आगरकर | १-२-३ * ** | ? | ० | × | १,२ × × | १,२,३ ? * ० | × | अनेक | १,२, × × |
| गोखले | × * * | × | ० | × | × × | ० ० * ? | ० | अनेक | × × |
| रानडे | × × * | × | ० | × | × × | ? * ० | × | एकदा | × × |
| टिळक | * * * | ० ० ० | ? | × | × × | ० ० ० * ० | ० | ए. ? ,, ० | अनेक· दा.१-२ |

वरील कोष्टकावरून काय सिद्ध होतें? आगरकर, गोखले, रानडे आणि टिळक यांचें, वरील नऊ विभागांविषयीं मत कसें हि असो, त्यांपैकीं प्रत्येक विभागावरील आपापल्या स्वतंत्र मतानुसार प्रत्यक्ष हातून कृति कोणाकडून अधिक घडली? नुसत्या संख्येच्या दृष्टीनें पाहिलें तरी आगरकरांना ३, गोखल्यांना ५, रानड्यांना ३ आणि टिळकांना ११ होकारार्थी गुण मिळतात. आतां टिळकांना ३ मुली आहेत, गोखल्यांना २ आहेत, आगरकरांना १ च होती व रानड्यांनाहि एकच होती, ही गोष्ट खरी आहे. पण या संख्यांचा फायदा स्त्रीशिक्षणांत गुण मिळण्यांत जरी थोडा गौण धरिला तरी प्रौढविवाहांत खात्रीनें सकारण आहे. टिळकांनां एकाद्या तरी मुलीचें लग्न आप्तांच्या आग्रहामुळें किंवा अन्य कारणामुळें लवकर, बाल्यावस्थेंत, करितां आला असता. तेव्हां सामान्यतेनें गुण दिलेले आहेत. उलट-

१ पुढील कोष्टक वाचतांना या गोष्टी ध्यानांत धराव्या. ( १ ) स्वतः लाविलेला किंवा मुलींचा अथवा सुनांचा लावून दिलेला १,२,३, ( २ ) मुलींचा ( ३ ) सहभोजनानें ( ५ ) स्वतः किंवा उपाध्याकरवीं १,२, ( ६ ) मुलींना, सुनांना व बायकोला १,२,३. ( ८ ) किती वेळां नाकारिलें ( ९ ) मानपत्र घेऊन व संकटांत मदत करून. १,२. नाहीं म्ह० + हो म्ह० प्रसंग पडला नसल्यास * संशयार्थी ? अशीं चिन्हें आहेत.

पक्षीं प्रसंग प्राप्त झाला असतांहि आपल्या मताप्रमाणें आचरण न करण्याची अनुदारता गोखल्यांनीं व रानड्यांनीं दाखविली आहे. रानड्यांनीं तर आपला दुसरा विवाह, कुमारिकेशीं लावून आपल्या आचरणावर नाहक निंदेचा शिक्का मारून घेतला¹. गोखल्यांनीं तेवढा तरी शहाणपणा व्यक्त केला. टिळकांनीं प्लेगनिवारणार्थ केलेली सर्ववर्णसेवा व अलीकडे अंत्यजांकडून आलेल्या मानपत्रांचा स्वीकार करून दाखविलेली उदारता सर्वश्रुत आहेत. तथापि १८९० सालीं "पांच हौदमिशनमधील चहाप्रकरण व ग्रामण्य" यांत प्रायश्चित्त घेतलें किंवा नाहीं हें अजिबात उडवून दिलें. याविषयींचा मजकूर एथेंच सांगितला पाहिजे. थोडेसें विषयांतर होईल खरें, पण या प्रकरणाला समाजसुधारणेंत स्वतंत्र असें फारसें महत्त्व नसल्यामुळें पुढें जागा मिळणार नाहीं. परंतु चरित्राच्या दृष्टीनें हें टाळणें अयोग्य होईल.

## १८९० चें ग्रामण्य प्रकरण

हें प्रकरण पुण्यांतलें आहे. हें स. १८९० ऑक्टोबर् १४ तारखेला घडलें. गोपाळराव जोशी ह्म० डॉ. आनंदीबाई जोशी यांचे पतिराज—हे ख्रिस्ती झाले होते—यांनीं शहरांतील पन्नास--पाऊणशें मंडळींना व्याख्यानार्थ आमंत्रण दिलें. त्याप्रमाणें आमंत्रित मंडळी गेली. त्यांत बळवंतरावजीहि होते. गोखले व रानडे हे हि होते. आगरकर असल्याचा उल्लेख कोठेंच आढळत नाहीं. रमाबाईच्या "आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी" या पुस्तकांत सुद्धां चालू प्रकरणीं आगरकरांचें नांव दिसत नाहीं. मात्र रमाबाई स्वतः इतर दहाबारा बायांसमवेत आमंत्रणावरून सेंटमेरीज कॉनव्हेंटमध्यें हजर होत्या. तेथें ठराविक कार्यक्रम झाल्यानंतर कॉनव्हेंटमधील सिस्टर्सनीं स्वहस्तांनीं मंडळीस, स्त्रीपुरुषांस, चहाचे पेले दिले. बायामंडळींनीं चहा घेण्याचें साफ नाकारिलें. पुरुष—मंडळीपैकींहि कित्येकांनीं नुसते पेले हातीं धरून, चहा न घेतां, टेबलांवर ठेऊन दिले. अशा-

---

१ या बाबतींत रानड्यांचीं पुढील जबानी फार महत्त्वाची आहे. त्यांनीं दुसरें लग्न करण्याच्या अगोदर वडिलांना सांगितलें, "कदाचित् मी तसाच राहिल्यांस पुनर्विवाह करीन अशी आपणास भीति वाटत असेल तर मी तो करणार नाहीं, असें आपल्याला वचन देतों. त्याबद्दल आपल्याला काळजी नको." आ. आ. कां. आठवणी पान ३२.

पैकीं आपण एक होतों असें बळवंतरावजींचें ह्मणणें होतें, असो. कित्येकांनीं चहापान केलें. पुढें २।३ दिवसांत गोपाळराव जोश्यांनीं " पुणें–वैभवांतून " आपली नारदी किल्ली फिरविली. त्याबरोबर शास्त्री–पुराणिकादिकांत खळबळ उडून हजर असलेल्यांपैकीं ५२ मंडळींवर ग्रामण्य उपस्थित झालें. उपस्थित करणारे प्रमुख पुढारी ह्मणजे " पुण्यांतील प्रति–शंकराचार्य नातु घराण्यांतील कै. श्रीमंत बळवंतराव ऊर्फ बाळासाहेब नातु हे होते. " आणि त्यांचे अनुयायी ह्मणजे पुण्यांतील भट-भिक्षुक; त्यांनीं शंकराचार्यांकडे हे प्रकरण नेलें. आरोपींपैकीं बळवंतरावजी टिळक आणि कै. रघुनाथ दाजी नगरकर यांनीं आपल्या पक्षाचें समर्थन केलें. परंतु ५२ पैकीं ४२ जणांवर आरोप शाबित होऊन त्यांना प्रायश्चित्त देण्याचें, नाहीं तर वाळित टाकण्याचें ठरलें. या ४२ जणांपैकीं बळवंतरावजीहि एक होते. त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें त्यांनीं वास्तविक चहा घेतला नव्हता आणि त्यांनीं खरोखरच घेतला होता असें निश्चयानें सांगणारा विश्वसनीय असा गृहस्थ एकही नाहीं. तरीपण आचार्यांच्या प्रतिनिधीपुढें चवकशी होऊन, तींत त्यांच्यावर गुन्हा शाबित झाला व त्यांना प्रायश्चित्ताची शिक्षा सुनावण्यांत आली. आणि त्यांनींहि श्रींची आज्ञा ह्मणून ती मान्य केली. परंतु आपण त्या प्रकरणानंतर लवकरच काशीस गेलों होतों; तेथेंच प्रायश्चित्त घेतलें असें त्यांनीं सांगितलें. याविषयीं मात्र बराच मतभेद आहे. चहा घेतला नव्हता तर प्रायश्चित्त कां घेतलें ? आणि घेतलें ह्मटल्यानंतर चवकशींत चहा घेतला नाहीं असें कां ह्मटलें ? या कोड्याचा उलगडा एकाच सत्यानें होणार आहे. आणि तें ह्मणजे टिळकांना अलीकडील शंकराचार्यांची विशेष थोरवी वाटत नव्हती हें खचित. याबद्दल पुरावा पुढीलप्रमाणें होय.

पांचहौद--प्रकरणानंतर १४ वर्षांनीं ह्म० १९०४ सालीं संकेश्वरमठाधिपति पुण्याला आले होते. तेव्हां १४ वर्षांपूर्वीचें प्रायश्चित्त--प्रकरण कांहीं कारण नसतां पुन्हां चिकळलें. अर्थातच असलीं शेंकडों प्रकरणें पचवून खाक करण्याइतकी लोकमान्यांची त्यावेळीं प्रखर तपश्चर्या झाली होती. त्यामुळें त्यांनां आचार्यांकडून नोटिस मिळण्याच्या ऐवजीं स्वतः आचार्यांनींच " आपलें कर्तव्य काय आहे ? " असा लोकमान्यांना प्रश्न विचारून

आपल्या शास्त्रीभिक्षुकांकडून ( ! ) त्यांशीं वाद करविला. ( हा वाद हि १९०४ सालच्या मेच्या २३ तारखेलाच झाला हें आश्चर्य होय. ) लोकमान्यांचा विजय झाला हें निराळें सांगण्याचें कारणच नाहीं. परंतु त्यानंतर जनतेनें लोकमान्यांना म्हटलें कीं " अनायासें शंकराचार्य आले आहेत, त्यांच्याकडून सामाजिक व धार्मिक सवलती मिळवून घ्या कीं. " तेव्हां लोकमान्यांनां जरी सवलती हव्या होत्या तरी त्यांनीं आचार्याजवळ त्या मागितल्या नाहींत. याचीं कारणें त्यांनीं अशीं सांगितलीं कीं ( १ ) स्वतः जगद्गुरु चांगले हुशार व चाणाक्ष पाहिजे होते. ( २ ) त्यांच्या पदरीं हुशार पंडित व विद्वान् सल्लामसलतगार हवे होते; आणि (३) आपलेच लोक आपणांला विरुद्ध नको होते. यांपैकीं पहिल्या कारणावरून लोकमान्यांची शंकराचार्यांविषयीं विशेष आदरबुद्धि नव्हती हेंच खरें. असाच प्रकार गोखल्यांचाहि होता. त्यांनीं तर प्रायश्चित्ताची शिक्षा झुगारूनच दिली. रानड्यांनीं प्रायश्चित्त घेतलें. गोखले टिळकांपेक्षां बरे, असें वाटेल; पण तें चूक आहे. कारण टिळकांनी आचार्यांबद्दल आदरबुद्धि नव्हती पण त्या पीठाबद्दल पूज्यबुद्धि असे. त्यांनीं काशीला जाऊन तेथल्या शास्त्र्यांना झालेली खरी गोष्ट सांगून त्यांच्या आग्रहानें खरोखरच प्रायश्चित्त घेतलेंहि असेल. नंतर पुण्याला आल्यावर आरोपींच्या आग्रहावरून वकीलपत्र घेतल्यामुळें त्यांना पुन्हां चहा घेतला नाहीं " असें खरें सांगावें हि लागलें असेल. आणि शिक्षेची अमंलबजावणी अगोदरच झाली असल्याकारणानें पुन्हां प्रायश्चित्त घेण्याचें कारणच उरलें नसेल. तथापि हें सगळें चमत्कारिक प्रकरण झालें खरें. परंतु एक मूळ गोष्ट मात्र विसरतां कामा नये कीं रानड्यांनीं कुमारिकेशीं द्वितीय संबंध जोडण्यापेक्षां हें जरा साशंकपणाचें टिळकांचें प्रायश्चित्तप्रकरण फार चांगलें आहे; असो. लोकमान्यांचें दुसरें प्रायश्चित्त म्हणजे परवां विलायतेहून आल्यानंतर कनिष्ठ चिरंजीवाचें लग्न होण्याच्या वेळीं घेतलेलें होय.

ऐथपर्यंत समाजसुधारणेच्या व्यावहारिक अंगांत टिळकच सर्व सुधारकांपेक्षां श्रेष्ठ ठरतात याचें विवेचन झालें. आतां फिरून मूलतत्त्वांवर येऊन ध्येयात्मक कामगिरीचाहि विचार करायला हवा. आमच्या मतें व्यक्तीच्या आचरणाला मान नाहीं असें नाहीं. त्यालाहि अतोनात महत्त्व आहे. पण व्यक्तींचें आचरण—चांगलें व वाईट दोनही प्रकारचें—कालाच्या विशाल

पटलावरून पुसून जातें. कालाला व्यक्ति रुचतच नाहींत. योगवासिष्ठांतला भूशुंड नामक कावळा वसिष्ठ मुनीला ह्मणाला "मी तुझ्यासारखे आठ वसिष्ठ पाहिले आहेत" ! तेव्हां कालाच्या दीर्घपटावर तत्त्वें च अधिक टिकतात. याविषयीं अनेक तज्ज्ञांचा आमच्याशीं विरोध होईल हें आह्मी जाणून आहोंत. पण आह्मांला आमचा हा तत्त्वात्मक मुद्दा मुळींसुद्धां लांबवितां येत नाहीं. तत्त्वविवेचनाचें हें स्थळ नव्हे. तसेंच ग्रंथकाराचें पांडित्यहि दाखविण्याला एथें अवसर नाहीं. आह्मी अगदीं जरूर तेवढेंच विवेचन करून जरूर तितकेच उतारे व जरूर तेवढेच उल्लेख करितों. कालाच्या अनंत पटावर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक या व्यक्तीचें "ध्येयात्मक आणि व्यावहारिक" असें चित्र कसें उमटलें हेंच फक्त आह्मी एथें या ग्रंथांत दाखवूं. असो.

तेव्हां आतां आचारांत टिळकांना पहिलें स्थान देऊन ध्येयात्मक बाजूचा आरंभ करायचा ह्मणजे टिळकांच्या वेळची सामाजिक परिस्थिति कोणती होती हें पहावयास पाहिजे. फिरून सामाजिक सुधारणेची मर्यादित व्याख्या व तिच्या स्पष्टीकरणार्थ केलेले कप्पे विसरूं नका, अशी विनंति आहे. दुसऱ्या प्रकरणांत टिळक-आगरकर-उपासनी वगैरे मंडळींचे जे दोन संवाद दिले आहेत, त्यांवरून, विशेषतः दुसऱ्यावरून तरी, वाचकांनां कळून चुकलें असेल कीं सामाजिक जखम हृदयाची आहे असें लोकमान्य समजत व तिचें निराकरण आर्थिक शास्त्राच्या द्वारें राजकारणांत शिरून स्वातंत्र्य मिळविल्याखेरीज मुख्यतः होणार नाहीं अशी त्यांची खात्री असे. उलट आपण स्वतःच आपलें हित पहावें आणि त्यांत सरकार आडवें पडलें तर त्याला दूर लोटावें अशी आगरकरांची मनीषा होती. लोककल्याण हें दोघांचेंहि ध्येय होतें आणि दोहोंच्या दृष्टीचा मिलाफ शिक्षणक्रमांत झाला होता. शिक्षणक्रमाची वाहात कां, कशी व कोणी लाविली, हें या प्रकरणांत विस्तारानें येऊनच गेलें आहे. तेव्हां शिक्षणाचें लोहचुंबक निघून गेल्यामुळें टिळक राजकारणीं पडले व आगरकर सामाजिक सुधारणेंत घसरले. मनाला असा विचार सुचतो कीं हे दोघे प्रथम एकत्र आले नसते तर फार फार चांगलें झालें असतें. तसें झालें असतें तर राजकारण व समाज-सुधारणा यांच्या मिलाफाच्या जागा योग्य तऱ्हेनेंच आंखून टाकिल्या गेल्या असत्या. तसें झालें नाहीं ह्मणून दोहोंचा उठल्यासुटल्या, वेळींअवेळीं, नाहीं त्या ठिकाणीं, मिलाफ होऊं लागला. आणि

त्यांत जें द्वेषाचें बीजारोपण झालें त्याचे आतां वृक्ष होऊन त्यांची कांहीं गोड, कांहीं कडु, पण एकंदरीनें दुहीचीं अतएव कडूच फळें खावीं लागत आहेत. परंतु आतां काय? झालें तें होऊन गेलें व त्यांतहि कोणाकडे विशेषसा दोष येत नाहीं. कारण अंतःकलहाचीं बीजें निदान महाराष्ट्रांत तरी फार जुनीं आहेत. तसेंपण घाबरून जाण्याचें कारण नाहीं. राष्ट्रांत नवीन जोम उत्पन्न झाला आहे. आणि असा जोम सुरू झाला ह्मणजे काळकूट विषेंदेखील संजीवनीप्रमाणें सुफलदायी होतात. हा जो जोम उत्पन्न झाला असें आह्मी ह्मणतों, त्याचींच राजकारण व समाजसुधारणा हीं निरनिराळीं अंगें होत. राजकारणांत टिळकांनीं पराक्रम केला. आगरकरांनीं सामाजिक अंग सुधरून काढिलें. राजकारणांत टिळक बेफाम असे कधींच झाले नाहींत. ह्मणून त्यांच्यावरच्या नेमस्तांच्या फाजिल दावाचा आह्मी निषेध करितों. आगरकर सुधारणा करितां करितां मर्यादेचें चटकन् अतिक्रमण करित असत. त्यांना टिळकांनीं मुद्दाम मर्यादेत खेचावें ह्मणून आह्मी टिळकांचे आभार मानितों. परंतु हें काम टिळकांनीं केलें नसतें व आगरकरांच्या फाजिल उत्साहाच्या लाटा समाजावर आदळूं दिल्या असत्या तर त्या आपोआप फुटल्या असत्या. व तसें झाल्यानंतर आगरकर शमले असते. पण टिळकांच्या प्रतिरोधानें मूळचेच तापट आगरकर जास्तच चिडले आणि त्यांच्याकडून प्रमाद होऊन त्यांचा चटका टिळकांनाहि मिळत गेला. यावर टिळकांच्या वतीनें असेंहि ह्मणतां येईल कीं आगरकरांचा फायदा घेऊन सरकार समाजांत घुसले असते. उदाहरणार्थ संमतिवयाचा कायदा. आणि ह्मणून टिळकांनीं आगरकरांना थोपवून धरिलें, ही गोष्ट अगदीं खरी आहे. तथापि झाला तो प्रकार अनिष्ट झाला खरा. त्यामुळें सामाजिक सुधारणेला प्रगति मिळाली; राजकारण रंगांत आलें; परंतु स्वराज्य मात्र फार लांब गेलें. तें कसेंहि असो. जनतेच्या अंगांत जी दुष्ट घाण मुरली होती, ती आगरकरांनीं साफ केली खरी. समाजाला आगरकरांनीं सुधरलें व टिळकांनीं त्याला वळण लाविलें. ह्मणजे आगरकर ध्येयात्मक आणि टिळक व्यावहारिक बाबतींत [illegible] होऊन गेले असें ह्मणतां येईल. याचेंच विशदीकरण वर नमूद करून ठेविलेल्या ९ कार्यविभागांत सारांशानें करावयास हवें. परंतु तें काम आह्मी तूर्त तरी सोडून देतों; कारण तें विशेषतः विघातक स्वरूपांत मोडतें. मात्र जातां

जातां सांगून टाकितों कीं टिळकांचे राष्ट्रीय गुरु असे विष्णुशास्त्रीसुद्धा सामाजिक बाबतींत टिळकांहून ध्येयात्मक अंशानें श्रेष्ठ होते. टिळकांच्या बाबतींत हा परिणाम न होणें शक्य नव्हतें. त्यांना ध्येयात्मक कल्पना उच्च करतां येणें अशक्य नव्हतें. तसें त्यांच्या मनांत असतें तर त्यांच्या वदनांतून व लेखणींतून आगरकरांपेक्षां किती तरी पटीनें श्रेष्ठ दर्जाचें ध्येय त्यांना वर्णितां आलें असतें. पण त्यांची दृष्टि समष्टिस्वरूपी राष्ट्रीय होती. ते जनतेच्या, राष्ट्राच्या दृष्टीच्या ध्येयाचें भोक्ते होते. आणि म्हणूनच त्यांनीं व्यावहारिक बाबतींत अघाडी मारिली. शेवटीं ध्येय वर्णन करणें एकवार सोपें आहे पण त्याप्रमाणें आचरण करून जनतेचें हित साधणें असिधाराव्रताइतकें कष्टमय आहे एवढें सांगून हें प्रकरण संपवितों.



# प्रकरण ४ थें

## विधायक कामगिरी ( पुढें चालू )

## वाचन मनन आणि संभाषण

## १८७३-१९२०

The Drama, dealing with all departments of Human Life, is necessarily political.

—Bernard Shaw

( मानवी जीविताच्या प्रत्येक कृतीशीं नाटकाचा संबंध असल्याकारणानें, तें–जीवितरूपी नाटक–लोकविषयक असलेंच पाहिजे–बर्नर्ड शॉ. )

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या चरित्रांत प्रथम शैक्षणिक आणि नंतर सामाजिक सेवेनंतर, विधायक कामगिरींत त्यांची राजकीय सेवा आह्मी विचारांत घेऊं, अशी पुष्कळांची कल्पना असेल. कित्येक वाचक तर त्या प्रकरणाबद्दल आतुरहि झाले असतील. असतील कशाला ? आहेत. लोकमान्यांच्याच प्रसादानें व आमच्या वाचकांच्या ममतेनेंहि आह्मी दोन प्रकरणें लिहून पुरीं केलींत तेव्हांच तीं आमच्या स्थानिक मित्रांनां फार फार आवडलीं व ते मजकूर लिहून होत जाईल तसा वाचित गेले. अर्थातच आतां लोकमान्यांची मुख्य अशी जी राजकीय सेवा तिचें केव्हां गायन करणार–हो. लोकमान्यांच्या राजकारणी सेवेलासुद्धां गायन हाच शब्द उत्तम आहे, कसा तो लवकरच कळेल–असें ते मित्र आह्मांला आतुरतेनें विचारित गेले. परंतु चरित्र लिहिणें ह्मणजे कांहीं आपल्या हातांतली गोष्ट नाहीं. चरित्रनायक पराक्रम करून गेला. तो पराक्रम योग्य रीतीनेंच वर्णिला पाहिजे. लोकमान्यांचा राजकीय पराक्रम सर्वश्रेष्ठ होता यांत शंका नाहीं; परंतु राजकारण ही गोष्ट फार एकांगी आहे ? राजसत्तेशीं प्रामुख्यानें संबंध असलेल्या गोष्टींवर राजकीय असा

---

१ भाषांतर करतांना बरेंच स्वातंत्र्य घेतलें आहे.

94292

छाप बसतो, हें आह्मी जरी मागिल प्रकरणीं सांगितलें आहे, तरी छाप मारणारा जो राजकारणी पुरुष तो स्वतः कसकसा राजकारणी होत चालला हें अगोदर कळल्याविना त्याच्या राजकारणी धोरणांची रास्त कल्पना होणें शक्यच नाहीं. टिळक कॉलेजांत असतांना प्रोफेसरांच्या ब्युरॉक्रसीशीं सख्यत्वानें असत, किंबहुना ते ब्युरॉक्रसीच्या गळ्यांतले ताईत असत; तेच टिळक कॉलेजांतून बाहेर पडल्यानंतर, राष्ट्रीय शिक्षणाच्या स्वदेशी भावनेनें, मराठा-केसरींच्या संपादकत्वानें, ध्येयात्मक जरी नाहीं तरी व्यावहारिक समाजसुधारणेनें, वगैरे अनेक कारणांमुळें, आस्ते आस्ते, लोकमान्यपद पावून ब्युरॉक्रसीचे शत्रु बनले, हा अजब प्रकार नव्हे कां ? हा चमत्कार कां ट्रॅन्सफर सीनसारखा चटकन् घडून आला ? नाहीं. राष्ट्राचा व राष्ट्रसूत्रधाराचा इतिहास व चरित्र हीं ट्रॅन्सफर सीन्सचीं नाटकें कधींहि नसतात. फ्रान्स देशांतील स. १७९२ ची राज्यक्रान्ति भडकलेल्या दावानलाप्रमाणें जरी सबंध युरोपखंडाला भाजू लागली होती, तरी तिची राजकीय चूक चवदावा लुई, अगोदर शंभर वर्षांपासून फुंकित होता. हें फुंकणेंच शहाण्या माणसानें अभ्यासिलें पाहिजे. लोकमान्य राष्ट्रीय पुरुष होते यांत आनंद आहे. लोकमान्य राजकारणी पुरुष होऊन गेले यांत दुःख आहे. लोकमान्य तुमच्या आमच्याकरितां राजकारणांत शिरले. पण खरे लोकमान्य राष्ट्रीय पौरुषांत सापडतील. परंतु हे असले खरे लोकमान्य कोणत्या पद्धतीनें पहावयाचें ? तेंच आतां एका प्यान्यांत सांगतों.

एखाद्या राष्ट्राकडे किंवा त्याशीं परिमाणूपरिमाणूनें निगडित झालेल्या राष्ट्रपुरुषाकडे पहाण्याच्या दोन पद्धति असतात. एक बाहेरून आंत व दुसरी आंतून बाहेर. पहिली पाश्चात्यांची होती. दुसरी पौर्वात्यांची प्राचीन कालापासून आहे. पहिलीला Inductive ह्मणतात व दुसरीला Deductive ही संज्ञा आहे. आह्मी पौर्वात्य आहोंत, व आतां पाश्चात्यसुद्धां आमच्याच पद्धतीवर शास्त्रीय पद्धतीनेंहि येत चालले आहेत; म्हणून आम्ही दुसरी म्हणजे आह्मां हिंदूंची पद्धति स्वीकारितों. प्रथम राष्ट्राची, किंवा राष्ट्रपुरुषाची Normal साधारण स्थिति पहावयाची व नंतर ती Supra-

१ कर्मयोगीच्या खास लोकमान्य अंकांतील देशभक्त भाऊसाहेब असनारे यांचा लेख अवश्य वाचावा.



94292

Normal असाधारण कशी झाली हें पहावयाचें असा हा पौर्वात्य क्रम आहे. या कामीं Civilization in England या सन्मान्य पुस्तकाचा कर्ता H. T. Buckle याची साक्ष फार पोषक होईल. तो म्हणतो--

" Thus, it has been found, that the best way of arriving at a theory of disease is by beginning with the theory of health; and that the foundation of all sound pathology must be sought in an observation, not of the abnormal but of the normal functions of life. Just in the same way, I believe, it will be found that the best method of arriving at great social truths, is by first investigating those cases in which society has developed itself, according to its own laws, and in which the governing powers have least opposed themselves to the spirit of their times. "

( अशा रीतीनें, शोधांतीं आढळून आधलें आहे कीं, रोगाची मीमांसा करावयाची असल्यास, आरोग्याच्या ममिांसेपासून आरंभ केला पाहिजे; आणि उत्तम रोगनिदानशास्त्राचा पाया, प्राणांच्या प्रकृतींतच शोधिला पाहिजे. विकृतींत शोधून उपयोगाचें नाहीं. माझा विश्वास आहे कीं, समाजशास्त्राच्या मूलतत्त्वांची अशीच गांठ घेतां येईल. समाज आपल्या स्वतःच्याच नियमानीं स्वतःच कसा विकसित झाला याची छाननी केली पाहिजे. अशा छाननींत ज्या प्रकारांत राजसत्तेकडून थोडा तरी प्रतिबंध झाला असेल, असे प्रकार अजिबात काढून टाकिले पाहिजेत )

या उताऱ्यात समाजाचा विचार झाला, राष्ट्राचा किंवा राष्ट्रपुरुषाचा झाला नाहीं अशी शंका राहू नये, म्हणून त्याच ग्रंथकर्त्यानें मुद्दाम खालीं टीप देऊन स्पष्ट मल्लीनाथाप्रमाणें विवरण केलें आहे कीं—

" In a philosophic view, it is evident that precedence should be given to countries by the historian soeely in reference to the ease with which their history can be generalized; following in this respect the scientific plan of proceeding from the Simple to the Complex. This leads us to the conclusion, that in the study of *Man*, as

§ Civilization in England by H. T. Buckle Vol. II page, 1

in the study of *Nature*, the question of priority resolves itself into a question of observation; and that the more aberrant man has been, that is to say, the more he has been interfered with, the lower be must be placed in an arrangement of his history. . . . . . Pathology should be investigated deductively rather than inductively."

( तात्त्विक दृष्ट्या, ज्या देशांचा इतिहास गुंतागुंतीचा नसल्याकारणानें लिहिण्यास सोपा जाईल, त्या देशांना इतिसकारांनीं प्रथम हातीं घ्यावें. साध्या स्वरूपापासून गुंतागुंतीच्या जाळ्याकडे दृष्टि नेण्याची शास्त्रीय पद्धति इतिहासकारांनीं अमलांत आणावी. यावरून आपणांला असा सिद्धांत करितां येईल कीं, मनुष्याच्या किंवा सृष्टीच्या मीमांसेंत कितपत गुंतागुंत झाली आहे या प्रश्नावर, अगोदर कुठून आरंभ करावा हा प्रश्न अवलंबून राहतो. म्हणजे मनुष्याच्या चरित्रांत जितका जास्त घोटाळा झाला असेल, म्हणजे त्याला जितपत अडथळे आले असतील, तितपत त्याचा इतिहास पुढें ढकलावा. × × × × निदान शास्त्रांचा अभ्यास बाहेरून आंत न करितां आंतून बाहेरची त्यांची गति असावी[1]

या बकलच्या साक्षींत त्यानें मुख्यतः मनुष्यप्राण्याचा किंवा सृष्टिक्रमाचा शास्त्रीय अभ्यास कसा करावा हें सांगितलें आहे हें खरें आहे, पण तें प्रत्येक मनुष्याच्या, ( मग तो कितीहि मोठा असो, ) नव्हे प्रत्येक जीवजंतूच्या, ( मग तो कितीहि लहान असो, ) जीवितक्रमाला लागू पडतें. हीच शास्त्रीय पद्धत, गंगाधर शास्त्र्यांच्या, शास्त्रप्रिय मुलाला आम्ही पहिल्यापासून लावित आलों आहोंत[2]. स्वतः लोकमान्यदेखील प्रत्येक पदार्थाचा, प्रत्येक प्रश्नाचा, प्रत्येक तत्त्वाचा, प्रत्येक संस्थेचा, प्रत्येक गोष्टीचा विचार सामान्य जनतेच्या Normal (सामान्य) दृष्टीनेंच करित असत हें आम्ही वारंवार सांगत आलों आहोंत. परंतु आतांपर्यंत ह्या मुद्याला विशिष्टत्व प्राप्त झालें नव्हतें, याला कारण लोकमान्यांच्या राजकारणात्मक सेवेचा आतांपर्यंत प्रश्नच उद्भवला नव्हता. लोकमान्यांचें विशेष लोकमान्यत्व त्यांच्या राजकीय सेवेंत आहे, आणि राजकारण हें एकेरी तत्त्व नाहीं व त्याची Supra-normal सामा-

1 Ibid page 3—3; foot-note. २ विशेषकरून पहिल्या प्रकरणाचा शेवटला भाग पहा.

न्यातीत कल्पना एकदम येणें शक्य नाहीं व करून देणेंहि अशास्त्रीय आहे; सबब आह्मी या प्रकरणांत लोकमान्यांच्या राजकारणाची Normal condition साधारण स्थिति ( जिला पूर्व तयारी ह्मणतां येईल ) ती एथें सांगतों.

परंतु तत्पूर्वी आह्मी आमच्या या शास्त्रीय पद्धतीला खुद्द लोकमान्यांच्या वचनांची साक्ष देतों. हीं वचनें प्रस्तुत लेखकाला स्वतः त्यांच्याच वदनांतून ऐकायला मिळालीं आहेत; त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या माणसांकडून हि याला कळलीं आहेत; परंतु, आज जो उठला तो लोकमान्य माझ्याशीं असें बोलले होते, अशी खात्रीची ग्वाही देतो, कारण त्याला माहित आहेकीं आतां लोकमान्य कांहीं खरें सांगायला दृश्य स्वरूपांत येत नाहींत. निदान आह्मी तरी विश्वसनीय भागांपलीकडे जाऊं इच्छित नाहीं. सबब आह्मी खुद्द केसरींतलींच वचनें देतों. आर्यपुत्र नरसिंह चिंतामण केळकर लिहितात—[1]

" टिळकांचें सर्व चरित्र राजकारणी पुरुषाचें झालें आहे हें खरें; तथापि आपण राजकारणी चळवळींत पडावें या गोष्टीची आवड त्यांना अगदीं प्रथमपासून होती असें नाहीं. ते नेहमीं ह्मणून दाखवित कीं, " पहा, यदृच्छेनें मनुष्याचें चरित्र कसें बनतें तें. आपण शिक्षक, प्रोफेसर व्हावें; विशेषतः कोणत्याहि विषयांत संशोधन करून नवीन मतें प्रतिपादन करून ग्रंथ लिहावे; असें मला वाटे. पण शेवटीं पहावें तों स्वतः काढलेली शाळा व कॉलेज हीं सोडून देऊन मी राजकारणांत पडलों. मला लिहिण्याचा मनापासून कंटाळा, असें असतां माझा सर्व जन्म वर्तमानपत्राच्या संपादकाचा धंदा करण्यांत गेला. "

या आत्मसाक्षीवर रा. न. चिं. केळकर यांनीं जें विवरण केलें आहे तें शास्त्रीय नाहीं अशी आमची अल्प समजुत आहे. त्यायोगें लोकमान्यांच्या राजकीय सेवेबद्दल नसते गैरसमज उत्पन्न होऊन ते स्वतः केळकरांनांहि दूर करतां येणें मुष्किलीचें होणार आहे. या विषयीं विवेचन केल्यास विषयांतर होईल. सबब केळकरांची, वर उल्लेखिलेला लेख लिहितांना काय स्थिति झाली असेल, याचें बकलच्याच शब्दांत वर्णन करून त्यांची रजा घेतों. मात्र हा उतारा वाचतांना बकलनें देशांच्या इतिहासाकाराची स्थिति वर्णिली आहे, हें लक्षांत ठेवावें. तो ह्मणतो—

1 केसरी ३ ऑगस्ट १९२०

कटसहिष्णुता याचा विचार करून आपला कार्यक्रम आंखीत असत. ष्ट तत्त्वांवर आत्यंतिक निष्ठा ठेवून उपयुक्ततेच्या व व्यवहार्यतेच्या विचा- ते आपल्या कार्यक्रमांतून कधीं ही फाटा देत नसत. लोकांस अन्या- ी चीड येऊन त्याचा प्रतिकार करण्यास जनतेनें तयार झाल्याशिवाय ी राष्ट्राचा उद्धार होणार नाहीं हें तत्त्व त्यांनीं आपल्या स्वतःच्या आचर- व अखंड उपदेशानें सिद्ध केलें आहे.

आज या शिकवणुकीची अत्यंत जरुरी आहे. परंतु अशा आणीबाणी- वेळीं सेनापति नाहींसा झाल्यामुळें हिंदीलोकांची जी मनःस्थिति झाली है, तिचेंच वर्णन वॉल्टर स्कॉट यांच्या काव्यांतून वर शिरोलेखांत उद्धृत ल्या वाक्यांत आहे. अशा स्थितींत त्यांच्या तत्त्वांच्या यथार्थज्ञानाचा बोध तेंत होऊन ती खऱ्या शिष्टराष्ट्रक्षुण्ण अशा आपल्या चळवळीच्या मार्गा- ने व्यतीत होणार नाहीं अशी आशा प्रदर्शित करून ही छोटेखानी ावना लेख संपवितों.

यवतमाळ
आश्विन शु. ९ मी
रोज गुरुवार

माधव श्रीहरि अणे




**स्वदेशी ! स्वदेशी !! स्वदेशी !!!**

## अवश्य वाचा ] सोन्याचांदीचे दागिने [ आणि मागणी करा

अत्युत्कृष्ट गुलाबी फुलें, नामी नक्षीदार फॅन्सी सीलच्या अंगठ्या, तऱ्हतऱ्हेच्या मोनोग्रॅमचीं कामें केलेलीं भांडीं व सिळा, बटन्स, घड्याळाचे छेडे वगैरे सोन्या–चांदीचे तसेच मोत्याचे आणि हिऱ्यांचें दागिने आमच्या दुकानीं किफायतशीर व खात्रीशीर मिळतील; आणि करून दिले जातील. गिऱ्हाइकांनीं अशी सुसंधी दवडू नये. एकदा अनुभव घेतला कीं गिऱ्हाईक दुसऱ्या दुकानीं खरेदी साठीं जाणारच नाहींत.

पत्ताः—जी. वी. नाशिककर आर्टिस्टस ब्रदर्स

आग्रारोड–धूळिया सिटि.



हिंदपुत्र फेरोजशहा मेथा.



आर्यपुत्र गोपाळराव गोखले.



दे.भ. लाला लजपतराय.



सार्वजनिक काका.

"Historians, instead of following a scientific method suited to the actual exigencies of our knowledge, have adopted an empirical method suited to their own exigencies; and have given priority to different countries, sometimes according to their size, sometimes according to their antiquity, sometimes according to their geographical position, sometimes according to their wealth, sometimes according to their religion, sometimes according to the brilliancy of their literature, and sometimes according to the facilities which the historian himself possessed for collecting materials."

(इतिहासकार आपल्या ज्ञानात्मक अडचणी लक्षांत घेऊन लिहिण्याची शास्त्रीय पद्धति स्वीकारित नाहींत. तर त्यांनीं आतांपर्यंत स्वतःच्याच अडचणी लक्षांत घेऊन फक्त अनुभवसिद्ध किंवा प्रयोगसिद्ध तेवढ्याच गोष्टींवर हवाला ठेविला आहे; आणि त्या दृष्टीनें त्यांनीं कोणत्या देशाचा इतिहास लिहावयाचा हें ठरविलें आहे. त्यांनीं कधीं देशाच्या आकाराला, कधीं जुनाटपणाला, कधीं भूगोलात्मक स्थानास, कधीं सांपत्तिक दर्जाला, कधीं धर्मदृष्ट्या, कधीं वाङ्मयात्मक वैभवाला, आणि कधीं तर स्वतःच्या सामुग्री गोळा करण्याच्या सामर्थ्याप्रमाणें, महत्त्व देऊन इतिहास लिहिले आहेत.)

रा. केळकर लिहितात, " टिळकांचा चरित्र–हेतु विद्यार्थीदशेंत व वार्धक्यांत एकच ह्मणजे स्वकीयोत्कर्ष व परपरीभव हाच होता." आह्मी नम्रपणें नमूद करून ठेवितों कीं आह्मांला तरी लोकमान्याच्या दर्शनाला फक्त स्वकीयोत्कर्षच दिसतो. लोकमान्यांच्या मनांतून पहिल्यापासून स्वकीयोत्कर्षच हवा होता; परपरीभव नको होता. परपरीभवाचा रस्ता त्यांनीं घेतला तो स्वकीयोत्कर्षाकरितां त्यांना घ्यावा लागला ह्मणून त्यांनीं घेतला. स्वकीयोत्कर्षाकरितां परसख्य त्यांना जर फायदेशीर वाटलें असतें तर त्यांनीं परसख्य हि केलें असतें. उपासनींच्या सांगण्यावरून व खुद्द लोकमान्यांच्या आचारविचारांवरूनहि त्यांनीं प्रत्येक प्रसंगीं प्रथम परसख्यच[*] अजमावून पहावें. आणि तें अंतीं घातुकच होईल असें मनाशीं ताडून नंतर परपरीभवाचा बिकट मार्ग चोखाळ

[*] Civilization in England Vol. II Page 2 foot-note.

ळावा. अशी वस्तुस्थिति असतां लोकमान्यांच्या यदृच्छेचा त्यांच्या वर्तनाशीं विसंगतपणा झाला अशी उगांच कल्पना करून केळकरांनीं तो दोष टाळण्याचा प्रयत्न केला आहे. हेतु शुद्ध पण प्रयत्न अशास्त्रीय झाला आहे. हीच अशास्त्रीय दृष्टि त्यांनीं भावी चरित्रांत ठेविली तर त्यांना लोकमान्यांच्या चरित्राची भयंकर ओढाताण करावी लागणार आहे. "एका वर्डसवर्थ खेरीज इतर कोणाहि प्रोफेसरांविषयीं त्यांना यत्किंचितही आदर वाटत नसे." हें विधान पहा आणि उपासनींची शूट साहेबांची आठवण वाचा, दुसरी खरी असेल, व दाजीसाहेब खऱ्यांच्या कॉलेज सोडण्याच्या गोष्टींत तथ्य असेल तर केळकरांच्या माहितीच्या व तिच्यावर रचलेल्या विधानांचा सत्याशीं कसा मेळ बसवावयाचा? शिवाय शिक्षण, संपादकत्व, संस्थास्थापकत्व वगैरे यच्चयावत् गोष्टींना राजकारणाच्या चरकांतून खेंचून काढून त्यांच्या निष्कर्षांवर "राजकीय" शिक्का मारणें व ती लोकमान्यांची कामगिरी ह्मणून सांगणें निदान आह्माला तरी देशहिताची वाटत नाहीं. शिवाय ती गोष्ट खुद्द लोकमान्यांना पसंत नाहीं ह्मणून हृदयाला दुखतें हें स्पष्टपणें पण निर्मळ अंतःकरणानें नमूद करून ठेवित आहोंत.

## [ २ ]

## वाचन व मनन

चवथें प्रकरण राजकारणाचें कां केलें नाहीं या किरकोळ मुद्यावर फार विवेचन झालें. कबूल आहे. पण मूळांत चूक होऊं नये ह्मणून खबरदारी घेतली ह्मणून वाचकांनीं क्षमा करावी. तेव्हां लोकमान्यांनीं पुढें जी अलौकिक राजकीय सेवा केली, किंवा त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें ह्मणजे त्यांच्याकडून यदृच्छेनें जी राजकीय सेवा झाली, तिच्यापूर्वी त्यांच्या मनाचा मुख्यत: कल कोणीकडे होता? दुसऱ्या प्रकरणांत सांगितलेंच आहे कीं लिटनच्या कारकीर्दीमुळें त्यावेळच्या तरुण पिढीला ब्रिटिश सरकारच्या हेतूचा संशय येऊं लागला होता. त्यांना आरंभीं नुसता संशयच आला. पण त्या तरुणांपैकीं कित्येकांना तो भ्रामक वाटला. कारण पुढें लवकरच लॉर्ड रिपनची कारकीर्द सुरू झाली. दोन चपराकी मारून, मागाहून गाल चोळण्याचें ब्रिटिशांचें तत्व, गव्हर्नर–जनरलांच्या यादीवरूनहि स्पष्ट दिसू

येतें. त्याचप्रमाणें गाल चोळले असतां, आपणांपैकीं अनेक पुढारी अजूनहि थंडे होतात हा अनुभव आहेच. त्याप्रमाणें रिपनच्या कारकीर्दीत अनेक तरुण, आपला संशय चुकला, असें समजले. या तरुणांत टिळक-आगरकरादि मंडळी नव्हती. विष्णुशास्त्री तर मुळींच नव्हते. तरीसुद्धां या शेलक्या मंडळीवर रानडे, तेलंग, चंदावरकर दादाभाई प्रभृति मंडळींच्या धिमेपणाचा परिणाम झाला. हिंदुस्थानचे पितामह 'I still believe in the generosity of the English" असें शेटपर्यंत पुकारित राहिले. स्वत: लोकमान्यांनींहि म. गांधींप्रमाणें ब्रिटिशांबद्दल पूर्ण निराशा कधींच जाहिर केली नाहीं. ही स्थिति आज संपणाऱ्या दशकाची होय, तर ४०-४५ वर्षांपूर्वी टिळक आगरकरादि मंडळींना ब्युरॉक्रसीचा खळखळ्या तिटकारा आला असें सांगणें साफ खोटें होईल. त्यांना संशय आला, क्वचित् प्रसंगीं रागहि येई, व आपण इतर ग्रॅज्युएटांप्रमाणें ऐष-आरामांत न राहतां, आपणांकडून शक्य तितकी देशसेवा करूं या, अशी त्यांच्या मनांला उठावणी होई. त्याबरोबरच देशसेवेचा व्यवहार्य मार्ग कोणता याविषयीं वादविवाद चालत. त्यांत मतभेद होई. पण कोणताहि मार्ग घेतला तरी पुस्तकी ज्ञान हवेंच, अशी प्रत्येकाची खात्री पटे. त्यांत टिळकांना प्रथम अपयश आलें. या सगळ्या ज्वालाग्राही पदार्थांत शूटची ठिणगी पडली. मग काय विचारतां, गंगाधर शास्त्र्याच्या, केरूनाना छत्र्यांच्या, व उपासनींच्या बाळानें वाचन आरंभिलें! आगरकरानां म्हणतात, ॲरिस्टॉटल् आणि मिल्ल फार आवडत असत. असतील. नव्हे होते. पण टिळकांनीं मुंबईला कायद्यांचा अभ्यास करावयास आरंभ करण्याच्या अगोदरच साधारणत: मुख्य तेवढ्या सगळ्या युरोपियन तत्त्वज्ञान्यांचे ग्रंथ वाचून टाकिले. हे ग्रंथ त्यांनीं कसे पचविले याची साक्ष गीतारहस्यांत आहे. त्या लोकमान्यांच्या नवमान्य ग्रंथांत ते लिहितात:—

"भगवद्गीतेचा व आमचा प्रथम परिचय होऊन आज (१९१५ सालीं) सुमारें त्रेचाळिस वर्षें झालीं. इ. स. १८७२ सालीं वडील शेवटच्या दुखण्यानें आजारी असतां भगवद्गीतेवरील भाषाविवृत्ति नांवाची प्राकृत टीका त्यांस वाचून दाखविण्याचें काम आलें होतें, तेव्हां म्हणजे आमच्या वयाच्या सोळाव्या वर्षीं गीतेचा भावार्थ पूर्णपणें लक्षांत येणें शक्य नव्हतें. तथापि लहान वयात मनावर घडणारे संस्कार टिकाऊ

असल्यामुळें भगवद्गीतेबद्दल तेव्हां उत्पन्न झालेली आवड ( हरिभाऊ गोडबोल्यांच्या उत्तरानें झालेली कां ? ) कायम राहून संस्कृताचा व इंग्रजीचा पुढें अधिक अभ्यास झाल्यावर, गीतेवरील संस्कृत भाष्यें व दुसऱ्या टीका, आणि इंग्रजींत व मराठींत अनेक पंडितांनीं केलेलीं विवेचनें-हि वाचण्यांत आलीं "

या उताऱ्यावरून पुष्कळशा गोष्टींवर प्रकाश पडतो व अनेक अमृतवचनें " मुलांस उपदेश " म्हणून सांगतां येतील. दुसरें कार्य या पुस्तकाचें नाहीं. पहिल्या कार्यांत मात्र स्थलसंकोचास्तव नुसतें उल्लेखून जातों. स. १८७२ ते १८७९ पर्यंतच टिळकांना तत्त्वज्ञानाचा अभ्यास करायला पुष्कळसा वेळ मिळाला. डेक्कनकॉलेजांत असतांना उपासनी व ते रोज फिरायला जातांना बहुधां तत्त्वज्ञानावरच बोलत असत. अथवा टिळक बोलत व उपासनी ऐकत हेंच खरें; असो. नंतर गीतेवर उजेड पाडतील असें नीतिशास्त्रवाङ्मय वाचायला व त्यावर खोल विचार करावयाला लोकमान्यांना वेळ मिळाला. डोंगरीच्या तुरुंगांत १०१ दिवसांच्या तुरुंगवासांत, आगरकर लिहितात—

" आपआपसांत हळूहळू गोष्टी सांगण्याखेरीज, किंवा अकरा वाजल्यावर बराकींत कोंडून घातल्यावर तेथें फिरण्याखेरीज दुसरी कांहींहि करमणूक नसे. टिळकांचा आणि माझा नाना तऱ्हेच्या विषयांवर वाद करण्यांत पुष्कळ वेळ जाई. कित्येकदां तर आम्ही रात्रीच्या रात्रीं बोलत घालविल्याचें मला आठवतें ! "

लोकमान्यांनीं व आगरकरांनीं आपापल्या चरित्राचीं टांचणें करून ठेवलेलीं नाहींत; निदान आम्हांला तरी तीं उपलब्ध नाहींत, ही अ[illegible] खेदाची गोष्ट आहे. लेखी पुराव्याच्या अभावीं आगरकरांना मिल्ल व ॲरिस्टॉटल् आवडत असत व लोकमान्यांनीं अमके अ[illegible] ग्रंथकार आपल्या कुशाग्रबुद्धीनें मागें टाकिले, हें त्यांच्या ग्रंथांतून उल्लेखलेल्या व क्वचित् प्रसंगीं वर नमूद केलेल्या उताऱ्यांवरूनच ताडण्याचा प्रसंग येऊन पडला आहे. वास्तविकपणें अमक्या ग्रंथकाराचा अमका ग्रंथ आम्ही अमक्या वेळेला वाचिला व त्याविषयीं आम्ही जें बोललों त्यांत अमकें विशेष आहे, अशा अर्थाचीं

१ गीतारहस्य, प्रस्तावना, पान १. २ डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे [illegible] एक दिवस. द्वि. आ पान ११

लेखी टिपणें हवीत. धुळयाला परमेश्वरकृपेनें दे. भ. श्रीधररावजी उपासनी आहेत व वामनराव आपट्यांचे थोरले बंधु रा. माधवरावजी आपटे हे दोघे आहेत. परंतु त्यांपैकीं एकाहि जवळ त्यावेळचीं कागदपत्रें नाहींत ! किती ही शोचनीय स्थिति ! अजूनसुद्धां टिळकांच्या चरित्रावर प्रकाश पाडणारीं कागदपत्रें कोणी आम्हांला देईल तर आम्ही त्याचे जन्मभर ऋणी राहूं. विश्वसनीय माहितीनें भरलेलें असें हें आमचें लोकमान्यांचें पूजनच जर आमच्याकडून यथासांग होऊन आम्हांला मरण आलें तर आम्ही कृतकृत्यांच्या आनंदांत मरूं. इतकी या पूजनाची थोरवी आहे. हें एकट्याचें पूजन नव्हे. सर्व हिंदवासीयांचें आहे. "कर्मयोगी" निमित्त मात्र आहे. त्याला मदत केल्यानें आपणांलाच मदत केल्यासारखें आहे; असो.

स. १८८२ च्या डोंगरीच्या कारागृहवासानंतर लोकमान्यांच्या शाळेंतील अध्यापनामुळें व कांहीं अंशीं पाश्चात्य तत्त्वज्ञानावरील पुस्तकांत उल्लेखिलेलीं शास्त्रीय पुस्तकें थोडीफार वाचिलीं गेल्यामुळें त्यांचें लक्ष शास्त्रज्ञानाकडे लागलें. परंतु आपण प्रत्येक गोष्टींत शास्त्रीय शिस्त सांभाळित असल्यामुळें वाचन-मननांतसुद्धां, Normal to Supra-Normal साधारणापासून असाधारणापर्यंत, जाण्याचा क्रम सोडतां कामा नये. लोकमान्यांना वडिलांनीं संस्कृत आणि गणित ह्या दोन विद्या वडिलोपार्जित म्हणून ठेविल्या. अर्थात् त्यांचा Norma, गुण्या-संस्कृत व गणित विषय हे असत. त्यांचा विकास Supra-Norma अतीत विशिष्टत्वांत कसा झाला हें सांगायचें म्हणजे प्रथम त्यांचा गीतेवरील अभ्यास कसा झाला हें जें आपण सांगत आलों तेंच पुढें Climax शिखरा-पर्यंत चढविलें पाहिजे. तेव्हां १८८२ सालानंतर लोकमान्यांना पुन्हा भरपूर वेळ मिळाला तो, जनतेला वाटतें, स. १९०८ ते स. १९१४ पर्यंत मंडाले एथें मिळाला. नाहीं. तो काल त्यांचा गीतेवर अभ्यास करण्याचा नव्हता. तो काल त्रेचाळिस उणे सात, छत्तीस वर्षांच्या वाचनमनननिदिध्यासाला ग्रथित करण्याचा होता. १८८२ ते १९०८ या २६ वर्षांच्या कालविभागांत टिळकांनीं गीतेचा अभ्यास बाजूला सारून दिला ही कल्पनाच करितां येत नाही. मग अभ्यास केव्हां झाला ? अभ्यास झाला मुख्यत: १८९३ सालांत. त्यावर्षीं त्यांनीं लंडनला भरणाऱ्या नवव्या ओरिएंटल कॉंग्रेसकडे पाठविण्याकरितां "ओरायन

नांवाचा एक लेख लिहिला. त्या लेखाकरितां त्यांनां अनेक विद्वानांचीं मतें घ्यावीं लागलीं आणि अनेक संशोधकांशीं तत्त्वबोधार्थ वाद करावे लागले. अशा अनेक विद्वानांपैकीं व संशोधकांपैकीं प्रो. श्रीधररावजी जिन्सिवाले आणि डॉ. भांडारकर यांचीं नांवें सांगतां येतील. नंतर सदरहु लेख प्रकाशित होऊन तो तज्ज्ञांना पटला असें पाहून त्यांनीं तो लेख मोठा केला व तोच अभ्यास आणखी पुढें चालवून सन १९०३ सालीं The Arctic Home in the Vedas हा आपला ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. त्याकरितांहि त्यांनां निरनिराळ्या तज्ज्ञांशीं वाद करावे लागून पत्रव्यवहारहि ठेवावा लागला होता. ह्याबद्दल माहिती यथानुक्रम येईलच; पण एथें एवढेंच पहावयाचें कीं गीतारहस्यासारखा जो भावी शेंकडों वर्षांनां वळण देणारा ग्रंथ लोकमान्यांच्या लेखणींतून उतरला त्याचा त्यांनीं वाचनमननिदिध्यासादि तपश्चर्येनें सवड पाहून काढून अभ्यास केला. वेद, उपनिषदें, दर्शनें, पुराणें या सर्वांतून लोकमान्यांनीं कमालीचा ग्रंथ गीताच ठरविला होता. अर्थात त्यांचें रहस्य सांगण्यास त्यांनां सर्व शास्त्रें व सगळीं पुराणें अभ्यासावीं लागलीं. तीं त्यांनीं प्रामुख्यानें स. १८८२, स. १८९३ स. १८९७ या वर्षांत अभ्यासिलीं यांत संदेह नाहीं. १९०८–१९१४ या तपश्चर्येला " रहस्याचें " फळ आलें !

तरी गीतेचा अभ्यास अशा टप्याटप्याच्या कालविभागानें होणें शक्य नाहीं. तशा अभ्यासाला वाचन ह्मणतां येईल. मनन व निदिध्यास यांना त्यांतून फाटा द्यावा लागेल. परंतु मनननिदिध्यासांखेरीज रहस्यासारखा अमोलिक ग्रंथ उत्पन्न होणें प्रत्यक्ष व्यासालाहि शक्य नव्हतें. तर मग लोकमान्यांचें मनन व त्यांचा निदिध्यास हीं केव्हां झालीं, हा प्रश्न आहे. याचें उत्तरें दोनच संभवतात. एक केवळ आश्चर्यात्मक. आर्यपुत्र चिंतामण विनायक वैद्य त्यांनांहि आश्चर्य वाटलें कीं—

" लोकमान्यांचा निश्चय असामान्य होता हें सर्व जगप्रसिद्ध आहे, पण विद्याव्यासंग करावयास त्यांस फुरसत तरी केव्हां मिळे याचें राहून राहून आश्चर्य वाटतें. जगताच्या राजकीय उलाढाली करून व नानाप्रकारचे स्वतंत्र दुसऱ्याचे मुकदमे भांडून, त्याचप्रमाणें वर्तमानपत्र चालवून व कॉंग्रेस

सारख्या चळवळींत जोराचा भाग घेऊन लोकमान्यांना विद्याव्यासंग करण्यास फुरसत तरी केव्हां मिळत असे हें एक गूढ आहे. ”

दुसरें उत्तरहि चिंतामणरावच पुरवितात. ते लगेच पुढें सुचवितात— “ तथापि ते विद्याव्यासंग सतत करित, यांत मात्र त्यांच्या विद्वत्तेवरून काडीमात्र शंका नाहीं. ते दिवसां वाचित नसले तरी रात्रीं वाचित असले पाहिजेत. ”

ही सूचना सर्वस्वीं संभाव्य असली पाहिजे. कारण बुद्धिमत्ता ह्मणजे स्मरणशक्ति व एखादा सिद्धांत काढण्याचें सामर्थ्य, या गोष्टी ईश्वरदत्त आहेत. परंतु त्यांची पूर्वतयारी जी वाचननिरीक्षणांनीं मिळविलेली साधनसामुग्री तिला व्यासंगच हवा असतो. दुसरें प्रमाण ह्म. त्यांच्या रोगाचें. त्यांना मधुमेहाचा रोग जडला हें सर्वश्रुत आहेच. हा रोग काळजीइतकाच दीर्घोद्योगानेंहि जडतो. त्यांत मानसिक दीर्घोद्योग असला तर हा रोग बहुधा जडतोच. तिसर प्रमाण त्यांच्या दोन संवयींचें. ते चहा पीत व सुपारी तरें नेहमीं खात असत. [illegible] एक गोष्ट सिद्धांतरूपानें लिहिली तर वाचक दचकून जातील. परंतु असामान्य विद्वत्तेच्या माणसाला असलें परक्यांना प्रत्यक्षतः उपद्रव न करणारें असें एखादें व्यसन असतेंच. असणें हें त्यांच्या शरीरसंरक्षणाच्या दृष्टीनेंहि इष्ट असतें. लोकमान्यांना व्यसनांपायीं रोग जडला हें ह्मणणें असत्य होईल. रोग काळजीचा व मानसिक श्रमांचा परिणाम होय. तो मानसिकतान वेळोवेळीं चहानें व सुपारीनेंच ढिला करावा. त्यांनीं तसा नसता झाला तर लोकमान्यांना इतकें हि आयुष्य लाभलें नसतें. निदान त्यांचा मेंदू तरी अकालींच थकला असता. अकालीं मृत्यूचें उदाहरण विष्णुशास्त्रयांचें आहे. आणि उलट व्यसनें बेफाम सोडून शरीराची नासाडी करून मेण्याचें उदाहरण [illegible] वांच्या वडिलांचें एक व दुसरें आगरकरांचें आहे. व्यसन नसूनहि दीर्घायु । असल्याचें एकच उदाहरण डॉ. भाण्डारकरांचें आहे. परंतु त्यांच्या उ[illegible]गाला दीर्घ हें विशेषण निदान आह्मी तरी लावित नाहीं. शिवाय त्यांना मानसिक काळजी कोणती होती ? मुलगा गेला खरा. पण तो आतां अलीकडे गेला. शिवाय घरची काळजी एकवार पुरवली,

१“ अरविंद ” मासिकाच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्याच अंकांतील “ लोकमान्यांची लोकोत्तर विद्वत्ता ” हा लेख पहा. पान १०

पण जनतेची काळजी अगदींच निराळी असते. एडमंड बर्कसारखें, केवळ कर्त्या मुलग्याच्या मृत्यूनें वेडावलेल्या मनुष्याचें उदाहरण क्वचित् सांपडेल; असो. माधवरावजी रानडे हे तीव्र बुद्धीचे व साधारणपणें दीर्घायुषीहि झाले. पण त्यांनाहि चहाचें व्यसन होतें. तथापि एक गोष्ट मात्र मुळींच विसरतां कामा नये कीं ही किरकोळ निरुपद्रवी व्यसनांची सवलत फक्त असामान्य पुरुषांनांच असते. डॉ. जॉन्सन यालाच चहा ढोंसून चालेल. वाटेल त्या जॉन्सनला ती संवय अपायच करील. सामान्य जनतेनें म. गांधींच्या उपदेशाप्रमाणें चहा सोडायलाच पाहिजे; असो.

लोकमान्य आपलें वाचन बहुधां रात्रींच करित असावेत. कॉलेजांत असतांना व मुंबईला लॉ स्कूलमध्यें अभ्यास करण्यासाठीं राहत असतांना, त्यांना इतर, लक्ष वेधून घेणारे व्यवसाय नसतांहि, त्यांचें गहन विषयावरचें वाचन-रात्रीं होई. सायंकाळीं बॅंकवेवर उपासनींच्याबरोबर वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करित असतां जे नवीन मुद्दे उपस्थित होत असत त्यासंबंधीं आधार पाहण्याचें काम त्यांनीं दुसऱ्या दिवसावरच कधींहि ढकलिलें नाहीं. त्याच रात्रीं मुद्याची सांगोपांग सिद्धता करून त्यांनीं स्वस्थ चित्तानें झोंप घ्यावी. वाचावयाचीं पुस्तकें साधारणतः त्यांचीं स्वतःचीं असत. ते तितके श्रीमंत होते. त्यांनां पुस्तकावर मुळींच खुणा करण्याची जरूर पडत नसे याचें कारण जितकी त्यांची लोकोत्तर स्मरणशक्ति असे, तितकीच पुस्तकांची मालकीहि असे. केसरी-ऑफिसची लायब्ररी भारदस्त पुस्तकांची व खूप मोठी झाली ती उगाच नव्हे. तिची वाढ सन १८७७ पासून होऊं लागली होती. न्यू इंग्लिश स्कुलाच्या लायब्ररींत सर्वांपेक्षां टिळकांचींच पुस्तकें अधिक असत. पुढें संबंध सुटला तरी टिळकांनीं पुस्तकें परत घेतल्याचा उल्लेख आढळत नाहीं; असो. लोकमान्य रात्रींच वाचन करित असले पाहिजेत हें ताडायचा दुसरा मार्ग असा कीं त्यांना सवड सांपडेल तेव्हां वाचन करण्याची संधि नव्हती. कित्येक वाचनभक्त सवडीप्रमाणें वाटेल तेथें पुस्तकें वाचित असत हें शेले आणि मेकॉले यांच्या उदाहरणांवरून कळतें. शेले भर दुपारीसुद्धां लंडनशहराच्या गजबजलेल्या रस्त्यांनीं जातां जातां वाचनांत निमग्न असे. मेकॉले आणि कार्लाइल यांनां वाचण्य

ऱ्या भरांत आपण कोठें आहोंत याचें भान नसे. मॅझिनी रस्त्यावरील गोर-गरीबांना उपदेश करून थकला, म्हणजे त्यांना थोडावेळ विश्रांति घेण्यास सांगून, स्वतः पुस्तक वाचून विश्रांति घेई. अशी एकही संवय लोकमान्यांना नव्हती. अलीकडे अलीकडे रहस्याचीं प्रुफें चित्रशाळेंत पोंचविण्याचा प्रसंग त्यांच्यावरच येई तेव्हां ते स्वतः जात; परंतु त्यांनीं रस्त्यानें, " करेक्ट " केलेलीं प्रुफें वाचिलीं, असें कोणी सांगत नाहींत. त्यांची स्मरणशक्ति अचाट असे. एखादा शोध करण्याचा राहून गेला व त्याची आठवण त्यांना रस्त्यानें झाली तर ते नियमित स्थळीं जाऊन तो शोध करित; असो. एकंदरींत त्यांचें खरें वाचन बहुधां रात्रींच होई असें चिंतामणराव वैद्यांचें म्हणणें साधार आहे.

याचा अर्थ असा नाहीं कीं ते रात्रीशिवाय केव्हांहि वाचित नसत. निदान १९००–१९०८ पर्यंत तरी " सकाळीं आठ वाजल्यानंतर कोणी भेटावयास आलें तर त्यांना ते भेट घेत; नाहींपेक्षां लायब्ररींतला एखादा ग्रंथ काढून आपल्या खासगी बैठकीचे जागीं आरामखुर्चीवर तो वाचित पडत,[1] " असें आप्पा कुळकर्णी सांगतात. तरी पण त्यांच्याकडे वाटेल त्यास जाण्याला पूर्ण मुभा असल्यामुळें त्यांना सकाळचा वेळ कधीं रिकामा सापडला असें होत नसे. १९०८ ते १९१४ पर्यंतची गोष्टच बोलायला नको. सरकारनें त्यांना तुरुंगांत ठेऊन त्यांच्या वेळेचा त्यांनां राजा करून सोडिलें होतें ! १९१४ ते १९२० पर्यंत मात्र लोकमान्यांना रात्रींसुद्धां वेळ मिळत नसला पाहिजे. तथापि " होमरूल " च्या दौऱ्यावर असतां ज्यांच्या ज्यांच्या घरीं ते उतरले त्यांना त्यांना माहित असेल कीं, दिवसाचीं व रात्रींचीं सर्व कामें होऊन गेल्यावर " या निशा सर्वभूतानां तस्यां स संयमी " [illegible] अर्थातच वयपरत्वें पूर्वीसारखें व पूर्वीइतकें वाचन होईना. प्रसंगीं त्यांनीं दुसऱ्याकडून वाचून घ्यावें. पण मनन मात्र पूर्वीपेक्षांहि जास्त व्हावें; असो. या साधार [illegible] मुद्यावर बराच विस्तार झाला खरा. पण आमची खात्री आहे कीं तो [illegible] सारखाच [illegible] आहे.

वाचन केव्हां [illegible]त असे, या प्रिय विषयांतराचा नाद सोडून, मुख्य कथानकाची पुंगी पुन्हां वाजवायची म्हणजे असें सांगायचें कीं आतांपर्यंत

[1] लो. टिळकांचीं गेलीं आठ वर्षे. पान ७

भगवद्गीताविषयक वाचन-मननांचा विचार झाला. परंतु लोकमान्यांचें कांहीं नीतिशास्त्र विषयकच वाचन नव्हतें. त्यांच्या नुसत्या वाङ्मयसेवेच्या ग्रंथांचाच विचार केला आणि राजकारणात्मक ग्रंथावलोकन सोडून दिलें तरी त्यांचें शास्त्रीय वाचन पहावयाचें राहिलें आहे. तत्त्वज्ञानाच्या वाचनावरून ते शास्त्र-वाचनाकडे कसे वळले याबद्दल त्यांचेंच म्हणणें ऐकूं या. ते सांगतात—

" Some explanation may be necessary for publication of an essay on the antiquity of the Vedas by one whose professional work lies in different direction. About four years ago, as I was reading the Bhagwad-Gita, it occurred to me that we might derive important conclusions from the statement of Krishna that " he was Margashirsha of the months. " This led me to inquire into the primitive Vedic calendar, and the result of four years' labour is now placed before the public ? "

( माझा धंदा निराळा असून मी वेदकालच्या जुनाटपणावर लेख ज्या अर्थी लिहिला आहे त्या अर्थी त्याबद्दल खुलासा होणें जरूरीचें असेल. चार वर्षांपूर्वी मी भगवद्गीता वाचित असतां, तींत '' मासानां मार्गशीर्षोऽहम् '', असें जें कृष्णानें म्हटलें आहे, त्या वचनावरून फार महत्त्वाचे शोध लागतील, अशी कल्पना मला सुचली; आणि मी वेदकालीन पंचागाचें निरीक्षण करण्यास आरंभ केला. तेव्हांपासून मी चार वर्षे जो अभ्यास केला, त्याचें हें फळ जनतेपुढें मांडित आहे. )

आतां हें जें चार वर्षे निरीक्षण लोकमान्यांनीं केलें तें नुसत्या पुस्तक-वाचनानेंच केलें नाहीं. पदार्थज्ञानाची व त्याच्याहून जास्त तत्त्वज्ञानाची, वाचन ही एक साधारण पायरी आहे. काव्यप्रान्तांत तर हिची जरूर असतेच असें नाहीं. कवीच्या सहजस्फूर्तीला वाचनाची जोड मिळाली असतां त्याची कविता नानाविध रूपें घेईल; एवढेंच. परंतु शास्त्रज्ञानांत मात्र ग्रंथ-वाचनाशिवाय अगदीं चालायचें नाहीं. वाचनाशिवाय, तज्ज्ञांशीं संभाषण,

१ Preface to " the Orion. " first para. ( Poona, October 1893 )

सृष्टीचें अवलोकन, गहन व ऐकांतिक मनन, कल्पक व तुलनात्मक विचार-शक्ति, सततोद्योग व सत्याची चाड या सगळ्या गोष्टींची परमावधीची मदत हवी असते. अशी प्रत्येक गोष्टीची अतुल शक्ति लोकमान्यांच्या ठायीं होती. त्यांचा प्रथम ग्रंथ ह्मटला ह्मणजे "ओरायन." त्याकरितां त्यांनीं ज्या ग्रंथांचा अभ्यास केला त्यांची नुसती जंत्री दिली तरी तिला आठ पानें पुरावयाचीं नाहींत. तरी वाचकांना साधारण तरी कल्पना यावी ह्मणून आह्मी त्या सर्व-प्रसिद्ध ग्रंथांतून ठळक तेवढ्यांचींच निवड करून जंत्री देतों.

| ग्रंथकार | ग्रंथ |
|---|---|
| Prof. Max Muller | — 1 Rigveda |
| | 2 India, what it can teach us ? |
| | 3 Biographies of words |
| ,, Arrow Smith | — 4 Kaegi's Rigveda |
| Dr. Schrader | — 5 Pre-historic Antiquities of the Aryan Peoples. |
| Prof. H. Spencer | — 6 Principles of Sociology Vols I, II, III |
| ,, Zimmer | — 7 Life in Ancient India. |
| ,, Lewis | — 8 Historical Survey of the Astronomy of the Ancients. |
| ,, Weber | — 9 History of Ancient Literature |
| Dr. Haug | —10 Introduction to the Aitareya Brâhmana. |
| Prof. Whitney | —11 Sanskrit Grammar |
| | 12 Sûrya Siddhânta |
| | 13 The Hindu and Chinese Asterisms. |
| Thomson | —14 Bhagvad Gita |
| Colebrooke | —15 Essays |
| Krishna Shastri Godbole | —16 Antiquity of the Vedas. |
| S. B. Dixit | —17 Vedânga Jyotisha. |

| | | |
|---|---|---|
| Gladstone | --18 | Time and Place of Homer |
| Narrien | --19 | Origin and Progress of Astronomy |
| Prof. Max muller ( Editor ) | --20 | Sacred Books of the East, Series |
| Bentley | --21 | Historical view of the Hindu Astronomy |

हीं पुस्तकें इतकीं ठळक आहेत कीं, त्यांचें आज साधारण बरें वाचन झालें आहे असें ह्मणतां येईल, त्यांच्या अवलोकनांतून हे ग्रंथ, निदान त्या ग्रंथकारांचें एक तरी पुस्तक खात्रीनें गेलें असेल. लोकमान्यांनीं ओरायन-करितां जे ग्रंथ वाचिले ते संख्येनें निदान वरील जंत्रीच्या चौपट तरी असतील. त्यांत शंकराचार्य, मनु, यास्क, गर्ग, याज्ञवल्क्यादि आर्य ग्रंथकारांचे ग्रंथ, शिवाय वेद, उपनिषदें, पुराणें वगैरे मूळ ग्रंथ हे धरलेच नाहींत. बरें या ग्रंथांवरून लोकमान्यांनीं नुसती दृष्टि वळविली कां ? अशक्य. तसल्या वाचनाकरितां त्यांचें मन ईश्वरानें त्यांना दिलेंच नव्हतें. या ठिकाणीं लोकमान्यांनीं कोणता ग्रंथ केव्हां वाचिला, कोणाबरोबर वाचिला, कोठें वाचिला त्यांतून त्यांनीं कोणतीं टिपणें घेतलीत, वगैरे माहिती अत्यंत बारिक सारिक असली तरी फार फार मनोरंजक आणि सत्यशोधनार्थ अत्यवश्यक होईल. परंतु ही माहिती कोठेंच नसेल अशी भीति वाटते. नाहीं ह्मणायला, १९०८ सालीं शिक्षा होण्याच्या अगोदर त्यांनीं " राजनीतिशास्त्र " लिहावयाचें ह्मणून टिपणें करून ठेविलीं होतीं असें आ. वि. कुळकर्णी लिहितात.[१] तीं टिपणें जरी पहावयाला मिळतील तरी लोकमान्यांच्या वाचनपद्धतीवर विशेष प्रकाश पडेल. वाचनाचें दृश्य फळ जें, बहुमोल ग्रंथ तें तर जगापुढें आहेच. परंतु दृश्य फलाचें उगम–बीज कोणतें व त्याचें पोषण कसें झालें ही माहिती देऊन चरित्रनायकाची पराक्रमी मूर्ति अंतश्चक्षुपुढें उभी करण्याचें तर चरित्रकाराचें काम असतें. आह्मी अत्यंत दिलगीर आहोंत कीं सदरहु प्रकाश आह्मांला अजून मिळाला नाहीं. असो.

आतांपर्यंत लोकमान्यांचें गीतावाचन रहस्यापर्यंत कसें विकसित होत

१ लोकमान्य टिळकांचीं गेलीं आठ वर्षे.

गेलें व त्यांत ओरायनकडे ह्मणजे ज्योतिषशास्त्राकडे त्यांचा रस्ता कसा फुटला हें सांगितलें. आतां हा फाटा ओरायनपाशींच थांबला नाहीं, तर " आर्क्टिक होम इन् दि वेदाज " पर्यंत कसा गेला व मूळ गीतेला तो कसा पोषक झाला हें, नुसत्या वाचन--मननापुरतें सांगायचें आहे. लोकमान्यांचें लेखन आपणांला अजून पहावयाचेंच आहे. त्याच्या अगोदर संभाषणावरहि कमीतकमी दोन पानें तरी वाचकांनीं वाचलींच पाहिजेत. लेखनांतून संपादकी लेखन मात्र मुद्दाम काढून, त्याचें एक स्वतंत्र प्रकरण केलें पाहिजे. **कारण प्रो. टिळकांचे देशभक्त टिळक व नंतर लोकमान्य टिळक व रहस्यामुळें कर्मयोगी टिळक झाले, त्याचा आद्यबिंदु केसरीचें संपादन होय. तें जीवाला आनंदवून सोडणारें प्रकरण अजिबात वेगळेंच हवें.** त्यायोगानेंच आपली मूळची Normal to Supra-normal अशी शास्त्रीय पद्धति सुंदर रीतीनें विवेचिली जाणार आहे; असो.

लोकमान्यांना स. १८८९ च्या सुमाराला भगवद्गीतेवरून वेदकालनीर्णयाचा प्रश्न सुचला[1], हें आपणांला आतां कळलेंच आहे. आतां त्या ग्रंथांत, ( Orion ) मध्यें काय सांगितलें आहे याविषयीं चर्चा करण्याचें यापुढल्याच प्रकरणाचें कार्य आहे. आपण त्यांत लोकमान्यांच्या तीनहि ग्रंथाची व नानाविध लेखांची नीट ओळख करून घेऊंच. पण एथें पहावयाचें तें हें कीं लोकमान्यांना ज्योतिष शास्त्राधारें व वेदवचनांच्या सहाय्यानें वेदकालचा सुमारें इ. स. पूर्वी ४८०० वर्षें पावेतों पल्ला ओरायनमध्यें पोचवितां आला. परंतु या एवढ्या प्राचीनत्वामुळेंहि लोकमान्यांचें समाधान होईना. निदान चिनी किंवा इजिप्शियन संस्कृतींइतकी तरी आमची आर्य--संस्कृति जुनी असलीच पाहिजे[2]; व तें साधार आहे, असें स. १८९२ सालीं जरी त्यांना सिद्ध करितां आलें नाहीं तरी आर्य-संस्कृतीचें प्राचीनत्व इ. स. ४००० वर्षांपूर्वींपाशींच थांबलें नाहीं;[3] तर तें, अगदीं टाकून दिलें तरी, इ. स. पूर्वी ८००० वर्षेपर्यंत खात्रीनें येईल, अशी लोकमान्यांची स. १९०३ सालापर्यंत अभ्यास करून खात्री झाली. अर्थातच या[4] अभ्यासाला त्यांना बरोबर चवदा वर्षें खर्च करावीं लागलीं. आणि तीं तरी कशीं वर्षें होतीं ! दुष्काळ, प्लेग, व शिवाजी आणि

१ Orion page 220 २ Orion p. 56 ; ३ The Arctic Home in the Vedas. Preface p. II ; ४ Ibid page vi.

गणपति यांचे उत्सव, यांमुळें लोकमान्यांना अटक झाली होती ती याच १४ वर्षांत. त्यांचे हाल झाले ते याच १४ वर्षांत; त्यांच्यावर आगरकरादि घरच्या शत्रूंनीं हल्ला केला तो याच १४ वर्षांत; फार काय सांगावें, पण याच १४ वर्षांच्या अगदीं शेवटाला लोकमान्यांवर एक असा कांहीं विलक्षण विरह-प्रसंग गुदरला कीं, तसल्या प्रसंगीं प्रत्यक्ष Edmund Burke सारखा थोर पुरुषसुद्धां वेडा बनला ! लोकमान्यांचा हातातोंडाशीं आलेला चांगला विद्वान, हुशार, व लोकमान्यांच्याच तोलाचा, असा एक, विश्वनाथ नांवाचा ज्येष्ठ मुलगा, प्लेगनें एका दिवसांत हा इहलोक सोडून गेला !

लोकमान्यांना पुत्रनिधनामुळें किती भयंकर विरहव्यथा झाली असेल ! ज्यानें मातृविलापांत—

### श्लोक

पितरौ प्रथमं ततः सुतौ, हननस्य क्रम एष भो विधे ।
तनयः प्रथमं कथं त्वया मम नीतः प्रतिकूलचारिणा ॥[1]

अशी नुसती कविकल्पना केली त्याला प्रतिकूलचारि अशा विधीनें पुत्रविरहाचा तडाखा खरोखरींच मारिला तेव्हां त्याची स्थिति कशी बरें झाली असेल ? कशी झाली ? सांगितलें असतां वाचक थक्क होऊन जातील व एक दिलानें म्हणतीलच म्हणतील "वारे वा कर्मयोगी ! हाच खरा कर्मयोगी ! !" वाचकांनो, आपल्या आप्पा कुळकर्ण्यांनीं लिहून ठेविलें आहे. कीं "वडील चिरंजीवाच्या मृत्यूमुळें वाटणारें दुःख व त्याबरोबरच तें गिळून टाकण्याचें त्यांचें धैर्य अचाट होतें[2]" या बद्दल एक लहानशी गोष्ट कुळकर्ण्यांनीं लिहून ठेविली आहे. ती, विषयांतर झालें तरी बेहेत्तर, आह्मी आमच्या महाराष्ट्रबंधूंना सांगणारच !

"विश्वनाथपंतांना[3] वारून आठ दहा दिवस झाले असतील नसतील. त्यावेळीं एके दिवशीं ते पटांगणापुढील उजव्या हाताच्या माडीवर (विंचूरकरांच्या वाड्यांत) कांहीं पुस्तकें वाचित एकटेच बसले होते. माडीचा पुढील दरवाजा बंद असून त्यास कडी लाविली होती. त्या दिवशीं ते कांहीं लिहिणार होते ह्मणून त्यांनीं मला दोन प्रहरीं बोलाविलें होतें. मी

---

१ मातृविलाप श्लोक ४. २ गेलीं आठ वर्षे पान १०७. ३ २ प्रमाणें.

जिना चढून वर गेल्यावर दारास धक्का दिल्याबरोबर ' कोण आहे ? ' म्हणून त्यांनीं विचारिलें. मी माझें नांव सांगितलें. तेव्हां नेहमींच्या संवयीप्रमाणें दार उघडण्यासाठीं त्यांनीं मोठ्यानें ' विश्वनाथ ! ' म्हणून हांक मारिली व लगेंच धाईनें उठून दाराची कडी काढिली. यावेळीं मुलगा वारला आहे वगैरे विचार एकदम मनांत येऊन दुःखाचा आलेला उमाळा त्यांनीं तावडतोब कसा गिळून टाकिला हें त्यावेळेच्या त्यांच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होतें. "

मित्रांनो, अजून थोडी विषयांतराची माफी करा ! प्रतिलोकमान्य अशा Edmund Burke ची आतां कबुली वाचा कीं, चाललोंच आपण मूळ कथानकाकडे. त्या महात्म्याला सरकारांतून पेंशन मिळालें म्हणून त्या-च्यावर Duke of Bedford नें लॉर्डांच्या सभेंत विषारी टीका केली तिला उत्तर देतांना Edmund Burke नें आपल्या पुत्रविरहाला उल्लेखून म्हटलें.

" The storm has gone over me ; and I lie like one of those old oaks which the late hurricane has scattered about me. I am stripped of all my honours, I am torn up by roots, and lie prostrate on the Earth ! I live in an inverted order. They who should have succeeded me have gone before me. They who should have been to me as posterity, are in the place of ascestors ? "

( माझ्यावरती आकाश कडकडलें ! आणि मी आतां एकाद्या जुन-कट ओकवृक्षाप्रमाणें जमीनीवर धूळ खात पडलों आहे ! माझें सारें वैभव गेलें; मी मूळांसकट उलथून पडलों आहे; मी खरोखरच जमीनदोस्त झालों आहे ! मला सृष्टि फिरलीशी वाटते. ज्यांनीं माझी तिरडी धरायची त्यांना मी श्रीन्जली देत आहें ! जे माझे वंशज व्हावयाचे ते माझ्या पितृस्थानीं गेले. )[1]

स्नेह्यांनो, बर्कची ही विरहव्यथेची स्थिति केवळ शाब्दिकच नव्हती. तर खरोखरच त्याच्या मेंदूवर परिणाम झाला होता. फ्रेंच राज्यक्रान्तीचा त्याच्या दुःखानें भडकलेल्या मेंदूला थांगच पडेना ! Thomas Buckle सारख्या समतोल बुद्धीच्या ग्रंथकारानेंसुद्धां लिहून ठेविलें आहे कीं,

---

१ Letter to a Noble Lord p. 64

Such was the havoc, circumstances had made in his well-ordered intellect, that to this one principle ( of oppression by a long long war ), he sacrificed every consideration of justice, of mercy, and of expendiency !

( पुत्रविरहामुळें बर्कच्या मेंदूचा समतोलपणाच्या इतका विलक्षण धुव्वा उडवून दिला होता कीं, लोकसत्ताक फ्रेंच राष्ट्राचा, दीर्घकाल टिकणाऱ्या महायुद्धानें फन्ना उडविलाच पाहिजे, या तत्त्वापुढें त्यानें न्याय, दया, आणि सारासारविचारशक्ति यांची लवमात्र मतब्बरी ठेविली नाहीं. )

तेव्हां कोठें आमच्या महाराष्ट्राचा कर्मयोगी ! आणि कोठें हा विलायती साधु ! ! असें आह्मी उद्गारलों तर त्यांत आमचा काय बरें दोष ?

एकूण सांगायचें इतकेंच होतें कीं " ओरायन– " पासून " आर्क्टिक होम इन् दि वेदाज " पर्यंतचीं लोकमान्यांचीं १४ वर्षें अशीं होतीं कीं त्यांच्यापुढें प्रत्यक्ष प्रभु रामचंद्राचा १४ वर्षांचा व युधिष्ठिरादि पांडवांचा १२ वर्षांचा, हे दोन्ही वनवास पुरवले. परंतु अशा बिकट परिस्थितींत लोकमान्यांनीं, शाळा, वर्तमानपत्र, लॉक्लास, लोकसेवा, व्याख्यानें, उत्सव, वगैरे सर्व करून हि वेदकालनीर्णयाचा व आर्यांच्या मूलस्थानाचा अभ्यास केला ! चिंतामणराव वैद्य ह्मणतात, आश्चर्य आहे !

आश्चर्य तर खरेंच ! पण त्याचा उलगडाहि झाला तर हवा. उलगड्याची एकच गुरुकिल्ली. दीर्घ तपश्चर्येची लोकसेवा ! गीतेनें बीज पेरलें, त्याला ओरायनी अंकूर फुटला, त्याचा " खाल्डियन–संस्कृति, " " कारिकेंतील न आढळणारी आर्या " इत्यादि शाखांनीं, व अनेक ऐतिहासिक संशोधनांच्या पल्लवांनीं विभूषित झालेला " आ. हो. इ. दि. वेदाज " हा सिंहलद्वीपी वृक्ष झाला. आणि त्याला गीतारहस्याचें एक अमृतफळ आलें. असा या दीर्घ वाचनमननाचा थोडक्यांत इतिहास आहे.

( ३ )

## संभाषण

आतां लोकमान्यांच्या संभाषणावर दोन शब्द लिहून हें प्रकरण आटोपतें घेऊं. त्यांची जी जी कृति–लोकमान्यांची कृतिमय मूर्ति आहे–पहाल, ती ती त्यांनीं फार विचारांतीं केलेली दिसून येईल. प्रथम त्यांनीं जी गोष्ट

§ Civilization in England Vol. I page, 393-94

हातीं घ्यावी तीच नीट विचार करून घ्यावी. राष्ट्रहित करायचें हा मूळांतं हेतु; व त्याचा लवकर उत्कर्ष होईल ती गोष्ट हातीं घ्यावयाची हा त्यांचा बाणा असे. राष्ट्रोत्कर्षासाठींच त्यांनीं शिक्षण अंगीकारिलें; कौंसिलची पायरी स्वीकारिली; संस्था स्थापन केल्या; वगैरे वगैरे. पण प्रत्येक क्रिया अगोदर शुद्ध बुद्धीला पटवून नंतर केली. या पटविण्याच्या क्रियेंत वाचनमननांनीं त्यांचा कसा कसून अभ्यास झाला हें वर सांगितलेंच आहे. परंतु नुसत्या वाचनावर किंवा स्वतःच्याच तेवढ्या मननावर भिस्त ठेविण्याचा त्यांचा स्वभाव नसे. ज्या त्या कामांत ते तज्ज्ञांचा सल्ला घेत असत. तुह्मी त्यांच्या ग्रंथांचें नीट वाचन करा. तुह्मांला असें ठिकठिकाणीं दिसून येईल कीं त्यांनीं प्रो. मॅक्समुल्लरपासून रा. केतकरांपर्यंत, आचार्यांपासून तों थेट भिक्षुकांपर्यंत, रानांतल्या यतीपासून तों थेट मठांतल्या महंतापर्यंत निरनिराळ्या अंगीकृत कार्यांची सांगोपांग चर्चा करित असावें. अशा अनेक चर्चांपैकीं कांहीं प्रत्यक्ष भेटींत व्हाव्या व कांहीं पत्रद्वारेंहि व्हाव्या. या चर्चांचा पाऊस रदस्यानंतर लोकमान्यांवर इतका जोराचा पडला कीं त्या सर्वांना एकदमच उत्तर देण्याकरितां त्यांना स्वतंत्र व्याख्यानेंच द्यावीं लागलीं, हें सर्व महाराष्ट्रीयांस विदित आहेच. मनाला अतीव विषाद उत्पन्न होतो कीं, उपलब्ध असलेली खडान्खडा माहिती देण्याचें दीर्घ स्थळ आह्मांला मिळूं नये. नाहीं तर लोकमान्यांच्या चेहऱ्यावर कोणत्या चर्चेच्या वेळीं कसें तेज होतें, तें किती टिकलें, कां उत्पन्न झालें वगैरे शेकडों वारिकसारिक प्रश्नसुद्धां आह्मी आवडीनें सोडविले असते. महाराष्ट्रीय बंधूंची आमच्यावर मेहेरबानी असेल, व जगन्नियंत्या परमेश्वरानें तितकें आयुष्य दिलें तर देशबंधूंनो, आपण सर्व मिळून तें हि गुणगायन करूं. पण तोंपर्यंत लोकमान्यांच्या चर्चेतल्या कांहीं–फारच थोड्या–गोष्टीसुधा तर नमूद करून ठेऊं या.

## ( ४ )

## विनोद

(१) बाबा महाराजांच्या इस्टेटीसंबंधीं खटल्याचें काम चाललें असतां, एका गृहस्थाचा कांहीं खासगी अर्ज लोकमान्य लिहित बसले होते. तेव्हां

त्यांचे एक जिवलग स्नेही आले व ह्मणाले " वा ! अशा वेळींसुद्धां लोकांचे अर्ज आपण लिहितां काय ! " उत्तर— हें असें चालायचेंच. चिता पेटली तरी आमची विडी पेटलीच पाहिजे, असें ह्मणणारे कांहीं असतातच."

(२) रिक्रूटिंगच्या वेळीं एका बड्या इपिसरानें त्यांना अर्ध–विनोदी व अर्ध–गंभीर अशा आवाजानें विचारिलें " टिळक ! तुह्मी लोक आतां लढणार ना ? " उत्तर " आह्मी तुमच्याकरितां लढावें ह्मणतां ? अहो, आह्मी आमच्याकरितांच रडतों आहोंत ! "

(३) इंग्लंडमध्यें त्यांना एका शास्त्रज्ञानें विचारिलें, " टिळक, हिंदुस्थानांत शास्त्रीय शोधाची सामुग्री नसतांहि तुह्मी इतकीं महत्त्वाचीं शास्त्रीय पुस्तकें कशीं लिहिलींत ? " उत्तर— तुह्मी आमची भूमी उकरून आमची संपत्ती लुटली पण वेद ह्मणण्यासारखे उकरले नाहींत ह्मणून मला फायदा झाला.

## धार्मिक

( १ ) आतां शिकलेल्या माणसांनींच संन्यास घेतला पाहिजे.

( २ ) कालानुरूप लोकांना आतां सवलती दिल्याच पाहिजेत.

( ३ ) धर्मगुरूंची अगोदर सुधारणा झाली पाहिजे.

( ४ ) इंग्रजी शिकल्याखेरीज सध्यांच्या काळीं, आपल्या धर्माचें वजन चोहोंकडे पाडतां यावयाचें नाहीं.

## राष्ट्रीय

( १ ) थांबा, वाट पहा असें ह्मणून वाट पाहत स्वस्थ बसाल ?? कांहीं होणार नाहीं. आपली उन्नति करून घेणें आपल्याच हातांत आहे. याविषयीं तुमच्यांत जा[illegible]ति झाली आहे; व म्हणून [illegible]वता आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं पन्नास वर्षांनीं, शंभ[illegible] वर्षांनीं आपण खचित उत्पन्न करूं.

## ( ५ )

आतांपर्यंत लोकमान्यांच्या अभ्यासाचा, वांचन, मनन व संभाषण या तीन मार्गांनीं विचार केला. संभाषणांची माहिती [illegible]रच थोडी झाली. उपाय नाहीं. " लोकमान्यांचीं संभाषणें " असा स्वतं[illegible] ग्रंथ करण्याइतकीं

त्यांची संभाषणें आहेत. कोणी तसला ग्रंथ तयार करावा. केल्यास महाराष्ट्र त्याचा अत्यंत ऋणि राहील. आतां टिळक-वाङ्मय प्रसिद्ध होईल तितकें थोडेंच आहे; असो. या पुढल्या प्रकरणांत लोकमान्यांचें लेखन ह्म० फक्त ग्रंथलेखन आणि निबंधलेखन, या विषयींच लिहूं. वर्तमानपत्राच्या संपादनाचें त्यापुढलें प्रकरण होईल. आणि मग आपण शास्त्रीय रीत्या लोकमान्यांच्या खऱ्या व अमूल्य अशा राजकारणाच्या सेवेंत जाऊं. पण तोंपर्यंत, पुन्हां अशी विनंती करून ठेवावीशी वाटते कीं, राजकारण निराळें व राष्ट्रहित निराळें. मानवी जीविताच्या सर्व हिताहितांनां एका राष्ट्रहितांत स्वतंत्र स्थळें मिळतात. तशीं राजकारणांत मिळत नाहींत. राजकारण हा परिस्थितीच्या परिणामांना राष्ट्रहिताकडे वळविण्याचा मार्ग होय. निरनिराळे परिणाम होई-पर्यंत मुत्सद्दी वाट पाहतात. लोकमान्य नुसते मुत्सद्दीच नव्हते. ते परि-स्थितीहि तयार करित. ह्मणूनच ते राजे शिवाजी यांप्रमाणें राष्ट्रपुरुष होते. The drama, dealing with all departments of Human Life, is necessarily political असें जें बर्नर्ड शॉ यानें ह्मटलें आहे, त्यांत Political ह्मणजे राजकारणसंबंधीं असा अर्थ नाहीं, तर लोकांसंबंधीं असा आहे. फ्रेंच व जर्मन भाषांत Politics शब्दाचा धात्वर्थ Citizen नागरिक असा आहे. मनुस्मृतींत हि राष्ट्र शब्द " लोक " या अर्थी वाप-रला आहे. लोकमान्य प्रथम नागरिक व नंतर राजकार्यधुरंधर पुरुष होऊन गेले. इतकें विवेचन झालें असतां या प्रकरणाचें स्थल चुकूं नये असें वाटतें; असो.

पूर्वार्ध समाप्त

हें पुस्तक रा. रा. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं आपल्या ' आत्माराम ' छाप-
खान्यांत छापिलें. कव्हरपेज मुंबई येथें वि. सी. जव्हेरे यांनीं आपल्या
बॉंबे आर्ट प्रि. वर्क्समध्यें छापिलें. व सर्व पुस्तक रा. रा. एकनाथ
यादव निफाडकर यांनीं धुळें येथें कर्मयोगी कार्यालयांत
प्रसिद्ध केलें.

सचित्र

# महाराष्ट्र–ग्रंथ–माला

महाराष्ट्रांत भावनाप्रधान विचारांचा रोपा आजकाल हातोंहातीं रोपविला जात आहे हें सर्वश्रुत आहेच. या रोप्याचें मुळाशीं देशीपरदेशीचे अनेक भाषांतून खत पसरलें जात आहे. या खतांचा अनुभवजन्य अचुक उपयोग पुष्कळ बागवानांस माहित नसल्यानें रोपांच्या मुळाशीं–प्रत्येक आळवालांत–वाफ्यांत–या खतांतून जो विषारी गॅस उत्पन्न होतो त्यानें पुष्कळशा रोप्यांचें अज्ञानाच्या किडीपेक्षांही ज्यास्त नुकसान होत आहे. ही परिस्थिति कांहीं कुशल बागवानांच्या लक्षांत येऊन विविधज्ञानविस्तारकारांदीसारख्यांनीं अशा विषारास उतार ह्मणून कांहीं वरिष्ठ दर्जाचें वाङ्मय निपजविण्याचा योग्य मुत्सद्दीगिरीचा डाव टाकला आहे. असे प्रयत्न जागजागीं झाले पाहिजेत. अपायाला उपाय ठिकठिकाणीं काढण्याकरितां, सद्भावनेची लस टोंचण्याकरितां निष्णात डॉक्तरांनीं दवाखाने घातले पाहिजेत. अशाच प्रकारची एक योजना "महाराष्ट्र–ग्रंथ–माला" नांवाची संस्था काढून प्रवर्तविण्याचें ठरविलें आहे. या ग्रंथमालेंत सदभिरुचीपर व ज्या त्या विषयांतील निष्णात लेखकांकडून वरिष्ठ दर्जाचें वाङ्मय निपजविण्याचें आह्मी शिरावर घेतलें आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कै. लोकमान्य टिळकांचें चारित्र:— | | कर्मयोगी |
| २ | १ सदर, उतरार्धः— | | ,, |
| | २ शरीर सरंक्षण:— | | न. ह. देशपांडे |
| ३ | म्हैसुरचा वाघ:— | (कादंबरी) | ए. या. निफाडकर |
| ४ | केवळ स्वधर्मासाठीं:— | ,, | न. ह. देशपांडे |
| ५ | पाखंडी बुद्ध:— | (नाटक) | भा. ग. साठे |
| ६ | वर्णगुरु:— | (कादंबरी) | ना. ह. आपटे. |
| ७ | शाबास शिवाजी !:— | (नाटक) | ए. या. निफाडकर |

सारांश आपल्या लोकांत सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, ऐति-

हासिक, राष्ट्रीय, आणि शारीरिक संपत्तीच्या वस्तुस्थितिवर कल्पना जागृत व्हाव्यात व त्या मनोरंजनद्वारें जनतेंत पसराव्या या धोरणानें मालेंतून ग्रंथ निर्माण करवून महाराष्ट्राच्या भावीं उदयाचा पाया रचण्याचा आमचा हेतु आहे. परिपूर्ण करणार कर्मयोगी श्रीकृष्ण समर्थ आहे.

मालेचा आकार डेमी अष्टपत्री व क्राउनषोडषपत्री या दोन आकारांपैकीं एक राहील.

## मालेचे नियम

( १ ) एक रुपया प्रवेश फी भरून कायम ग्राहकांत नांव दाखल करतां येतें.

( २ ) कायम ग्राहकांना सर्व पुस्तकें पाऊणपट किंमतीस मिळतात.

( ३ ) कायम ग्राहकास प्रसिद्ध होणारीं सर्व पुस्तकें घेतलींच पाहिजे.

( ४ ) व्ही. पी. एकदा परत केली ह्मणजे कायम ग्राहकाचें नांव कमी करण्यांत येतें. परंतु पुन्हां प्रवेश फी भरली असतांना कायम ग्राहक होतां येतें.

( ५ ) वर्षांतून चार पुस्तकें प्रत्येकी १५०–३५० पृष्ठांची प्रसिद्ध होतील.

## विनंति

लोकमान्यांच्या चरित्रास मागणी फार असल्यानें पुन्हां द्वितीयावृत्ति काढण्याचा विचार आहे. तरी **ग्राहकांनीं तावडतोब आपलीं नांवें नोंदवावीत.** मालेचा लेखक वर्ग वरील असून शिवाय बामणगावकर, अनंततनय, बेहरे, करकरे आदि विद्वान लेखकांची त्याला जोड आहे. आलेल्या मागणीवरून खप बराच मोठा आहे. तरी **जाहिराती देणारांनीं** त्वरा करावी.

## जाहिरातीचे दर

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सबंध पान दरखेपेस रु. | | ६ | अर्धेपानं रु. | रु. ४ |
| सर्व टायटल नं. ४ | | १२ | अर्धेटायटल नं. ४ | ७ |
| ,, | नं. २।३ | प्रत्येकीं. १० | ,, नं. २।३ | रु. ६ |

एजन्टस पाहिजेत. माहिती मागवा. दुसरें पुष्प एप्रिलचे सुमारास प्रसिद्ध होईल.

व्यवस्थापक **कर्मयोगी कार्यालय**
**लोकमान्य पेठ–धुळें.**

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु. व पो. आंजर्ले

कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या शुद्ध व बहुमूल्य
वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध रामबाण औषधें

# मदनविलासामृत संजिवनी

**वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह-बुद्धि कान्तिवर्धक व पूर्ण धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिक-मौतिक-कस्तुरी-प्रवाळादि मिश्र अपूर्व गुटिका.**

या गोळ्यांनीं क्षयरोग, पांडुरोग, जीर्णज्वर, मस्तकशूल, मेंदूचे विकार, वाळंतरोग, संधिवातादि अनेक वातरोग, कडकी, नेत्रविकार, कटिशूळ इत्यादि नवीन अगर जुनाट असलेले नानाविध रोग तावडतोब दुरुस्त होऊन चित्तोत्साहबुद्धि आणि कीर्ती वाढते, अंगांत परिपूर्ण शक्ति येते, शारिरस्थ रस, रक्त, अस्थि, मज्जा, शुक्र वगैरे सप्तधातूंची वृद्धि होऊन मनुष्यास सर्व प्रकारें देह अगदीं जोमदार आणि आयुष्मान् होण्यास या गुटिका हेंच अगदीं प्रतिज्ञेचें औषध होय. यामुळें याचे लक्षावधि लोक नित्य ग्राहक होत आहेत. गोळ्या रुपयाच्या आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्याहून अधिक घेणारास टपालखर्च माफ; त्याच्या आंत घेणारास ट. ख. वेगळा ४ आणे पडेल.

३२ गोळयास १ रु.; ७० गो० २ रु.; १६० गो० ४ रु. २६० गो० ६ रु.; आणि ५२० गो० १० रुपये.

**थंडगार नेत्रांजन**– यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदुकांच वगैरे डोळ्यांचे एकंदर विकार तावडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार होते. डबीस १॥ रुपया.

**कर्णस्रावनाशक अप्रतिम तेल**—यानें कानांचे सर्व प्रकारचे व्रण आणि तत्संबंधीं इतर विकार त्वरित बरे होतात. बाटलीस १ रुपया.

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काळ दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. डबी ६ आ.

**गजकर्ण, खरूज नायटे इ.** विकार ३ दिवसांत बरे होतात ड. ६ आ.

**विंचवाचें विष**—हें औषध चोळतांच उतरतें. तें ४० मनुष्यास पुरेतें. ड. ८ आणे

**हिमज्वरावर वस्ताद औषध**—पाळीचे हट्टी ताप तीन दिवसांतच बरें करतें. डबीस १ रु.

**पटकी व इतर जुलाब**—दोन तीन गोळ्यानीं जलद बरे होतात. ड. १ रु.

सुरंगी, मालती, कल्हार, राजविलास, लक्ष्मीविलास, पुष्पराज इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली जाई वगैरे वगैरे सुगंधी अत्तरें आणि केशांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तैलें पूर्ण खात्रीचीं माफक दरानें मिळतील.

**सूचना**:-वरील औषधें पूर्ण खात्रीचीं असल्यानें आज पंचवीस वर्षांत त्याचा लक्षावधि लोकांस अतिशय उपयोग झाला ह्मणून त्याचा हल्लीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. ढोंगी लोकांच्या बनावट औषधाविषयीं ग्राहकांनीं फार सावध असावें. औषधें माहितीच्या खर्च्यासह रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं, प्या. व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्याव आरोग्य-रक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक फुकट देऊ. आमची औषधें मागविणें तो खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य.**

**मु० पो० आंजर्लें ता० दापोली जि० रत्नागिरी.**

१५२९२

१५२९२